मंदा के पिता महेन्द्र गांव में अस्पताल बनाना चाहते थे, लेकिन अस्पताल उद्घाटन समारोह में उन्हकीं हत्या होती है। पिता के इस अधुरे कार्य को मंदा पुर्ण करने का निर्धार करती है। गाँव में अस्पताल हो इसलिए जिला जाकर अर्जी देती है। इस दिशा में वह सतत प्रयत्नरत रहती है। गाँव के विकास के लिए वह सतत प्रयास करती है। भजन एवं कीर्तनों का आयोजन करवाकर ग्रामीणों को जगाने का प्रयास करती है। सोनपुर गाँव में सत्संग कार्यक्रमों का आयोजन करते हुए सामाजिक पृष्ठभूमि में सुधार लाने का प्रयत्न करती है। मंदा का यह कार्य ग्रामीण समाज के विकास में महिलाओं की भूमिका को स्पष्ट करता है। मंदा के आध्यात्मिक जागरण और सामाजिक जागरण के कारण लोगों की निद्रिस्त अस्मिता जागृत हो जाती है। इस संदर्भ में मैत्रेयी पुष्पा लिखती है, "सुनते-सुनते, विचारते सोचते किसनगत का कुचला हुआ दर्प लोट-पीटकर खडा हो गया। धीरे-धीरे आत्माभिमान जागने लगा और चैतन्य हो आये सोनपुरा के लोग।" मंदा के प्रभाव के कारण गांव के आम लोगों में चेतना की लहर दृष्टिगोचर होती है। मंदा के क्रान्तिकारी विचार मजदूरों एवं किसानों के मन में इस प्रकार बैठ जाते है कि वे पूँजीपतियों के विरोध में क्रान्ति का अवलंब करते है। इस संदर्भ में मैत्रेयी पुष्पा लिखती है, " फिर क्या था गांव की भीड ने करेंट के तारों से लेकर जितने उर्जा-पुर्जा हाथ आये, जितने नट-बोल्टों तक पहुँच हो सकी, सबके सब उखाड डाले, खोल डाले, तोड डाले और उजाड डाला उसका डेरा।" मंदा मार्क्स विचारों से प्रभावित है, इसलिए मजदूरों के हक्क के लिए लडती है।

पुरुषप्रधान संस्कृति के दोहरें चरित्र पर मंदा प्रहार करती है। पुरुष दूसरा विवाह कर सकता है, पर स्त्री से संबंध रख सकता है। लेकिन कोई स्त्री इस तरह से व्यवहार करती है तब उसे प्रताडित किया जाता है। पुरुष के दोहरे मापदंड पर सवाल उठाते हुए मंदा कहती है, " गाँव में छ: आठ ऐसे जोडे है, जिन्होनें दूसरा विवाह किया है। माना कि पुरुष हैं, तो क्या अम्मा स्त्री होने के नाते दण्ड की, मखौल की, हेय दृष्टि की भागीदार है ? यदि ऐसा नही है तो उन पुरूषों को अटपटे प्रश्न क्यों नही पूछता कोई ? उन्हे क्यों नहीं निकाल देता घर से कोई ? उनकी निगाह नीची क्यों नहीं होती ? वे अस्पताल जैसी सार्वजनिक जगह में रात काटने को क्यों विवश नहीं किये जायें ? " इस प्रकार मंदा पुरुष प्रधान संस्कृति को सवालों के घेरे में खडा करती है और नारी स्वातंत्र्य की बात करती है। अभिलाख सिंह मजदूरों का शोषण करते हुए उन्हके स्त्रियों को बेचता है। मंदा ग्रामीण मजदूरों को संगठित करते हुए उसका विरोध करती है। प्रस्तुत उपन्यास में मंदा ग्रामीणों के लिए मार्गदर्शक बनते हुए उन्हे जागृत करती है और गांव के विकास में योगदान देती है।

मंदा में राजनीतिक चेतना भी दृष्टिगोचर होती है। गांव में चुनाव का माहौल होता है। राजा साहब विधायक पद के लिए पुन: उम्मीदवार बन जाते है। गांव के लोग विधायक से नाराज है, इसलिए गाँव में चुनाव बहिष्कार आंदोलन

चरम सीमा पर होता है। इसी वक्त राजा साहब की भेंट मंदाकिनी से होती है। मंदाकिनी उनके सामने प्रस्ताव रखती है कि गाँव के अस्पताल में एक डॉक्टर और एक कम्पाउण्डर का प्रबन्ध करेंगे तो गांव के लोग उन्हे वोट देगें। यहां मंदा की राजनीतिक चेतना दृष्टिगोचर होती है। प्रस्तुत उपन्यास में मंदा गावं के विकास में महत्वपूर्ण भूमिका अदा करती है। इदन्नमम उपन्यास में कुसुमा और प्रेमा भी चेतित स्त्रिया है, जो अपने हक्क के लिए तत्पर रहती है। कुसुमा अपने पति से असन्तुष्ट रहने के कारण दाउजी से संबंन्ध रखती है, जिस वजह से वह गर्भ धारण करती है। परिवार का विरोध होने के बावजूद भी वह गर्भपात न करवाकर बच्चे को जन्म देती है। प्रेमा भी नैतिकता की देहरी लाँघकर साहसी होने का परिचय देती है।

**निष्कर्ष :**

कहा जा सकता है कि इदन्नमम उपन्यास बुन्देलखण्ड के पहाडी अंचल में बसे सोनपुरा गाँव का लोक जीवन चित्रित करनेवाला यथार्थ उपन्यास है। उक्त उपन्यास में ग्रामीण समाज के परिवेश में पली, अत्याचारों को सहती, झेलती, झुझती, अभिशप्त नारी का यथार्थ अंकन हुआ है। दूसरी ओंर उक्त उपन्यास ग्रामीण स्त्री के चेतित रुप को मंदा के माध्यम से स्पष्ट करता है। मैत्रेयी पुष्पा ने प्रस्तुत उपन्यास में स्त्री संघर्ष को इस प्रकार चित्रित किया है कि नारी को वह भैरवी, दुर्गा एवं महाकाली के रुप में रखती है। इस उपन्यास के सभी स्त्री पात्र अपने-अपने तरीके से पुरुष प्रधान संस्कृति के विरोध में विद्रोह करते है। उपन्यास में मंदा, टीकमसिंह, कुसुमा भाभी, सुगना, प्रेमा आदि पात्रों की लडाई स्वयं के लिए न होकर गाँव एवं राष्ट्र के लिए है। मंदाकिनी गांव के विकास को प्राथमिकता देती है। गाँव में अस्पताल को लेकर उसका संघर्ष, गांव के मजदूरों के लिए संघर्ष, गांव के समाज को सुधारनें के लिए संघर्ष, पुँजिपतियों के विरोध में किया हुआ संघर्ष उसके विकासात्मक दृष्टि को उजागर करता है। प्रस्तुत उपन्यास के नारी पात्र दूसरों के हित के लिए संघर्ष करते है। इन पात्रों का दूसरों के लिए जीना ही उपन्यास के शीर्षक को सिध्द करता है।

**संदर्भ ग्रंथ**

१. अन्तिम दशक के हिन्दी उपन्यासों में ग्रामीण जीवन का चित्रण : डॉ. मोहम्मद जमील अहमद
२. अन्तिम दशक के हिन्दी उपन्यासों का समाजशास्त्रीय अध्ययन : डॉ. गोरखनाथ तिवारी
३. अन्तिम दशक की हिन्दी लेखिकाओं के उपन्यासों में नारी : डॉ. सय्यद अमर
४. ग्रामीण विकास : कटार सिंह
५. सामाजिक समस्याऐं : राम आहूजा
६. समाजशास्त्र के सिध्दांत : भावना गुप्ता
७. भारतीय समाजिक व्यवस्था : राम आहूजा
८. भारतीय ग्रामीण समाजशास्त्र : ए.आर.देसाई
९. उच्चत्तर समाजशास्त्र विश्वकोश : हरिकृष्ण रावत

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# लघु उद्योग आणि ग्रामीण समुदाय विकास

**प्रा. बालाजी वैजनाथ आचार्य**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव
ता.अहमदपूर जि. लातूर

**प्रस्तावना :-**

ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था औद्योगिक दृष्टीने प्रगत होती. या प्रगतीमुळेच ब्रिटिश भारतामध्ये आकर्षित झाले आणि 150 वर्ष भारतावर राज्य करुन भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळ करुन टाकली. भारतातील लघु आणि कृषी उद्योगाचा ऱ्हास झाला. पण भारताच्या विकासात लघु उद्योगाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. भारतासारख्या विकसनशील देशात कमी भांडवलात चालणारे आणि अधिक रोजगार उपलब्ध करुन देणारा उद्योग म्हणजे लघू उद्योग होय. लघू उद्योगाचा राष्ट्रीय उत्पन्नातील व निर्यातीतील वाटा महत्वपूर्ण आहे. भारतात तयार झालेले मलमलचे कापड आणि मसाल्याचे पदार्थ, सिरॅमिक्सची उत्पादने, धातूची भांडी, लाकडावर नक्षीकाम केलेल्या वस्तू याना देश-विदेशात मागणी आहे. 1989-90 पर्यंत ग्रामीण लघु उद्योगाची निर्यात क्षमता (चालू किंमतीच्या संदर्भात) रु. 14,807 कोटी पर्यंत पोहंचली आहे. 1991 मध्ये सरकारने लघु उद्योगाबाबतचे नवे धोरण जाहीर केले. त्यानंतर उत्पादन वाढले, रोजगार निर्मितीची क्षमता वाढली त्याच बरोबर निर्यातही वाढली. देशाच्या एकूण निर्यातीत हा वाटा 44% इतका आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला रोजगार निर्मिती क्षमता आणि निर्यात क्षमता दोन्ही अर्थव्यवस्थेसाठी महत्वाच्या आहेत. भारतातील लघु उद्योगाचे महत्व लक्षात घेण्यापूर्वी लघु उद्योग म्हणजे काय आहे हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

**व्याख्या :-**

लघु उद्योगाची व्याख्या ज्यात गुंतवल्या जाणाऱ्या भांडवलाच्या व कामगाराच्या आधारावर केली जात असल्याने काळानुरुप त्यात बदल झालेला दिसतो. काही महत्वाच्या व्याख्यांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

1) फिस्कल कमीशनने 1949-50 ला केलेली व्याख्या खालीलप्रमाणे-लघु उद्योग म्हणजे असा उद्योग की ज्यात 10 ते 50 कामगार काम करतात.
2) औद्योगिक विकास व नियमन ॲक्ट 1951 - लघु उद्योग म्हणजे असा उद्योग की, ज्या उद्योगात विद्युत शक्तीचा वापर करुन 50 पेक्षा कमी लोक काम करतात किंवा विद्युत शक्तीचा वापर न करता 100 पेक्षा कमी लोक काम करतात अशा उद्योगाला लघु उद्योग असे म्हणतात.
3) 1975 ‘‘ज्या उद्योगात 10 ते 15 लाख रुपये भांडवल गुंतवले जाते त्या उद्योगाला लघु उद्योग असे म्हणतात’’.
4) 1980 ‘‘ज्या उद्योगात 20 ते 25 लाख भांडवल गुंतवले जाते त्या उद्योगाला लघु उद्योग असे म्हणतात. ’’
5) 1990 ला भारत सरकारने लघु उद्योग म्हणजे असे उद्योग की, ज्या उद्योगात गुंतवणूक 60 लाखापेक्षा जास्त नाही अशी व्याख्या दिली.
6) 1999 - लघु उद्योगाची गुंतवणूक सीमा घटवण्यात आली 1 कोटी पर्यंत ती कमी करण्यात आली.
7) 2007-08 च्या अंदाजपत्रकानुसार ज्या उद्योगात 1.50 कोटी रुपयापर्यंत भांडवल गुंतवले जाते अशा उद्योगाना लघु उद्योग असे म्हणतात.

**लघु उद्योगाचा विकास :**

भारतात लघु उद्योगाची विभागणी आठ विभागात केली. 1) खादी 2) ग्रामोद्योग 3) हातमाग 4) रेशीम 5) हस्तकला उद्योग 6) कॉपर उद्योग 7) कृषी आधारीत लघु उद्योग 8) यंत्रमाग

लघु उद्योगात पारंपरिक तंत्रज्ञानाचा व मनुष्य शक्तीचा अधिक वापर केला जातो. लघु उद्योगाचा विकास विविध पंचवार्षिक योजना काळात झालेला दिसून येतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेत लघु उध्योगासाठी 44 कोटीची तरतूद करण्यात आली होती. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत तरतूदीत वाढ करण्यात आली. आठव्या योजनेत 4.778 कोटीची तरतूद होती. यातून रोजगार उत्पादन निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. लघु उध्योगामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानात सुधारणा करण्यासाठी आणि आधुनिकीकरणासाठी लघु उद्योग महामंडळाने 200 कोटी निधी उभारला आहे.

अप्रगत आणि मागास क्षेत्रात लघु उद्योगाची वाढ घडवून आणण्यासाठी वाहतूक, दळणवळण व इतर सोई-सुविधा मध्ये वाढ करण्याचे ठरविले व यासाठी मागास राज्यांमध्ये खास केंद्राची उभारणी करण्यात आली. इंदौर, अहमदाबाद, भुवनेश्वर, जमशेदपूर, औरंगाबाद या ठिकाणी जर्मन, डॅनिश आणि इटालियन मदतनीसाच्या साह्याने लघु उद्योगांना खास तांत्रिक मार्गदर्शन करणारी केंद्र उभारण्यात आली आहेत.

**लघु उद्योगाचे महत्व :**

1) राष्ट्रीय उत्पन्नात लघु उद्योगाचा वाटा मोठा आहे.
2) रोजगार निर्मितीची क्षमता मोठ्या उद्योगाच्या तुलनेत अधिक असते.
3) अल्प भांडवलात उद्योगाची उभारणी करता येते आणि उत्पादन खर्च कमी असतो.
4) आर्थिक विषमता कमी करण्यास सहाय्यक.
5) सुप्त साधन संपत्तीचा वाढता उपयोग.
6) शेतीची उत्पादकता वाढते.
7) अल्प कौशल्य.
8) उद्योगाचे विकेंद्रिकरण होते.
9) विदेशी चलन मिळविता येते.
10) उद्योग स्थापनेचा कालावधी कमी.
11) संपत्तीचे योग्य वाटप करता येते.
12) तेजी मंदीवर नियंत्रण ठेवता येते.
13) शेतीवरचा भार कमी करता येतो.
14) स्थैर्यासहीत विकास.
15) प्रादेशिक समतोल निर्माण करता येतो.

**लघु उद्योगाच्या समस्या :**

1) भांडवलाची कमतरता.
2) कच्च्या मालाची समस्या.
3) ऊर्जेची समस्या.
4) यंत्रसामुग्रीच्या सुट्या भागाची समस्या.
5) जुने उत्पादन तंत्र.
6) विक्री व्यवस्थेची समस्या.
7) मोठ्या उद्योगाशी करावी लागणारी स्पर्धा..
8) करांचे वाढते प्रमाण.
9) आजारी उद्योगाचे वाढते प्रमाण.

**लघु उद्योगांच्या समस्येवरील उपाययोजना :**

1) कच्च्या मालाचा पुरवठा करणे.
2) भांडवलाचा पुरवठा करणे.
3) औद्योगिक वसाहतीची स्थापना करणे.
4) सरकारद्वारे वस्तूची खरेदी करणे.
5) स्वस्त दरात वीज पुरवठा करणे.
6) बाजारपेठ विषयक मदत.
7) तांत्रिक मदत.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्यपूर्व काळात लघुउद्योग क्षेत्राकडे ब्रिटिश शासनाने पूर्ण दुर्लक्ष केले होते. 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतातील ग्रामीण बेकारी सोडविण्याचा एक परिणामकारक मार्ग म्हणून लघुउद्योग क्षेत्राकडे लक्ष पुरविण्यात आले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लघुउध्योग क्षेत्राचा विकास करणे आवश्यक झाले आणि नियोजन काळामध्ये लघुउद्योगाच्या विकासावर विशेष भर देण्यात आला.

अनादी कालापासून ग्रामीण भाग स्वावलंबी आणि स्वतंत्र होता. लोक आपापल्या उद्योगात रममाण होते. ग्रामीण भागात यंत्राद्वारे तयार होणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तु आल्या. यंत्रामुळे गुणात्मक व सख्यात्मक दर्जा सुधारला पण उत्पादन खर्च वाढला. यात ग्रामीण समुदाय टिकू शकला नाही आणि कृषी उद्योग सर्व ग्रामीण भागातील बेकारांना सामावून घेण्यास असमर्थ ठरला. शहरी भागात काम शोधण्यासाठी ग्रामीण समुदायाचे स्थलांतर झाले. शहरी भागावरील ताण वाढून अनेक समस्या निर्माण झाल्या. यातून ग्रामीण औद्योगिकरणाचे महत्व वाढले. ग्रामीण औद्योगिकीकरणातून गावात रोजगार मिळाला आणि ग्रामीण समुदाय शारीरिक, मानसिक, बौद्धिकदृष्ट्या सक्षम झाला. त्याच्या कौशल्यात वाढ झाली. ग्रामीण औद्योगिकरण ग्रामीण भागातील लोकांना स्वावलंबी बनविले. हे महात्मा गांधी यांचे मत सत्य ठर्‍ले. यामुळे ग्रामीण औद्योगिकरणाच्या प्रयत्नातून लघु उद्योग आणि ग्रामीण उद्योगाच्या विकासातून मोठे उद्योग निर्माण व्हावेत असा प्रयत्न आहे. पायाभूत सेवा सुविधाद्वारे हे कार्य केले जाईल.

**संदर्भ :**

1) डॉ.स. श्री मु. देसाई, डॉ.सौ.निर्मल भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.
2) डॉ. सौ. स्मिता कोंडेवार, कोटलवार - भारतीय अर्थव्यवस्था, अरुणा प्रकाशन, लातूर.
3) डॉ. शंकर चिंतामन दीक्षित - भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.
4) चांदूरकर, राजूरकर - भारतीय विकासाचे अर्थशास्त्र, किताब महल, अलाहाबाद.
5) प्रा.डॉ. सुर्यकांत पवार - भारतीय अर्थव्यवस्था, स्वयंदीप प्रकाशन, पुणे.
6) डॉ.बी.डी. इंगळे - महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरुणा प्रकाशन, लातूर.
7) डॉ.आर.एस. सोळूंके - महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, कैलास पब्लिकेशन्स, पुणे.
8) डॉ. दि. के, देशपांडे - औद्योगिक अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.
9) प्रा.डॉ. यू. बी. कोंडेवार, प्रा. डॉ. स्मिता कोंडेवार - औद्योगिक अर्थशास्त्र, शोभाभारती प्रकाशन, अहमदपूर.

# शासकीय धोरण आणि ग्रामीण समाजाचा विकास

**प्रा. व्ही.डी आचार्य**
राज्यशास्त्र विभाग
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय
लोहाराता. लोहारा जि. उस्मानाबाद

१.० **गोषवारा (Abstract) :-**

*भारताच्या आर्थिक, सामाजिक, आणि औद्योगिक विकासामध्ये शासकीय धोरणांच्या आखणीला व अंमलबजावणीला महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. शासकीय धोरणांनी ग्रामीण विकासालाही प्रभावित केले आहे. शासकीय धोरण ग्रामीण विकासास अनुकूल असल्यास ग्रामीण विकास झपाट्याने घडूनयेतो.मात्र प्रतिकूल शासकीय धोरण ग्रामीण विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करते. सन १९९१ च्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या सरकारच्या नव्या आर्थिक धोरणानंतर ग्रामीण विकासात आमुलाग्र बदल घडून आला. एका बाजुला ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सुख-सुविधा त्याचप्रमाणे पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या, तर दुसऱ्या बाजुला ग्रामीण विकासावर शासकीय धोरणांचा विपरीत परिणाम होऊन ग्रामीण लोकसंख्येचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर शहरी भागाकडे झाल्याने ग्रामीण भागाचे महत्व कमी होऊन शहराचे आकर्षण वाढले. शासकीय धोरणाच्या प्रतिकूलतेमुळे ग्रामीण समाज हा शहरी समाजाच्या तुलनेने आर्थिक, सामाजिक, राजकिय, व औद्योगिक दृष्ट्या मागास राहिला आहे.*

१.१ **महत्वाचे शब्द :-** आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, शासकीय धोरण, अनुकूल, प्रतिकूल, पायाभूत-सुविधा, लोकसंख्येचे स्थलांतर.

## २.० प्रस्तावना ( Introduction) :-

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत देश २६ जानेवारी १९५० या दिवशीपासुन सार्वभौम, लोकशाही, गणराज्य म्हणुन उदयास आला. याचाच अर्थ भारतावरील ब्रिटीशांचे नियंत्रण पुर्णपणे संपले. भारत देश देशांच्या अंतर्गत कारभारात व आंतराष्ट्रीय राजकारणात स्वत: निर्णय घेण्यास व धोरणे ठरविण्यात स्वतंत्र व सार्वभौम असल्याने त्यावर इतराचें नियंत्रण राहिले नाही. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी आवडी येथील काँग्रेसच्या अधिवेशनात मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. याचाच अर्थ त्यांनी यातुन समाजवाद व भांडवलशाही यांचा सुवर्णमध्य साधला. म्हणजेच आपल्या देशाने समाजवादाबरोबर भांडवलशाहीचा स्विकार केला असल्याचे दिसते. देशाच्या पहिल्या पंतप्रधानांनी लोह, पोलाद, संरक्षण यासारख्या महत्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण केले होते. याचाच अर्थ ते उद्योग हे सार्वजनिक होते. तर कमी महत्वाच्या उद्योगांचे खाजगीकरण करण्याचे धोरण त्यांनी आखल्याचे आपल्याला दिसून येते. नेहरुनी भारतामध्ये काही प्रमाणात समाजवादी अर्थव्यवस्था स्विकारली याचे कारण भारतातील आर्थिक विषमता कमी करुन गरिब व श्रीमंत यांच्यातील दरी कमी करण्याचा आहे असे सांगितले जाते.स्वातंत्र्यापूवी महात्मा गांधीजीनी खेड्याकडे परत चला अशा प्रकारचा संदेश भारतीय जनतेला दिला होता. त्याचप्रमाणे गांधीजीनी हिंद स्वराज्य या आपल्या ग्रथांत 'रामराज्याची कल्पना' मांडली होती. महात्मा गांधीचे रामराज्य हे सर्व खेड्यांच्या विकासावर म्हणजेच ग्रामीण विकासावर अवलंबून असल्याचे आपणास दिसते.

## २.१ महात्मा गांधीजीची रामराज्याची संकल्पना :-

महात्मा गांधीजी चे रामराज्य म्हणजे असा ग्रामीण भारत की जेथे कोणीही श्रीमंत व गरिब असणार नाही. कोणावरही अन्याय होणार नाही, कोणीही दुसऱ्यावर अन्याय करणार नाही, सर्वजण आपण एकाच कुटुंबातील सदस्य आहोत, या भावनेने आपले सर्व जीवन राष्ट्र कार्यास वाहुन घेतील. तसेच या राज्यात शारिरीक कष्टाला महत्वाचे स्थान असेल व सर्वजण स्वावलंबी असतील. प्रत्येकाला आपआपल्या कामानुसार मोबदला मिळेल. अशाप्रकारे महात्मा गांधीजीनी रामराज्याची संकल्पना मांडलेली होती. मात्र स्वांतत्र्योतर काळात त्यांच्या या संकल्पनेकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष झाले असल्याचे आपणास दिसते.

खेड्यांच्या स्वंयपुर्णतेतुन महात्मा गांधीजीनी भारताच्या ग्रामीण विकासाचे खुप मोठे स्वप्न महात्मा गांधीजीनी पाहिले होते. भारतातील खेडे हे प्रत्येक बाबतील स्वयंपुर्ण बनले पाहिजे, खेडेच देशाचे संपुर्ण स्वरुप पालटु शकतात व जगामध्ये देशाला एक नवे स्थान देऊ शकतात. असे गांधीजीनी पाहिलेले स्वप्न मात्र आज प्रत्यक्षामध्ये उतरल्याचे दिसत नाही.

२.२.**ग्रामीण भागाच्या विकासासाठी सरकारने आखलेली अनुकूल धोरणे :-**

स्वांतत्र्योतर काळात ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी शासनाने काही धोरणे आखली व कार्यक्रम राबवले. त्यासाठी सरकारने खालील प्रमाणे काही कार्यक्रम / योजना राबविले असल्याचे दिसून येते.

१. **स्वर्णजयंती स्वंयरोजगार योजना :-** दारिद्रय रेषेखालील गरिब व्यक्तींना तीन वर्षात दारिद्यरेषेच्यावर आणणे हा या स्वर्णजयंती स्वयंरोजगार योजनेचा उद्देश आहे. अशा निवडक लाभार्थीचे उत्पन्न दरमहा रु दोन हजारापर्यंत वाढवीत न्यायचे हे धोरण आहे, ही योजना शासन पुरस्कृत असुन बँकेमार्फत राबविली जाते.
२. **जवाहर ग्रामसमृध्दी योजना :-** दारिद्यरेषेखालील बेरोजगारांना ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. यासाठी ग्रामपंचायतीने योजना तयार करावी लागते. गावाच्या विकासासाठी पायाभुत सोयी उपलब्ध होतील असे त्या कामाचे स्वरुप असावे त्यातुन बेरोजगारांना काम मिळेल व गावाचा विकास होईल.
३. **रोजगार हमी योजना :-** देशात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याने ही योजना राबविली असुन प्रामुख्याने दुष्काळी भागातील गरिब लोकांना काम मिळेल अशा योजना (सिंचन,रस्ते, सार्वजनिक बांधकाम इ.) योजना राबविल्या जातात. कामाची हमी दिली जाते मजुरी काही रोख आणि काही धान्याच्या स्वरुपात दिली जात होती. आज मात्र मजूरी संपुर्णपणे रोख स्वरुपामध्ये दिली जाते.
४. **इंदिरा आवास योजना :-** दारिद्यरेषेखालील व्यक्तिंना घरे बांधण्यासाठी अनुदान दिले जाते. लाभार्थी मध्ये ६० % लोक हे मागासवर्गीय असावेत आणि त्यांच्या नावाची शिफारस ग्रामसभेने करावी लागते. आज इंदिरा आवास योजनेचे नाव बदलुन प्रधानमंत्री आवास योजना असे करण्यात आले आहे.
५. **इंदिरा गांधी पेन्शन योजना :-** शेतमजूर असतील आणि जे दारिद्यरेषेच्या खाली असतील अशा शेतमजुरांना पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे.लाभार्थींना दरमहा पेन्शन दिली जाते.

वरील योजनांपैकी काही योजना केंद्र सरकार पुरस्कृत असतात. त्यांचे स्वरुप सर्व राज्यांत सारखेच असते. परंतु काही योजना या राज्य शासनामार्फत राबविल्या जातात. त्यांचे स्वरुप राज्याराज्यात भिन्न असु शकते. आर्थिक सत्तेचे विक्रेंद्रीकरणे आणि स्थानिक नेतृत्वाच्या हातात असलेले अंमलबजावणीचे अधिकार यामुळे दारिद्रय निर्मुलनाच्या योजना यशस्वी होण्यास गति प्राप्त झाली. त्यातुन आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास मदत झाली. निर्वाचित सदस्य लोकशाहीतील सदस्यापेक्षा अधिक जबाबदार असतात आणि स्थानिक परिस्थितीची त्यांना अधिक जाण असते. असे असले तरी या योजनांमध्ये भ्रष्टाचार झाल्याने व सरकारडुन या योजनांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने ग्रामीण भागाचा विकासाचा हेतु पुर्ण होऊ शकला नाही. गरिबी हटाव या घोषणेबरोबरच अमिरी हटाव या घोषणेची दखल घ्यायला हवी होती. तरी दखल घेतल्या न गेल्याने ग्रामीण व शहरी भागातील लोकांच्या उत्पन्नातील तफावत वाढत गेली.

२.३.**ग्रामीण भागाच्या विकास मार्गातील अडथळे :-** स्वातंत्र्यानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचे समर्थन करुन भांडवलशाहीचे समर्थन केले होते. याचाच अर्थ भाडवलदारांना पोषक वातावरण स्वातंत्र्य मिळाल्यापासुन तयार करण्याचे धोरण शासनाने आखलेले असल्याचे दिसुन येते. परंतु याचा अतिरेक सन १९९१ च्या शासनाने स्विकारलेल्या नविन आर्थिक धोरणात झाल्याचे आपल्याला दिसुन येतो. कारण नविन आर्थिक धोरणानुसार शासनाने खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण म्हणजेच (CPG) धोरण स्विकारले. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असल्याचे आपल्याला दिसते. उदारिकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा देशात प्रवेश झाला आणि ग्रामीण भागातील छोटे उद्योग, कुटीरोद्योग, बहुराष्ट्रीय कंपन्यापुढे टिकु शकले नाही. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था धोक्यात आली. शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट बनली याचे कारण भारत जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य असल्याने सरकारला शेतीमालाचे आयात-निर्यात धोरण ठरविण्याचे स्वातंत्र्य उरले नाही. ग्रामीण भागात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले. आज शेती विषयी ग्रामीण भागात आकर्षण राहिले नसल्याने ग्रामीण भागातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर शहरी भागाकडे स्थलांतर करित असल्याचे दिसते.

आपल्या देशात सर्वात मोठी आणि रोमारोमात भिनलेली समस्या म्हणजे भ्रष्टाचार. ती कमी होण्याऐवजी दररोज वाढत आहे. 'सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि जास्त सत्ता असेल तर तो अधिक भ्रष्ट होतो असे विचारवंत सांगतात. ' समाजातील दुर्लक्षित व्यक्तींच्या विकासासाठी राखुन ठेवलेला पैसा त्याच्यापर्यंत फक्त १५ टक्केच पोहचतो. त्यातुन अनेक घोटाळे उघडकीस आले आहेत. ग्रामसभेपासुन लोकसभेपर्यंत प्रतिनिधीची खरेदी-विक्री होत असल्याचे अनेकदा उघड झाले आहे. नौकरशाही, कर्मचारी हेच फक्त भ्रष्टाचार करतात असे नाही तर राज्यकर्ते आणि समाजसेवकही भ्रष्टाचारात सामील आहेत. अशाप्रकारे देशात मोठ्या प्रमाणातील भ्रष्टाचारही ग्रामीण विकासाला अडथळा आहे. सरकारने

भ्रष्टाचारविरोधी कडक धोरणे अद्यापही आखलेली दिसुन येत नाही. अद्यापपर्यंत देशाला सशक्त लोकपाल मिळालेला नाही. यावरुन सरकार कडक धोरण ठरविण्याबाबत चालढकल करत असुन निरुत्साही असल्याचे दिसुन येते.

- **संशोधनाचे महत्व ( Singificance of Research ) :-** प्रस्तुत संशोधनात शासकीय धोरणांच्या प्रतिकूल व अनुकूल परिणांमामुळे ग्रामीण समाजाच्या विकासावर कसा परिणाम झाला ? त्यामागची कारणे कोणती ? त्याचप्रमाणे ग्रामीण विकासाच्या बाबतीत शासकीय धोरणांमध्ये कोणकोणत्या त्रुटी राहिल्या आहेत इ. प्रश्नांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे ( Objective of Research ) :-**
  १. शासकीय धोरणांचा ग्रामीण भागाच्या विकासावरील होणाऱ्या परिणामाचा शोध घेणे.
  २. शासकीय धोरण ग्रामीण विकासास अनुकूल तसेच प्रतिकूल आहे का ? याचा अभ्यास करणे.
  ३. शासकीय धोरणातील ग्रामीण विकासासाबत असणाऱ्या त्रुटींचा अभ्यास करणे.
  ४. ग्रामीण विकासासाठी आवश्यक असणारे शासकीय धोरण कसे असावे यासाठी उपाययोजना सुचविणे.

- **संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research ):-**
  १. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी शासनाने विविध प्रकारच्या योजना आखलेल्या असल्याचे दिसते.
  २. ग्रामीण विकासासाबाबत शासनाचे धोरण हे निरुत्साही असल्याचे दिसते.
  ३. शासकीय धोरणात असणाऱ्या त्रुटीमुळे ग्रामीण विकासात मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण झाले आहेत.

- **संशोधन पद्धती (Research Methodology ) :-** प्रस्तुत संशोधनासाठी व्दितीय तथ्य संकलन साधनांच्या साहाय्याने विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

- **निष्कर्ष (Conclusion) :-**
  १. स्वातंत्र्योतर काळात शासनाने ग्रामीण विकासाकरिता अनेक प्रकारचे कार्यक्रम व योजना राबविल्या मात्र त्यात मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळतात.
  २. सरकारी (शासकीय) धोरणांना ग्रामीण भागांचा समतोल आर्थिक, सामाजिक, राजकीय व औद्योगिक विकास साधण्यात अपयश आल्याचे दिसते.
  ३. शासकीय धोरणे ग्रामीण विकासास पोषक नसल्याने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्याचे दिसुन येतात.

- **शिफारशी (Recomendation):-**
  १. शासनाने धोरणे आखताना ग्रामीण भागाला अधिक प्राधान्य द्यावे.
  २. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची निर्मिती करुन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करावी.
  ३. ग्रामीण भागात औद्योगिकीकरणाला चालना द्यावी.

- **संदर्भ (References):-**

१. डॉ. जोशी सुधाकर, 'भारतीय शासन आणि राजकारण'
२. Pannikar K.M, 'Foundation of New India'
३. खेडकर दिगंबर, 'आधुनिक भारतीय राजकिय विचारवंत'
४. Gupta D.C., 'Indian Govt. and Poltitcs'
५. कोठारी रजनी, 'Poltitics in India'
६. गांधी मोहनदास करमचंद,'हिंद स्वराज'

# ग्रामीण विकास आणि जलयुक्त शिवार अभियान

**प्रा. डॉ. आशा दगडू आकोलकर**
(लोकप्रशासन विभाग)
शरदचंद्र महाविद्यालय,
शिराढोण ता.कळंब जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना-**

भारतातील जवळ जवळ ७० टक्के लोक हे शेती या व्यवसायावर अवलंबून आहेत. भारतातील प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. शेती विकासासाठी पाणी हा मुख्य घटक आहे. अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्याला टंचाई परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. २०१४-२०१५ मध्ये भूजल पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २ हजार २३४ गावे तसेच प्रशासनाने टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या २२ जिल्हातील १९ हजार ५९ गावामध्ये हे अभियान प्राधान्याने राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रात सतत पडणारे दुष्काळ व या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य प्रशासनाने जलयुक्त शिवार ही योजना अमंलात आणली. पिण्यासाठी लागणारे पाणी, शेती, उदयोग व इतर उपयोगासाठी लागणाऱ्या पाण्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. एक हंडा पाण्यासाठी वणवण भटकणारी महिला दुसरीकडे शुध्द पाणी वाया जात आहे. असे विसंगत चित्र अनेक शहरी भागात दिसत आहे. यासाठी जलसाक्षरता व जनजागृती निर्माण होण्याची गरज आहे. सन २०१४ मध्ये पर्जन्यमानात सरासरी २०% पेक्षा जास्त घट असलेले १८४ तालुके आहेत, तर भुजल पातळीत ३ मीटरपेक्षा जास्त घट झालेले, ७२ तालुके २ ते ३ मीटरपेक्षा जास्त घट झालेले, ११६ व १ ते २ मीटर पेक्षा जास्त घट झालेले, १९० तालुके आहेत. म्हणजेच भूगर्भातील पाणी पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट प्रशासनाने दि. २५ नोव्हे २०१४ च्या प्रशासन निर्णयान्वे २२ जिल्हयातील १९०५० गावांमध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केलेली आहे. तसेच राज्यातील मोठया प्रकल्पात सरासरी ८१ % मध्यम प्रकल्पात, सरासरी ६७ % व लघु प्रकल्पात, सरासरी ६०% पाणीसाठा उपलब्ध आहे. सन २०१२-१३ मध्ये टंचाई परस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पुणे विभागातील ५ जिल्हयात जलयुक्त गाव अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये सर्व विभागाच्या समन्वयातून एकत्रितपणे वेगवेगळया योजना राबवून पाणी अडविण्यासाठी व भूजल पातळीत वाढ करण्यासाठी कृति आराखडा तयार करण्यात आला. या अभियानात जलसंधारणाच्या माध्यमातून विभागात पाणलोटाची कामे सिमेंट साखळी नाला बांधकामे, जूने अस्तित्वातील सिमेंट साखळी नालाबांध दुरूस्ती व नुतणीकरण जलस्त्रोतातील गाळ काढणे, जलस्त्रोत बळकटीकरण, विहिर पुनर्भरण उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि ओढे / नाले जोड कामे हाती घेण्यात आली. या सर्व कामांच्या माध्यमातून ८.४० टी.एम.सी. क्षमतेचे विकंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यात आले आहेत. त्यामुळे टंचाई परिस्थितीवर कायम स्वरूपी मात करण्यास मदत झाली आहे.

या सर्व कार्यक्रमाची फलश्रुती विचारात घेता 'सर्वासाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९' करण्यासाठी व टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करून पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

**संशोधनाचा उद्देश -**

. १. जलयुक्त शिवार योजनेची व्याप्ती समजून घेणे.
२. जलयुक्त शिवार योजनेचा उद्देश समजून घेणे.

**संशोधनाची गृहितके-**

१. जलसिंचनाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.
२. जलयुक्त शिवार योजनेमुळे जनजागृती निर्माण होत आहे.

**महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार योजना -**

जलयुक्त शिवार अभियान हे राज्यशासनाचे गावागावात पोहचलेले आणि यशस्वी ठरलेले अभियान आहे. सन २०१९ पर्यंत दुष्काळमुक्त महाराष्ट्र हा संकल्प पुर्ण करण्यासाठी या अभियानाच्या माध्यमातून शासनाने वाटचाल सुरू

ठेवलेली आहे. राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्ध करून देताना पाण्याच्या बाबतीत गावे स्वंयपूर्ण करणे हे या अभियानाचे मुख्य उदिष्ट आहे.

**जलयुक्त शिवार अभियानाचा उद्देश -**

राज्यात सतत टंचाई सदृश्य परिस्थिती विचारात घेऊन सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान हाती घेण्यात येत आहे.

१. पावसाचे जास्त्ीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच अडविणे.
२. राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे. शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
३. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
४. राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती व ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनर्निवीकरण करून पाणी पुरवठयात वाढ करणे.
५. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे.
६. विकेंद्रींत पाणी साठे निर्माण करणे.
७. अस्तित्ववातील जलस्त्रोतांमधील गाळ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे.
८. वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे.
९. पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव १ जागृती निर्माण करणे.
१०. शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यास प्रोत्साहन देणे.
११. पाणी अडविणे/जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित करणे लोकसहभाग वाढविणे.
१२. भूजल अधिनियम अंमलबजावणी करणे.

**अभियानाची व्याप्ती-**

सदर कार्यक्रम अभियान स्वरूपात शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्योजक यांचे कडील उपलब्ध निधीतून राज्यातील टंचाई सदृश्य तालुक्यात व उर्वरीत भागात भविष्यात टंचाई भासु नये यासाठी राबविण्यात येत आहे.

१. विभागीय समन्वय समिती २. जिल्हास्तरीय समिती ३.लातुका स्तरीय समिती

या समित्या स्थापन केल्या आहेत. त्यातून अमंलबजावणी केली जाते.

**अभियानांतर्गत घ्यावयाची कामे-**

जलयुक्त शिवार अभियांनात खालील कामे घ्यावीत याबाबतचा सविस्तर तपशिल परिशिष्ट पुढील प्रमाणे आहे.

१. पाणलोट विकासाची कामे.
२. साखळी सिमेंट कॉक्रीट नाला बंधाऱ्याची कामे नाला खोलीकरण, रूंदीकरणासह करणे.
३. जुन्या जलसंरचनांचे पुर्नजिवन करणे.
४. पाझर तलाव, लघुसिंचन तलाव दुरूस्ती, नुतनीकरण तलाव व क्षमता पुनस्थापित करणे.
५. अस्तित्वातील लघुपाट बंधारे संरचनांची (केटी वेअर, साठवण बंधारा ) दुरूस्त्ी करणे.
६. पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, शिवकालीन तलाव, ब्रिटिशकालीन तलाव, निजामकालीन तलाव, माती नालाबांधातील गाळ काढणे.
७. मध्यम व मोठया प्रकल्पाची सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाय योजना करणे.
८. छोटे ओढे, नाले जोड प्रकल्प राबविणे.
९. विहीर, बोअरवेल पुनर्भरण कामे.
१०. पाणी वापर संस्था बळकट करणे.
११. कालवा दुरूस्त करणे.
१२. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर.
१३. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे.

**सर्वासाठी पाणी -**

टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ उपक्रमातर्गत राबण्याच्या उपाययोजनांसाठी डिलिव्हरींग चेंज फाऊंडेशन (डीसीएफ) आणि पेमांडु यांच्याव्दारे १९ ते २७ जुन २०१४ दरम्यान आयोजित सर्वांसाठी पाणी वॉटर लॅब मध्ये सर्व घटकांच्या सहभागातून आणि सहमतीव्दारे विकसीत झालेल्या प्राधान्यक्रमांचा , निकषाचा अवलंब केला जाईल.

**अभियानाचा कालावधी -**

अभियानांतर्गत नियोजित कामे पावसाळयापूर्वी पूर्ण होतील. अशी कार्यवाही करणे आवश्यक असल्याने डिसेंबर अखेर कृति आराखडा तयार करण्यात यावा. त्यास विभागीय समितीची मान्यता घेवून जानेवरीच्या पहिल्या आठवडयात प्रत्येक तालुक्यातून किमान ५ कामे सुरू करावीत या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी जानेवारी २०१५ ते जानेवारी

२०१६ पर्यंत करण्यात यावी व त्यानंतर जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ या कालावधीत मूल्यमापनाचे काम करण्यात यावे याप्रमाणे सन २०१९ पर्यंत सदर अभियानाची अंमलबजावणी करण्यात यावी.

ज्या गावात तीव्र पाणी टंचाई आहे, अशा गावात पाण्याच्या ताळेबंदानुसार पाण्याची गरज लक्षात घेउुन कार्यक्रम राबवावा.

**गावासाठी पाण्याचा ताळेबंद तयार करणे -**

जलयुक्त शिवार अभियान तंत्रशुध्दरित्या राबविण्याकरिता संबंधित गावातील पाण्याचा ताळेबंद तयार करणे आवश्यक आहे. सदर ताळेबंद कृषी जलसंधारण, जलसंपदा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यानी तयार करावा. पाण्याचा ताळेबंद तयार करण्यासाठी खालील ठळक बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. पाणलोट क्षेत्रामध्ये प्रत्यक्षात पडणारा पाऊस.
२. पाणलोटातील एकूण पाण्याची उपलब्धता.
३. पावसाचा निव्वळ वाहून जाणारा भाग.
४. गावासाठी नेमकी पाण्याची गरज अ) पिण्यासाठी आणि ब) सिंचनासाठी
५. वाहून जाणाऱ्या पाण्यामधून आपण किती आडविले आहे आणि अजून किती पाणी अडवू शकतो याचबरोबर हे पाणी कोणकोणतया उपचार पध्दतीने व किती अडविलेल आहे आणि संभाव्य किती पाणी अडविणे आवश्यक आहे हे ठरवावे.
६. नविन घ्यावयाचे उपचार प्राधान्यक्रम - गावातील पाण्याची गरज भागविण्यासाठी गावामध्ये अस्तित्वात असलेल्या उपचाराशिवाय आणखी नव्याने काही उपचार हाती घ्यावयाचे आवश्यकता असल्यास ते खालील प्राधन्यक्रमाणे पूर्ण करण्यात यावेत.
   १. सलग समतल चर/खोल समतल चर
   २. शेततळी
   ३. गॅबीयन बंधारे
   ४. सिमेंट बंधारे
   ५. नवीन केटी वेयर/पझार तलाव
   ६. वनीकरण, कुरण विकास
   ७. नाले, ओढा, जोडकामे
   ८. विहीर पुर्नभरण.

**मुल्यमापन-**

जलयुक्त शिवार योजनेमुळे प्रत्येक गाव हे जलसाक्षर झाले आहे. प्रत्येक गावामध्ये जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याच्या एका थेंबाचे महत्व हे गावाला कळल्यामुळे श्रमदानातून जलयुक्त शिवार योजना साकार होत असल्यानचे दिसून येत आहे. छोटया छोटया गटांनी पुढाकार घेऊन गावकऱ्यांचा सहभाग मिळविला आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन झाले पाहिजे याची जाणीव महाराष्ट्रातील खेडयापाडयात निर्माण झाली आहे. नदया, नाले, ओढे, तलाव खोलीकरण, रूंदीकरण, ओढे इ नाले जोडप्रकल्प या अभियानाला लोकांनी आर्थिक मदत मोठया प्रमाणात केली आहे.

पावसाच्या पाण्याशिवाय पर्याय नाही हे शाश्वत सत्य लोकांना कळले आहे. त्यामुळे नाल्याच्या खोलीकरणामुळे निघणारा गाळ काही शेतकऱ्यांनी शेतात टाकल्यामुळे त्याचा उपयोग खतासारखा झाला. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली. कोरडवाहू क्षेत्रातील पिकांसाठी जलयुक्त शिवार योजना वरदान ठरलेली आहे. जलयुक्त शिवार योजनेची व्याप्ती खूप मोठी असल्यामुळे माळरानावर वनश्री फुललेली दिसेल सगळीकडे अल्हाददायक व निसर्गमरम्य चित्र हे केवळ स्वप्न न राहता ते एक दोन वर्षात सत्यात उतरेल हे केवळ जलयुक्त शिवार या योजनेमुळेच हेच या योजनेची फलनिष्पती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१. जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ ग्रामस्तरीय प्रतिनिधी व कर्मचारी प्रशिक्षण माहिती पुस्तीका - महाराष्ट्र शासन मृद व जलसंधारण विभाग.
२. दैनिक अॅग्रोवन
३. ग्रामीण विकास - डॉ . नागोराव कुंभार
४. दैनिक लोकमत, सप्टेंबर २०१७ (१३.०९.२०१७)
५. जलयुक्त शिवार अभियान - विकास पिडीया.

# समाज व ग्रामीण विकास

**प्रा. डॉ. शशीकांत मुकुंदराव आलटे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शरदचंद्र महाविद्यालय, शीराढोण
ता. कळंब जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

मानवी जिवनाचा इतिहास हा फार प्राचीन आहे. विश्वातील सजिवसृष्टी निर्मीतीतील शेवटची निर्मीती म्हणजे. माणव प्राणी होय. प्राथमिक अवस्थेत मानवी जिवन भटकंतीच्या स्वरुपात व्यतीत होताना पाहावयास मिळते. कालांतराने मानवी जिवनाला स्थीरता प्राप्त झाली. मानवाला कृषिचे तंत्र अवगत झाल्यापासून मानव स्थाई स्वरुपात वास्तव्य करु लागला. यातूनच ग्रामांचा विकास होण्यास सुरुवात झाली. ग्रामिण समाज जिवनासंदर्भात प्राचिनतम् कालखंडापासून अनेक विचारवंतानी आपली मते विविध स्वरुपात मांडलेली आहेत. विचारवंताच्या मतानुसार ग्रामीण समुदायाच्या विभीन्न पैलूचे अध्ययन केले जाते. भारतातील ग्रामीण समुदायाची परंपरा फार प्राचिन स्वरुपाची आहे. ग्रामीण समुदाय विश्वातील सर्व राष्ट्रात आढळून येतात. भारताच्या दृष्टीने ग्रामीण समुदाय अभ्यासने महत्वपूर्ण आहे. कारण भारत हा खेड्यांच्या देश म्हणून ओळखला जातो. भारत कृषीप्रधान देश आहे. शेती हा ग्रामीण समुदायाचा मुख्य व्यवसाय आहे. "खरा भारत खेड्यात आहे खेड्याकडे चला" अशी हाक महात्मा गांधीनी भारतीयांना दिली होती. स्वतंत्र्यानंतर विकासाचे आणि प्रशासनाचे मुलभुत घटक म्हणून खेड्याची कल्पना उचलुन धरली होती. त्यांचा हा विचार भारतीय समाज परंपरेला अनुसरुनच होता.

भारतीय समाजावर अनेक आक्रमने झाली. असे असले तरी ग्रामीण समुदाय एकसंघ राहिला होता. रामायण, महाभारत अशा पौरानिक ग्रंथामधुन याचे दाखले पहावयास मिळतात. ग्रामिण समुदाय आकाराने लहान, स्वतंत्र, स्वायत्त, स्वयंपुर्ण आणि बलशाली स्वरुपाचा होता. ग्रामीण समुदायात व विविध स्वरुपाचे विकेंद्रीकरण झालेले दिसुन येते. शेतीव्यवसाय आणि हस्तव्यवसाय यावर आधारलेली स्वयंपुर्ण अर्थ व्यवस्था ग्रामीण समुदायाचे वैशिष्ट्ये होते. संयुक्त कुटुंबपध्दती, बलूतेदारी पध्दतीचे (जजमानी पध्दती) समुदयावर नियंत्रण होते. संयुक्त कुटुंबपध्दती हा ग्रामीण समाजाचा आत्मा आणि बलूतेदारी हा अर्थव्यवस्थेचा पाया होता. ब्रिटीश आगमनापर्यंत ग्रामीण समाजव्यवस्थेची परंपरा टिकुन होती. काळानुरुप ग्रामीण समाजात किरकोळ स्वरुपाचे परीवर्तन झाले. ग्रामीण सामुदाय समाईक जमीन, शेती आणि बगरशेती व्यवसाय यांचा समन्वय आणि अपरिवर्तनिय श्रमविभाजन यावर आधारलेली आहे. म्हणून मार्क्स भारतीय खेड्यांना छोटी स्वराज्ये असे म्हणतो ग्रामीण समुदाय असा एकात्म गट आहे. जो स्वतः वस्तुचे उत्पादन करुन तो आपल्या गरजा भागवत असतो.

**ग्रामिण समुदाय :-**

भारतात साधारणपणे सहा लाख खेडी आहेत. काही खेडी मोठी आहेत. काही मध्यम स्वरुपाचे तर काही आकाराने लहान आहेत. खेड्यांना जोडून लहान-लहान वाड्या पण आहेत. भारतातील बहुसंख्यलोक खेड्यात राहतात. धार्मीक सामाजिक व सांस्कृतीक मुल्य, आदर्श व संकेत यांचा ग्रामीण समुदायावर व्यापक प्रभाव असतो. ग्रामिण समुदाय वैशिष्ट्येपूर्ण आहे ग्रामिण समुदाय म्हणजे काय हे आधिक स्पष्ट करण्यासाठी काही व्याख्यांचा विचार आपणास पूढील प्रमाणे करता येतो.

**ग्रमिण समुदाय व्याख्या :-**

श्री अत्रे - "खेडने म्हणजे जमिन कसने व खेडूत म्हणजे जमिन कसनारा तेव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडे ! ज्यामध्ये प्रमुख धंदा शेती व राहनाऱ्याची वस्ती शेतकऱ्याची असते. त्या वस्तीला खेडे म्हणतात"

श्री - हॅराल्ड - ग्रामिण समुदायात अशा परस्पर संबंधीत किंवा असंबधीत व्यक्तीच्या समुहाचा अंतर्भाव होते की जो समुह एका कुटुंबापेक्षा मोठा असून त्याची राहती घरे जवळ-जवळ किंवा अनियमीतपणे वसलेली असतात. तसेच या समुदायाच्या कृषियोग्य जमिनीवर शेती केली जाते व सभोवतालच्या पडीक जमीनीवर गायरान असते व शेजारच्या समुदायापर्यंत पसरलेल्या जमिनीवर त्या समुदायाची मालकी मालकी हक्काची भावना असते.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये :-**

१.ग्रामिण समुदयाचा अर्थ समजून घेणे.
२.भारतीय ग्रामिण समुदाय विकास संकल्पना समजून घेणे.
३.ग्रामीण समुदयाच्या समोरील आव्हाणे अभ्यासने.
४.ग्रामीण समुदाय विकासाची उपाय योजना तपासुन पाहने.

**ग्रहितके :-**

१. पंचवार्षीक योजनांच्या माध्यमातुन ग्रामीण भागाचा विकास होतो आहे.
२. दरीद्रय हे ग्रामीण विकासातील प्रमुख अडथळा आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तृ त शोध निबंधाच्या तथ्य संकलनासाठी द्वितीय साधनाचा उपयोग केला आहे. पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला आहे.

**भारतीय ग्रामीण समुदाय विकास :-**

औद्योगिक क्रांती व ब्रिटीश राजवट या काळात ग्रामीण समाजाची फार मोठी अद्योगती झाली. परिणाम ग्रामीण समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या. ग्रामीण समाजाला या अवस्थेतुन बाहेर काढण्यासाठी विचारवंत सामाजिक कार्यकर्ते इत्यादीनी स्वातंत्र्या पूर्वी सुधारनेची अनेक कामे केली होती. परंतु अपुरे तंत्रज्ञान व अपुरा पेंसा यामुळे फारशी सुधारणा करता आली नाही. १८७५ ते १९०१ या कालखंडात भारतात अनेकवेळा दुष्काळ पडला, ब्रिटीशानांही ग्रामीण सुधारनेचा विचार करणे भाग पाडले. शासकीय पातळीवर ग्रामीण विकासाच्या योजना राबवल्या गेल्या. या योजना राबवताना नियोजनाचा अभाव होता. त्यामुळे विकास योजना स्पष्ट अर्थाने वास्तवात उतरु शकल्या नाहीत.

भारतातील स्वंयसेवी संस्था, सामाजिक संघटना यांनी ग्रामीण विकासासाठी प्रयत्न केले. पुण्यामध्ये, भारतसेवक संघाने "शेती आणि उद्दोगधंद्याचे केंद्र सुरु केले खतीस्ती धर्मप्रसारकांनी शिक्षण, आरोग्यसेवा, यातुन ग्रामविकास करण्याचा प्रयत्न केला." थोडक्यात ग्रामीण समाजाचा सर्वांगिन विकास करुन ग्रामीण जिवनाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण मानसीकतेत बदल करण्याचा प्रयत्न केला विकासात्मक दृष्टीकोन निर्माण करुन राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत, ग्रामीण समाजाला सहभागी करुन घेण्यात आले.

ग्रामीण समाजाचा विकास कार्यक्रम राबवत असताना, प्रामुख्याने, ग्रामीण विकासासाठी काही ठळक गोष्टीचा विकास करण्याचे निश्चीत करण्यात आले होते. ग्रामीण विकासातील काही घटकांचा विचार आपणास पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते.

**१) शेतीचा विकास :-** ग्रामीण समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असल्यामुळे शेती विकासाला महत्व दिले गेले. शेतीचा विकास झाला तरच ग्रामीण जिवनमान उंचावण्यास मदत होईल. म्हणून शेतीविकास अनिवार्य आहे. पडीक जमीन लागवाडीखाली आनने विजपूरवठा, संकरित बि-बियाने, रासायनिक खते, किटक नाशके, शेतकऱ्यांना तांत्रिक ज्ञान देणे, फळ उत्पादनास प्रोत्साहन देणे. कुकुटपालन मासेमारी, दुग्ध व्यवसाय अशा जोडधंद्याना प्रोत्साहन देणे. अशा प्रकारच्या कार्यामधून ग्रामीण विकास साधण्याचा कार्यक्रम राबवण्यात आला.

**२) दळण-वळण साधनाचा विकास :-** ग्रामीण समाजाच्या विकासासाठी सामुदायीक विकास योजना राबवण्यात आली. या योजने अंतर्गत दळन-वळन साधनाचा विकास घडवून आनला गेला. रस्ते निर्माण करणे, पुल बांधने अशा गोष्टीचा समावेश यामध्ये होतो. दळण-वळणाच्या विकासातुन ग्रामीण समाजाचा संबंध बाह्यजगाशी येईल आणि अशा प्रकारे ग्रामीण समाजाला विकास प्रवाहात आनने सहज शक्य होईल.

**३) शैक्षणिक प्रसार :-** ग्रामीण समाजाचा विकास करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करणे आवश्यक आहे. शिक्षणाने समाज सुजान व साक्षर बनतो. समाजात प्रगती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शिक्षणाला महत्व दिले गेले. प्राथमिक शिक्षणाच्या मोफत सोई उपलब्ध करुन दिल्या आहेत. सामाजिक शिक्षण, प्रौढशिक्षण, स्त्री शिक्षण अशा शैक्षणिक कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्यात आले.

**४) आरोग्य विषयक सुविधा :-** समाजविकास योजनेत आरोग्याच्या सोईचा अंतर्भाव करण्यात आला होता. स्वच्छ पीण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, रोग प्रतिबंधक औषधे ग्राम सफाई, धुर विरहीत चुली, प्राथमिक स्वास्थ केंद्र, दवाखाने इत्यादी. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. तसेच सकस आहारा संबंधी मार्गदर्शन करण्यात आले. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंबनियोजनाचे महत्व सांगण्यात येवू लागले. अशा प्रकारे, ग्रामविकास साधला जाऊ लागला.

**५) रोजगारा निर्मीती :-** वाढत्या लोकसंख्येचा अतिरीक्त भार कमी करण्यासाठी विकास कार्यक्रमात रोजगार निर्मीतीवर भर देण्यात आला. रोजगार निर्मीतीमुळे बेरोजगारांना काम मिळू लागले. ग्रामीण भागात गृहउद्योग आणि लघुउद्योग यांना प्रोत्साहन देण्यात आले. यासाठी प्रशिक्षणाची सोय करण्यात आली. नविन व्यवसाय, करण्यासाठी आर्थीक मदत देवून प्रोत्साहन देण्यात आले.

**६) प्रशिक्षण सुविधा :-** ग्रामीण समुदाय सुधारणेसाठी विविध स्वरुपाच्या प्रशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. गृह उद्योग, शेती सामान्यज्ञान अशासाठी प्रशिक्षण दिले जाऊ लागले शेतीसाठी प्रात्यक्षिक केद्रे निर्माण करण्यात आली.

**७) गृहनिर्मान योजन :-** ग्रामविकासात शाळा सांस्कृतीक केंद्र यांचे पक्के बांधकाम करण्यात आले. लोकांना पक्की घरे बांधून देणे. आर्थीकदृष्ट्या दुर्बल असनाऱ्या लोकांना घर बांधुन देणे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**८) मनोरंजनाच्या सुविधा :-** समाज कल्यान कार्यक्रमात ग्रामीण मनोरंजनाचाही अंतर्भाव करण्यात आला आहे. मनोरंजनासाठी सांस्कृतीक केंद्र आणि मंडळ स्थापन करण्यात आली. युवक संघटना, महिला मंडळे, दवाखाने, प्रौठशिक्षण केंद्र, पंचायत अशा संघटना व केंद्र निर्माण केली. ग्रामीण भागातील लोकांना ग्रामफोन रेडीओ, चलचित्र, दुरदर्शन अशा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. अशा योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला प्रोत्साहन देण्यात आले.

**निष्कर्ष :-**

ग्रामीण समुदाय या सर्व योजनांचा लाभ घेताना दिसून येतो. अशा विविध योजनामुळे ग्रामीण जिवनात सुधारणा होत आहे. ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी केंद्रीय पातळीपासून, गावपातळीपर्यंत, प्रशासकीय यंत्रना कार्यान्वयीत आहेत. ग्रामविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी "समाज विकास व सहकार" मंत्रलयाची स्थापना करण्यात आली होती. १९६६ पासुन या मंत्रलयाला "शेती व अन्न" मंत्रालयात विलीन करण्यात आले. सामुदायिक विकास कार्यक्रमाची आमलबजावणी या मार्फत देशभरात करण्यात येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. दिलीप खैरनार - भारतीय ग्रामीण समाजशास्त्र.
२. डॉ. दादासाहेब उत्तमराव मोरे - ग्रामीण समाजशास्त्र.
३. प्रा. अरुणा पाटील - सावरगावकर
४. सौ. प्रतिभा अहिरे - ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र
५. सौ. अरुणा सावरगावकर (पाटील)
६. प्रा. सौ सुमन पाटे - ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र
७. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे - भारतीय समाज रचना.

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www.aiirjournal.com

# ग्रामीण आरोग्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका

संशोधक विद्यार्थी
**ऋषिकेश सर्जेराव अंबुरे**
समाजशास्त्र विभाग,
डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रस्तावना :-**

भारतात आरोग्य सेवांची सुरवात आठराव्या शतकाच्या मध्यावर झाली,"एकविसाव्या शतकात आरोग्याचे महत्व नव्याने सांगायला नको. हिंदू धर्मात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. या सर्वांचे मुळ हे आरोग्य चांगले असण्यावर आहे. चांगले आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक रोगांपासून मुक्त असणे तसेच यश, बल, वीर्य व पराक्रम यांनी युक्त असणे होय. अशा मनुष्याचे आयुष्य हितकर व सुखी होय." वैदिक काळात देखील आरोग्यास महत्त्व देण्यात आले आहे.

"भारतीय लोकशाही राज्य प्रणालीने सर्व नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे. आरोग्य हा प्रत्येक मानवाचा हक्क आहे. व आरोग्य सेवा सर्वापर्यंत पोहचल्या पाहिजेत या तत्त्वाच्या पुर्ततेसाठी भारत कटिबध्द आहे." (२) इं.स. १९७८ मध्ये रशियातील आल्मा आटा येथे जागतिक आरोग्य परिषद भरली होती. त्यात इ.स. २००० पर्यंत 'सर्वांना आरोग्य' ही संकल्पना मांडण्यात आली. ती भारतानेही मान्य केली होती. त्यामुळे भारत सरकारने देशातील आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी वेगवेगळ्या आरोग्य संबंधित योजना व सेवा सुविधा निर्माण केल्या आहेत. त्यामध्ये "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान" च्या अंतर्गत "आशा" स्वयंसेविका ही योजना २००५ मध्ये सुरु करण्यात आली. आशा स्वयंसेविका ही ग्रामीण व आदिवासी भागातील माता व बाल मृत्यूदर कमी करणे, आरोग्य विषयक शासकीय योजनांची माहिती लोकांना पुरवीणे व इतर आरोग्य सेवा देण्याचे कार्य करते.

**संशोधनाचा उद्‌देश :-**

१) "आशा" स्वयंसेविकामुळे माता व बालकांच्या आरोग्य समस्या व मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे.
२) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामुळे ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या आरोग्याच्या सोयी सुविधांची माहिती व प्राथमिक औषधोपचार मिळत आहे.

"खऱ्या भारताचे दर्शन ग्रामीण भागातच घडते.असे महात्मा गांधींचे म्हणणे होते.भारतातील लोकसंख्येच्या जवळपास ८०% लोक ग्रामीण भागातच राहतात. या ग्रामीण भागातील लोकांचा विकास म्हणजेच खऱ्या अर्थाने भारताचा विकास होय.ग्रामीण भागात राहणीमान अत्यंत गैरसोयीचे असून तेथे सकस व योग्य तेवढी शक्ती देणाऱ्या आहाराचा तुटवडा आहे. पिण्यासाठी शुध्दपाणी पुरवठा देखील नाही. भारताचे दरडोई वार्षिक उत्पन्न कमी आहे व लोकसंख्या वाढत आहे. ग्रामीण भागात निरक्षरतेमुळे दारिद्रय व अज्ञान यांचा परिणामी कुपोषण होते,त्यायोगे आजाराचा प्रादुर्भाव होतो." (३)

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान :-**

"संपूर्ण देशात ग्रामीण जनतेला परिणामकारक व प्रभावि आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. संपूर्ण देशामध्ये २००५ ते २०१२ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गावामध्यये स्त्री आरोग्य कार्यकर्ती ची (आशा) निवड करणे हा या मिशनमधील एक महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण भागात अरोग्य खात्याच्या योजना व संदेश परिपुर्णतेप्रत पोहचविण्याची धुरा (आशा) हिच्या खांद्यावर आहे.' आशा स्वयंसेविका ही आरोग्य संस्था व ग्रामीण जनता यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करणार आहे. गरोदर माता, स्तनदा माता, लहान बलके, कुपोषित बालके तसेच विविध सांसर्गिक व असांसर्गिक आजारांवर उपचार घरी करणे शक्य होणार आहे. तसेच आशा ही स्थानिक रहिवासी असल्याने स्त्री आरोग्यदूत म्हणून आरोग्य संदेश समाजात सहज रुजवू शकेल. त्यामुळे माता बाल संगोपनाच्या सवयी सुधारुन 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा' माता व बालमृत्यू कमी करण्याचा मुख्य उददेश साध्य होणार आहे.

**आशा स्वयंसेविका :-**

डॉ. अभय बंग हे सर्च या संस्थेमार्फत गडचिरोलीतील ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा आणि संशोधन असे कार्य करतात. बालमृत्यू नियंत्रणावरील त्यांच्या संशोधनाची दखल भारतासोबतच अनेक देशांनी घेतली. त्यांनी जगाला 'न्यूमोनिया' हे बालमृत्यूचे सर्वात मोठे कारण आहे. हे दाखवून दिले. गडचिरोली जिल्ह्याच्या कुपोषणावर व नवजात अर्भकांच्या मृत्यूवर डॉ. अभय बंग व राणी बंग यांनी लिहिलेली "कोवळी पानगळ" हा शोधप्रबंध खुप गाजला होता. या शोधप्रबंधामुळे केवळ राज्य व देशाच्याच शासनाला नव्हे तर जागतिक आरोग्य संघटनेला (WHO) आपले आरोग्याविषयी धोरण बदलावे लागले. तसेच डॉ. राणी बंग यांनी आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती बघून यावर रीतसर संशोधन केल. त्यात त्यांनी स्त्रियांमध्ये असलेल्या अशक्तपणाची कारणे शोधून काढली. 'सर्च' (Society for Education Action and Research in community Health ) मध्ये अशिक्षित स्त्रियांना आरोग्य सेवेचे किमान प्रशिक्षण देण्यात येत होत. दाई आणि आरोग्यदूत यांच्या मार्फत स्त्रियांना उपचार देण्याचा प्रकल्प 'सर्च' मध्ये राबवण्यात येत होता. अशा पध्दतीच्या आरोग्य दूतांमुळे ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहचू शकते. हे लक्षात आलं व हीच् प्रणाली व्यापक करायचे सरकारने ठरवले "ग्रामीण आरोग्याच्या सुधारणेसाठी 'रुरल हेल्थ मिशन'या नावाने एक मोहीम आखली आहे. त्या अंतर्गत स्त्री आरोग्य दुतांच्या धर्तीवर आरोग्य सेविका नेमण्याचे ठरवलं आहे. "आशा" हे तिचं नाव." (४)

ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य विषयीच्या शासकीय योजना / सेवा व सुविधांची माहिती व सेवा पुरविण्याचे कार्य आशा स्वयंसेविका (ASHA) Accredite Social Health Activist) करतात.

ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा यशस्वीरीत्या आणि सातत्याने मिळाव्यात यासाठी शासकीय पातळीवर अनेक कार्यक्रम राबविले जातात. प्रामुख्याने मातांच्या सेवा, बालकांच्या आरोग्य सेवा, कुटूंब कल्यान, पौगंडावस्थेतील आरोग्य सेवा, सामाजिक आरोग्य, विविध आरोग्य सेवा, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, तालुका या पातळीवर दिल्या जातात. यामध्ये आशा स्वयंसेविकांना प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र स्तरावरुन कोणकोणत्या सेवा कोणाकडून कुठे मिळतात हे माहिती करुन घेऊन त्याबद्दल लोकांना माहिती देणे "आरोग्य सेवा मिळण्यापासून वंचित राहिलेल्या गरोदर मतांना शोधून काढणे. उदा. गावापासून दूर राहत असलेल्या दारिद्रय रेषेखालील असलेल्या बाहेरुन आलेल्या, तसेच मागासवर्गीय जाती, जमातींमधील गरोदर स्त्रियांना आरोग्य सेवा देणे" (५) तसेच विविध सांसर्गिक व असांसर्गिक आजारांवर उपचार घरी करणे शक्य होणार आहे, तसेच आशा ही स्थानिक रहिवासी असल्याने स्त्री आरोग्यदूत म्हणून आरोग्य संदेश समाजात सहज रुजवु शकेल. "आरोग्य संवर्धन, विविध प्रतिबंधक व उपचारात्मक उपाययोजना तसेच समाजामध्ये जाणीव जागृती वृध्दिंगत करणे यामध्ये "आशा" स्वयंसेविकेची महत्त्वाची भुमिका आहे. आरोग्य सेवा व आरोग्य संस्थांची माहिती सर्व लोकांपर्यंत उपलब्ध करुन देणे,आरोग्य सेवा सुविधांचा लाभ घेण्यासाठी लोकांना प्रोत्साहीत करणे, आरोग्याबद्दल लोकांमध्ये मानसिक व सामाजिक बदल घडवणे आदि कामे आशा स्वत: करत आहे." (६)

महाराष्ट्रात "आशा" ही योजना २००७ पासून लागू केलेली आहे. सुरवातीस ही योजना फक्त आदिवासी भागात होती. २००९ पासून ती ग्रामीण भागांतही ही योजना लागू झालेली आहे. लवकरच शहरी भागात आरोग्य कार्यकर्त्या नेमल्या जातील मात्र त्यांना "आशा" ऐवजी "उषा" असे नाव असेल. NRHM च्या माध्यमातून गावपातळीवर आशा आरोग्य कार्यकर्तीचे खुप महत्त्व आहे.

**आशा स्वयंसेविकेच्या जबाबदाऱ्या :-**

१) संस्थेतील प्रसुती वाढविणे.
२) मलेरिया, कुष्ठरोग, क्षयरोग उपचारांसाठी मदत करणे.
३) कुटूंब कल्याण प्रचार गर्भनिरोधकांचे वाटप करणे.
४) साध्या किरकोळ आजारांवर उपचार उदा. ताप, खोकला, जखम यावर औषधी देणे.
५) माता व बाल आरोग्यविषयी प्रबोधन. उदा. प्रसुतिपुर्व तपासणी, लसीकरण, लोहयुक्त गोळयांचे वाटप
६) जन्म-मृत्यूंच्या नोदणींमध्ये मदत.
७) वेळोवेळी शासनाच्या सुचनेनुसार कार्य.

**समारोप :-**

या योजने अंतर्गत माता व बालकांना विविध सेवा सुविधा दिल्या जात आहेत. जसे की लसीकरण, आरोग्य शिक्षण, प्राथमिक आरोग्य सेवा, ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेवा देण्यामध्ये आशा स्वयंसेविकांची महत्त्वाची भुमिका आहे. स्वच्छता, खानपान, राहणीमान, गरोदर पणातील घ्यायची काळजी, स्तनपान, आहार, लसीकरण रोग प्रतिबंध इत्यादी बाबतीत.अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून अनेक आरोग्य सेवा देण्याचे कार्य आशा स्वयंसेविका करतात. तसेच लोकांमध्ये आरोग्य सेवांची माहिती व प्रत्यक्ष त्यांना ती सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्याचे कार्य आशा स्वयंसेविका करतात. आशा प्रकारे ग्रामीण आरोग्य सुधारणेमध्ये ‘‘आशा’’ स्वयंसेविकांची मदत होते आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) लिमकर सुधाकर पांडुरंगराव (२००५) ‘‘आरोग्य संवाद’’, संवाद प्रकाशन औरंगाबाद, पृ. क्र. ५
२) जनवैद्यक भारतातील आरोग्य परिस्थिती संघटक (१९९०), हॅलो वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, पृ. क्र. ४
३) आंबुलगेकर रामदास, (१९८७)वैद्यकीय समज गेरसमज, कैलाश पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. ७०
४) कुलकर्णी सुहास (२००८) खरे खुरे आयडॉल्स, युनिक फीचर्स, समकालीन प्रकाशन, पृ.क्र. १७
५) आशा कार्यक्रम पुस्तिका क्रमांक २, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. क्र. १६
६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (२००८-०९), आशा स्वयंसेविका योजना, बिगर आदिवासी क्षेत्रात आशा स्वयंसेविका नियुक्ती, बाबत, मार्गदर्शक सुचना, पृ. क्र. १

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www.aiirjournal.com

# ग्रामीण विकासात उद्योग धंद्याची भूमिका

**प्रा.डॉ. एस.डी. अंभुरे**
इतिहास विभाग
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि.परभणी

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी म्हटले होते, की खेड्याकडे चला परंतु आज प्रत्येक दिवशी लोक शहराकडे आहेत. जे लोक शहराकडे येत आहेत ते केवळ मौज मजा करण्यासाठी येत नाहीत. तर प्रत्येक व्यक्ती आपले पोट भरण्यासाठी धडपड करत आहे. आज महाराष्ट्रातुन प्रत्येक गावाचा व्यक्ती मुंबई, पुणे, नाशिक येथे येत आहे. प्राचिण काळात, मध्ययुगीन काळात प्रत्येक गाव स्वयंपुर्ण होते. परंतु भारतात ब्रीटीशांचे आगमन झाल्यानंतर येथील उद्योग धंदे बंद पडले. 12 बलुतेदार व 18 बलुतेदार पध्दत बंध झाली ग्रामीण भागातील लोकांवर बेकारी आली त्यांना आपला व्यवसाय बंद झाल्यामुळे गाव सोडावे लागले.

**2. शहरीकरणाची करणे :-**

1. **दुष्काळ व नापिकी :-** आज ग्रामीण लोकांची आर्थिक स्थिती वाईट झाली आहे. आजही महाराष्ट्रात बऱ्याच भागत 70 टक्के शेती कोरडवाहु आहे. शेती निसर्गावर आवलंबुन आहे. मागील 4 वर्षापासुन महाराष्ट्रात दुष्काळ आहे. त्यामुळे शेतीतुन कोणतेच उत्पन्न नाही. लोकांना एकवेळेस जेवण मिळत नाही, मुलांना शिक्षण नाही. गुराजनांना चारा पाणी नाही. हजारो शेतकरी आत्महात्या करत आहेत. गावात काम नसल्यामुळे लोक शहराकडे येत आहे.
2. **हमीभाव नाही :-** शासनाने कतीही हमी भावाची घोषणा केली असली तरी आज शेतकऱ्यांच्या मालाला कोणताच हमी भाव भेटत नाही ही वस्तु स्थिती आहे. परंतु कंपनी किंवा उद्योग धंद्यातील वस्तुला हमी भाव आहे. उदा :- टि.व्ही.यामुळे लोक शहराकडे येत आहेत.
3. **रस्ते, शिक्षण आरोग्य गौरसोयी :-** आज संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामीण जीवन फार वाईट आहे. ग्रामीण भागात कुठल्याही प्रकारचे रस्ते नाहीत, शिक्षण व आरोग्य नाही, शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. उद्योग व्यापार विकसीत झाला नाही. त्यामुळे लोकांचा कल शहराकडे आहे.
4. **शहराकडे रोजगार मिळतो असा समज :-** आज प्रत्येक व्यक्तीला असे वाटते की शहराकडे कोणतेतरी काम मिळते कारण शहरात औद्योगिक करणामुळे रोजगार उपलब्ध आहेत.
5. **मान सन्मान मिळतो :-** शहरात राहणारा व्यक्ती हुशार असतो व गावात राहणारा साधा भोळा शहरात मान सन्मान मिळतो असा एक समज झाला आहे.

**3. शहरीकरणाचे परीणाम :-** आज प्रत्येक व्यकतीला शहराकडे यावे असे वाटून फार मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. परंतु शहराचे स्वरूप बदलुन तेथे फार मोठ्या समस्या निर्माण होत आहेत. यात नगर समस्या, आरोग्य, प्रदुषण, बेकारी, पाणी प्रश्न,झोपडपट्टी, गोंगाट इत्यादी समस्या निर्माण झाल्या आहे. भारत-इंडिया असे दोन भाग झाले आहेत.

**4. ग्रामीण भागात उद्योगधंद्याची गरज :-**

1. **स्थानिक कच्या मालाचा वापर :-** ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारले तर प्रत्येक शेतकऱ्याला कच्चा माल जाग्यावर विक्री घेउन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, रोजगार मिळेल, दळणवळण खर्च टळेल, शहरी करण होणार नाही.
2. **शेतीवर जास्त लोकसंख्या :-** ग्रामीण भागात प्रामुख्याने शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. लोकसंख्या वाढ आहे. जमीन तेवढीच राहत आहे. त्यामुळे जास्त लोक व कमी जमीन झाल्याने छुपी बेकारी वाढत आहे.
3. **शेती विकास :-** शेतीचा विकास करायचा असेल तर शेतीनिगडीत व शेतीआधारित उद्योगधंदे निर्माण झाल्याने शेतीचा विकास होतो.
4. **ग्रामीण बेकारी :-** ग्रामीण उद्योगामुळे ग्रामीण भागवातील बेकारी कमी होईल.
5. **व्यक्तिमत्व विकास :-** ग्रामीण भागात उद्योगधंदे निर्माण झाले तर शेतकऱ्यांच्या मुलांजवळ पैसा राहिल. त्याचा व्यक्तिमत्व विकास होईल.

**5. ग्रामीण उद्योगधंद्याचे फायदे :-**

जास्तीचे उत्पादन :- ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारले तर ग्रामीण भागातील लोकाजवळ शेतीमाला व्यतिरिक्त उत्पादन होईल व ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारेल.

विकेंद्रीकरण होईल :- ग्रामीण भागात उद्योग धंदे उभारले तर शहराकडे सर्व संपत्ती न जाता. सयंतीचे विकेंद्रीकरण होईल. नागरी समस्या कमी होतील. त्यात प्रदुषण, झोपडपट्या ताण, पाणी समस्या इ. तसेच ग्रामीण उद्योग धंद्यामुळे लोक आपल्या गावात, समुहात राहतील व संस्कृती जतन होईल. याच बरोबर स्थानिक पिक, वस्तु, कच्चामाल, वाहतुक खर्च कमी होईल. आणि ग्रामीण भागातील सुध्दा बेकारी कमी होईल.

**6. शेती निगडीत उद्योग :-**

1. **पशुधन :-** ग्रामीण अर्थव्यवस्था मध्ये पशुधनाचे विशेष महत्व आहे. प्राचीन काळात पशूला धन समजत असत. देवाण-घेवाण पशू त्या माध्यमातून घेत असे. भारतीय परंपरा मध्ये मुलीला गाय दिली जात आहे.या वरूण ग्रामीण भागात पशुला किती महत्व होते हे दिसुन येते पशु मध्ये गाय, बैल, बकरी, मेंढी, गाढव इ. प्राण्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये प्रमुख स्थान होते. भारतातील राष्ट्रीय उत्पादनात पशूधनाचा फार मोठा हिस्सा होता.
2. **पशुधनाचे उपयोग :-** शेतीकामासाठी पशू फार महत्वाचे आहे. नांगरणी, बखरणी, पेरनी, कोळपणी इ. शेती कामासाठी पशुचा उपयोग होता तसेच गाय, म्हैस, बकरी इ. दुध व दुधापासुन मिळणारे दुग्धजन्य पदार्थ इत्यादिची प्राप्ती होते. त्याचबरोबर आपल्याला आज 25 टक्के बकरी, मेंढी, यांचे मटण मिळते. अनेक पशू पासुन लोकर फार मोठ्या प्रमाणात निर्माण होते. लोकर पासून ब्लॅकेट, स्वेटर, मोजे इ. वस्तु बनतात. त्याचबरोबर बुट, पर्स, बॅग, दात इ. पासुन अनेक वस्तु बनत असत. अशा प्रकारे पशुधनाचे उपयोग दिसुन येतात.
3. **मत्स्य व्यवसाय :-** जेव्हा शेतीचे उत्पादन कमी झाले असेल आणि खाणरे जास्त झाले तेव्हा इतर मार्गाने अन्न तयार करावे लागेल. अशा परिस्थितीत मत्स्य व्यवसायापासून अन्न आणि पैसा मिळेल आणि बेकारी कमी होईल.
4. **कुक्कुट पालन :-** कुक्कुटपालनामुळे सुध्दा फार मोठे उत्पादन मिळते. शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन फार महत्वाचे आहे.
5. **वराह पालन :-** शेतीला जोडधंदा म्हणुन वराह पालन हा व्यवसाय पुढे आला आहे. वराहा पासून फार मोठ्या प्रमाणात परदेशात मांस निर्यात करू शकतो.
6. **शेळी पालन :-** शेळीपालन हा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणात फायदेशीर आहे. 150 दिवसात दोन, तीन पिलांना जन्म देत. एक शेळी एका वर्षात दोन वेळेस पिलांना जन्म देते.
7. **फळ प्रक्रिया :-** वेगवेगळ्या फळापासुन ज्युस व इतर पदार्थ (आंबा, लिंब, लोणचे, आवळा मुरब्बा इ.) पासुन फार मोठे उत्पन्न मिळते.
8. **दुग्ध व्यवसाय :-** दुधाच्या एकुण उत्पादनामध्ये भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. परंतु नेदरलँड, स्वित्झरलँड हे देश आपल्या पुढे आहेत कारण त्योंची पॅकींग, मॉर्डण, टेक्नॉलाजी इ. मुळे ते पुढे आहेत. भारतात गुजरात मध्ये आनंद, अमुल कंपन्या आहेत. परंतु सहकारी योग्य भाव मिळत नाही परिणामी महाराष्ट्रात अनेक दुध अंदोलन झाले. परिणाम काहीच झाले नाही. परंतु दुध व्यवसाय फायद्याचा आहे.

**7. शेतीवर आधारित उद्योग :-**

1. **साखर उद्योग :-** भारतातील साखर उद्योग हा महत्वपुर्ण व जुना उद्योग आहे. महाराष्ट्रात 60 वर्षापासुन परंपरा आहे. महाराष्ट्रत विखे पाटील, धनंजय गाडगीळ, वसंतदादा पाटील इ. साखर कारखाने चालु केले. महाराष्ट्रात वर्षाकाठी 12 हजार कोटीची साखर उलाढाल होते. या उद्योगापासुन साखर, अल्कोहोल, दारू, कागद, इलेक्ट्रीसीटी रोजगार मिळतो तसेच शेतकऱ्यांना नगद पैसा मिळतो. म्हणुनच पश्चिम महाराष्ट्राची अधिक प्रगती झाली.
2. **कापड उद्योग :-** महाराष्ट्रात  कापड उद्योग सुध्दा जुना उद्योग आहे. प्राचीन काळात सातवाहन कालीन कापड मिल टाकण्यात आली यानंतर नाशिक, कोल्हापूर, सांगली येथे कापड मिल टाकण्यात आल्या यामुळे रोजगार व पैसा मिळाला. कापड उद्योगात भारत 2 नंबर वर आहे. भारतातुन 76 टक्के निर्यात होते.
3. **तेल गिरण्या :-** हा उद्योग सुध्दा फार जुना आहे. सुरवातीच्या काळात बैल घन्यापासुन तेल काढत असत परंतु आज इलेक्ट्रानिक मोटर तेल गिरण्या चालु झाल्या आहेत त्यामुळे भुयमुग, सोया, तीळ, जवस इ. शेतीमालाना भाव मिळेल. व शेतकऱ्यांना पैसा व रोजगार मिळेल.

4. **धान्य प्रक्रिया :-** ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शेतीत वेगवेगळे धान्य पिकविले जाते. त्यावर धान्य प्रक्रीया मालाची पॅकींग करून मोठे उत्पन्न मिळेल या मध्ये भात, तुर, डाळ, मुग अशा तयार करत खरेदी विक्री मोठी होईल.
5. **बेकरी उद्योग :-** ग्रामीण भागात आटा व मैदा यापासुन ब्रेड, बिस्कीट, नानकटाई व वस्तु बनवुन बेकरी उद्योग टाकता येतो. विशेष म्हणजे या उद्योगात शिक्षणाची गरज नाही.
6. **मसाला उद्योग :-** ग्रामीण भागात मसाला उद्योगापासुन सुध्दा फार मोठे उत्पन्न मिळते तसेच कारळ, तीळ, मिरची, इ. धान्यापासुन उत्पन्न मिळवता येते.

**8. समारोप :-**

ग्रामीण भागात विकासात. वरील शेती गिनडीत व शेतीवर आधारित छोटे-मोठे उद्योग चालु केले तर ग्रामीण भागातील बेकारी कमी होईल. व ग्रामीण भागत रोजगार मिळेल तसेच शेतकऱ्यांना आपल्या शेतातील धान्य इतर शहरात न्यायची गरज राहणार नाही. त्यामुळे दळणवळणाच व वाहतुकीचा खर्च टळेल ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारले तर शहरीकरण थांबेल. व त्यामुळे शहरीकरणाच्या समस्या कमी होतील. म्हणुनच आज ग्रामीण भागात सरकारी अनुदान योजना Small Industrues Development Bank तसेच प्रधानमंत्री रोजगार जनरेशन प्रोग्राम (पी.एस.ई) मार्फत जिल्हा उद्योग केंद्रात अनुदान दिले जाते त्याचबरोबर सरकारी अनुदान, व्यवसायिक कर्ज, ग्रहउद्योग, सबसीडी योजना राबवण्यात येत आहेत. परंतु बऱ्याच योजना सर्वसामान्यांना माहित नसल्याने किंवा राजकिय पुढारी त्यांच्या पर्यंत पोहचु देत नाहीत. यामुळे ग्रामीण भागात उद्योग धंद्याचा विकास झाला नाही.

**संदर्भ :-**

1. विद्यादर पटवर्धन :- आर्थिक विचाराचा इतिहास - प्रकाशक मनोहर पिंपळापुरे 1992.
2. प्रा.डॉ.दत्तात्रय भुत्तेकर :- आथिक विचाराचा इतिहास - कैलास पब्लीकेशन औरंगाबाद.
3. डॉ.एस.के.पवार :- आर्थिक विकास आणि नियोजन
4. प्रा.डॉ.एम.डी. कच्छवे :- भारतीय शेती आणि जागतीकीकरण न्यु मॅन पब्लीकेशन परभणी
5. ग्रामीण भागात करता येण्या सारखे उद्योग 3 फेब्रुवारी 2018 स्मार्ट उद्योजक लेख.
6. कृषी आधारित उद्योग :- 16 ऑगस्ट 2018
7. लोकसत्ता लेख :- ग्रामीण व कृषी उद्योग व्यवसाय 2 नोव्हेबर 2015.
8. विकीपीडीया लेख 16 जाने 2019

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

# शेतीच्या पुनरुत्थानाचा मूलमंत्र : शेतकऱ्याचा आसूड

**प्रा. डॉ. अत्तार अमजद हारुण**
मराठी विभाग प्रमुख
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण
ता. कळंब जि. उस्मानाबाद.

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. तरीही संपूर्ण जीवनव्यवहारात अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी बजावित असूनही महाराष्ट्रात किंवा साऱ्या हिंदूस्थानात दुर्लक्षित राहिलेली जमात म्हणजे शेतकऱ्यांचा वर्ग होय. बळीराजा किंवा शेतकरी सुखी तर जग सुखी असे सतत म्हटल्या जाणाऱ्या आणि कृ,षीसंस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या आपल्या देशात किंवा महाराष्ट्रात आजही शेती व शेतकरी यांची दयनीय अवस्था आहे. त्याला आपले देह फासावर चढवावे लागत आहे ही वस्तुस्थिती आहे. **शेतकऱ्याचा आसूड** च्या केंद्रस्थानी सामान्य शुद्र शेतकरी आहे तो अन्याय लुबाडणुकीपासून मुक्त कसा होईल त्याचे जीवन सुखी समाधानी कसे होईल याची चिंता फुल्यांना होती. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या किंवा त्यांच्यासमोरील आव्हाने व उपाय यावर शेतकऱ्याचा आसूड मधून फुल्यांनी आपले विचार मांडले आहेत.

शेतकऱ्याचा आसूड च्या अभिव्यक्तितून भारतीय ग्रामीण भागातील शेतीच्या पुनरुत्थानाचा एक संपूर्ण मूलगामी कार्यक्रमच फुले यांनी आपल्यासमोर ठेवला. त्यांचे दृष्टेपण आपणास स्तिमित करते. शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे विदारक चित्र रेखाटणाऱ्या आसूडा चा संरक्षक तसाच आक्रमक असा उभयविध अर्थ म. फुले यांना अभिप्रेत आहे. या वर्णनात्मक ग्रंथाचा नाविण्यपूर्ण भाग म्हणजे शेतकऱ्यांच्या अवनस्थितीचे वास्तवचित्र, या अवनत स्थितीची केलेली मूलगामी चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाययोजना होय. समकालीन विद्यावंत समाजसुधारक यांच्या कार्यापेक्षा जोतिरावांच्या कार्याची दिशा अगदी निराळी होती. समाजाच्या अगदी शेतकऱ्यांच्या तळाच्या थरांतील माणसांच्या सुख दु:खाशी फुले समरस झाले होते. शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात ते शुद्रातिशुद्र हा शब्द वारंवार योजताना दिसतात. हा त्यांच्या समरसतेचा सर्वाधिक प्रत्यय आहे. हिंदू समाजातील शुद्रातिशुद्राच्या व्यथा त्यांनी नि:शंकपणे बोलून दाखविल्या. कर्जबाजारीपणापायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गाऱ्हाणी त्यांनी वेशीवर टांगली या कष्टकऱ्यांचे अज्ञान व दारिद्रय हे ईश्वरनिर्मित नसून त्याचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे हे त्यांनी नेमकेपणाने ओळखले होते. या व्यवस्थेतील धर्माधिष्ठित, बौध्दिक, गुलामगिरी सामाजिक अन्याय व आर्थिक शोषण याकडे त्यांनी लोकांचे लक्ष वेधले परंपरागत कष्टकरी वर्गाच्या समस्या ओळखून, त्यांना त्यांचे नैसर्गिक मानवी हक्क प्राप्त करुन देण्यासाठी ते जगभर झगडले. भारतीय शेतकऱ्याचे पुढील आव्हाने व त्यावर उपाय सांगण्याऱ्या महात्मा फुले यांना कृषिक्रांतीचा अग्रदूत ही बिरुदावली डॉ. स.ग. मालशे यांनी बहाल केली.

शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ फुले यांनी १८८३ मध्ये प्रकाशित केला. पेशवाई बुडालेल्या ६५ वर्षे होऊन गेली होती. शेती व शेतकरी यांची इंग्रजी अंमलाचा ५०-६० वर्षामध्ये काय हालत झाली होती. त्यासंबंधी फुले लिहित होते. पेशवाई परवडली पण नवे इंग्रजांचे राज्य नको, असे म्हणण्यासारखी अवस्था १८७० साली ग्रामीण ग्रामीण भागात उत्पन्न झाली होती. १८७५ मध्ये नगर-सोलापूर भागात झालेले शेतकऱ्यांनी सावकाराविरुद्ध केलेले दंगे वासुदेव बळवंत फडके यांनी कोळी भिल्ल, रामोशी यांना हाताशी धरुन केलेले बंड, सावकारी लुबाडणुक व पिळवणूकीस पायबंद बसावा म्हणून १८७९ साली Deccan Agriculturist Relief Act या नावाचा सरकारने केलेला कायदा तसेच १८७७ साली महाराष्ट्रात पडलेला प्रचंड दुष्काळ......अशा अनेक गोष्टी शेतकऱ्यांसमोरील आव्हाने शेतकऱ्याचा आसूड ची पार्श्वभूमी म्हणून आपल्याला नोंदवता येतील.

**शेतकऱ्यांसमोरील आव्हाने व उपाय :-**

शेतकरी हा अडाणी आणि अंधश्रद्धाळू असल्याने जन्मापासून तो अंत्येष्टीपर्यंत पुरोहित वर्ग त्याचे आडवणूक करीत असतो. शास्त्राने केलेल्या अटकबंदीमुळे परदेशातून शेतकरीवर्गाची कशी प्रगती झालेली आहे. याची त्याला गंधवार्ताही नसते. इंग्रज सरकारचे व्यापारविषयक धोरण स्वार्थी आहे ते यंत्राद्वारे इंग्लंडमध्ये निर्माण होणाऱ्या मालाला उत्तेजन देते. त्यामुळे भारतातील छोटे मोठे उद्योगधंदे बसत चालले आहेत. शेतजमिनीचे अधिकाधिक तुकडे पडत चालले आहेत. उत्तरोत्तर जमीनीचा कसही घटत चालला आहे. सरकारने त्यातच शेतकरी वर्गाच्या डोक्यावर जबर कराची ओझी लादली आहेत. शेतकरी कर्जबाजारी होऊन व्याजबट्टा करणाऱ्या सावकारांच्या जाळ्यात सापडून आत्महत्या करीत आहे.

सर्वतोपरी लुबाडणूक होत असलेल्या शेतकऱ्याच्या या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी फुल्यांनी सरकारला ज्या बारकाव्याच्या सूचना केलेल्या आहेत त्यावरुन त्यांचा दूरदृष्टीपणा दिसून येतो.

- वाढीदिढी करणारे सावकार, खोटी मापे वापरुन क्रयविक्रय करणारे व्यापारी, दारुडे तसेच अंमलदार आणि जुलमी पाटील यांचयावर कडक नजर ठेवावी.
- शेतकऱ्यांची मुले तमासगिरांच्या नादी लागून नैतिकदृष्ट्या बिघडू नयेत म्हणून डिटेक्टिव्ह डॉक्टर नेमावेत.
- बदचालीच्या बायांसाठी लॉक इस्पितळे उघडावित.
- बालविवाह आणि बहुपत्नित्व यावर बंदी आणावी.
- शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण सक्तीचे करावे.
- जोडधंदे आणि शेतकी यांचा मेळ घालावा.
- शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळावर शेतकऱ्यापैकीच शिक्षक नेमावेत.
- शेतकऱ्यांच्या मुलांसाठी देशी भाषेत शेतकीविषयक पुस्तके तयार करावीत.
- लोकल फंडाचा पैसा केवळ शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणार्थ खर्च करावा.
- शेतीविषयक आधुनिक साधन सामुग्री पुरवावी आणि वापराचे शिक्षण शेतकऱ्याला दिले जावे.
- पशुधन सुधारण्यासाठी उत्तम बेण्याची आयात करावी.
- शेतकऱ्यांच्या गुरचराईसाठी मोफत जमिनी द्यावी.
- लाकूडतोडी विरुद्ध कायदा करण्यात यावा.
- बांधवस्ती करुन जमिनीची धूप थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत.
- खताचा पुरवठा करुन त्यांच्या वापराविषयी योग्य माहिती मिळावी.
- श्रावणात पिकांची प्रदर्शने भरवावीत आणि आश्विनात उत्तम शेती करणाऱ्या शेतकऱ्यास पारितोषिक द्यावे.
- परदेशातील सुधारित शेतकीचा अभ्यास करण्यासाठी शेतकऱ्यांच्या होतकरु मुलांना शिष्यवृत्या देऊन परदेशी पाठवावे.

अशा या विविध प्रकारच्या संरक्षक व उत्पादक अशा उभय प्रकारच्या उपाययोजना सुचवून महात्मा फुलेंनी सरकारला एक मजेशीर अमीष दाखविलेले आहे ते म्हणजे शेतकऱ्यांची स्थिती सुधारली म्हणजे त्यांच्या अंगी सरकारी कर पट्टया भरण्याचे सामर्थ्य आपोआप येईल आणि सरकारी तिजोरीत उत्पन्न वाढेल.

एकंदरीत शेतीच्या पुनरुत्थानाचा एक मूलगामी मंत्र देताना फुले म्हणतात :

कष्टाळू शुद्रांचे लक्ष्मी पाय दाबी ॥
म्हणे ना कुणबी ॥ त्यास कधी ॥
सुख देणे घेणे, सर्व सुखी होती ॥
आरिष्टे पळती ॥ बारा वाटा ॥
कष्टाळू मानव शुद्र बंधू खरा ॥
त्याचे हित करा ॥ ज्योति म्हणे ॥

शेतकऱ्यांच्या आसूडाच्या केंद्रस्थानी सामान्य क्षुद्र शेतकरी आहे. तो अन्याय लुबाडणूकीपासून मुक्त कसा होईल, त्याचे जीवन सुखी-समाधानी कसे होईल यांची चिंता फुलेंना आहे एकूणच शेती विषयीची फुले यांची उपजत पारंपारिक जाण अधिक सूक्ष्म व सरस आहे. अतिक्षुद्र व स्त्रिया यांची स्थिती, सामान्य क्षुद्र शेतकऱ्यांची स्थिती, सामान्य कामगारांची स्थिती ही जोतिबांच्या समाजाच्या निकोपपणाची, चौगुलपणाची कसोटी होती, ही गोष्ट महत्त्वाची आहे.

स्त्री पुरुषे सर्व कष्टकरी व्हावेत ।
कुटूंबा पोसावे ॥ आनंदाने ॥

या दोन ओळीतच शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथाचा मूळ संदेश आहे असे म्हणावे लागेल. कष्टकऱ्यांच्या घरात लक्ष्मी नांदावी हेच सार्वभौम सत्य फुले मांडताना दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) महात्मा ज्योतिराव फुले - धनंजय कीर
२) महात्मा ज्योतीबा फुले - गोविंद तळवलकर
३) महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांचे कार्य - विठ्ठलराव भागवत
४) महात्मा जोतिबा फुले यांचे १०१ मौलिक विचार - (संपादन) नागनाथ कोतापल्ले.

# व्यवसायाचे समाजिक उत्तरदायित्त्व

**प्रा.डॉ.बाजीराव माणिकराव पाटील,**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगाव

पुर्वी व्यवसायाकडे केवळ आर्थिक नफयासाठीच म्हणून पाहीले जाई परंतू आजच्या सामाजिक विचारवंतांना ते मान्य नाही त्या मुळे व्यवसाय हा तत्त्वज्ञानाच्या नीतिशास्त्राच्या अभ्यासक्षेत्रात अभ्यासला जाणारा विषय आहे. व्यावसायाची सामाजिक जबाबदारी आहे. समाजाप्रती व्यवसायाचे नैतिक उत्तर दायित्व आहे. व्यवसाय ही एक सामाजिक संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजाचे अनेक प्रश्न सोडवता येणे शक्य आहे. कोणतयाही व्यवसायामध्ये समाजातील मनुष्यबळ, नैसर्गिक साधन संपत्ती चा वापर केल्याने मानवाच्या गरजा भागवने हे व्यवसायाचे नैतिक उत्तरदायित्त्व असते. म्हणून व्यवसाय केवळ नफा मिळवण्यासाठी स्थापन केलेला व्यक्तीगत मालकीचा होवूच शकत नाही म्हणून समाजाच्या उन्नतीसाठीच त्याची निर्मीती केली जाते.कोणताही व्यवसाय समाजाच्या सहकार्यातून निर्माण होतो म्हणून प्रत्येकांना आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून समाजाला विविध सेवा सुविधा पुरवून त्याच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहीजे. व्यवसायाच्या माध्यमातून जर समाजाला त्यांच्या गरजा आपण व्यवस्थित पुरवल्या नाहीत तर समाजाचे फार मोठे नुकसान होते उदा:- एखाद्या औषध कंपनीने जर निकृष्ट दर्जाच्या औषधाची निर्मीती करुन ती समाजाला दिली तर त्यापासून समाजाला रोगापासून मुक्ती मिळणार नाही म्हणून उच्च प्रतीची सेवा देण ही प्रत्येक व्यवसायाची नैतिक जबाबदारी आहे. "समाजातील मूल्यांची व उदिष्टांची पूर्तता करण्या बाबत व्यवसायावर गर्भितपणे असणारी कर्तव्ये आणि या कर्तव्यपूर्ततेसाठी व्यावसायिकांने स्वीकारलेले व्यवसायाचे धोरण, धोरणाची अंमलबजावनी करण्यासाठी घेतलेले निर्णय आणि निर्णय राबवण्यासाठी स्वीकारलेला मार्ग म्हणजे व्यवसायाची सामाजिक जबाबदारी होय. "

"स्वहितासाठी कार्य करित असतांना इतरांच्या अधिकारावर त्यांच्या हितसंबधावर कोणत्याही प्रकारचे आक्रमन केले जानार नाही, अशी व्यक्तीगत हमी देण्याचे कर्तव्य म्हणजे सामाजिक जबाबदारी होय "

वरिल व्याख्यांच्या अनुशंघाने अपनास सामाजिक जबाबदारी म्हणजे व्यवसायिकांनी समाज हितासाठी पाळावयाची कर्तव्ये व्यवसायाचा विकास समाजावर अवलंबून असतो. विकासासाठी सामाजिक साधन सामग्री व समाजाचा उपयोग होतो. शासनाची संरक्षण व्यवस्था, कायदे याचा फायदा होत असतो. केवळ समाजामूळेच व्यवसायाची अर्थिक स्थिती सुधारते तो समाजावरच अवलंबून असतो एकुणच व्यवसायाची सर्वबाजूने वृदधी समाजामूळे होत असल्याने व्यवसायाची सुदधा समाजाप्रती काही जबाबदाऱ्या व उत्तरदायित्व असतात ती पुढील प्रमाणे सांगता येतील. व्यवसाय हा समाजाचा भाग असतो. व्यवसायासाठी समाजाचे योगदान असते. जसे व्यवसाय उभारणीसाठीची जागा, बँक लोन, कायदे, संरक्षण या सर्व गोष्टी आपणास समाजाच्या माध्यमातूनच मिळतात म्हणून व्यवसायाची सुदधा जबाबदारी हीच असते. की समाजाच्या गरजा भागवण्यासाठी विविध उत्पादनाची निर्मिती करणे. व्यवसात केवळ नफा प्राप्त करुन चालत नाही तर समाजाच्या गरजा भागव ने ही नैतिक जबाबदारी व्यवसायाची असते. व्यवसाय करण्यासाठीची सर्वोपरी मदत आपण समाजाकडून घेत असतो त्यामूळे समाजाचे ऋण फेडण्याची आपली सुदधा एक जबाबदारी असते या उददेशाने आपण व्यवसाय करत असतो. समाजापुढील विविध निर्माण होणाऱ्या समस्या सोडवनं हे व्यवसायाचे कर्तव्य असते कारण आपल्या व्यवसायाचे उदिदष्ट आपण समाजाच्या मदतीनेच गाठत असतो. व्यवसायाला नफा हा समाजकडून मिळून व्यवसायाची भरभराट होते त्यामूळे व्यवसायाचे सुदधा समाजाप्रती उत्तरदायित्व किंवा जबाबदारी असते म्हणून सामाजिक महत्व म्हणजेच ग्राहक हीत, कामगार हित, भागदारकांचे हित जोपासण्याची जबाबदारी व्यवसायीकांची आहे.

### १) व्यवसाय व भागधारक :-

व्यवसाय स्वत:किंवा भागधारकांच्या मदतीने आपण स्थापन केलेला असल्याने आपल्या व्यवसायामधील नफा तोटयाच्या विवरणा प्रमाणे प्रत्येक भागधारकांच्या गुंतवनुकी प्रमाणे त्याला सुदधा फायदा तोटा समप्रमाणात दिला पाहीजे. व्यवसायात अधिकचा फायदा झाला तर तो फायदा सर्व भागधारकांना देवून त्यांचे जिवनमान उंचावण्याचा नैतिक प्रयत्न व्यवसायधारकांने केला पाहीजे. तसेच होणाऱ्या फायदयातून आपल्या व्यवसायामध्ये वृदधी करण्याचा प्रयत्न केला पाहीजे.

### २) व्यावायिकांने विश्वस्ताची भुमिका बजावावी :-

व्यवसायामध्ये अनेक भागधारकांचे मिळून संचालक मंडळ तयार केलेले असते त्यांनी विश्वस्ताची भुमिका बजावत समाजाचे आपण काही तरी देणे लागतो व ते फेडणे आपले कर्तव्य आहे हे मनात ठेवून कार्य करावे.

**३) कर्मचाऱ्या विषयीची जबाबदारी :-**

समाजातील मनुष्यबळ म्हणजे कामगार कर्मचारी त्याच्या शिवाय आपला व्यवसाय अपनास चालवता येत नाही. म्हणजे कोणत्याही व्यवसायाचे यश अपयश हे कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याने व्यवसायाच्या आर्थिक उत्पन्नानुसार त्यांना सुदधा फायदे मिळाले पाहीजेत व्यवसायाच्या माध्यमातून त्यांच्या कुंटूंबाचे जिवनमान उंचावण्याची नैतिक जबाबदारी ही व्यवसायाची असते. कामगाराच्या उन्नतीसाठी वेगवेगळया कल्याणकारी योजना राबवण्याची जबाबदारी व्यवसायिकांची आहे.

**४) व्यवसाय व ग्राहक :-**

व्यवसायाच्या यशापयशासाठी मुख्य घटक म्हणजे ग्राहक आहे हे जाणून ग्राहकांचे अधिकात अधिक कल्याण साधण्याचा व उत्तमोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न व्यवसायिकांने केला पाहीजे. व्यवसायाच्या वाढीसाठी ग्राहक महत्वाचा आहे .तोच आपल्या व्यवसायाच्या यशाचा पाया आहे. म्हणून योग्य अशा त्याच्या गरजांची सेवांची पुर्तता व्यवसायाच्या माध्यमातून केली पाहीजे. ग्राहकाला ज्या वस्तू किंवा सेवा आपण पुरवतो त्या सेवांच्या किंमती ग्राहकांना परवडणाऱ्या असल्या पाहीजेत त्याच्या या माध्यमातून पिळवनुक होता काम नये. त्याला किमान किमंती मध्ये सेवांचा पुरवठा केला पाहीजे. त्याच प्रमाणे चैनिच्या वस्तू व जिवनावश्यक वस्तू मधील जीवनावश्यक वस्तूवर तर अधिक किंमत आकारु नये. ग्राहकांना चांगल्या प्रतीच्या वस्तू वाजवी किंमतीमध्ये पुरवण्याची जबाबदारी व्यवसायिकांची आहे. ग्राहकांच्या आवडी निवडी व गरजा लक्षात घेवून लवकरात लवकर सेवा पुरवण्याची जबाबदारी व्यवसायिकांचीच आहे.

**५) व्यवसाय व पुरवठा संस्था :-**

ज्या संस्था अपणास मालाचा पुरवठा करतात उदा :- शेतकरी याच्या कडून वेगवेगळया प्रकारचे उत्पादने विक्रीसाठी व्यवसायिक घेवून जातात त्या शेतकऱ्यांचे सुदधा कल्याण आपल्या व्यवसायाचे ध्येय असले पाहिजे. व्यवसायाचा मुख्य घटक म्हणजे शेतकरी त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूवरच बरेच व्यवसाय चालत असतात त्या मुळे व्यवसायिकांने त्यांच्या कडून योग्य किमतीतच उत्पादन खरेदी करुन त्याला सुदधा जास्तीत जास्त सहकार्य करण्याची जबाबदारी व्यवसायिकांची आहे.

**६) व्यवसाय व सरकार :-**

आपला व्यवसाय अधिकृतरित्या करुन सरकारला आपल्या उत्पन्नातून व्यवसायकराचा वेळोवेळी भरणा न चुकता करुन देश उभारणी साठी हातभार लावला पाहीजे. कारण या कराच्या माध्यमातून शासनाला अनेक सोयी सुविधा आपल्या सगट सर्वांना पुरवाव्या लागतात त्यामूळे कायदयाचा चौकटीत राहून व्यवसाय केला पाहीजे, लाचलूचपत टाळली पाहीजेत, समाजविरोधी कृत्य टाळून सरकारमार्फत चालवल्या जानाऱ्या विकास यज्ञाला कराचा भरणा करुन सहकार्य करावे. तसेच समाजाला चांगल्या प्रतीच्या सेवा पुरवण्याचा प्रयत्न करावा.

**७) व्यवसाय व समाज :-**

समाजामध्ये अनेक वेळा नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती येतात त्या वेळी सुदधा व्यवसायिकांनी होता होईल तेवढी मदत समाजाला केली पाहीजे.

**सारांश :**

व्यवसायाचे कार्य अशा प्रकारे संचलित केले जावे की, ग्राहक, सरकार, कामगार,आणि समाज या सारखे विविध हितसंबध असणाऱ्या समूहाबाबत असणारी सामाजिक जबाबदारी पार पाडताना त्यांच्यात समानता राहू शकेल.

**संदर्भ ग्रंथ:**

१. सराफ मोहन, व्यवसाय व्यवस्थापनाची मूलतत्त्वे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९६
२. देशमुख प्रभाकर, देशमुख रविंद्र - व्यवसाय व्यवस्थापनाची मुलत्त्वे, पृ.क्र. २
३. वर्मा अशोक कुमार, नितीशास्त्र की रुपरेखा, मोतीलाल बनारसीदास प्रकाशन, दिल्ली, आठवा संस्करण, १९९९
४. सराफ मोहन, व्यवसाय व्यवस्थापनाची मूलतत्त्वे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९६
५. गोखले किरण, (संपा.) पत्रकारिता विद्या,मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी २००३,
६. लोकसत्ता, ९ ऑक्टोबर -२०१४

# कृषी उद्योग व ग्रामीण विकास

**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

भारतासारख्या देशात वाढत्या लोकसंख्येतून दारिद्र्य व बेरोजगारीचे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. अशा परिस्थितीत ग्रामीण भागात औद्योगिकीकरण घडून आले तर रोजगारनिर्मिती, स्थानिक साधनांचा कार्यक्षम वापर, प्रादेशिक संतुलन, आर्थिक विषमता कमी करणे इत्यादी सर्वच दृष्टीकोनातून ग्रामीण औद्योगीकरणाची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यपूर्व ते आजपर्यंत देशातली बहुसंख्य जनता ग्रामीण भागातच राहते. सन १९११ मध्ये, भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८९.६ टक्के भाग ग्रामीण तर १०.९ टक्के भाग शहरी होता. तर हेच प्रमाण सन २०११ च्या जनगणनेनुसार ६८.८४ टक्के लोकसंख्या ग्रामीण तर शहरी ३१.१६ टक्के आहे. सन २०२६ पर्यंत हे प्रमाण ग्रामीण ६६.५७ तर शहरी ३३.४३ होईल असा अंदाज आहे. ग्रामीण व शहरी भागातील लोकांच्या गरजा भागविण्याबरोबर त्यांना रोजगार, हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळवून देण्यात व ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यात कृषी उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे.

**गृहितके :-**'कृषी उद्योग व ग्रामीण विकास' हा शोध निबंध लिहिताना पुढील गृहितके गृहीत धरली आहेत.

१) कृषीवर आधारित उद्योगाच्या स्थापनेमुळे ग्रामीण विकास होत आहे.
२) खेड्यातल्या लोकांना खेड्यातच रोजगार मिळवून देण्यात कृषी उद्योग यशस्वी होत आहेत.
३) कृषीवर आधारित उद्योगाच्या स्थापनेमुळे ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात भर पडत आहे.
४) कमी भांडवल व विकेंद्रीकरण म्हणजे प्रादेशिक समतोल निर्माण करण्यात कृषी उद्योग यशस्वी होत आहेत.

**संशोधन पध्दती :-** 'कृषी उद्योग व ग्रामीण विकास' हा शोधनिबंध लिहिण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक साधनसामग्री या माहिती संकलनाच्या पध्दतीपैकी द्वितीयक साधनसामग्रीचा वापर केला आहे. विषयावर आधारित संदर्भग्रंथ, पुस्तके, विविध लेख इत्यादीचचा वापर केला आहे.

**प्रमुख कृषी उद्योग :-**

**१) कृषी पर्यटन :-**

कृषी पर्यटन म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात रममान होणे. पर्यावरणाला धोका न पोहचवता काढलेली सहल म्हणजे कृषी पर्यटन होय. चंद्रशेखर भटसावळे यांच्या मते, "स्वत: शेतकऱ्याने आपल्या खेड्यातील फळत्या-फुलत्या शेतावरच आयोजित केलेली आनंददायी शिक्षण प्रक्रिया व मौज यांचा सुंदर मिलाप असलेला उपक्रम म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटनासाठी महाराष्ट्र सरकारने न्याहारी व निवास योजना, सार्वजनिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे. महाभ्रमण योजना सुरू केलेली आहे.

कृषी पर्यटन उद्योगामुळे कृषी जीवनाचा परिचय होतो. कृषी उत्पादनांना स्थानिक बाजारपेठ निर्माण होते. कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना मिळते. कृषी पर्यटनामुळे मानवी तंत्रज्ञान, ज्ञान व संपत्तीचे ग्रामीण भागाकडे स्थलांतर होईल. कृषी पर्यटनाचे केंद्र उभे करण्यासाठी शेतकरी वर्गाला जास्त गुंतवणूक करण्याची आवश्यकता नाही. थोडक्यात ग्रामीण भागाच्या विकासात कृषी पर्यटन उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे.

**२) दुग्ध व्यवसाय :-** दुध उत्पादनात भारत हा जगातील पहिल्या क्रमांकावर आहे. दुग्ध उत्पादकतेचा विचार केल्यास डेन्मार्क, नेदरलँड्स, स्वित्झर्लंड इत्यादी देश कितीतरी पुढे आहेत. भारतामध्ये दुग्ध व्यवसाय दोन दृष्टीने महत्त्वाचा आहे. छोटी धारणक्षेत्रे असणाऱ्या बहुतांश कास्तकारांना बऱ्याच कमी खर्चात दुय्यम उत्पन्न देण्याचे काम हा व्यवसाय करतो. दुग्धाच्या प्राप्तीशिवाय त्यांना शेतीसाठी शेणखत मिळते आणि विविध कामे करण्यासाठी बैल मिळतात. आज ग्रामीण क्षेत्रात छोट्या सुधारकांच्या दुरावस्थेचे जे चित्र दिसते आहे. यामागे अनेक कारणे असली तरी या महत्त्वपूर्ण पुरक व्यवसायाच्या पध्दतशीर विकासाकडे झालेले दुर्लक्ष हे एक महत्त्वाचे कारण आहे. खालील तालिकेत भारतातील दुधाचे उत्पादन आणि दैनंदिन प्रतिव्यक्ती उपलब्धता दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. १.१**

**भारतातील दुधाचे उत्पादन आणि दैनंदिन प्रतिव्यक्ती उपलब्धता**

| वर्ष | दुधाचे उत्पादन (कोटी टन) | दैनंदिन दरडोई उपलब्धता (ग्रॅम) |
|---|---|---|
| १९५०-५१ | १.७ | १२४ |
| १९९०-९१ | ५.३९ | १७६ |

| | | |
|---|---|---|
| २०००-०१ | ८.०६ | २२० |
| २००५-०६ | ९.७१ | २४१ |
| २००६-०७ | १०.०९ | २४६ |
| २००७-०८ | १०.४८ | २५२ |
| २००८-०९ | १०.८५ | २५८ |
| २००९-१० | ११.२५ | २६३ |

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर काळात भारतामधील दुधाचे उत्पादन सहा पटीपेक्षा जास्त वाढले आहे. तर दरडोई उपलब्धता दुप्पटपेक्षा जास्त झाली आहे. अर्थात ही उपलब्धता जागतिक सरासरीपेक्षा (प्रतिदिन २७९.४ ग्रॅम) थोडी कमी असली तरी विकसित राष्ट्रापेक्षा कमी आहे.

**३) मत्स्य व्यवसाय :-**

ग्रामीण भागाच्या विकासात मत्स्य व्यवसाय अनेक अर्थानी लक्षणीय ठरतो. या व्यवसायामध्ये भूजल मत्स्य व्यवसाय आणि सागरी मत्स्य व्यवसाय असे दोन भाग केले जातात. खालील तालिकेत भारतातील मत्स्योत्पादन दाखविलेले आहे.

**तक्ता क्र. १.२**

**भारतातील मत्स्योत्पादन (लाख टन)**

| वर्ष | सागरी क्षेत्र | भुजल क्षेत्र | एकूण उत्पादन |
|---|---|---|---|
| १९९०-९१ | २३ | १५ | ३८ |
| २०००-०१ | २८ | २८ | ५६ |
| २००५-०६ | २८ | ३८ | ६६ |
| २००८-०९ | ३० | ४६ | ७६ |
| २००९-१० | २९.८ | ४८.७ | ७८.५ |

१९९०-९१ ते २००९-१० या काळात एकुण उत्पादन दुप्पटपेक्षा जास्त वाढले. त्यामध्ये सागरी क्षेत्रातील उत्पादनाचा हिस्सा ३८ टक्के तर भुजल क्षेत्राचा वाटा ३२% होता.

थोडक्यात काय तर ग्रामीण भागाच्या विकासात कृषी उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे. निर्यात वाढ, रोजगार वाढ, शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यात उद्योगाचे विकेंद्रीकरण व प्रादेशिक समतोल निर्माण करण्यात, संपत्तीचे न्याय वाटप घडवून आणण्यात ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यात कृषी उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे.

**निष्कर्ष :-** कृषी उद्योग व ग्रामीण विकास या शोध निबंधाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१) कृषीवर आधारित उद्योगाच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागाचा विकास होत आहे.
२) खेड्यातल्या लोकांना खेड्यातच रोजगार मिळवून देण्यात कृषी उद्योग यशस्वी होत आहेत.
३) कृषीवर आधारित उद्योगाच्या स्थापनेमुळे ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात भर पडत आहे.
४) कमी भांडवल व विकेंद्रीकरण म्हणजे प्रादेशिक समतोल निर्माण करण्यात कृषी उद्योग यशस्वी होत आहेत.

# महीला आणि कैंाटुबिक समस्या हुंडा पध्दती

**प्रा राजाराम भिसे**
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
शरदचंद्र महाविद्यालय,शिराढोण

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृती टिकवून धरण्यात एकत्र कुटुंबपध्दतीची फार मोलाची भूमीका राहिली आहे.अजूनही जगातील बऱ्याच प्रगत देशांना भारतीय कुटुंबाबद्दल आदर वाटतो.भारतात बाहेर सर्रास जाणवणाऱ्या घटस्फोट,हुंडा,स्त्रियांवरील अत्याचार, वृध्द माणसांवर म्हतारपणी होणारे हाल, घटस्फोटीत पती-पत्नींच्या मुलांवर होणरे वाईट परिणाम अशा समस्या फार कमी आहेत अनाथ एकेकटी मुले-मुली, घटस्फोटीत स्त्रिया, तरूण मुलगे-मुली कुटुंबाशिवाय वाढतात.आईचे प्रेम न मिळाल तरी त्याचे त्यांना काहीच वाटत नाही.कारण त्यांनी आईवडीलच पाहिले नसतात.काहींचे पालक मुले अगदी लहान असतानाच इतके भाडतात,क्रूरपणे वागतात की मुलांना वाईट वाटते, भीती वाटते पण ती तशीच जगत मोठी होतात.असे कैंाटुबिक आयुष्य वाटयाला येऊ नये अशी कुटुंबाची व्यावस्था असली पाहिजे.

**कौटुंबिक विघटनाची कारणे:**

पूवीच्या काळी पितसत्ताक कुटुंबाच्या प्रमुखाला भरपूर सत्ता असे, त्यांची सर्वावर करडी नजर असे आणि त्यांना नाराज करण्याचे धैर्य कोणताही नसे.असे सबंध जिव्हाळयाचे क्वचितच असत मालमत्ता, राहते घर (स्वयंपाकघर),देव; धार्मिक कार्ये, कुटुंबपुमूखाची सत्ता आणि निर्णयाचा अधिकार सामाईक असे.त्यामुळे विवाहित तरूण जोडपी एकत्र नांदताना स्वत:चे वेगळे निर्णय घेत नसत.चुल आणि इतर व्यवहार एकत्रच होत त्यामुळे मुले-मुली एकत्र खेळत, अभ्यास करत मोठी होत. असत युरोपीय सामाजातील कुटुंबेही अगदी एकत्र नसली तरी विस्तारित (Extended) असत त्यामुळे नवरा-बायको व त्यांची मुले यांचे एक केंद्र असे व त्यांचे व्यावहार स्वतंत्र चालत;निर्णयक्षमता एकाच प्रौढ पुरूषाकडे नसे.

१) **औद्यौगिकीकरण:**
औद्यौगिकीकरण जसजसे पसरत गेले तसतसे कौटुंबिक संबंध बदलले.आज पाश्चात्य देशांमध्ये वा युरोपमध्ये एकत्र वा विस्तारित कुटुंबे आढळत नाहीत. गेल्या दोनशे वार्षापासुन व्यक्तीस्वातंत्र्याची जाणीव इतकी तीव्र झाली की, तेथे छोटी छोटी कुटुंबे म्हणजे जोडपीच मुले होऊ न देताच एकेकटी राहण्यापर्यत बदल झाला आहे.काही मुले लहान असेपर्यत एकत्र राहतात व मुले मोठी झाली की वेगवेगळी राहू लागतात.कार्यात्मक आणि संरचनात्मक विभक्त होणे हे ते तेथील कुटूंबाचे समाजमान्य लक्षणच आहे.

२) **स्थलांतर :**
भारतीय कुटुंबे नोकरीच्या व रोजगारांच्या निमित्ताने राहते एकत्र घर सोडुन दुसरीकडे राहावयास गेली आहेत. शहरांमधील सर्व झोपडपट्टयांतील घरे ही गावाकडील एकत्र कुटुंबामधलीच आहेत.शहरांमधील वा छोटया नगरांमधील सदनिकांमध्ये राहणारी निम्न-सयुक्त वा विभक्त कुटुंब अजुनही ग्रामीण भगात आहेत.देव-धर्म,महालक्ष्मी, मत्यूनंतरचे अंत्यविधी आणि लग्नकार्ये यासाठी ही सर्व छोटी कुटुंबे गावी एकत्र कुटुंबात जमतात त्यांच्यात तात्पुरते का होईना जिव्हाळयाचे,नात्यातील देवाणघेवीचे सेबध जोपासले जातात.

३) ज्या कुटुंबानी शहरामध्ये स्थलांतर केले त्यांनी पुन्हा ग्रामीण कुटुंबाकडे वळून पाहिले नाही.शहरातच मिळेल तशा छोटया जागेत स्वत:च्या वा भाडयाच्या घरात सर्व नातेवाईकांना सामावून घेतले. वेगवेगळया वयांची विवाहित,अविवाहित मंडळी अशा कुटुंबातून राहिल्यामुळे वयात येणा-या मुलीच्या,प्रौढ कुमारिकांच्या आणि कुमारी मातांच्या समस्या घराबाहेर घेऊ लागल्या. एकत्र कुटुंबात ही पापे करणा-या मुलींना चार भिंतीच्याआतच सांभाळले जात होते.

४) **लोकसंख्या भरमसाट वाढविली :** अगदी अलीकडे १९५०-६० च्या दरम्यानही पती-पत्नी कुटुंबनियोजनाचे महत्व समजावून न घेता किंवा समजूनही धुडकावून लावत लोकसंख्ये भर घालत होत्या याचा हा सबळ पुरावा होता कोणत्याही समस्येवर सरकारी मदत मागण्या-या या कुटुंबांना मदत मागण्या-याचा काय नैतिक आधार आहे? पावसाने झाडे पडली वा वीज कोसळून कोणाचे मृत्यू झाले तरी सरकारी मदत मागणे म्हणजे लाचारी किंवा निर्लज्जपणा आहे.

**हुंडा प्रथेची समस्या :**

१. **स्वरूप,कारणे,दुष्परिणाम :**हुंडा व हुंडबळी प्रथेचे स्वरूप खूप गुंतागुंतीचे झाले आहे व त्यातुन विविध प्रकारे कुटंबामध्ये स्त्रियांना,त्यांच्या मुलामुलींना आणि विवाहाच्या बाबतीत विवाह होणे - न होणे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत.

१) लग्न झाल्यावर अगदी पहिल्या दिवसापासून ते पहिल्या काही वर्षापर्यत नववधूंना घरातील नातेवाईक नवरा,सासु-सासरे,नणंदा आणि क्वचित कोठे दीर छळायला सुरूवात करतात, मारहाण करतात, वाकडे बोलतात,

उपाशी ठेवतात, जाळतात, कोंडून आणि ठारही मारून टाकतात असा छळ करण्याचे कारण तिने स्वत:कमवीत असेल तर स्वत:चे पैसे द्यावेत किंवा माहेरच्या माणसांकडून आणावेत, माहेरच्या वाटण्यांमध्ये हिस्सा मागावा व न दिल्यास त्रास देणे हाच उद्देश असतो. अशा पैशांना व अशा रीतीने मागण्याला हुंडा मागणे असे म्हणतात हुंडा ५००रु. पासून ते पाच लाखांपर्यंत असू शकतो. याहूनही अती श्रीमंत घरांमध्ये जास्त रकमांसाठी छळ होतो.असा हुंडा न दिल्यास त्या सासुरवाशीण मुलीला ठार मारले जाते वा विद्रुप करू न घरातून हाकलले जाते.बहुतेक घरातून हाकललेल्या अशा हुंडबळी मुली माहेरी परत येतात. थोडे फार पैसे देऊन परत नांदायला जातात. अशामुळे समस्या सुटत नाही.उलट अधिक पैसे मागायची सवय सासरच्यांना लागत मंडळी पुराव्यासह सापडली तर कोर्टात केस चालते, साक्षीपुरावे होतात. सासर-माहेर या दोन्ही कुटुंबांना वकील लावावे लागतात.ब-याच महिन्यांनंतर केसचा न्यायनिवाडा होतो आणि आरोप सिध्द झाला तर आरोपींना शिक्षा होतात, कारावास भोगावा लागतो मुलीचा मृत्यू झाला असेल तर जन्मठेप वा कधी कधी फाशीची शिक्षा होते ती अमलात यायला काही वर्षे जावी लागतात पण ती खुनाची केस झाली तर केवळ हुंडयाची केस असेल आणि मुलगी जिवंत असेल तर ७ वर्षे सक्तमजुरी व दंड अशी शिक्षा भोगावी लागते. पूर्वी हुंडा प्रतिबंधक कायदा होता तो कलम ४९८ प्रमाणे होता हुंडयाचे प्रमाण वाढल्यानंतर मात्र देशातील स्त्रीसंघटना, वकील मंडळी आणि मोठया प्रमाणावर पालकयांच्याकडुन दडपण आले,मोर्चे निघाले आणि त्यामुळे महत्वाची घटनादुरूस्ती झाली ४९८ कलमाला अे (अ) हे उपकलम लावले गेले आणि ४९८ अ या नावाने कायदा झाला.

२. लग्न जमविण्याची प्रक्रिया काही घरी थोडक्यात आटोपते,तर काही ठिकाणी बरीच लांबते काही वर मुलगे इतके चोखंदळ असतात की ते ९० ते १०० मुलांना पाहण्यासाटी जातात तेथील पाहुणचार घेतात,थोडेफार प्रश्न विचारून मुलांना चाचपून बघतात आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांच्यात गुण आढळतात का ते पाहातात मुलगी पसंत असेल तर मग लग्नामध्ये बक्षिसे म्हणून काय देणार, लग्नसमारंभ कसा करणार, जेवणावळी, दागदागिने, भांडीकुंडी आणि कपडेलत्ते या सर्व भौतिक गोष्टी किती फायदेशीर होतील या व्यावहारात शिरतात आणि येथेच हुंडयाचा प्रश्न येतो ही व्यावहारी देवघेव हुंडा या नावाखाली ठरविली जाते या देवघेवीचा अलिखित नियम असा असतो की वराची बाजू श्रेष्ठ समजली जाते आणि वधूकडची गौण वधूच्या बाजूने वस्तू-वास्तू-पैसे-दागदागिने-वस्त्रे यांचा ओघ वराकडे आला पाहिजे असे गृहीत धरले जाते आणि वर स्वत: आणि त्याचे आईवडील अवाजवी मागण्या करतात एकुण बोजा खूपच असेल तर मुलीकडून असहायता दाखविली जाते आणि या मुद्दयावरून विवाह जुळत नाहीत.

**दुष्परिणाम :**

१) अशा मुली अनेक वर्षे लग्न न होता माहेरीच राहतात किंवा माहेरच्या माणसांनाही पटले नाही तर एकेकटया राहतात.

लग्न व्हावे ही नैसर्गिक इच्छा त्यांना असते पण पैशाअभावी वा सौंदर्याअभावी वा अन्य कारणामुळे त्यांचे लग्न योग्य वयात

(म्हणजे ३०-३२ वर्षांपर्यंत) होत नाही आणि त्यांना प्रौढ कुमारिका म्हणून राहावे लागते त्यांच स्वभाव चिडचिडा किंवा तुसडा होतो.त्यांना एकलकोडे जीवन जगण्याची सवय करावी लागते, पण त्यातुन त्या समाधानी होत नाहीत त्यांच्या प्रकृतीच्याही तक्रारी सुरूहोतात.

२) एकटे राहण्यात धोकेही असतात, कोणी त्यांच्या एकटे राहण्याचा गैरफायदा घेतात;समाज त्यांच्याबद्दल संशयी बनतो आणि चारित्र्यावर शिंतोडे उडण्याचीही भीती असते. पाश्चात्य आणि विचारांनी प्रगत देशांमध्ये अशा स्त्रियांचे एकटे राहणे बरेच सुसहय असते. कारण तेथे आजूबाजूचे लोक अशा स्त्रीबद्दल विनाकारण संशय घेत नाहीत किंवा चिखलफेक करीत नाहीत.अशा स्त्रिया आपल्या मित्रमैत्रणींबराबर बाजारहाट,करमणूक, कामाच्या ठिकाणी व अन्य ठिकाणी प्रवासात मोकळपणाने सहभागी होऊ शकतात अशा स्त्रियांना भीती वाटली तर त्या सोबतीला कोणाला बोलावू शकतात.

३) मात्र पारंपारिक विचार असलेल्यांचा समाजात अशा स्त्रियांना राहणे अवघड असते त्यापैकी काही जणी खूप कर्तबगार असतात त्या त्यांच्या नोकरीत चांगले काम पार पाडुन लोकप्रिय होतात त्या कामामध्ये इतक्या रममाण होतात की त्यांना वेळ अपुरा पडतो करियर, काम आणि त्यातील यश हे त्यांच्या लग्न न होण्याच्या दृष्टीने लाभदायकच ठरते.

४) अशाच प्रकारचे उदाहरण राजकारणातील नाव मिळविलेल्या आणि त्याठिकाणी चांगले मानाचे पद असणा-या स्त्रियायांबाबत देता येईल उलट लग्न न झाले तर जीवनात निर्माण झालेली पोकळी त्यांचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील यश भरून काढते.

अशीही उदाहरणे आहेत की, अशा काही स्त्रिया हुंडाविराधी चळवळींचे नेतृत्व करतात आणि वेळ आली तर हुंडा मागणा-यांशी लग्न करु नका,अविवाहित राहिले तरी चालेल असे बोलले उदाहरण स्वत:च्या जीवनातून देऊ शकतात नेतृत्व कस असावे, कथनी आणि करणी यात सुसंगती असावी हे त्या प्रत्यक्ष जगण्यातून देऊ शकतात.

**परिणाम व उपाय :**

१) हुंडयाच्या समस्येवर गंभीर चर्चा ठिकठिकाणी होते. जनजागृतीसाठी कार्यक्रम होतात. तरूण मुले-मुली हुंडा घेणार नाही - देणार नाही अशा शपथा घेतात; आणि वरसंशोधन सुरू करतात. मुली पसंत पडाव्यात म्हणून अनेक ठिकाणी दाखवितात आणि पसंत पडलीच तर वराकडील मंडळी मागेल तितका हुंडा कबूल करून बसतात.

२) कर्ज काढतात, हतबल होऊन लग्न करून देतात हुंडा देऊ नये हे पटते पण वळत नाही कुंटुबातील पालक जर असेच वागणार असतील तर यापुढे या समस्येवर तोडगा निघेल अशी आशा करायला जागाच उरत नाही.

३) पुढे मुलीला त्रास झालाच तर मुलीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत नाहीत. जोपर्यत माहेतची माणसे विवाहित मुलीच्या मागे उभी राहणार नाहीत तोपर्यत गुन्हेगार उजळ माथ्याने समाजात वावरत राहतील . एक उदाहरण अतिशय बोलके आहे आणि थोडीशी हिंमत दाखविली तर करून दाखविण्यासारखी आहे. एका डॉक्टर मुलीचे लग्न एका डॉक्टर मुलाशी झाले आणि ती सासरी गेली -सासु-नणंदा-सासरे यांनी कुजकट बोलणे आणि टोमणे सुरु केले घरात कोणी आजारी पडले की सुनबाईचा पायगुण अपशकुनी आहे असे समर्थन करण्यात सुरुवात केली.

**कारणे :**

१) कष्ट न करता लग्नानंतर सासरी आलेल्या नव-या मुलीला त्रास देऊन, पैसा मिळविणे.
२) ब-याच मुलींचे बाप गरीब/ श्रीमंत असणाऱ्यांच्या दुर्बलतेचा फायदा घेणे.
३) पुरूषप्रधान कुटुंबपध्दतीचा गैरफायदा घेऊन सुनेला छळण्याची वृत्ती विकृतीत बदलणे.
४) पैसा मिळविण्याची हाव, मोहावर आवर घालता न येणे, पुरूषी अहंकार चा शत्रूमुळेच सुनेचा शाब्दिक छळ,शारीरिक छळ, मानसिक अपमान,लैगिक विकृत छळाचा आनंद घेणे, क्रूरतेतून आनंद लुटणे, कैाटुंबिक प्रतिष्ठेचे प्रदर्शन करणे.

**परिणाम :**

शरीर विद्रुप होते, भीती मनात घर करते, पुन्हा लग्न करावेसे वाटत नाही स्त्रीधनाचा, पैशाचा नाश, कर्जबाजारीपणा, इतर बहिणींची लग्ने जमत नाहीत बदनामी होते, माहेरच्या नातेवाईकांवर भार, माणुसकीवरचा विश्वास उडतो.

**उपाय :**

१) हुंडा देणार नाही अशाच निर्धाराने विवाह ठरवण्यासाठी दबावगट तयार करणे ( विवाह मंडळे,महिला मंडळे, युवक संघटना, राजकीय पक्ष )
२) हुंडा मागितल्याबरोबर पोलिसात तक्रार करणे, घेतल्यावर तक्रार करणे, सापळा रचून पकडणे.
३) छळ सुरू होताच तक्रार करणे, विरोध करणे, पेपरमध्ये प्रसिध्दि देणे, पुरावा गोळा करणे.
४) मरण येण्यापूर्वी खरी माहिती देण, नवरा, सासू यांना पकडणे, बदनामी करणे, सामाजिक संस्थानी दबाव आणणे.
५) न्यायालयात खरी साक्ष देणे.

**सारांश :**

अशा त्रिसूत्री कार्यक्रमांचा पाठपुरावा प्रत्येक सुशिक्षित स्त्रीने कारावयाचा ठरविले तर कौटुंबिक अत्याचारांमुळे होणारे व्यक्तीविघटन,कौटुंबिक विघटन आणि सामाजिक विघटन या तिन्हींवर मात करता येईल. शेकडो वर्षापासून चालणारे हे अत्याचार थांबविलेच पाहिजेत तरच या समस्यांवर नियंत्रण होईल.

**संदर्भ :**

१. पंचायत भारती - मुंबई
२. प्रेरक ललकारी - मुंबई
३. समाज प्रबोधन पत्रिका- पुणे
४. शैक्षणीक संदर्भ पर्यावरण विशेषांक- पुणे

# भारत में महिला सशक्तिकरण में आने वाली बाधाऍं

**प्रा.डॉ. सूर्यकांत माधवराव दळवे**
(हिंदी विभाग)
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण
ता. कळंब जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :–**

आज के समय में महिला सशक्तिकरण सबसे बडा चर्चा का विषय है। महिलाओं की तरक्की और सशक्तिकरण के बिना देश की तरक्की संभव नहीं है। महिलाओं के आर्थिक सशक्तिकरण का अर्थ उनके आर्थिक फैसलों, उनकी आय, संपत्ति और दूसरे वस्तुओं की उपलब्धता से है। इन सुविधाओं को पाकर ही वह अपने सामाजिक स्तर को उंचा कर सकती है। महिला सशक्तिकरण का अर्थ महिलाओं के सामाजिक और आर्थिक स्थिती में सुधार लाना है। उन्हे रोजगार, शिक्षा, आर्थिक तरक्की के बराबरी के मौके मिल सके। जिसके व्दारा महिलाऍं भी पुरूषों की तरह अपनी हर आकांक्षाओं को पूरा कर सके।

**भारत में महिला सशक्तिकरण में आनेवाली बाधाऍं :-**

भारतीय समाज में कई तरह के रिवाज, मान्यताऍं और परंपराऍं शामिल है। कई बार यह पुरानी मान्यताऍं और परंपराऍं भारत में महिला सशक्तिकरण के लिए बाधा सिध्द होती है।

1. **समाजिक मापदंड :–**

भारत में पुरानी और रूढीवादी विचारधाराओं के कारण कई सारे क्षेत्रों में महिलाओं के घर छोडने पर पाबंदी होती है। इस तरह के क्षेत्रो में महिलाओं को शिक्षा या फिर रोजगार के लिए घर से बाहर जाने के लिए आजादी नहीं होती है। इस तरह के वातावरण में रहने के कारण महिलाऍं खुद को पुरूषों से कमजोर समझने लगती है और अपने वर्तमान सामाजिक और आर्थिक दशा को बदलने में नाकाम साबित होती है।

2. **लैंगिग भेदभाव :–**

हमारे देश में अभी भी कार्यस्थलों पर महिलाओं के साथ लैंगिग स्तर पर काफी भेदभाव किया जाता है। कई सारे क्षेत्रा में तो महिलाओ को शिक्षा और रोजगार के लिए बाहर जाने की भी इजाजत नही होती है। इसके साथ ही उन्हें आजादी पूर्वक कार्य करने या परिवार से जुडे फैसले लेने की भी आजादी नहीं होती है और उन्हें सदैव में पुरूषों की अपेक्षा कमजोर ही माना जाता है। इस प्रकार के भेदभावों के कारण महिलाओं की सामाजिक और आर्थिक दशा बिगड जाती है। इसके साथ ही यह महिला सशक्तिकरण लक्ष्य को भी बुरी तरह से प्रभावित करता है।

3. **कार्यक्षेत्र में शारीरीक शोषण :–**

कार्यक्षेत्र में होने वाला शोषण भी महिला सशक्तिकरण में एक बहूत बडी बाधा है। नीजी क्षेत्र जैसे की सेवा उद्योग, सॉफ्टवेअर उद्योग, शैक्षणिक संस्थाऍं और अस्पताल शारीरिक शोषण की समस्या से सबसे ज्यादा प्राभावित होते है। यह समाज में पुरूष प्रधानता के वर्चस्व के कारण महिलाओं के लिए और भी समस्याए उत्पन्न करता है। पिछले कुछ वर्षो में इन सभी कार्यक्षेत्रों में महिलाओं के साथ होने वाले उत्पीडन में काफी तेजी से वृधी हुई है और पिछले कुछ दशकों में लगभग 170 प्रतिशत वृध्दी देखने को मिली है।

4. **भुगतान में असमानता :–**

भारत में महिलाओं को अपने पुरूष समकक्षों की अपेक्षा कम भूगतान किया जाता है और असंगठित क्षेत्रों में यह समस्या और भी ज्यादा दयनीय है। देहातों में मजदूरी वाले जगहों पर तो यह सबसे बदतर है। समान कार्य को समान समय तक करने के बावजूद भी महिलाओं को पुरूषों की अपेक्षा काफी कम भूगतान किया जाता है। संगठित क्षेत्र में काम करने वाली महिलाओं को अपने पुरूष समकक्षों के तरह समान अनुभव और योग्यता होने के बावजूद पुरूषों की अपेक्षा कम भूगतान किया जाता है।

5. **अशिक्षा :–**

महिलाओं मे अशिक्षा और बीच में ही पढाई छोडने जैसी समस्याऍं भी महिला सशक्तिकरण में काफी बडी बाधाऍं है। वैसे तो शाहरी क्षेत्रो में लडकियॉं शिक्षा के मामले में लडकों के बराबर है पर ग्रामीण क्षेत्रों में इस मामले में वह काफी पीछे है। भारत में महिला शिक्षा दर 64.6 प्रतिशत है। जबकि पुरूषों की शिक्षा दर

80.9 प्रतिक्षत है। बहूत सारी ग्रामिण लडकियॉ जो स्कूल जाती भी है, पर उनकी पढाई बीच में ही छूट जाती है। वह दसवी कक्षा भी नही पास कर पाती है।

6. **बाल विवाह :–**

भारत में पहले कच्ची उम्र में ही लडकी का विवाह किया जाता था। लेकिन पिछले कुछ दशकों से सरकार व्दारा लिये गये प्रभावी फैसलों व्दारा भारत में बाल विवाह जैसी कुरीति को काफी हद तक कम कर दिया गया है। फिर भी 2018 में युनिसेफ के एक रिपोर्ट द्वारा पता चलता है, की भारत में अब भी हर वर्ष लगभग 154 लाख लडकियों की शादी 18 वर्ष से पहले ही कर दी जाती है। जल्दी शादी हो जाने के कारण महिलाओं का विकास रूक जाता है और वह शारीरीक तथा मानसिक रूप से व्यस्क नहीं हो पाती है।

7. **महिलाओं के विरूध्द होने वाले अपराध :–**

भारतीय महिलाओं के साथ कई सारे घरेलू हिंसा, दहेज, हॉनर किलिंग और तस्करी जैसे गंभीर अपराध देखने को मिलते है। यह काफी अजीब है की शहरी क्षेत्रों की महिलाएॅ ग्रामिण क्षेत्र की महिलाओं की अपेक्षा अधिक अपराधीक हमलों की शिाकार होती है। यहॉ तक कि कामकाजी महिलाएॅ भी देर रात में अपनी सुरक्षा को देखते हूए सार्वजनिक परिवहन का उपयोग नही करती है। सही मायनों में महिला सशक्तिकरण की प्राप्ति तभी की जा सकती है जब महिलाओं की सुरक्षा को सुनिश्चित किया जा सके और पुरूषों की तरह वह भी बिना भय के स्वच्छंद रूप से कही भी आ जा सकें।

8. **कन्या भ्रूणहत्या :–**

कन्या भ्रूणहत्या या फिर लिंग के आधार पर गर्भपात भारत में महिला सशक्तिकरण के रास्ते में आने वाली सबसे बडी बाधाओं में से एक है। कन्या भ्रूणहत्या का अर्थ लिंग के आधार पर होने वाली भ्रूणहत्या से है, जिसके अंतर्गत कन्या भ्रूण का पता चलने पर बिना मॉ के सहमति के ही गर्भपात करा दिया जाता है। कन्या भ्रूणहन्या के करण ही हरियाणा और जम्मु काश्मीर जैसे प्रदेशो में स्त्री और पुरूष लिंगानुपात में काफी ज्यादा अंतर आ गया है। हमारे महिला सशक्तिकरण के यह दावे तब तक नहीं पुरे होंगे जब तक हम कन्या भ्रूणहत्या की समस्या को मिटा नही पायेंगे।

**निष्कर्ष :–**

जिस तरह से भारत सबसे तेजी से आर्थिक तरक्की प्राप्त करने वाले देशों में शुमार हुआ है, उसे देखते हुए निकट भविष्य में भारत को मलि सशक्तिकरण के लक्ष्य को प्राप्त करने पर भी ध्यान केंद्रीत करने की आवश्यकता है। महिला सशक्तिकण के द्वारा ही देश में लैंगिग समानता और आर्थिक तरक्की को प्राप्त किया जा सकता है।

भले ही आज के समाज में कई भारतीय महिलाएॅ राष्ट्रपती, प्रधानमंत्री, प्रशासनिक आधिकारी, डॉक्टर, वकील आदि बन चुकी हो फिर भी बहूत सारी महिलाओं को आज भी सहयोग और सहायता की आवश्यकता है उन्हे शिक्षा और आजादी से कार्य करने, सुरक्षित यात्रा सामाजिक आजादी में अभी भी और सहयोग की आवश्यकता है। महिला सशक्तिकरण का यह कार्य काफी महत्वपूर्ण है क्योंकि भारत की समाजिक, आर्थिक प्रगति उसके महिलाओं के समाजिक आर्थिक प्रगति पर ही निर्भर करती है।

## संदर्भ संकेत :–

1. युनिसेफ – अहवाल – 2017–18
2. महिला सबलीकरण – डॉ. संभाजी देसाई
3. भारतीय राजनिती समस्याएॅ और समाधान – डॉ. महेन्द्र कुमार मिश्रा
4. भारत में स्थानीय प्रशासन – अशोक शर्मा
5. कर्मचारी प्रशासन – प्रा. के. आर. बंग

# ग्रामीण विकासावर माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रभाव

**डॉ. प्रा. बी.एल. दाणे**
लोकप्रशासन विभाग,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पंचायतीराज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकल्पा अंतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता व पारदर्शकता आणणे नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा-दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबध्द स्वरुपात मिळत, तसेच इतर व्यावसायिक सेवा, जास्तीत जास्त प्रकारच्या बँकिंग सेवा ग्रामीण जनतेला सुलभ व तत्परतीने मिळाव्यात या हेतूने ग्रामीण भाग हा शासनाने जास्तीत जास्त माहिती तंत्रज्ञानाशी सलग्न करण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याचे काही चांगले परिणाम ग्रामीण भागावर झालेले आपल्याला पुढील घटकाच्या माध्यमातून आढळून येतात.

**१) माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा शिक्षणावरील परिणाम:**

शिक्षण हे देशाचा कणा आहे बऱ्याच विकसनशील देशामध्ये मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहामध्ये सामील करुन घेणे. ही एक अतिशय जटील समस्या आहे व त्यांची प्रामुख्याने कारणे म्हणजे भौगोलिक संरचना, सामाजिक व आर्थिक स्तर इत्यादी होय. उदा- भारतातील उत्तर-पूर्व राज्यातील अनेक खेडी ही डोंगर दऱ्यामुळे विखुरलेल्या अवस्थेत आहेत त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना दयनीय वाहतूक व्यवस्थेमुळे ग्रामीण भागातील मुलांमध्ये दररोज शाळेमध्ये येण्याबाबत उदासिनता दिसून येते. तसेच ग्रामीण भागात चांगल्या शिक्षकांचा तुटवडा आहे. मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व त्यांच्या मागे असलेल्या शिक्षकांचे प्रमाण हे सुध्दा विद्यार्थी गळतीचे प्रमुख कारण मानले जाते. ज्या वेळेस शहरी भागातील विद्यार्थ्यांची तुलना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांशी करण्यात आली तेव्हा शिक्षणाच्या दर्जाबाबत त्यामध्ये मोठी तफावत आढळून आली ही तफावत आढळून आली ही तफावत माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या (ICT) माध्यमातून काही प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. ICT ची संकल्पना स्विकारल्याने शिक्षण देण्याची पध्दत ही शिक्षक केंद्रीत न राहाता विद्यार्थी केंद्रीत बनण्यास मदत होत आहे. ICT च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तज्ञासोबत चर्चा करण्यासाठी फोन किंवा व्हिडीओ कॉन्फरन्सींगची सुविधा पूरविली जात आहे. इंटरनेट आणि वेबसर्व्हर वरिल विविध विषयाचे संकलित भांडार हे ज्ञानार्जनाचे सर्व रस्ते खुले करीत आहे. ICT वर आधारित अंतर शिक्षण सेवा ही उच्चशिक्षण देण्यास मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहे.

ICT मुळे फक्त प्राथमिक किंवा उच्च शिक्षणच देता येत आहे असे नव्हे तर प्रौढ शिक्षण, सुध्दा देणे शक्य होत आहे. ICT मुळे ऑनलाईन व्यावसायिक प्रशिक्षण देणे शक्य झाल्यामुळे इंजिनियरींगच्या विविध शाखेतील जसे, सिव्हिल, इलेक्ट्रीकल, कॉम्प्युटर, मेकॅनिकल इत्यादी तज्ञ ग्रामीण भागात निर्माण करता येतील ज्यामुळे ग्रामीण भागातील गरजा, रोजच्या अडचणी सहज हाताळता येतील.

**२) माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा आरोग्य सेवेवरील परिणाम:**

वैद्यकीय सेवा ही ग्रामीण भागातील सर्वात जास्त दुर्लक्षित अशी सेवा आहे. ग्रामीण भागात पदवीधारक डॉक्टर मिळत नाहीत. बऱ्याचशा ग्रामीण दवाखान्यामध्ये पूर्णवेळ डॉक्टर नियुक्त केलेला नसतो किंवा डॉक्टर ही ग्रामीण भागात येण्यास टाळाटाळ करीत असतात कारण ग्रामीण भागात पायाभुत सुविधांचा अभाव, संधीचा अभाव, संवादाचा अडथळा इत्यादी कारणांमुळे ग्रामीण भागात ते राहण्यास इच्छुक नसतात. परंतु ICT च्या माध्यमातून संभाषित वैद्यकिय सेवा ही ग्रामीण भागात पोहचण्यासाठी, मिळण्यासाठी व उपलबीबाबत परिणामकारक ठरत आहे. ICT वर आधारित ई-आरोग्य सेवा प्रशिक्षित व्यक्तिच्या मदतीने ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पुरविण्यास सक्षम ठरत आहे. जेंव्हा रुग्ण आरोग्य कक्षामध्ये आणला जातो त्यावेळी तेथील प्रशिक्षित व्यक्ती त्या पेशंटबाबतची सर्व माहिती आरोग्याची व आजाराची दवाखान्यासोबत संपर्क साधला जाऊन कक्षामधील प्रशिक्षित व्यक्ती शहरातील डॉक्टरशी चर्चा करुन डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व मार्गदर्शनानुसार पेशंटच्या तपासण्या करतो. आणि औषधोपचार करतो तसेच व्हिडीओ कॅन्फरसिंगद्वारे डॉक्टर व पेंशट समोरासमोर पाहून बोलू शकतो.

**३) माहिती तंत्रज्ञानाचा कृषीक्षेत्रावरील परिणाम:**

ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येचे पोट भरण्याचे काम हे प्रामुख्याने शेती व्यवसायाकडून केले जाते. जरी विज्ञानाने आज मोठी प्रगती केली असली तरी अनेक उद्योगाधंद्याचा विकास झाला असला तरी विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाची प्रमुख भूमिका राहिली आहे परंतु आजही ग्रामीण भागातील शेती पारंपारिक पध्दतीने केली जाते याचा परिणाम उत्पादनावर होतो म्हणून ICT चा वापर हा शेती विकासाच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा मानला जाते आहे. ICT ची सुविधा पारंपारिक शेतीच्या पध्दतीचे रुपांतर प्रगत शेतीमध्ये करु शकते.

ICT च्या माध्यमातून शेतकरी हे कृषीतंज्ञाशी चर्चा करुन त्यांचा सल्ला सहज मिळवू शकतात. ऑनलाईन माध्यमाद्वारे शेतकरी आपल्या शेतातील मातीचे परिक्षण करुन कोणत्या पीकासाठी ती जमीन योग्य आहे हे जाणून घेऊ शकतात. विकसित देशामध्ये शेतजमीनीवर उपकरण लावण्यात आलेले असून त्याद्वारे हवामान, उष्णता, पाऊस याबाबतची माहिती मिळवून पिकांना संरक्षण देण्यात आलेले आहे. तसेच सदर उपकरणाद्वारे जमिनीला पाण्याची गरज, क्षारांची कमतरता खताचा वापर किटकनाशकांचा वापर इत्यादी बाबतची माहिती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होते. अशा प्रकारचे उपकरण हे विकसनशील देशामधील शेतकऱ्यांना फायदेशीर ठरु शकते. सॅटेलाईट व सेन्सॉर सारखे उपकरणांमुळे हवामानाबाबतची अचूक माहिती शेतकऱ्यांना एक महिना आगोदर मिळू शकते त्यामुळे शेतकऱ्यांना कोणती पीक लागवड करावी हे ठरविणे शक्य होत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून सुधारित व दर्जेदार बियाणे निवडणे सोपे होत आहे. तसेच पिकांच्या बाजारातील दराबाबत व सरकारी ई-सबसिडीबाबत माहिती शेतकऱ्यांना सहज मिळेल. ICT च्या वापरामुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या थेट शेतकऱ्यांकडून शेतीमालाची मोठया प्रमाणावर खरेदी करीत असल्याने मध्यस्थ खरेदीवर ही संकल्पना आता मोडीत निघाली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. भारतातील काही राज्यामध्ये सरकारने शेतकऱ्यांना माल थेट शहरातील स्वयंपाकघरामध्ये ही संकल्पना स्विकारली आहे. जे की ICT मुळे कष्टकरी शेतकऱ्यांना प्रगतीच्या मार्गावर आणण्याचे कार्य केलेले आहे.

**४) माहिती तंत्रज्ञानाचा आपत्ती व्यवस्थापनावरील परिणाम:**

नैसर्गिक आपत्ती किंवा संकट हे अनिश्चित असून ते देश विकसित, अविकसित किंवा विकसनशील असो ते कोठेही येऊ शकते बऱ्याच नैसर्गिक आपत्तीमुळे मोठया प्रमाणावर मानवहानी व वित्तहानी झालेली आहे. ज्याचा परिणाम हा बराच काळ विसरला जाऊ शकत नाही. अनेक वेळेला असे निदर्शनास येते की, मोठया नैसर्गिक आपत्तीचे परिणाम हे विकसित देशापेक्षा अविकसित किंवा विकसनशील देशावर खोलवर पाहायला मिळतात.

भारतामध्ये २००४ सालचा त्सुनामीचा उद्रेक किंवा २०१५ साली झालेला नेपाळचा भूकंप याने संपूर्ण जग हादरावून टाकले. अपुरी परिवहन व्यवस्था दूरसंवादाच्या साधनांची कमतरता या कारणांमुळे शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये नैसर्गिक आपत्तीचा परिणाम जास्त खोलवर झाला आहे. चक्रीवादळ, पूर, त्सूनामी, ज्वालामुखी इत्यादी सारख्या नैसर्गिक आपत्तीच्या प्रकारामध्ये पुर्वसूचना देणारी यंत्रे बसविणे गरजेचे आहे. पुर्वसूचना जर मिळाली तर लोकांना सुरक्षित स्थळांचा सहारा घेणे सहज शक्य होईल. व होणारी जिवित हानी काही प्रमाणात कमी होऊ शकेल.

उदा- त्सुनामीबाबत सावधगिरीचा इशारा देणारी यंत्रणा ही जपान, इंडोनेशिया तसेच चक्रीवादळाबाबत सावधगिरीचा इशारा देणारी यंत्रणा व सुविधा ही क्युबा, मेक्सिको, अमेरिका या ठिकाणी अस्तित्वात असल्याने जिवितहानीचा आकडा शून्यावर आहे.

ICT च्या उपकरणांच्या मदतीने योग्य तांत्रिक माहिती व त्यांची आखणी करणे शक्य आहे. तसेच संकटाच्या वेळी योग्य निर्णय व तात्काळ मदत सर्व स्तरावरुन करणे शक्य झाले आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये प्रामुख्याने संवाद साधनाच्या उपरकरणांची हानी होते. त्यामुळे संवाद साधने कठीण होते व परिस्थिती आणखीच बिकट होऊन बसते. अशावेळी GIS व GPS यांचा प्रभावीरितीने उपयोग करुन घेण्यात येतो. हार्न रेडिओ हा ICT चा घटक असून नैसर्गिक आपत्तीने प्रभावित असलेल्या भागामध्ये आपत्कालीन संवाद, दूरभाष साधण्याकरिता याचा वापर होतो.

तसेच रिमोट सेन्सींग टेक्नीक आणि सॅटेलाईटवरील माहिती ही फायदेशीर ठरली आहे, ज्याद्वारे पूराची परिस्थितीबाबत पूर्वसूचना देणे शक्य झाले आहे. नागरिकांच्या मदतकार्यात योजना व कृतीची अमलंबजावणी करीत असताना शेतकऱ्यांसाठी विहिर, बोअरवेल घेण्यासाठी सुध्दा GIS व GPS ची मदत घेता येत आहे.

पंचायतराज संस्थांच्या कारभारात एकसूत्रता व पारदर्शकता आणणे, सर्व सामान्य ग्रामीण जनतेस त्यांच्या राहण्याच्या परिसरात सर्व शासकीय सेवा पारदर्शक पध्दतीने त्वरीत उपलब्ध करुन देण्याच्या उद्दिष्टाने भारत सरकारने माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रसार हा ग्रामीण भागापर्यंत केलेला आहे.

आज माहीती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात नागरिकांना दिली जाणारी सेवा ही डिजिटल स्वरुपात मिळत आहे. या सेवेमुळे नागरिकांचा वेळ, पैसा, श्रम याची बचत होऊन प्रशासनात असणारी दफ्तर दिरंगाई, लालफितशाही संपुष्टात आली व प्रशासन पारदर्शक उत्तरदायी व तत्पर बनत आहे. केंद्र सरकारचा डिजिटल इंडिया या कार्यक्रमातून संपुर्ण गावातील ग्रामपंचायती इंटरनेटने जोडल्या गेल्या आहेत. त्यातून गावपातळीवरच सर्व सेवा मिळत आहेत. गावातील प्रत्येक नागरिक या सेवांचा लाभ घेत आहे.

**संदर्भ :**

१. योजना, डिसेंबर, २०१८
२. योजना, मार्च, २०१६.
३. लोकप्रशासनातील नवप्रवाह, डॉ. प्रिती पोहेकर
४. लोकसत्ता.

# ग्रामीण विकास आणि शासकीय योजना

**प्रा.डॉ. जगदीश देशमुख**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी
ता.जि. उस्मानाबाद

**१. प्रस्तावना :-**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर ग्रामीण समाज जीवनाचा दृष्टीकोन बदलण्यास सुरुवात झाली. देशातील मोठा समाज खेडयात असल्याने त्यांचा सर्वांगीण विकास कोणकोणत्या मार्गाने होईल यावर लक्ष केंद्रित झाले. गाव समाजाला वगळून देशाची प्रगती करणे अशक्य आहे. गाव हेच केंद्रबिंदू समजून ग्रामीण विकासाच्या योजना अथवा विकासाचा कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. ग्रामीण समाज व नागरी समाजाच्या विकास कार्यक्रमामध्ये जोपर्यंत संतुलन साधले जात नाही, तोपर्यंत संपूर्ण भारताचा आर्थिक व समाजिक दृष्टीने विकास होण शक्य नाही. यासंदर्भात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम नेहमी म्हणत असे, ‘‘विकसित राष्ट्र होण्यासाठी भारतातील ग्रामीण भागांच्या विकासाचा विचार करावा लागेल.’’

ग्रामीण विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. खेडयांचा नियोजन पध्दतीने बदल घडवून आणणे, खेडयांची पुर्नरचना करणे, ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानाबरोबरच शेती, शेती संबंधित उद्योग, शिक्षण, आरोग्य, पेयजल व मनुष्यबळाची उपयुक्तता वाढविणे असा अर्थ होय.

**२. ग्रामीण विकास - अर्थ आणि व्याख्या :-**

ग्रामीण विकास ही संकल्पना बहुगुणी असली तरी ती ग्रामीण जीवनाच्या मानसिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आदी क्षेत्रातील विकासाचे ध्येय यामध्ये अंतर्मुख असते.

१. जागतिक बँकेच्या मतानुसार :- ‘‘ग्रामीण विकास म्हणजे अशी रचना की, जी विशिष्ट समूहातील व्यक्तीच्या आर्थिक व सामाजिक जीवनातील विकासासाठी योजना तयार करते.’’
२. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मते :- ‘‘शासनाच्या व लोकांच्या संघटित प्रयत्नांद्वारे सर्व समाजाच्या मतानुसार आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमाला सहकार्य करणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.’’

**३. अभ्यास विषयाची उद्दिष्टे –**

१. ग्रामीण विकास या संकल्पनेचा अभ्यास करणे
२. ग्रामीण विकासचा अर्थ व व्याख्या पाहणे
३. ग्रामीण विकासाच्या संदर्भात भारत शासनाच्या योजनांचा अभ्यास करणे
४. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकासाच्या संदर्भात योजनांचा आढावा घेणे

**४. ग्रामीण विकास आणि शासकीय योजना :-**

स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य सरकारने ग्रामीण भागाच्या विकासासाठी वेगवेगळे कार्यक्रम व योजनांची अंमलबजावणी केली आहे. त्यातील कांही प्रमुख योजना खालील प्रमाणे –

**अ. ग्रामीण विकास आणि केंद्र शासनाच्या योजना :-**

१. सामुदायिक विकास कार्यक्रम – १९५२
२. राष्ट्रीय विस्तार शेती – १९५३
३. खादी आणि ग्रामोद्योग कार्यक्रम – १९५३
४. रोजगार हमी योजना – १९७२
५. दुष्काळ प्रवण क्षेत्र कार्यक्रम – १९७३
६. वाळवंट विकास कार्यक्रम - १९७७
७. ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण योजना - १९७८
८. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम – १९८०
९. वीस कलमी कार्यक्रम – १९८०
१०. इंदिरा आवास योजना – १९८५
११. केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम – १९८६
१२. लोक कृती आणि ग्रामीण तंत्रज्ञान प्रगत परीषद – १९८६
१३. एकात्मिक पडजमीन विकास कार्यक्रम – १९८९
१४. जवाहर रोजगार योजना – १९९३
१५. राष्ट्रीय सामाजीक सहाय्य कार्यक्रम - १९९५
१६. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना – १९९९
१७. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना – २०००
१८. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना – २००१
१९. पंतप्रधान ग्रामोदय योजना - २००१
२०. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम – २००१
२१. संपुर्ण स्वच्छता अभियान - २००३

२२. ग्रामीण भागामध्ये शहरी सुविधांची तरतूद – २००३
२३. ग्रामीण उद्योग केंद्रस्थान – २००४
२४. महात्मा गांधी - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा – २००५
२५. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना - २००५
२६. निर्मल ग्राम पुरस्कार – २००५
२७. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम – २००५
२८. पाण्याची गुणवत्ता परिनिरीक्षण आणि निगराणी – २००६
२९. ग्रामीण दुरध्वनी कार्यक्रम - २००७
३०. राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम – २००८
३१. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम – २००८
३२. जनधन योजना – २०१४
३३. महात्मा गांधी स्वच्छ भारत योजना – २०१४
३४. सुकन्या समृध्दी योजना - २०१४
३५. दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती – २०१५
३६. अटल पेंन्शन योजना – २०१५
३७. मुद्रा बँक योजना – २०१५
३८. पंतप्रधान ग्रामीण कौशल्य विकास योजना - २०१५
३९. आवास योजना – २०१६
४०. सांसद आदर्श ग्राम योजना - २०१६
४१. प्रधानमंत्री पीक विमा योजना – २०१७
४२. दीनदयाळ अंत्योदय योजना – २०१८

**ब. ग्रामीण विकास आणि महाराष्ट्र शासनाच्या योजना –**

१. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान – २०००
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा – २०००
३. महात्मा गांधी तंटामुक्त मोहिम – २००७
४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार (महाराष्ट्र राज्य)
५. यशवंत ग्राम समृध्द योजना
६. आमदार आदर्श ग्राम योजना
७. ग्रामीण भागाच्या विकासासाठी उन्नत महाराष्ट्र अभियान
८. आमचा गाव - आमचा विकास गावाच्या विकासासाठी लोक सहभगणीय उपक्रम
९. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना
१०. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना
११. उन्नत शेती - समृध्द शेतकरी अभियान
१२. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना
१३. रमाई आवास योजना
१४. मागेल त्याला शेततळे
१५. अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना
१६. महात्मा फुले - आरोग्य योजना
१७. मृद सर्वेक्षण व मृद चाचणी योजना
१८. शेतमाल तारण कर्ज योजना
१९. नीलक्रांती धोरणाअंतर्गत मत्स्यव्यवसाय एकात्मिक विकास
२०. कुक्कट पालन व्यवसाय अनुदान
२१. ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण
२२. ग्रामसभा पुरस्कार
२३. माझी कन्या भाग्यश्री
२४. राजमाता जिजाऊ आरोग्य अभियान
२५. महात्मा फुले जल अभियान
२६. राजर्षी शाहू घरकुल योजना
२७. यशवंत ग्रामसमृध्दी योजना
२८. अंगणवाडी कार्यकर्ती विमा योजना
२९. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ

**५. सारांश :-**

भारतीय नियोजन आणि विकास प्रक्रियेणे ग्रामीण भागाचा आणि ग्रामस्थांच्या विकासाला प्राधान्य दिलेले आहे. आर्थिक उदारीकरण, संरचनात्मक समायोजन कार्यक्रम आणि ग्रामीण गरिबांना संरक्षण जाळे पुरवण्यासाठी ग्रामीण विकासला नवीन कार्यक्रमानुसार व अस्तित्वात असलेल्या कार्यक्रमांची पुनरआखणी करुन प्राधान्य देण्यात आले.

समग्र ग्रामीण विकास हा शाश्वत ग्रामीण विकासाचा महत्वाचा टप्पा आहे. ग्रामीण भागात सुविधा राबवून ग्रामीण भागाचा मोठया प्रमाणात विकास केला गेला पाहिजे. शाश्वत ग्रामीण विकास करावयाचा असेल तर ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता बदलली पाहिजे.

या उद्देशांच्या पुर्ततेसाठी ग्रामीण विकास मंत्रालय (भारत सरकार व महाराष्ट्र सरकार) विविध योजनांची अंमलबजावणी करीत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. प्रा.डॉ. ज्योती नाडे, 'पंचायत राज व ग्रामीण विकास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१६
२. तुकाराम जाधव व महेश शिरपुरकर, 'भारतीय संविधान व भारतीय राजकारण (भाग - १)', युनिक ॲकॅडमी, पुणे २०१५
३. स्मिता जोशी, 'भारतीय संविधान, राजकारण आणि कायदा', (राज्यसेवा मुख्य परीक्षा अभ्यासक्रम)
४. सामान्य अध्ययन (पेपर ३ रा - मनुष्यबळ, मानवी हक्क व समुदाय विकास), स्टडी सर्कल पब्लिकेशन्स, मुंबई.

# ग्रामीण सामाजिक विकास एक अभ्यास

**डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख**
रा. कोपरा
ता. अंबाजोगाई जि. बीड

भारतातील खेड्याला ग्राम असे संबोधले जाते. जो समाज नागरी नाही त्याला ग्रामीण समाज असे मानले जाते. ग्रामीण समाजाचा प्रमुख व्यावसाय शेती तर दुय्यम व्यावसाय पशुपालन आहे. येथील सर्वच लोक शेतीवर अवलंबून नसतात तर त्यात काही शेती धारक तर काही त्यावर शेतीवर राबवणार शेतमजूर असतात. अनेक लोक या शेती व्यावसायास पूरक अशा अन्य व्यवसायांची कास धरून गुजराण करतात. हे लोक बहुतांशी कारागीर असतात.

एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करून जीवन जगणाऱ्या अनेक कुटुंबांच्या समुदायाला ग्राम किंवा खे्डे असे म्हणतात. श्री. ना. अत्रे यांनी केलेली खेड्याची व्यावहारिक व्याख्य सूचक आहे ते म्हणतात खेडे म्हणजे जमीन कसणे व खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा या खेडुताची जी वस्ती आहे ते खेडे ज्यामध्ये मुख्य व्यवसाय शेती व ज्यामध्ये वस्ती शेतकऱ्यांची असते. त्याला खेडे असे म्हणतात. म्हणजेच ज्या एका विशिष्ठ भूभागावर अनेक कुटुंबाचा समुह की ज्याचा प्रमुख व्यावसाय शेती असून जेथे पाण्याची पाणी मुबलक प्रमाणात आहे अशा ठिकाणी वस्ती करून राहतो त्यास खेडे असे म्हणतात. या समूहाची मदार निसर्गावर अवलंबून असते. खेड्यातील राहणारी व्यक्ती अधिक धार्मिक असते. या लोकांत एकमेकास सहकार्य करण्याची भावना असते.

आधुनिकता व परंपरांतील संघर्ष परंपरा आणि आधुनिकता यामध्ये सातत्याने संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष वादाच्या रूपाने प्रस्तुत करता येऊ शकतो याच अनुषंगाने परंपरेला वाद आणि आधुनिकतेला प्रतिवाद मानून या दोन्हीच्या तुलनेतून संवादात्मक स्थिती होते. त्या स्थितीस आधुनिकीकरण असे समजले जाते. उपरोक्त प्रकाराबरोबर उच्च आणि निम्न प्रक्रियातील संघर्ष पुनर्जागरणात्मक शृंखला यासारख्या बाबींचा उल्लेख करता येईल. ज्या मध्ये परिवर्तने हे आंतरक्रिया आणि संघर्षातुन होत असते. मुखर्जी यांनी आपले सर्व लक्ष प्रामुख्याने बृध्द परंपरावर इस्लाम, हिंदुवादी, पाच्छिमात्य केंद्रीत करून विचारांची मांडणी केली.

मानवी समाजाचा विकास होत असताना तो एका सरळ रेषेत न होता नागमोडी स्वरूपात होत असतो. या विकासाच्या मार्गात सातत्याने द्दंद किंवा विरोध निर्माण होतो. प्रस्थापित समाज व्यवस्थे विरूध्द संघर्ष करण्याची प्रवृती नवीन मूल्ये धारण करून पाहणाऱ्या समाजात सातत्याने आढळून येते व त्यांच्या संघर्षातुनच समन्वयात्मक स्वरूपाची समाजव्यवस्था उद्यास येऊन कालांतराने हीच व्यवस्था प्रस्थापित समाजव्यवस्थेचे रूप धारण करीत असते व पुन्हा नवसमाज त्या विरूध्द संघर्ष करण्याचा प्रयत्न करतो. या प्राकरे मानवी समाजाचा विकास हा त्यांच्यामध्ये निर्माण होणाऱ्या द्दंद किंवा विरोधातूनच आहे हे मार्क्सप्रणीत सूत्र अवलंबून भारतीय परंपरेचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न मुखर्जी यांनी केला.

राष्ट्रपिता महात्मा गांधी ने म्हटले आहे. की भारत देशाची आत्मा ही खेड्यामध्ये असतो. तर हिंदी स्वराजाच्या म्हण्यानुसार भारतीय अर्थव्यवस्थाही खेड्यावर आधारीत आहे. मे २०१८ मध्ये भारत देशातील शंभर टक्के गांव हे विद्युतीकरण मोठे रूप हे योजनेच्या रूपाने मुर्तरूप दिले जाणार आहे. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान योजना सूरूवात केलेली आहे. ग्रामीण समाजाचा विकास साधण्यासाठी शासना विविध योजनाचा शुभारंभ करून विकास करण्याचे ठरवले आहे.

ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध करण्यासाठी जोडलेल्या या योजनेत बल देऊन याची पुर्नरचना केली गेली. याच्या अंतर्गत कृषी सिंचन कार्याला केली गेली. याच्या अंतर्गत कृषी सिंचन कार्याला जोडला गेला. याचा पहिला प्रभाव ग्रामीण आय आणि दूसरा प्रभाव कृषी आय वर पडलर आहे. याचा अर्थ ही योजना आता फक्त मजुरीवर आधारित रोजगारालाच देण्यात आलेली नाही तर हिला एक दिर्घावधि कृषी निवेश असे स्वरूप देण्यात आलेल आहे.

या अभियाना संदर्भात पूर्ण भारतात ग्रामीण स्वच्छता अभियान ग्रामीण भागात सुरू करण्यात आले आहे. या प्रकारची ही सर्वात माठी योजना आहे. जीचा ग्रामीण विकासाशी प्रत्यक्ष संबंध आहे. या अंतर्गत रिकाम्या जागेवरील शौच्छालयास जाने संपवण्यात आले. म्हणजे ही समस्या संपवण्याकडे लक्ष देण्यात आले. देशात लोकसंख्येला लाभ - फायदा तोपर्यंत भेटणार नाही जोपर्यंत लोकसंख्येची कौशल्य - प्रगती अस्त्वित येणार नाही. कौशल्य विकासामध्ये डिजिटल माध्यमाचा मोठा वाटा आहे. याच प्रकारे येणाऱ्या कालावधीत वेळेत शासन या माध्यमाचा उच्च (वरच्या)

पातळीवर उपयोग करण्याच्या मार्गावर आहे प्रयत्नशील आहे. अनुदानाची अपुर्तता शिक्षण, आरोग्य, वित्य, समादेशन शाखा इत्यादी.

कृषी आणि ग्रामीण कल्याण कृषी आणि शेतकरी ग्रामीण विकास बजटच्या नऊ आधार स्तंभापैकी एक आहे. याचा सरळ संबंध ग्रामीण विकासासी आहे. ग्रामीण आयोग आणि शेतकरी यांच्या संकटाच्या समाधान करण्यासाठीच ग्रामीण विकास योजनेचा उयोग होत आहे. या संदर्भात यावेळी बजट रूपयाच्या बाबतीत काही विषेश अधभुत असे तर्क वितर्क अंदाज काढण्यात आले आहेत.

अशा प्रकारे ग्रामीण भागाचा विकास म्हणजेच भारतातील खेड्याचा म्हणजेच ग्रामीण भागातील विकासामध्ये ग्रामीण विद्युतीकरण म्हणजेच वीज निर्मीती करण्यात आली. स्वच्छ भारत अभियान असे नाव आले डिजीटल साक्षरतेला कशा प्रकारे योगदान मिळाले हे माध्यम कसे विकसीत झाले या नंतर कृषी आणि ग्रामीण शेतकरी विकास साध्या पद्धतीने टिकेल असा प्रयत्न करण्यात आला आहे. याचे काही विषेश अंदाजही काढण्यात आले आहे. भारतातील ग्रामीण भागाचा विकास झालेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ**

१. भारतीय समाजरचना आणि लोकसंख्या - समाज डॉ.दा.धो. काचोळे, के.एस. अतकरे, केलाश पब्लिकेशन्स, गोकुळवाडी औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ ९७९८.
२. भारतीय समाज - रचना व परिर्वतन डॉ. दिलीप खैरनार, चिन्मय प्रकाशन, श्री. विश्वाभंर कुलकर्णी १३, व्यंकटेश कृपा, शारदाश्रम कॉलनी, पैठण गेट रोड औरंगाबाद, पृष्ठ २९.
३. कुरूक्षेत्र, उन्नति की और ग्रामीण भारत, जून २०१६, पृष्ठ ६.
४. कुरूक्षेत्र, ग्रामीण विकास को समर्पित, एप्रिल २०१६, पृष्ठ १०, ११.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# ग्रामीण समुदाय विकास आणि शासकीय योजना

**प्रा. रामेश्वर शंकरराव धप्पाधुळे**
लोकप्रशासन विभाग
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय लोहारा

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र मिळून आज ७१ वर्ष पूर्ण झालेली आहे. इ.स. २०११ च्या जनगननेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ करोड ऐवढी आहे. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशामध्ये भारताचा दुसरा क्रमांक आहे. ही वाढती लोकसंख्या नियंत्रणात आली नाही, तर येणाऱ्या काही वर्षात भारत जगातील सर्वात जास्त लोकसंखेचा देश म्हणून पहिल्या क्रमांकावर येण्यास वेळ लागणार नाही. त्याच बरोबर आज भारतातील एकुण लोकसंख्येतील ६८.८४ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागातून आपले जीवन जगत आहे.[१] शहरापेक्षा ग्रामीण भारतातले चित्र फार वेगळे आहे. भारतातील ग्रामीण भागामध्ये प्राथमिक गरजा पुर्ण झालेल्या नाहीत. उदा: आदीवाशी मागासवर्ग, आज ही पाण्यासाठी २ ते ३ कि. मीटरचा रस्ता चालत जावे लागत आहे.

शासन गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण समुदाय विकास कार्यात फार मोठया प्रमाणात अनेक योजनांच्या माध्यमातून विकास कार्य करित आहे. उदा: शिक्षण, आरोग्य, रोजगार, पर्यावरण, सामाजीक, राजकीय इत्यादी तेंव्हा ग्रामीण समुदाय विकास आणि शासकीय योजना या विषयावर संशोधन करित असताना पुढील मुद्यावर प्रकाश टाकणेमहत्वाचे ठरते.

**उददेश :**

१ ग्रामीण समुदाय विकासाचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण समुदाय विकासातील समस्या जाणून घेणे
३. ग्रामीण समुदाय विकासात शासकीय योजनाची भूमिका जाणून घेणे

**संशोधन पध्दती:**

सदरील विषयाला अनुसरुन शोध निबंध कार्यासाठी प्राथमीक आणि दुय्यम स्त्रोतांची माहिती संकलीत करण्यासाठी उपयोग करण्यात आला आहे. प्राथमीक साधनामध्ये मुलाखती, निरिक्षण, प्रश्नावली, इत्यादी साधनाचा उपयोग करण्यात आला आहे. तर दुय्यम साधनामध्ये सार्वजनिक लेख, प्रकाशीत, अप्रकाशीत विविध अहवाल, पुस्तके, वर्तमानपत्रे आणि मासिके इत्यादी साधनाचा उपयोग करुन सदरिल माहिती गोळा केली आहे.[२]

**ग्रामीण समुदाय विकासाची गरज:**

ग्रामीण समुदाय विकास ही संकल्पना २० व्या शतकाच्या शेवटी विसतारलेली दिसून येते. भारतीय पंचवार्षीक योजनांच्या सुरुवातीची ३० ते ४० वर्ष ग्रामीण समाजात अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पुर्ण करण्याचे उददेश प्रमुखठिकाणी असल्याचे दिसते. मागील दोन दशकांमध्ये अन्न, वस्त्र आणि निवारा याच बरोबर नागरी भागात उपलब्ध असलेल्य रोजगाराच्या संधी वीज, रस्ते, पाणी, स्वच्छतागृहे, दळणवळणाची साधने, आरोग्य सुविधा, शाळा-महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुविधा आणि पायाभूत सुविधा ग्रामीण भागातील लोकांनाही उपलब्ध करुन देणे गरजेचे झाले आहे. हे गरज लक्षात घेऊन शासनाने विविध योजनांची तयारी ग्रामीण समुदाय विकासात करित आहे.[३]

**ग्रामीण समुदाय विकासाची व्याप्ती :**

भारतामध्ये आजही मोठया प्रमाणात लोकसंख्या खेडयातून अथवा ग्रामीण भागातून जीवन जगत आहे. त्याचे जीवन एकंदरीत शेतीवर अवलंबून आहे तेंव्हा ग्रामीण समुदाय विकासाची व्याप्ती पाहताना प्रामुख्याने पुढील मुद्यांचा विचार करावा लागतो शेतीचा सर्वांगीण विकास, शिक्षणाचा प्रसार, दळणवळणाच्या साधनामध्ये वाढ करणे, आरोग्य सुविधामध्ये वाढ, समाज कल्याण/समुदाय भावना वाढीस लावने, घर बांधनी योजना लागू करणे, ग्रामीण भागामध्ये उद्योगधंदयांना प्राधान्य देणे, ग्रामीण भागातील लोकसंख्याचे वाढते प्रमाण कमी करणे, सहकारी संस्थांना प्राधान्य देणे, इत्यादी घटकांचा ग्रामीण समुदाय विकासाच्या व्याप्तीशी फार जवळचा संबंध आहे[४]

**ग्रामीण समुदाय विकास आणि शासकीय योजना:** भारतातील ग्रामीण भागातील परिस्थिती पुर्वी सारखी राहीलेली नाही. आज ग्रामीण भागामध्ये ही फार मोठया प्रमाणात विकास घडून येत आहे. त्याचे कारण शोधले असता ग्रामीण विकासामध्ये गेल्या ३० ते ४० वर्षापासून विविध शासकीय योजनाच्या कार्याचे परिणाम होय. अशा काही शासकीय योजनाची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम २ आक्टोंबर १९८०: साली सुरु करण्यात आली. या कार्यक्रमातून ग्रामीण एकात्मिकता साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२. ग्रामीण युवकांना स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना१९९६: साली सुरु करण्यात येऊन या योजनेतून ग्रामीण युवकांना रोजगाराची संधी प्राप्त करुन देण्यात आली.

३. ग्रामीण कार्य योजना १९७०: या योजनाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.
४. कामाच्या बदल्यात अन्न योजना १९७७: या योजनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना कामातून अन्न वाटप करण्यात आले
५. महिला व बाल संगोपन योजना: या योजनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नवजात शिशू आणि माता याची काळजी घेतली जाते
६. राष्ट्रीय ग्रामीण अजीवीका मिशन २०११: या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण गरिबांसाठी रोजगार आणि संघटनेला प्रेरणा देण्यासाठी तयार करण्यात आली.
७. ग्रामीण कौशल्य योजना २०१४: या योजनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांच्या कलागुणात्म विकासाला प्रोत्साहान देण्यात आले.
८. संसद आदर्श ग्रामीण योजना २०१४: या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गावाचा विकास साधण्यासाठी निर्माण करण्यात आली.

वरिल योजना व्यतिरिक्त पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान सडक योजना, अन्नपुर्ण योजना, राष्ट्रीय सामाजीक सहायता कार्यक्रम, दिनदयाल उन्त्योदय योजना, इत्यादी योजनाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये समुदाय विकासाला चालना देण्याचे कार्य शासनाकडून होत आहे.[५]

**ग्रामीण समुदाय विकासातील समस्या:**

ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासासाठी भारत स्वातंत्र झाल्यापासून प्रयत्न चालू आहेत या संदर्भात अनेक योजना, कार्यकम राबविण्यात आले. एवढेच नव्हे, तर ७३ वी घटना दुरुस्ती करुन पंचायतराज व्यवस्थांना घटनात्मक दर्जा देवून याद्वारे ग्रामीण भागाचा संपूर्ण विकास करण्यासाठी जाणीव पूर्व प्रयत्न केल्याचे दिसून येतेपरंतू ग्रामीण समुदाय विकास झाल्याचे दिसून येत नाही
ग्रामीण विकास प्रक्रियाचा अभ्यास केला असता या प्रक्रियातील काही समस्या समोर येतात. त्या समस्या थोडक्यात.

१. गावातील लोकांचा सहभाग कमी असतो.
२. ग्रामीण भागातील लोकांची गरिबी, दारिद्रय समोर येते.
३. ग्रामीण भागातील असलेले अनिष्टरुढी, परंपरा व अंधश्रध्दा समोर येते.
४. ग्रामीण भागामध्ये आजही पुरेशा प्रमाणात दळणवळणाच्या सुविधा नाहीत.
५. नैसर्गीक आपत्ती हे एक मोठी समस्या ग्रामीण विकासात दिसून येते.[६]

**निष्कर्ष:**

१. ग्रामीण समुदाय विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनाची माहिती लोकांना नाही
२. ही शासनाची योजना आहे शासन राबविल, अशी भावना गावातील लोकांची असल्यामुळे विकास प्रक्रियेची व्यवस्थित अमलबजावणी होत नाही.
३. ग्रामीण समुदाय विकास साधण्यासाठी शासकीय पातळीवर मोठया प्रमाणात योजना राबविण्यात येतात. परंतू ग्रामीण भागातील लोकांचा सहभाग दिसून येत नाही. कारण निरक्षर व्यक्ती या योजनाकडे पाटफिरवीतो.
४. शासन ग्रामीण विकास साधण्यासाठी केंद्रीय स्तरावर योजना तयार करित असतात त्याचे उददेश ही निशिचत केले जातात. परंतू ग्रामीण स्तरावर ती योजना पोहचपर्यंत त्या योजनाचे संपूर्ण स्वरुप बदलून जाते

**सारांश :**

ग्रामीण समुदाय विकासासाठी सरकारने योजना आखल्या आहेत त्या योजना ग्रामीण भागात राबवितांना ग्रामीण भागातील लोकांनी व समुहाने सक्रीय भाग घेऊन त्या योजनाची माहिती घेतली पाहिजे. व ही योजना आपल्याच कल्याणासाठी तयार करुन राबविण्यात येत आहे. याची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली पाहिजे. तर ग्रामीण समुदाय विकासात शासनाच्या योजना यशस्वी होतील.

**संदर्भग्रंथ :**

१. International Referred online research journal, March 2014,page no. 2
२. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे डॉ. प्रदिप आगलावे, विदया प्रकाशन नागपूर, १ जानेवारी २०००, पृष्ठ क्र. १०.
३. ग्रामीण विकास आणि योजना, दत्तात्रय आघाव,चिन्मय प्रकाशन, पृष्ठ क्र. २०
४. shodhgangainflibnct.ac.in chapter 06 page no 18
५. https//www.rural development policy.ac.in
६. ग्रामीण विकास आणि योजना, दत्तात्रय आघाव, चिन्मय प्रकाशन, पृष्ट क्र. ४५.

# आदिवासी क्षेत्रातील बाल आरोग्याच्या समस्या आणि सामुदायिक आरोग्य विकास

**प्रविण पांडुरंगराव लोणारकर**
लोकप्रशासन विभाग
बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना:**

आपल्या देशात इंडिया आणि भारत असे दोन भाग आहेत असे म्हटले जाते. इंडिया संपन्नतेचे प्रतीक आहे तर भारत गरिबीचे व आभावाचे. गरिब व श्रीमंत यांच्यातील दरी ही स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षानंतरही तशीच आहे जशी स्वातंत्र्याच्या वेळेला होती. त्यातही आदिवासी भागात विकास आजही जवळजवळ नसल्यातच जमा आहे. अदिवासीना आपल्या मूलभूत गरजा भागविनेच अशक्य असल्याने गरिबी, बेकारी, अनारोग्य, कुपोषण आदि समस्यानी आदिवासी बहूल क्षेत्र पुर्णत: ग्रासलेले दिसते. विकासाचा अभाव व दुर्लक्ष अदिवासीना नक्षलवादी बनण्यास प्रेरीत करत आसल्याचे मत अनेक समाजसुधारकांनी व विचारवंतानी नोंदविले आहे. विकास हा काही लोकांपुरताच मार्यदित न राहता तो सर्वसमावेशक असावा लागतो. विकासाचा संबंध मानवीकल्यानाशी असने गरजेचे असते अन्यथा विकासाची प्रक्रिया कधीही पूर्ण होउ शकत नाही.

युनिसेफच्या मागील अहवालानुसार आशिया खंडातील निम्यापेक्षा अधिक बालके म्हणजे १.२७ कोटी बालके हे गरिबी, कुपोषन व आरोग्याच्या समस्येने ग्रासलेली आहेत. या अहवाला प्रमाणे जगातील जलद विकसित होणाऱ्या आर्थिक महासत्ता म्हणजे चीन व भारत या देशांतील मुले मूलभूत सुविधांपासून जसे अन्न, स्वच्छपाणी, निवारा, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता इत्यादी पासून वंचीत आहेत. भारतातील प्रत्येक पाचवा मुलगा कुपोषीत आहे.

**संयुक्तराष्ट्र संघटनेची आरोग्य विषयक सनद :**

२० नोव्हेंबर १९८९ साली संयूक्तराष्ट्र संघटनेने बालकांच्या हक्काची सनद(कलम २४) मंजूर केली यानूसार बालकांच्या एकंदर स्थितीमध्ये बदल करण्याची जबाबदारी राष्ट्र व समाजावर सोपविण्यात आली. विशेषत: विकसनशिल राष्ट्रातील बालकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे व बालहक्कांचे रक्षण करणे आवश्यक असल्याचे नोंदविले गेले. या सनदे प्रमाणे बालकांना स्पर्श, रंग, लिंग, भाषा, धर्म राष्ट्रीयत्त्व, सामाजिक दर्जा, जन्मस्थान या आधारावर भेदभावाची वागणूक देता येणार नाही.

**आरोग्य म्हणजे काय ?**

आरोग्याची परिभाषा स्थळ, काळ व वेळे नुसार भिन्न आढळते मात्र जागतिक आरोग्य संघटनेने (W.H.O.) केलेली व्याख्या सर्वत्र स्विकृत करण्यात आली आहे. या संघटनेच्या व्याखेनुसार आरोग्य म्हणजे संपूर्ण शारीरिक, मानसिक व सामाजिक सुदृढता मात्र नसून रोग व वैफल्यापासून मुक्तता आहे.

**आदिवासी क्षेत्रातील बाल आरोग्याच्या समस्या:**

भारतातील आदिवासी क्षेत्रातली आरोग्याच्या समस्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**१) आरोग्याच्या सुविधांचा आभाव :**

आदिवासी बहूल क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रसूतीगृह, बालरोग तज्ञ आदिचा आभाव आहे. त्यामुळे आरोग्यविषयक जागृतीचा आभाव असल्याचे जानवते. आदिवासी भागात मुळातच आज्ञान, आंधश्रध्दा आदी समस्या अधीपासूनच असल्यामुळे आरोग्याच्या सुविधांचा आभाव ही नवी समस्या त्यात भर घालणारी आहे.

**२) कुपोषण :**

पुरेशा व सकस आहारा आभावी शारीरिक व बौध्दिक वाढ खुंटन्याच्या स्थितीला कुपोषण असे म्हणतात. कुपोषण हि समस्या आदिवासी बहूल क्षेत्रात गंभीर स्वरुपात आढळते. आदिवासी भागात माता व बालक दोघांचेही कुपोषण आठळते. माता कुपोषणा मूळे बालकांच्या शरीरिक व बैध्दिाक अपंगत्वाचा तर बालकांच्या कुपोषणामुळे त्यांच्या मुत्यूचा धोका असतो. ० ते ५ वर्षे वयोगटातील मुलांचे वजन सामान्यत: वयोमानानुसार आणि आलेखानूसार कमी भरणे आणि त्यानुरुप शारीरिक लक्षणे न दिसणे म्हणजे कुपाषण होय. कुपोषणामुळे बालकांचा शारीरिक व बौध्दिक विकास योग्य रीतीने होत नाही. महाराष्ट्रासारख्या विकसीत राज्यात गेल्या चार वर्षात १ लाखा वर बालकांचे कुपोषणामूळे बळी गेले आहेत.

**३) बालमृत्यू :**

युनिस्कोच्या मागील अहवालाप्रमाणे जगातील प्रमुख ५ देशात बालमृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. या पाच देशात भारताचा क्रमांक लागतो हे आपले दुर्देव मानावे लागेल. भारतातील एकूण मृत्यूच्या प्रमाणात ५०% वाटा हा केवळ बालमृत्यूचा आहे. तर जागतिल एकूण बालमृत्युच्या प्रमाणाशी तुलनाकरता एकट्या भारतातचा वाटा २२% एवढा आहे.

**४) जिवघेणे आजार :**

भारतातील एकूण बालमृत्यूमध्ये १० पैकी ०७ बालकांचा मृत्यू हा प्रमूख पाच घातक आजारांमुळे होतो यात (१) अतिसार (२) न्युमोनिया (३) हिवताप (४) गोवर (५) कुपोषण यांचा समावेश आहे. सरकारला आरोग्य अभियान राबवूनही या पाच प्रकारांमुळे होणाऱ्या मृत्यूंवर नियंत्रण प्रस्थापीत करता आलेले नाही.

**५) अपंगत्त्व :**

बालकांच्या अपंगत्त्वाला प्रमुख दोन प्रकारांमध्ये वर्गिकृत करण्यात येते. (१) बौध्दिक अपंगत्त्व (२) शारीरिक अपंगत्त्व. बौध्दिक अपंगत्त्व हे मूलाला जन्मापूर्वी मातेच्या कुपोषणामुळे प्रामुख्याने येते. या मध्ये आईच्या आहारातील पौष्टीक घटकांचा आभाव, आयोडीनयुक्त मिठाचा अभाव, मादक द्रव्यांचे सेवन इत्यादी प्रमुख कारणांचा उल्लेख करावा लागेल शारीरिक अपंगत्त्व हे प्रामुख्याने पोलीओ मूळे येते. लसिकरणाच्या गैरसमजामुळे पोलिओचे प्रमाण काही अंशी आदिवासी भागात आढळते.

**६) स्तनपान विषयक गैरसमज :**

जन्मानंतर बालकाच्या आहाराचा एकमेव आधार म्हणजे मातेचे दुध असते. जन्मापासून ३ दिवसात येणारे मातेचे दुध बाळासाठी अमृत समान असते. यादुधात बालकाच्या वाढीसाठीची सर्व पोषक द्रव्य असतात. बालकाच्या जन्मापासून सहा महिने बाळाला केवळ आईचे दुध देणे गरजेचे असते. आदिवासी समाजातील अनेक आंधश्रध्दां मूळे व गैरसमजामूळे बालकाला मातेच्या पहिल्या दुधापासून वंचीत ठेवले जाते. त्यामुळे बालकांची वाढ योग्य होत नाही.

**७) लसिकरण मोहिमे बाबत उदासिनता :**

जन्माला आलेले बाळ दोन वर्ष शारीरिकदृष्ट्या विविध रोगांचा मुकाबला करण्यासाठी सक्षम नसते. त्याची प्रतीकारशक्ती अतिशय कमी असते. त्यामुळे विविध विषाणू व जिवाणूची त्याला चटकन लागण होते. त्याला विविध गंभीर आजार होतात. कधीकधी शारीरिक व बौध्दिक अपंगत्त्व देखील येते. त्यामूळे या घातक आजारापासून बचावासाठी त्याला विविध प्रकारच्या लसी देण्यात येतात परंतू आदिवासी समजाच्या निरक्षरता व अज्ञान मूळे ते लसीकरण मोहिमेस विरोध करतात. परिणामी अनेक घातक रोगांच्या उच्चाटनासाठी लसीकरण मोहिम राबवूनही जनतेच्या योग्य सहकार्या अभावी त्यारोगाचे समूळ उच्चाटन करता आलेले नाही.

**उपाय :**

१) **आरोग्य जागृती मोहिम राबवावी :** आदिवासी भागात आरोग्य जनजागृती मोहिम राबविने गरजेचे आहे यात माहिती पट, चित्रपट, प्रत्यक्ष भेटी आशा प्रभावी माध्यमांचा अवलंब करावा.

२) **बालकांना पोषक आहाराचा मोफत पुरवठा करावा :** कुपोषनाची समस्या सोडविण्यासाठी गरोदर माता व बालकांना दुध, अंडी, मोड आलेले धाण्य, कडधाण्य, हिरव्या पालेभाज्या, जिवनसत्वयुक्त औषधे यांचा समावेश असावा.

३) **आरोग्य विषयक सामाजिक गैरसमज दुर करावेत :** आदिवासी समाजात रूढ झालेल्या आरोग्य विषयक गैर समजूती दुर करूण लसीकरण स्तनपान, उपचार याविषयी जागृती निर्माण करावी.

४) **आरोग्य निर्मितीसाठी सार्वजनीक व खाजगी भागीदारीस प्रोत्साहन द्यावे :** आरोग्याच्या सुविधांचा पुरवठा तसेच जागृती निर्माण करण्यासाठी शासकिय प्रयत्ना सोबत खाजगी संस्था व स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात यावी ज्या मूळे प्रभावी व परिणामकारकता साध्य करता येईल.

**सारांश :**

आरोग्याल मूलभूत आधिकाराचा दर्जा देण्याचा विचार देशात चालू असतांना आदिवासी समाजातील बाल आरोग्याची समस्या गंभीर आहे. त्यावर प्रभावी उपाय केल्या शिवाय व सर्व समावेशक आरोग्य धोरण निर्माण केल्या शिवाय आरोग्याचा आधिकार मूलभूत आधिकार बनविणे केवळ व्यर्थ आहे. भारताला हेल्थ टुरिझम म्हणून विकसित करण्याचे स्वप्न पहाणारा देश जागतिक आरोग्य निर्देशांकात १९५ देशांच्या यादीत १४५ व्या स्थानावर आहे हि बाब विचारणीय आहे. थोडक्यात आदिवासी भागातील बाल आरोग्या कडे दुर्लक्ष भविष्यासाठी गंभीर बाब ठरेल.

**संदर्भ :**

१. Maitreyia Das, Soumya Kapoor, Denis Nikitin, A Closer look at child mortality among Adivasis in India, The World Bank south Asia Region Human Development Department, India.
२. The status of Tribal Children India a Historical Perspective, UNICEF, India, country office, ७३ Lodi Estate , New Delhi.
३. UNESCO report on Child Mortality २००७
४. खडसे इंदिरा (२००१), अन्न पोषणशास्त्र, हिमालय पब्लीकेशन, मुंबई
५. योजना मासिक

# महिला सबलीकरणात कायद्यांची भूमिका

**डॉ. जयदेव उध्दवराव मोहिते**
श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय,
लातूर

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत अनेक कायदे केले गेले. महात्मा गांधींच्या विचारानुसार जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर तो स्वतः शिकेल पण जर एका स्त्रिला शिक्षण दिले तर ती सर्व कुटूंबाला शिक्षित करेल. भारतीय घटनेने महिलांना फक्त समानतेचा दर्जा दिला नाही, तर ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरूस्तीने ग्राम पंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद, महानगरपालिका यामध्ये ३३ % जागा राखीव ठेवल्या आहेत.

भारत सरकारने महिलांचे अधिकार त्यांना मिळावेत म्हणून वेगवेगळे कायदे संमत केले आहेत. त्यामध्ये हिंदू विवाह कायदा १९५५, हुंडाविरोधी कायदा १९९१, गर्भपात प्रतिबंधन कायदा १९७१, समान वेतन कायदा १९७६, गर्भचिकित्सासंबंधी कायदा १९९४ यामध्ये महिलांना समाजामध्ये प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. या कायद्या व्यतिरिक्त सरकारने काही कल्याणकारी योजना सुरू करून महिलांना सबळ करण्याचे प्रयत्न केले आहेत. यामध्ये रोजगारासाठी प्रशिक्षण कार्यक्रम १९८७, महिला समृद्धी योजना १९९३, राष्ट्रीय महिला कोष १९९२-९३, इंदिरा महिला योजना १९९५, महिला व बाल विकास कार्यक्रम १९९७, बालिका समृद्धी योजना या सर्वांबरोबर एकात्मिक स्वयंसहाय्यता बचतगट म्हणजे स्वयंसिद्धा इत्यादी १९५३ मध्ये भारत सरकारने केंद्रीय समाज विकास बोर्डाची स्थापना करून महिलांना अनुदान, बालके आणि दुर्लक्षित घटक यांना मदत केली. केंद्रामध्ये स्वतंत्र महिला व बाल विकास मंत्रालय स्थापन केले आहे. आज महिला अनेक उच्च पदावर कार्य करत आहेत. तरी देखील त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येत नाही. देशातील समान कामासाठी समान वेतन ही मिळत नाही. कुटूंबामध्ये ही त्यांना अत्याचाराला बळी पडावे लागते. अशा महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी किंवा त्यांच्या संरक्षणासाठी कोणते कायदे अस्तित्वात आहेत, त्याचे स्वरूप कसे आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. यासाठी महिलांचे कायदेशीर अधिकार याविषयी अभ्यास करण्याची गरज आहे. हा अभ्यास करताना पुढील उद्दिष्टये डोळयासमोर ठेऊन अभ्यास करण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. महिलांसाठी संविधानाने निर्माण केलेल्या विविध कायद्यांचा अभ्यास करणे.
२. महिलांमध्ये कायद्याविषयी जाणीव जागृती निर्माण करणे.
३. भारतातील कायद्यांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**गृहितके**

१. महिलांचे विविध कायदे असूनही अत्याचार वाढत आहे.
२. महिला कायद्याची अंमलबजावणी निपक्षपाती होणे गरज आहे. पक्षपातात वाढ होत आहे.
३. महिला प्रथम श्रेणीतील कार्य करणाऱ्या महिलांनी अत्याचारीत महिलांना मानसिक, आर्थिक असुरक्षितता निर्माण करण्यास दिरंगाई होते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला. यात पुस्तके,मासिके, अहवाल, इंटरनेट, वृत्तपत्रे इ. चा समावेश आहे.

**महिलांविषयक कायदे :**

आधुनिक काळात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तसेच मानवाच्या नीतीमुल्यातील घसरणीमुळे महिलांचे वंदनीय अवस्थेतून दयनीय स्वरूपात परिवर्तन झालेले दिसत आहे. त्यामुळे दररोज घडत असणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या घटना आपण बघत असतो.ज्या घरात ती स्वतः सुरक्षित समजते. त्याच घरात ती विविध अत्याचाराला बळी पडते. तसेच घराबाहेर पडल्यानंतर ही तिला बऱ्याच अत्याचाराला बळी पडावे लागते. या सर्व अत्याचारापासून संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी आजपर्यंत खाली दिले गेलेले कायदे अस्तित्वात आहेत.

**१. सतिप्रथा प्रतिबंध कायदा (१९२९) :**

इ.स. १९२९ साली राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सती प्रथा प्रतिबंध कायदा लॉर्ड बेटींग या इंग्रजी अधिकाऱ्याने पास केला. त्यामुळे पती निधनानंतर त्यांच्या चितेवर प्राण द्यावा लागणाऱ्या महिलांच्या या जाचक रुढीतून मुक्तता झाली व त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी हा कायदा फायदेशीर ठरला.

**२. हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१) :**

समाजामध्ये हुंडा देणे ही घातक स्वरूपाची प्रथा बनलेली होती. याला आळा घालण्यासाठी हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ अस्तित्वात आला आहे. प्रत्येक पोलिस स्टेशनला हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. राज्यात २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणून साजरा केला जातो.

**३. हिंदू विवाह कायदा (१९५५) :**

हिंदू विवाह कायदा हा हिंदू धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीस लागू आहे. शिवाय वीरशेव, बौद्ध, जैन, शिख, ब्राम्हो व आर्य समाज या अनुयायांना हा कायदा लागू आहे. ज्या समाजासाठी स्वतंत्र विवाह कायदे अस्तित्वात आलेले आहेत. तसेच ज्या हिंदूचे विवाह हे स्पेशल मॅरेज ॲक्टनुसार केले जात नाहीत. त्यांना हा कायदा लागू होतो.

**४. स्त्रियांचा संपत्तीचा कायदा (१९५६) :**

एके काळी कौटुंबिक मालमत्तेत मुलीला काही वाटा नव्हता. मुलगा हा कौटुंबिक मालमत्तेचा वारसा मानला जात असे. १९५६ च्या कायद्यानुसार कुटूंबाची मालमत्ता वडिलांनी मिळवलेली मालमत्ता यात त्याच्या पत्नीला तसेच मुले मुली यांना समान वाटा देण्यात आला आहे.

**५. समान वेतन कायदा (१९७६) :**

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून घोषीत करण्यात आले होते. स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन असावे त्यासाठी हा कायदा करण्यात आला.

**६. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा (२००९) :**

महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियम २००४ दिनांक २६ / १० / २००६ पासून अंमलात आला. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्यासाठी हा कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे महिलांना शारीरिक अत्याचार, लैंगिक, भावनिक, आर्थिक अत्याचारापासून संरक्षण दिले आहे.

**७. गर्भपात प्रतिबंध कायदा (१९२९) व गर्भलिंग परिक्षण कायदा (१९७१) :**

भारतात मुलींचे प्रमाण झपाटयाने कमी होत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी गर्भपाताचा व गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायदा करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू आहे. यातील सर्व गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र करण्यात आले आहेत. या कायदान्वये गर्भातील लिंग तपासणी करणाऱ्या व्यक्तीला आणि अशी तपासणी करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाला दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली.

**८. राष्ट्रीय महिला आयोग कायदा (१९९०) :**

या महिला आयोगावर एक अध्यक्ष व पाच सभासद असतात. हे सदस्य विविध क्षेत्रातून आपल्या क्षमतेच्या बळावर आलेल्या महिला असतात. याशिवाय या आयोगावर केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या व्यक्ती सभासद सचिव असतो. या कायद्यान्वये राज्यघटना व इतर कायद्यांनी स्त्रियांच्या संरक्षणाकरीता ज्या तरतूदी केलेल्या आहेत. त्या संबंधित उपस्थित होणाऱ्या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाते.

अशा प्रकारे भारतात कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांना प्राप्त झालेले अधिकार, शासन स्तरावरील विशेष प्रयत्न आणि त्यांच्या विषयी वाढत असलेली जाणीव जागृती यामुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात बदल होताना दिसत आहेत.

**निष्कर्ष :**

महिला विषयक कायद्यांचे वरील चर्चेवरून महिला सक्षमीकरणातील योगदान लक्षात येईल. वरील विविध कायद्यांनी महिलांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण केली. त्यांना आत्मविश्वास दिला. तसेच पुरूषांवर धाक निर्माण केला. ज्यामुळे महिलांवरील अत्याचारात काही प्रमाणात का होईना घट झाली. महिला सक्षमीकरणाचा महिलांना अधिकार, स्वातंत्र्य देऊन तिचे सामर्थ्य वाढविणे हा अर्थ लक्षात घेतला तर या संदर्भात महिलांविषयक विविध कायद्यांनी महिला सक्षमीकरणात महत्वाची भूमिका बजावली आहे हे नाकारता येत नाही. परंतु यामध्ये आणखी सुधारणा करणे आवश्यक आहे. विशेषत: कायद्याची अंमलबजावणी कठोर व वेळेत होणे आवश्यक आहे. न्यायालयीन कामकाजात गतिमानता आणण्यासाठी आणखी महिला विषयक विशेष न्यायालय निर्माण करावे व प्रत्येक केसचा निकाल हा निश्चित वेळेत द्यावा ज्यामुळे भारतीय कायद्यांना खऱ्या अर्थाने आधार प्राप्त होईल.

**संदर्भसूची :**

१. ॲड.देशमुख अरूण - मानवी हक्क आयोग, मनोरमा प्रकाशन
२. डॉ. जया सागडे - स्त्री न्याय कायदा
३. डॉ.ए.एन.अग्निहोत्री - महिला सशक्ती और कानून
४. शर्मा मंजू, नारी के प्रति अत्याचार एवं मानवाधिकार

# भारतीय उच्च शिक्षण : वास्तव व समस्या

**डॉ. वितेश भारत निकते**
राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर

**१) प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून भारतात शिक्षण हे पवित्र आणि उदात्त कार्य सामाजिक परिवर्तनाचे मुख्य साधन मानले गेले. त्यामुळे शिक्षणासाठी फारसा मोबदला घेतला जात नसे. पण ब्रिटिश काळापासून शिकविण्यासाठी वेतन देण्यास सुरुवात झाली. विद्यार्थी हा केंद्रबिंदु मानला जाऊन शिक्षणाद्वारे मानव विकास होत असतो. उच्च शिक्षण हे मानवी विकासाचे व देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे अप्रगत व विकसनशील राष्ट्रांमध्ये देशाच्या व समाजाच्या विकासासाठी उच्च शिक्षणावर मोठी गुंतवणूक प्राधान्यक्रमाने केली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील लोकशाही मजबूत करण्यासाठी व राष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी उच्चशिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे मत व्यक्त केले आहे. मागासलेले उपेक्षित लोक एकवेळ संपत्ती व सत्तेचे लाभ सोडायला तयार झाले तर फारसे बिघडत नाही, पण ते उच्च शिक्षणाच्या सर्वेच्च संधीपासून वंचित राहता कामा नये. यामागचे एकमेव उद्देश म्हणजे सत्ता व संपत्ती ही मिळाली व तिचा उपयोग करण्यासाठी दृष्टी नसेल तर तिचा उपयोग नसतो. याउलट उच्चशिक्षणाने व्यक्ती सबल झाला तर तो आपल्या प्रतिभेने समाजामध्ये अधिक विधायक बदल घडवून आणू शकतो. थोडक्यात, उच्च शिक्षण हे माणसांच्या अंतशक्ती जागा करण्याचे एकमेव साधन आहे. बाह्य किंवा पराभूत शक्तींनी माणसे गुलाम होतात. मात्र तीच माणसे आत्मशक्तीने तेजाळून निघतात. त्यांच्या मते, कोणत्याही समाजाची उंची मोजायची झाली तर त्या समाजातील किती टक्के नागरिक उच्च शिक्षणाचा लाभ घेऊ शकले आहेत यावर मोजता येते. मोतपट्टी लावली तर भारतात सर्वाधिक विषमता दिसून येईल. यामुळे भारतसरकारने विविध समित्या आयोगाच्या माध्यमातून उच्चशिक्षणासाठी प्रयत्न केले आहेत.

**२) संशोधनाचे उद्दष्टे :**

- भारतातील उच्चशिक्षणाचा आढावा घेणे.
- भारतीय उच्चशिक्षणातील विविध समस्यांचा अभ्यास करणे.
- भारतातील उच्चशिक्षणाचे वास्तव किंवा स्थिती समजून घेणे.

**३) संशोधनाची गृहितके :**

- भारताला उच्चशिक्षणाची प्राचीन परपंरा लाभलेली आहे.
- भारतात सध्यस्थितीमध्ये उच्चशिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.
- भारतात उच्चशिक्षणामध्ये व्यापारीकरण ही एक प्रमुख समस्या आहे.

**४) संशोधन पध्दती :**

प्रस्तुत लघुशोधनिबंधासाठी सामाजिकशास्त्रातील विवरणात्मक व विश्लेषणानात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये तथ्यसंकलन करताना संदर्भसाहित्य, विविध मासिके, साप्ताहिक व जिवनचरित्राचा अधार घेण्यात आला आहे.

**५) भारतीय उच्चशिक्षणाचे वास्तव :**

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आणि त्या अगोदरच्या अनेक आयोगानी प्राथमिक शिक्षणावर भर दिला. भारतात शिक्षणावरील गुंतवणूक राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ टक्के असावी असा आग्रह राहीला आहे. भारतात महाविद्यालये आणि विद्यापीठांची संस्थात्मक वाढ सातत्याने होत आहे. भारतात १९९५ साली २२८ विद्यापीठे, १००० महाविद्यालये आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६० लाख होती.

आज भारतात उच्च शिक्षणातील प्रवेश प्रमाण हे २००६-०७ च्या आकडेवारीनुसार ११ टक्के आहे. म्हणजे १८ ते २३ वयोगटातील ८९ टक्के तरुणांना उच्च शिक्षणाची संधी मिळत नाही. त्याचबरोबर देशातल्या विविध ५८४ जिल्हयांपैकी ३६३ जिल्हयांत उच्च शिक्षण नोंदणीचे प्रमाण हे राष्ट्रीय प्रमाणपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. देशात उच्च शिक्षण सर्वाधिक घेणाऱ्या राज्यांमध्ये नागालँड व गोवा राज्याचा क्रमांक प्रथम येतो तेथे १९ टक्के हे प्रमाण आहेत तर त्यानंतर केरळ मध्ये १८.५ टक्के इतके प्रमाण आहे. सर्वात कमी प्रमाण हे अरुणाचल प्रदेशात केवळ ४ टक्के इतके आहे. तसेच महाराष्ट्रात हे प्रमाण केवळ १३ टक्के इतके आहे.

जागतिक स्थितीचा विचार केल्यास विकसित देशांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण ५५ टक्के आहे तर विकसनशिल देशात हे प्रमाण ३६ टक्के असून सर्वसाधारण विकसनशिल राष्ट्रांमध्ये हे प्रमाण २३ टक्के इतके आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, भारताला प्रगत देशाबरोबर बरोबरी करावयाची असेल तर दुप्पटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षणाच्या बाबतीत ग्रामीण व शहरी असा भेद केला असता. युवकांचे उच्चशिक्षण घेण्याचे प्रमाण हे ग्रामीण भागात ७ टक्के तर शहरी भागात २० टक्के प्रमाण असल्याचे दिसून येते. देशात अनूसूचित जाती व दलितांमध्ये हे प्रमाण ६.३० टक्के इतके आहे. ओबीसी मध्ये ८.५ टक्के इतके आहे. तर मुलींचा विचार केला असता हिंदू मध्ये ९.३२ टक्के आहे सर्वात अधिक ख्रिश्चन समाजामध्ये १६ टक्के इतके आहे. सर्वात कमी मुस्लिम समाजात ५.८ टक्के दिसून येते.

असे असले तरी आज खेडयापाडयात उच्चशिक्षण पोहचले आहे असे भासवले जाते परंतु वास्तवात तेथे केवळ कागदोपत्री पदव्या पोहचल्या आहेत. संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात होत आहे परंतु गुणात्मक वाढ ही अल्पसी दिसून येते आहे याचे कारण म्हणजे उच्च शिक्षणातील समस्या होय.

**६) उच्चशिक्षणातील समस्या :**

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये काळानूसार व परिस्थितीनूसार बदल करणे आवश्यक आहे. आजच्या उच्चशिक्षण व्यवस्थेमध्ये धोरणात्मक व कार्यात्मक अशा अनेक समस्या असल्याचे दिसून येते. भारतात उच्च शिक्षण घेण्याऱ्यांचे प्रमाण हे अत्यंत अल्पसे आहे. याचे बरोबर संख्यात्मक व गुणात्मक समस्या ही अधिक दिसून येतात.

- महाविद्यालयातील प्रवेशातील विद्यार्थी अधिक असतात परंतु मोठया संख्येने विद्यार्थी वर्गामध्ये गैरहजर असल्याचे दिसून येते. गैरहजेरीचे प्रमाण देशातील मोठमोठी शहर किंवा तेथील काही महाविद्यालये सोडली तर इतरत्र सर्वत्र गैरहजेरीचे प्रमाण दिवसेंदिवस अधिकच वाढतच आहे. यामध्ये प्रामुख्याने ७० टक्क्यापर्यंत हे प्रमाण वाढत आहे.
- भारतीय उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम हा पारंपारिक पध्दतीचा कारकुनी पध्दतीचा असल्याचे दिसून येते. त्याचा व्यवहारिक जीवनात फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे भारतीय शिक्षण व्यावसाभिमुख बनविणे आवश्यक आहे.
- भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये अध्यापन पध्दती, कालबाह्य अभ्यासक्रम तरुणांची उदासिनता या सर्व कारणामुळे शिक्षण व्यवस्थेत असंख्य कच्चे दुवे निर्माण झाली आहेत. विद्यार्थ्यांचा विचार न करता अभ्यासक्रम ठरविण्यात येत नाही. तेच पारंपारिक अध्ययन व अध्यापन पध्दती प्रामुख्याने दिसून येते.
- देशातील अनेक भागातील अनेक विद्यापीठातून परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आले आहेत. परीक्षेतील गैरप्रकारामुळे हुशार विद्यार्थ्यांपेक्षा कधीच महाविद्यालयाचे तोंड न पाहणारा विद्यार्थी गुण जास्त घेऊन उत्तीर्ण होत आहे.
- शिक्षण जीवनोपयोगी असावे परंतु आजच्या शिक्षणाने हा उद्देश साधला जात नाही असे दिसते. नोकरीसाठी शिक्षण असा सर्वत्र सूर दिसून येतो. आजच्या शिक्षणाने विद्यार्थी स्वावलंबी होऊन स्वतंत्र जीवन जगू शकत नाही. मिळविलेल्या पदवीचा नेमका उपयोग काय हे न समजून अनेक युवक बेकार झालेले दिसून येतात.
- राजकारणी नेतृत्त्व भारतीय उच्च शिक्षणांमध्ये बदल करण्यास तयार नाहीत कारण यामुळे त्यांच्यात स्वावलंबीपणा निर्माण होऊन त्यांना मदत करण्यासाठी कार्यकर्ते मिळणार नाहीत यामुळे यामध्ये बदल केला जात नाही. तसेच अनेक नेतृत्वांच्या संस्था असल्यामुळे कार्यक्षमत अध्यापक ऐवजी भ्रष्टाचार, वशिलेबाजी, भाईभतिजा या माध्यमातून भरती होताना दिसून येते. त्यामुळे शिक्षण देखील दर्जेदार मिळेल याबाबत शंका येते.

अशा विविध समस्या भारतीय उच्च शिक्षणात दिसून येतात.

**७) सारांश :**

भारतीय शिक्षणातील विविध समस्याला सामोरे जाऊन आर्थिक विकासातभारताला अग्रेसर होण्यासाठी योग्य शैक्षणिक नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी आजच्या शिक्षण पध्दतीत बदल करुन रोजगारभिमुख, स्वयंरोजगार, व्यावसायिक शिक्षण, मूल्य शिक्षण, नैतिक शिक्षण या मुलभूत उद्दिष्टांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

**८) संदर्भ :**

१. उच्च शिक्षण, व्यक्तिमत्व विकास व मानवी मूल्ये, (संपा.) डॉ. नागोराव कुंभार, अरुणा प्रकाशन, लातूर, २०११.
२. ध्यास परिवर्तनाचा डॉ. जनार्दन वाघमारे गौरव ग्रंथ, (संपा.) डॉ. सूर्यनारायण रणसुभे, विवेक प्रिंट सर्व्हिस, लातूर, २०११.
३. बदलते भारतीय शिक्षण, अर्थकारण, समाजकारण व राजकारण, (संपा.), ब्रिजमोहन दायमा, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०१२.
४. भारतीय राज्यव्यवस्था समकालीन कळीचे मुद्दे, तुकाराम जाधव, मुक्ता कुलकर्णी, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स, पुणे, २०१८.
५. दैनिक लोकसत्ता व लोकमत.

# स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्राम विकासाच्या सह संबंधाचा अभ्यास

**प्रा. बी.टी. पवार**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कालिंकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरुर कासार जि.बीड

**डॉ.काकासाहेब पोकळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड.

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून ते आज पर्यंत भारतीय जनते संबंधी कल्याणकारी विचार करणारी व्यवस्था म्हणून स्थानिक स्वशासनाकडे पाहिले जाते. स्थानिक स्वशासन संस्था जनतेच्या कल्याणाचे धोरण ठरवितात.त्या धोरणानुसार कार्यक्रम तयार करतात.ते कार्यक्रम जनतेच्या कल्याणासाठी अमलात आणतात.

सुशासन व्यवस्था निर्मितीचे बीज अंकुरण्याचे कार्य स्थानिक स्वशासन संस्था करता.या संस्था लोकशाही राष्ट्राची निर्मिती करतात.त्या खऱ्या लोकशाही शासन व्यवस्थेची पायाभरणी करण्याचे कार्य अत्यंत कुशलतेने करतात.कोणत्याही देशात कोणतीही शासन व्यवस्था अथवा राजवट भागविता येत नाहीत.स्थानिक जनतेच्या नागरी गरजा भागविण्यासाठी स्थानिक स्वशासन संस्थांची मदत घ्यावीच लागते.स्थानिक स्वशासनाचा कारभार काहिसा गुंतागुंतीचा असतो.कोणत्याही देशामध्ये अशा संस्थाची फारच मोठी अशी यंत्रणा असते.अशा संस्थांचे जाळे देशभर पसरलेले असते.

लोकशाही प्रधान देशात अनेक महत्त्वाची कार्ये या संस्थाकडून पार पाडली जातात.स्थानिक जनतेत स्वातंत्र्याचे नव चैतन्य निर्माण करण्याचे महान कार्य या संस्था करतात.नव नेतृत्त्वाची निर्मिती या संस्थांच्या माध्यमाद्वारे होत असते.स्थानिक नेतृत्त्वातूनच राष्ट्रीय नेतृत्व निर्माण होत असते.

स्थानिक कारभार सुरळीत चालविण्यासाठी एक अपरिहार्य यंत्रणा म्हणून स्थानिक स्वशासन संस्थांकडे बघितले जाते.केंद्रशासन अथवा राज्य शासनाचा एक अविभाज्य घटक म्हणून या संस्था अस्तित्वात आलेल्या आहेत.

कोणत्याही देशात काही विषय हे नागरीकांच्या जीवनाशी अत्यंत निगडीत असतात.त्या विषयांचा कारभार भौगोलिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून स्थानिक स्वशासन संस्थाच पाहतात असे निरनिराळया देशातील अनुभवावरुन सांगता येते.स्थानिक स्वरुपाची कार्ये करण्यासाठी त्या विशिष्ट स्थानिक क्षेत्रापुरती मर्यादित सत्ता किंवा अधिकार अशा संस्थाना मिळतात सर्व देशभर केंद्र सरकारची सत्ता असते.राज्यात राज्य सरकारची सत्ता असते.स्थानिक क्षेत्रापुरती स्थानिक शासनाची सत्ता असते.लोकसत्ता करण्यात लोकांच्या कल्याणकारी लोकांना सहभागी होण्यासाठी स्वशासनाची ही यंत्रणा उभारली जाते अशी यंत्रणा उभारण्यासाठी लोकप्रिय अशा निवडणुकीचे तत्व अंगीकारले जाते.सत्तोच्या विकेंद्रीकरने अशा संस्थाना बळकटी आणली जाते.

जनतेचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, विकास घडवून आणण्यासाठी या संस्था ग्रामीण समुदायाचा विकासाच्या कार्यात हातभार लावतात. स्थानिक जनतेला सेवा पुरवणे इत्यादी कार्य स्थानिक स्वराज्य संस्था करतात.**आर.एम.जॅक्सनने** म्हटल्याप्रमाणे“नेहमीसाठीच स्थानिक शासन हे राष्ट्रीय शासनाचा आधार असते.”स्थानिक स्वशासनाने अनेक राष्ट्रातून नवनवीन विचार प्रवाहाला जन्म दिला.अनेक देशातील जनतेच्या पारंपरिक जीवनावरील घट्ट पकड सैल करण्याचे कार्य या संस्थानी केले आहे.

स्थानिक स्वशासन संस्थाचे ग्रामीण जीवनावर फार मोठे परिणाम होतात.ग्रामीण जनतेचे जीवन सुखी करण्यासाठी व समृध्द बनविण्यासाठी आधुनिक भारतातील प्रयोग महत्वपूर्ण आहेत. यालाच आपण पंचायत राज असे नाव देतो यालाच लोकशाही विकेंद्रीकरण असे म्हणतो यालाच सत्तेचे विकेंद्रीकरण असेही संबोधतात ग्रामीण क्षेत्रातील सामान्या जनतेच्या विकासाठी एक नाविण्यपूर्ण यंत्रणा उभारणी गेली आहे. या यंत्राद्वारे कार्ये आणि जबाबदाऱ्या वाढविण्यात आल्या आहेत.या यंत्राच्या अधिकार कशाही रुंदावल्या गेल्या आहेत. जनतेच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा ही विस्तारली आहे.जनतेप्रती असलेल्या उत्तरदायित्वालाही महत्व आले आहे.सामान्य जनतेच्या आशाकांक्षांची पूर्तता करण्यामध्ये व त्यांचा उत्कर्ष करण्यामध्ये संस्थाना महत्त्वाचे योगदान द्यावे लागणार आहे.पंचायत राज संस्थाद्वारे जोमाने विकास साधण्याचे कार्य देशाने हाती घेतले आहे.

स्थानिक स्वशासन संस्थांचा एकूण कार्यभाग पाहता त्यांच्या अभ्यासाला तेवढे महत्त्व दिले जात नाही.काळाची गरज म्हणून तरी या विषयांच्या अभ्यासाला शासन दरबारी सर्वच योग्य असे स्थान दिले पाहिजे.थोडया बहुत संस्था या विषयांचा अभ्यासाकडे अनेक वर्षापासून लक्ष देत असल्यातरी त्याचे प्रयन तुज पुजे पडतात.

**गृहितके :**

१. ग्रामीण भारतातील राजकीय स्थिती सुधारण्यासाठी उपयोगी आहे.
२. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी यांची आवश्यकता आहे.
३. आरोग्यासाठी पुरक आहे.
४. सामाजिक बांधली निर्माण होईल.
५. शैक्षणिक सुधारणा होतील.

**उदिष्टये** :

१. ग्रामीण भारतांच्या राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण जनतेची आर्थिक स्थिती अभ्यासणे.
३. ग्रामीण जीवन शैलीचा अभ्यास करणे.
४. आरोग्यासाठी दिलेल्या सुविधाचा अभ्यास करणे.
५. शैक्षणिक कार्याचा समाजांच्या प्रगतीसाठी उपयोग होतो काय?हे अभ्यासणे.
६. मागासवर्गीय समाजाचा विकास होईल काय यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती** :

स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्राम विकासाच्या सह संबंधाचा अभ्यास.या संशोधनासाठी मी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

**भारतातील स्थानिक स्वशासनाचा इतिहास** :

भारतातील स्थानिक स्वशासन संस्थाचा इतिहास अत्यंत प्राचीन व वैभव संपन्न असा आहे.या संस्थाचे अस्तित्व वैदिक अस्तित्व वैधिक काळापासून आहे. वेद, पुराण, उपनिषद, धर्मग्रंथ,स्मृती, श्रृती, कथा, शासन व काही प्रवास वर्णनात्मक ग्रंथ इत्यादीमधून भारतच्या प्राचीन काळातील स्थानिक स्वशासनाचे पुरावे मिळतात. ग्रामीण स्थानिक स्वशासन आणि नागरी स्थानिक स्वशासन अशा दोन्ही प्रकारच्या शासन व्यवस्था स्थानिक कारभारासाठी भारतीयांचे जीवन व्यापून टाकले.भारतातील या संस्थाचा इतिहास म्हणजे शतकानुतके संथपणे वाहणारा प्रवाह आहे.कालमानानुसार त्या प्रवाहास कधी अधिक वेग मिळालातर काही वेळा त्या संस्थांचा इतिहास असा काही वेगाने उफाळून वाहू लागतो की, त्यामुळे व्यक्तीचे समाजाचे आणि राष्ट्राचे जीवन अमुंलाग्र बदलेले आढळते.भारतीयाच्या जीवनात विलक्षण स्थान ग्रहण केले आहे.

रामायणाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, त्या काळात प्रशासन व्यवस्था, 'पुर',व'जनपद' अशा दोन प्रकारात विभाजीत होती. ग्रामांचा उल्लेख वेगळा केला जात असे.परंतु ग्राम कोणत्याही 'जनपद' मध्ये सामावलेले असे.'ग्राम', 'महाग्राम' व घोष यांचा उल्लेख रामायणात मिळतो. ग्रामाच्या जवळचे नगर, 'पट्टण' म्हणून ओळखले जाते.यांचा उपयोग जनपंदाना बाजार हाट करण्यासाठी होत असे रामायणात श्रेणी आणि नियम अशा निवासी संघटनाचा उल्लेख येतो.

महाभारतातील 'शांतीपर्व' मधील वर्णनानुसार शासनाचा सर्वात छोटा घटक ग्राम हाच होता. ग्राम यांचा प्रमुखास 'ग्रामीक' असे म्हणून ओळखले जात.तो शासनाचा घटकाचा प्रमुख होता.मनुस्मृतीमध्ये यांचा उल्लेख आहे.तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रात यांचा उल्लेख आढळतो.मध्ययुगीन काळ व ब्रिटीश काळात स्थानिक स्वशासनाचा विकास झालेला दिसून ब्रिटीश काळात लॉर्ड रिपन यांना त्याचे श्रेय दिले जाते.

**स्थानिक स्वशासनाचा अर्थ** :

**१.ब्रिटीनिका विश्वकोष :** स्थानिक स्वशासन म्हणजे पूर्ण राज्याऐवजी अंतर्गत दृष्टया छोटया भुभागात व्यवस्थापन करुन निर्णय घेऊन त्यांच कार्यवाही करणारी सत्ता होय.

**२.राज्यशास्त्र शब्द कोश :** स्थानिक स्वशासन शासनाचा असा भाग असतो की, ज्याचा मुख्य संबंध कोणत्या तरी शहर अथवा क्षेत्रीय समितीच्या स्थानिक व्यवहाशी असतो. साधारणपणे स्थानिक स्वशासन राज्य सरकार किंवा राष्ट्रीय सरकार कडून अधिकार प्राप्त सत्तेचा उपयोग करते त्यांना राज्य घटने अंतर्गत स्वतंत्र अधिकार प्राप्त झालेले असतात.

**३.जॉन जे क्लार्क :**स्थानिक शासन केंद्र शासन किंवा राज्य शासन यांचा एक भाग असते. जे त्या विशेष भागातील अथवा जिल्हयातील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेऊन आवश्य वाटल्यास अशा कामाची जबाबदारी स्थानिक ठिकाणाच्या लोकांकडे सोपवून त्यावर केंद्राचे नियंत्रण स्थापित केले जाते.

**आवश्यकता** :

लोकशाही प्रणाली स्विकारलेल्या देशात स्थानिक स्वशासन संस्था असते.ही मुलभूत आवश्यकता समजली जाते. लोकशाही गणराज्यात लोकाभिमुख स्थानिक स्वशासन संस्था असणे हे त्या शासन व्यवस्थेच्या पूर्णपणे विकासाचे व समृध्दीचे लक्षण समजले जाते. लोकशाही संवर्धनासाठी व सामाजिक समस्या सोडवणे त्याच बरोबर सत्तेचे विकेंद्रीकरणासाठी लोकाची रुची निर्माण करणे.नौकशाहीतील दोष कमी करणे यासाठी स्थानिक स्वशासनाची आवश्यकता आहे.

**महत्त्व** :

एखादया गोष्टीचे महत्व त्या गोष्टीच्या उपयुक्तेतवरुन ठरत असते.स्थानिक स्वशासन संस्थाची उपयुक्तता आज सर्व सामान्य ठरली आहे.ज्या देशातील स्थानिक स्वशासन संस्था चांगले कार्य करतात.त्या देशात सुराज्य प्रस्थापित होत असते.ज्या देशात मजबुत स्थानिक स्वशासन संस्था असतात.त्या देशात स्थिर व बळकट लोकशाही प्रधान शासन निर्माण होत असते.नागरीकांच्या गरजा भागविण्याचे काम करते.'जेम्स ब्रुस' म्हणतात.स्थानिक स्वशासन संस्थामुळे देशात उत्तम नागरिक बनविण्यात मदत होते.सामान्य नागरिकांना कृतिशिल बनण्यास व प्रमाणिकपणे कार्य करण्यास या संस्था स्फूर्ती आळस आणि स्वार्थ यांचा त्याग केल्यास या संस्था पृथ्वीवर स्वर्ग साकारु शकतात.

**भारतीय स्वशासनाला राज्यघटनेचा आधार** :

आज स्थानिक स्वशासनाचा दर्जा घटनात्मक बनला आहे. १९९३ त्या वेधानिक आधारावर होत्या. आज त्यांना घटनेत स्थान दिल्यामुळे त्या आज घटनात्मक बनल्या आहेत. यापूर्वी घटनेच्या कलम ४० मध्ये राज्याने या संस्था निर्माण करण्याची निती स्विकारावी ऐवढा उल्लेख होता.केंद्र आणि राज्य यांच्या अधिकारांच्या विभागणीत स्थानिक स्वशासन हा विषय राज्य सुचित समाविष्ट केल्याने ते सातव्या परिशिष्टांत आढळतो.

ग्रामीण स्थानिक स्वशासनासाठी ७३ वी घटनादुरुस्ती झाली आहे.'पंचायत राज' संबंधीची ही घटना दुरुस्ती असून डिसेंबर १९९२ ला दोन्ही सभागृहानी मान्यता दिली असून घटक राज्यानी मान्यता दिली आहे.२० एप्रिल १९९३ पासून त्यांची अंमलबजावणी सुरु झाली या घटनादुरुस्तीने राज्यघटनेत भाग ९ समाविष्ट करुन कलम २४२ ते २४३ ओ एकूण १५ कलमे या कलमाचा समावेश केला आहे.त्यासाठी ११ वे परिशिष्ट जोडले आहेत.

**स्थानिक स्वशासनातील नेतृत्व** :

स्थानिक स्वशासन संस्था सामान्य जनतेलाच केवळ राजकीय प्रशिक्षणाचे पाठ देतात असे नव्हे तर या जनतेचे नेतृत्व करणाऱ्या वर्गाला देखील प्रशिक्षण देतात उभरत्या नेतृत्वाचे भरण पोषण करण्यात या संस्थाचे योगदान महत्व पूर्ण मानले जाते. एवढेच नव्हे तर अगदी सामान्य माणसातही नेतृत्वाचे गुण संवर्धित करण्यात या संस्था अग्रेसर ठरल्या आहेत. या संस्थातून कार्य करणाऱ्याला राजकारणाचे आणि प्रशासनाचे अनुभव येतात.अनेक गोष्टीचे ज्ञान मिळते हा अनुभव व ज्ञान हे नेत्याना राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करताना उपयोगी पडतो.भारतातील नव्हे तर जगातील अनेक थोर व्यक्ती ज्यांनी राजकारणात लौकिक प्राप्त केला आहे.अशा विभुतीचे कार्य स्थानिक स्वशासन संस्थातूनच सुरु झाले. विन्स्टन चर्चिल, मोतीलाल नेहरु, जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, सरदार वल्लभभाई पटेल, फिरोजशहा मेहता, चक्रवर्ती राजगोपालाचारी, वसंतराव नाईक, शिवराज पाटील चाकुरकर,विलासराव देशमुख अशा अनेक मान्यवरांनी नामावली देता येईल. त्याचे सार्वजनिक जीवन स्थानिक स्वशासनाच्या माध्यमातून सुरु झाले. प्रो लॉस्की तर म्हणतात की, अशा व्यक्तीनाच केंद्रीय अथवा राज्य सरकारात प्रतिनिधीच्या रुपात काम करण्यांचा अधिकार मिळाला पाहीजे की, ज्यांनी कमीत कमी तत्पूर्वी तीन वर्ष स्थानिक स्वशासन संस्थातून प्रतिनिधीच्या रुपाते कार्य केलेले असले पाहिजे. सामाजिक जीवनाशी सुसंगत विचार प्रवाह निर्माण झाल्यास या बाबतीत नवीन नेतृत्व निर्माण होऊ शकते. हे नेतृत्व रुढी, परंपरामध्ये न दबता, जुनी जळमटे बाजूला सारुन जीवनाकडे निकोप वृत्तीने पाहणाऱ्या उदयोन्मुख युवा पिढीतून निर्माण होऊ शकेल. राजकीय जीवना बरोबरच सामाजिक जीवनही गतिमान बनवून विधायक दृष्टी ठेवणारे नेतृत्व निर्माण होईल अशा बाळगली पाहिजे.

**ग्रामीण समुदायाचा विकास** :

**ग्राम सभा :** पंचायतराज रचनेमध्ये सर्वात छोटा घटक म्हणून ग्रामसभा ओळखली जाते. संपूर्ण शासनाच्या ग्रामीण क्षेत्रातील योजना व विकासाची स्वप्ने साकारण्याचा हा मूलभूत घटक आहे.७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभेला घटनात्मक दर्जा दिला आहे.गावातील प्रत्येक प्रौढ स्त्री पुरुषांचा समावेश ग्राम सभेत होतो.ग्रामपंचायत हा स्वायत्त घटक निर्माण करणारी ग्राम सभाच असते. व्याख्या ग्रामसभा म्हणजे गाव पातळीवरील पंचायत क्षेत्रामध्ये अंतर्भुत असलेल्या एखादया गावांशी संबंधित असलेल्या मतदार यादीत ज्यांची नावे नोंदविण्यात आलेली असतील अशा व्यक्तींची मिळून बनलेली संस्था होय.

पुढील कलम २४३ क या स्वंतत्र कलमात म्हटले आहे की, ग्रामसभा, गावपातळीवर राज्याच्या कायदेमंडळाने कायदा करुन ठरवून दिलेली कार्ये पूर्ण करील आणि अधिकारांचा वापर करील, म्हणजे या कलमाद्वारे ग्रामसभेला भारतीय राज्यघटनेनुसार अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे कर्तव्य ही पार पाडावी लागतात.

राज्यघटनेचे २४३(ख) व २४३(क) या कलमाआधारे असे स्पष्ट नमुद करता येते की, ग्रामसभेला घटनात्मक दर्जा तर प्राप्त झाला आहेच शिवाय या दर्जाचे स्वरुप देशपातळीवर लोकसभा किंवा राज्यपातळीवर विधानसभा यांच्यासारखे आहे. त्या प्रकारचा दर्जा गाव पातळीवर ग्राम सभेला प्राप्त झाला आहे.यामुळे ७३ वी घटना दुरुस्ती ही एक ऐतिहासिक बदल घडवून आणणारी घटना दुरुस्ती ठरते.

ग्रामसभा ही लोकसभा व विधानसभा यापेक्षाही श्रेष्ठ आहे.गावातील प्रत्येक मतदार हा कोणतेही निवडणूक न लढवता संसद सदस्याप्रमाणे अथवा आमदाराप्रमाणे ग्रामसभेच्या कार्यात भाग घेऊ शकतो.'मतदार हा आमदार' आहे.ही जाणीव या ग्रामसभेच्या सदस्यांना होणे किती आवश्यक आहे.हे यावरुन स्पष्ट होते.

**२. त्रिस्तरीय पध्दती** :या कायदयाप्रमाणे प्रत्येक राज्यात ग्रामस्तर आणि मध्यम स्तर, जिल्हा स्तर अशा त्रिस्तरीय पंचायतीराज व्यवस्थेची तरतुद केली गेली आहे. अशा प्रकारे हा कायदा देशभरातील पंचायतीराज व्यवस्थेत एक समानता आणतो.

**३. अध्यक्ष आणि सदस्य यांची निवड** :ग्रामस्तर, मध्यम स्तर आणि जिल्हा स्तरावरील पंचायतीमधील सर्व सदस्य आणि अध्यक्ष यांची लोकाकडून प्रत्यक्ष पध्दतीने निवड केली जाईल अशी तरतुद आहे. मध्यम आणि जिल्हा स्तरावरील पंचायतीचे निर्वाचीत सदस्य त्यांच्यापैकी एकाचा अप्रत्यक्ष पध्दतीने अध्यक्षपदी निवड करतील. अशीही तरतुद आहे. परंतू ग्रामस्तरावरील पंचायतीच्या अध्यक्षाची निवड राज्य विधीमंडळ ठरवेल त्या पध्दतीने होईल.

**४. जागामध्ये आरक्षण :** तिन्ही स्तरावरील प्रत्येक पंचायतीत पंचायत क्षेत्रातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यासाठी जागा आरक्षित असतील. अशी कायदयात तरतुद आहे.या व्यक्तिरिक्त राज्य विधीमंडळ ग्राम किंवा इतर स्तरावरील पंचायतीचे अध्यक्षपद अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीसाठी आरक्षीत ठेवू शकतो.अशी कायदयात तरतुद आहे. शिवाय प्रत्येक स्तरावरील एकूण अध्यक्षपदांपैकी किमान एक- तृतीयांश पदे महिलासाठी आरक्षीत असतील या कायदयाने कोणत्याही स्तरावर पंचायती जागा किंवा अध्यक्षपदे मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवण्यांची तरतुद करण्यांचा अधिकार राज्य विधीमंडळाला देण्यात आला आहे.

**५. पंचायतीचा कार्यकाल** : प्रत्येक स्तरावरील पंचायतीचा कार्यकाल पाच वर्ष असेल परंतू कार्यकाल संपण्यापूर्वी पंचायत विसर्जित करता येते.

**६. अपात्रता** : जर ती संबंधीत राज्याच्या विधीमंडळाच्या निवडणुकीसाठी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयानुसार अपात्र असेल.

**जिल्हा परिषद** - पंचायतराज ही स्थानिक स्वशासनाची त्रिस्तरीय शासन व्यवस्था आहे.या तीन स्तरांपैकी सर्वात वरिष्ठस्तर जिल्हा पातळीवर आहे.यालाच 'जिल्हा परिषद' असे संबोधले जाते.जिल्हयाच्या विकासाची ही सर्वोच्च संस्था आहे.विकासाचा केंद्रबिंदू समजल्या जाणाऱ्या या संस्थेला पंचायतराज व्यवस्थेत अनन्य साधारण असे महत्व आहे.भारतांच्या ग्रामीण भारतांचा विकास करण्यासाठी ही व्यवस्था बलवतरॉय मेहता समितीने सुचविली आहे.विकासांची सर्व कार्य संपन्न करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर टाकण्यात आली आहे. त्यामुळे असे म्हणावे लागते की, जितक्या कार्य क्षमतेने जिल्हा परिषद विकासाची कार्ये पार पाडील. तितक्या जलद गतीने ग्रामीण भागाचा विकास होईल. यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ हा कायदा केला आहे. त्याआधारे महाराष्ट्रातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचा कारभार चालविला जातो.

**जिल्हा परिषदेचे कार्य** :

१. **कृषी :** कृषीविषयक कार्य करण् हे जिल्हा परिषदेची मूलभूत जबाबदारी आहे.
२. **पशुसंवर्धन आणि दुग्धविकास :** पशुसंवर्धासाठी पशुवैद्यकिय दवाखाने निर्माण करणे.
३. **समाजकल्याण :** मागासवर्गाचा विकास, शैक्षणिक, शिष्यवृत्ती देणे फी माफ करणे, वस्तीगृहाची स्थापना, शाळाची स्थापना त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे त्यांना अर्थ साहय करणे.
४. **मागासवर्गाचा आर्थिक विकास :** शेतीची सामुग्री देणे त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे. त्यांना अर्थसाहय करणे.
५. **अस्पृश्यता निवारण :** हरिजन सप्ताह साजरे करणे, झुनका भाकर कार्यक्रम, संवर्ग हरिजन यांच्यातील आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देणे.
६. **मागासवर्गाच्या कल्याणाचे कार्यक्रम :** महिला, बालकांच्या कल्याणाचे कार्यक्रम व प्रकल्प बालवाडया स्थापना समाज प्रबोधानांचे कार्यक्रम राबविणे. संस्कार केंद्र चालविणे सभागृह निर्माण करणे, घरे देणे, पिण्याच्या पाण्याची तरतुद करणे.
७. **मागासवर्गीयांना प्रशिक्षण देणे :** प्रशिक्षण शिबीर आयोजित करणे, तांत्रिक प्रशिक्षणाची सोय करणे. कुटीर रुग्णालये निर्माण करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करणे, फिरती आरोग्य केंद्र, लस टोचने, शालेय आरोग्य सेवा इत्यादी.
८. **वैद्यकिय - आयुवैदिक व सार्वजनिक आरोग्य :** तालुका दवाखाने त्यांच्या दर्जात वाढ करणे, कुटीर रुग्णालये निर्माण करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करणे, फिरती आरोग्य केंद्र, लस टोचने, शालेय आरोग्य सेवा इ.
९. **इमारती व दळवळण :** ग्रामीण रस्ते निर्माण करणे, पुलाचे बांधकाम ते सुस्थितीत ठेवणे त्याची दुरुस्ती करणे प्रशासकीय इमारती निर्माण करणे.
१०. **सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी :** ग्रामीण पाणी पुरवठा करणे, समाजासाठी पाणी पुरवठा करणे.
११. **प्रसिध्दी:** फिरती प्रसिध्दी याने जिल्हा प्रदर्शन करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारे प्रसिध्दी.
१२. **सामुहिक विकास :** समाज शिक्षण
१३. **इतर महत्वाचे :**आदर्श गांव लोकाचे आरोग्य सुविधा सोयी बाजार, धर्मशाळा, गावठाणा बसविणे, स्मशानभूमी, दफनभूमी, सहकार संस्था, पतसंस्था, जाहीर स्वागत समारंभ, तीर्थयांत्राचा विकास.

**पंचायतसमिती** : पंचायतराज व्यवस्थेतील त्रिस्तरीय आकृती बंधात मधल्या स्तरावर 'पंचायत समिती' कार्यरत आहे.समुह विकासाठी गटनिर्माण करण्यात आले होते.हा गट साधारणपणे तालुका स्तरावर निर्माण करण्यात आला होता. परंतू काही ठिकाणी असे ही होते की, एका विकास गटाचा विस्तार दुसऱ्या तालुक्यात अथवा तहसिलच्या कार्यक्षेत्रात पोहचत असे विकासासाठी फार लहान अथवा फार मोठे क्षेत्र घटक म्हणून नसावे या विचारामुळे पंचायत समिती हा विकासाचा एक घटक म्हणून स्वीकारण्यात आला.

**पंचायत समितीचे कार्ये** :

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ कायदयाच्या कलम १०८ अन्वये पंचायत समितीचे कार्ये सांगीतली आहेत.

१. विकास योजनाचा एक संपूर्ण आराखडा तयार करणे.
२. गट अनुदानातून कोणत्याही कामास किंवा विकास योजनांस मंजूरी देणे.
३. पंचायत समितीच्या सभापती व गटातील इतर कोणत्याही पदाधिकाऱ्याकडे न सोपविलेल्या कार्ये अथवा अधिकार यांचा वापर करणे.
४. पंचायत समितीच्या क्षेत्रातील साधन संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्यासाठी आपल्या क्षेत्रात प्राप्त अनुदानातून घ्यावयाचा कामाचे नियोजन करणे.
५. जिल्हा परिषदेच्या विकास योजना व त्याची कार्ये जी त्या पंचायत समितीच्या क्षेत्रात संपन्न होणार असतील. त्या सर्व कामावर देखरेख ठेवणे.
६. जिल्हा परिषदेने मुद्यामहून सोपविलेली त्या गट क्षेत्रातील सर्व कार्येपार पाडणे.
७. पंचायत समितीला आपली कार्येपार पाडण्यासाठी आणि अधिकाराचा वापर करतांना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचा अंमलकरणे.

**ग्रामपंचायत** :

पंचायतराज व्यवस्थेमध्ये सर्वात खालच्या स्तरावर ग्रामपंचायत ही स्थानिक स्वशासन संस्था स्थापन करण्यात आली आहे.पंचायतराज व्यवस्थेचा आधारभूत घटक म्हणून ग्रामपंचायतीला फार मोठे महत्व प्राप्त झाले आहे.ग्रामीण विकासांचा प्रमुख घटक म्हणून ग्रामपंचायतीला अनन्य साधारण असे महत्व आहे. पंचायत राज व्यवस्थेतील हे दुहेरी महत्व लक्षात घेऊन केंद्रशासन ग्रामपंचायतीला अधिक अधिकार दिले महाराष्ट्रात ग्रामपंचायतीचा कारभार चालविण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ हा अस्तित्वात आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कायदयातील प्रशासकीय अधिकार आणि कर्तव्य या प्रकरणातील कलम ४५ तरतुदीनुसार गावातील ज्या कामा संबंधाने वाजवी तजवीज करणे हे पंचायतीचे कर्तव्य आहे असे कामे ग्राम सुचीत नमुद केलेली आहे. सदर विषय ७९ असून १२ प्रमुख भागाखाली येतात. कलम २४३ छ अधिकार दिले आहेत.

**ग्रामपंचायतीचे कार्य :**

१. कृषी २. पशुसंवर्धन ३. वने ४. समाजकल्याण ५. शिक्षण ६. वैद्यकिय सेवा आणि आरोग्य ७. इमारती व दळणवळण ८.पाटबंधारे ९.उद्योगधंदे व कुटीर उद्योग १०. सहकार ११. स्वसंरक्षण व ग्रामसंरक्षण १२. सामान्य प्रशासन

वरील प्रमाणे ग्रामीण समुदाया व स्थानिक स्वशासनाचा सह संबंध येतो.तो ग्रामीण समुदायाच्या विकासाची संलग्नीत आहेत त्यामुळे ते एकमेकांशी संबंधीत तर आहेतच शिवाय ते परस्परावर परावलंबीत आहेत त्यामुळे ते वेगळे कार्य करु शकत नाही.त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्राम विकास याचा सह संबंधावरच ग्रामीण समुदायाचा विकास अवलंबून आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय लोकशाहीमध्ये सत्ता विभाजनांच्या सिंध्दातानुसार सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले.कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्याय मंडळ हे कार्यानुसार वेगळे करण्यात आले.केंद्र सरकार भारतामध्ये सर्वोच्च स्थानी त्यानंतर राज्यांना स्थान देण्यात आले.ग्रामीण भागात स्थानिक स्वशासन यांना महत्व देण्यात आले.त्यानुसार भारतीय लोकशाहीचा शेवटचा टोक म्हणजे ग्रामपंचायत ग्रामपंचायतीच्या वतीने ज्या सुविधा लोकांना पुरविल्या जातात. त्यावरुन आपणास असे म्हणता येईल की ग्रामीण भागाचे प्रगतीचे चित्र या स्थानिक संस्थेमुळे निर्माण झाले भारतातील ग्रामीण जनतेचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास हे या संस्थेमुळे झालेले आहे. या ग्रामीण जनता ही आज शिक्षणामुळे जागृत होत आहे.व प्रत्येक भारतीय नागरीक आपल्या अधिकारांच्या बाबत जागृत असल्यामुळे प्रगती होत आहे.हे भारतीय लोकशाहीसाठी शुभ संकेत आहेत.

**संदर्भग्रंथ सूची** :

१. Panchyatiraj in India- Rajeshwar Dayal
२. Panchyatiraj in India- R.L. Khanna
३. Local Government in India- M.P. Sharma.
४. Leadership in Panchyatiraj- Dr. Arjunrao Darshankar
५. डॉ. रमेश एखेळीकर- भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्याबुक्स पब्लिशर्स,औरंगपूरा औरंगाबाद, जुन १९९९.
६. प्रा.के.आर.बंग- भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ- महाराष्ट्र राज्य, श्री मंगेश प्रकाशन, २३, नवी रामदास पेठ नागपूर, २००५.
७. डॉ.जी.एस.बडे, भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, उद्‌गम आणि विकास.
८. डॉ. शांताराम भोगले- भारतातील स्थानिक शासन
९. डॉ. अर्जु दर्शनकार- पंचायतराज व नागरी प्रशासन.

# ग्रामीण विकासासाठी स्त्री सबलीकरणाची आवश्यकता

**डॉ. प्रकाश रावसाहेब शिंदे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि. लातूर

स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी बनविणे असा ढोबळ मानाने अर्थ घेतला जातो. थोडक्यात स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करुन निर्णय प्रक्रियेत सामील करणे होय असे सांगता येईल. देशाचा विकास आणि स्त्री सबलीकरण यांचा निकटचा संबंध आहे. भारतातील समाजव्यवस्था व जातीव्यवस्थेत स्त्रीला अत्यंत काडीमोल, हिन दर्जाचे मानले जाते. विशेषत: मनुस्मृती वर्णव्यवस्थेत स्त्रीला शुद्रापेक्षाही शुद्र मानले जात भारतात प्रचिन काळापासुन ते अधुनिक काळापर्यंत सियांवर सदैव अन्यायच केला अहो. त्यामुळे भारताचा अपेक्षेप्रमाणे विकास होऊ शकला नाही.

भारताच्या विकासात स्त्रीच्या सबलीकरणाची आवश्यकता अनेक बाबीसाठी आहे. त्यातील काही निवडक बाबी पुढील प्रमाणे.--

**१) शैक्षणिक विकासासाठी :-**

स्त्री सबलीकरणात शिक्षणाची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. कारण शिक्षणाचे प्रमाण वाढले तर अपेक्षित विकास साध्य करणे शक्य आहे. त्यासाठी स्त्री सबलीकरणाच्या माध्यमातुन त्यांना शिक्षण देऊन त्यांची शिक्षण देण्याची क्षमता वाढविल्यास देशाच्या विकासाची गती ही दुप्पटीने वाढते. कारण एक स्त्री शिकली तर संपुर्ण कुटूंब साक्षर होते. राष्ट्राच्या विकासातील अर्धा घटक शिक्षित झाल्यास देशाख पुर्ण विकास होतो. व हे स्त्री सबलीकरण झाल्याशिवाय शक्य नाही त्यामुळे स्त्री सबलीकरण करणे आवश्यक आहे.

**२) कुंटूबं कल्याणासाठी :-**

भारतीय कुंटूबं व्यवस्थेत पुरुषांपेक्षा स्त्रियांचे योगदान अधिक आहे. कारण पुरुष हा जेव्हा घराबाहेर कामासाठी बाहेर असतो त्यावेळेस घर सांभाळणे, घरातील समस्या स्त्रीयाच सोडवितात. तसेच काही जमातीत स्त्री प्रदान सत्ता आहे तेथील घरांचा विकास अधिक झाला आहे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कुंटूबं कल्याणासाठी स्त्री सबलीकरण आवश्यक आहे.

**३) ग्रामीण विकासासाठी :-**

भारताचा विकास हा ग्रामीण भागावर अधारीत आहे. जोपर्यंत ग्रामीण स्त्रीयांचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. कारण २००१ च्या जनगणेनुसार ७२ % जनता ही ग्रामीण भागात राहते तर त्यातील ४८ % स्त्रिंयाचे प्रमाण आहे.तसेच शेतीतील बरीच कामे ही स्त्रियांमार्फत केली जातात. त्याच बरोबर ग्रामीण भागातील कृषी व्यवसायात स्त्रिंयाचे कार्य उल्लेखणीय आहे. म्हणुन ग्रामीण विकासासाठी स्त्री सबलीकरण आवश्यक आहे.

**४) पर्यावरण विकास :-**

पर्यावरण विकास व पर्यावरण संवर्धन करण्यामध्ये सुध्दा महत्तवाची भुमिका आहे.वृक्षरोपण, वृक्षतोड बंदी तसेच पाण्याचा योग्य वापर करण्याबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण केल्यास पर्यावरणाचा विकास साधता येतो. त्याचा परीणाम म्हणून देशाचा विकास सुध्दा करता येतो. व यासाठी स्त्री सबलीकरणाची गरज आहे.

**५) बालकल्याण व अरोग्य बाबत जागृती :-**

देशातील जनतेला निरोगी ठेवण्यासाठी प्रशासन अनेक सुविधा पुरविते. विशेषता बालकांच्या आरोग्यासाठी लसीकरण, स्वच्छता, आहार इ. बाबतीत महिलांची भुमिका महत्वाची आहे. कारण आरोग्य, बालसंगोपन, बालकल्याण याबाबत महिलामध्ये जाणीव-जागृती करण्यासाठी स्त्री सबलीकरण आवश्यक आहे.

**६) अर्थिक बचत :-**

पुरुषापेक्षा स्त्रियांमध्ये आर्थिक बचत किंवा काटकसर हा गुण जास्त प्रमाणात दिसुन येतो. कारण पुरुष पैशाची उधळपट्टी करताना दिसुन येतात. अलीकडे बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी बँकामध्ये मोठया प्रमाणात बचत केली आहे. व त्या पैशातुन आपल्या मुलांच्या शिक्षणाचा ,त्याचबरोबर आपल्या कुंटबांचादेखील विकास होतो म्हणुन त्यासाठी स्त्री सबलीकरणाची गरज आहे.

**७) शासकीस योजनांची अमंलबजावणी :-**

शासना मार्फत ज्या योजना किंवा विविध कार्यक्रम राबविले जातात त्यामध्ये स्वच्छता अभियान, जलसंवर्धन, अरोग्य व लसीकरण, शिक्षण इ. योजनामध्ये स्त्रियांचा सहभाग जास्त दिसुन येतो. त्यामुळे या योजना यशस्वी होण्यास कदत होते. म्हणून विकास योजनांची व कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी करण्यासकरीता स्त्री सबलीकरण आवश्यक आहे.

**८) कुटीर उद्योगास चालना :-**

स्त्रिया शेतीबरोबर अनेक महत्तवाच्या साह्यकारी किंवा जोडधंदात व कुटीर उद्योगात सहभागी होतात. त्यामाध्यमातुन स्वत:चा व देशाचा विकास घडवितात. खालील र्काक्रमात स्त्रियांचे योगदान महत्तवपुर्ण आहे.

१) कापुस उद्योग, २) तंबाखु उद्योग, ३) नारळ उद्योग, ४) दुग्ध उद्योग, ५) कुक्कुट पालन उद्योग ,६) बांधकाम उद्योग,७) सेवाक्षत्र, ८) शैक्षणिक कार्य,९) छोटे घरगुती उद्योग, इ.

अशाप्रकारे विविध क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. म्हणून स्त्रियामध्ये अधिक जागरुकता निर्माण करुन तिचे सबलीकरण करणे गरजेचे आहे.

**९) सामाजिक समस्या निर्मलनात :-**

समाजातील बालगुन्हेगारी, सतीप्रथा, बालविवाह, दारुबंदी, वाढती लोकसंख्या आणि अधंश्रध्दा यासारख्या सामाजिक समस्याबाबत स्त्रियामध्ये जागृती निर्माण केल्यास व समस्या सोडविण्यासाठी स्त्रियाची मदत घेतल्यास सामाजिक समस्या सोडविण्यासाठी स्त्री सबलीकरणाची गरज आहे.

**सारांश :-**

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी सानिया नेहवाल, मेरी कॉम या आपल्या देशाच्या विकासात योगदान देत असल्या तरी दुसःया बाजुला अनेक स्त्रियावर बलात्कार, हुंडाबळी, भ्रुणहत्या, स्त्रीयांची विक्री अशा अनेक अमानुष अत्याचारांना त्यांना बळी जावे लागत आहे. या अत्याचाराचा विरोध करण्यासाठी, अन्यायाला आळा घालण्यासाठी, स्त्री सबलीकरणाची गरज आहे. यासाठी शासकीय पातळीवर स्त्री सबलीकरणासाठी धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रथंसूची :**

१ भारतीय संविधान -सुभाष कश्यप.
२ भारतीय शासन एवं राजनिती - बी.एल. फाडीया
३ आपली संसद - सुभाष ाी. कश्यप,
४ भारत मे स्थानीय शासन, अशोक कुमार शर्मा
५ भारतीय स्थानिक शासन, डॉ. शाम सिरसाठ

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

# ग्रामीण एकात्मिक विकास व आरोग्य सुविधा

**डॉ. शिवाजी लच्छिराम राठोड**
श्री हावगीस्वामी महाविद्यालय
उदगीर जि.लातूर

**प्रा.डॉ. एल.के. उलगडे**
लोकप्रशासन विभागप्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

भारत सरकार द्वारा देशात ग्रामीण एकात्मिक विकास घडवून आणण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात. त्यसामध्ये अनेक योजनांचा समावेश आहे. जसे - इंदिरा आवास योजना ट्रइसेम-१९८०, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, रोजगार हमी योजना, कस्तुरबा गांधी बालिका योजना, अंत्योदय योजना, ग्रामोदय योजना, प्रधानमंत्री सुरक्षा योजना, अटल पेंशन योजना, स्वच्छ भारत मोहिम, जन-धन योजना, राजीव गांधी व आरोग्य निवास योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून केंद्र शासन एकात्मिक ग्रामीण विकास करीत आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्यविषयक सुधारणा घडवून आणण्यासाठी केंद्र आणि राज्य स्तरावर आरोग्य अभियानाद्वारे जनतेला सेवा देण्यात येत आहे.

**ग्रामीण विकासाच्या व्याख्या**

१) जी. पार्थसारथी : ‘‘ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण लोकांच्या जीवनस्तरामध्ये सुधार करणे होय. ग्रामीण विकासामध्ये चार महत्त्वपूर्ण तत्त्व आहेत ग्रामीण लोकांची सक्रिय भागिदारी, मौखिक व मानवी साधनांचा श्रेष्ठ उपयोग, भांडवल संघटन व तंत्रज्ञानाचा उपयोग.’’

२) सर्वसाधारण : ‘‘ग्रामीण विकास म्हणजे एक अशी व्यूहरचना आहे ज्याद्वारा ग्रामीण लोकांचा जीवनस्तर सुधारण्यास व त्याचे उत्पन्न व रोजगाराचा स्तर वाढण्यास प्रयत्न केले जातात.’’

भारतात आज हवा, पाणी प्रदूषण, अफाट शहरीकरण, पावसाची असमानता अनिश्चिततेमुळे आणि योग्य धोरणाअभावी शेतीमधील वाढते नुकसान, वाढती गरिबी आणि एकीकडे कुपोषण तर दुसरीकडे डायबेटीज, हृदयरोग, कॅंसर अशा आरोग्याच्या समस्या आहेत. या सर्वांच्या मुळाशी विकासाची प्रक्रिया सामाजिकदृष्ट्या समन्यायी नसणे आणि पर्यावरणीय दृष्ट्या विनाशकारी असणे होय.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याची संकल्पना**

सर्वांना सहजसाध्य परवडणारी, कार्यक्षम, उत्तरदायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात १२ एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू केले आहे.

भारताने मृत्यूदर कमी करण्यात यश मिळवले आहे. तसेच माता व अर्भक मृत्यू दरातही घट झाली आहे. आज ग्रामीण भागात अनेक संसर्गजन्य साथीचे रोग, कुपोषणात वाढ अशा हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, मानसिक आजार अशा अनेक आजारांमुळे आरोग्य सेवेवर प्रचंड ताण पडत आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवा सहज उपलब्ध असणे आणि त्या सेवा कार्यक्षम उत्तरदायी व गुणवत्तापूर्ण करणे गरजेचे आहे. या भावनेतून देशातील आरोग्य अभियान संकल्पनेचा विकास झाला.

**उद्दिष्ट्ये**

१) देशातील ग्रामीण भागातील जनतेस सेवा सहज उपलब्ध होतील अशी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
२) देशाच्या एकूण खर्चात आरोग्य क्षेत्रावरील खर्चात वाढ करणे.
३) योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करणे.
४) देशातील ग्रामीण भागातील जनतेस विशेषतः स्त्रिया व बालके यांना सहजगत्या परवडण्याजोगी प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गतचे कार्यक्रम**

१) **मनुष्यबळ उपलब्ध करणे.**

मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या दृष्टीने या अभियानाअंतर्गत काही ठराविक गावपातळीवर प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. येथे डॉकटर व स्त्री परिचारिका यांची नियुक्ती केली जाते. तर उपकेंद्रात ए.एन.एम. परिचारिका काम करीत असते. त्यांच्या मदतीला गावस्तरावर गावातील आरोग्याविषयक समस्या जाणून घेण्याचा व आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्याचा काम आशा वर्कर करीत असते.

२) **ग्रामआरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कार्यरत**

या अभियानाअंतर्गत प्रत्येक गावातील ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे रुपांतर ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये करण्यात आले आहे.

**३) जननी सुरक्षा योजना**

माता मृत्यू आणि अर्भक मृत्यू कमी करणे या उद्देशाने ही योजना तयार केली आहे. त्यासाठी प्रसुतीपूर्वी प्रसुतीदरम्यान आणि प्रसुतीनंतर मोफत सेवा देणे तसेच नवजात बाळाला ३० दिवसांपर्यंत मोफत सेवा दिली तर हे उद्दिष्ट साध्य व्हायला मदत होईल. उदा. व्हॅन रुग्णवाहिका दारी (१०८)

**४) शालेय आरोग्य कार्यक्रम**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविला जातो. यामध्ये ग्रामीण भागातील पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. यामध्ये वस्तीशाळा, शिक्षण केंद्रात शिकणारी मुले, अन्य शाळा व आश्रमशाळामधील मुले यामध्ये २ डॉक्टरांची नियुक्ती केली जाते. उदा. गोवर रुबेला लसीकरण मोहिम (देशात अग्रेसर)

**निष्कर्ष**

१) शासकीय आरोग्य योजनांच्या सवलती ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्यात यश आले आहे.
२) दारिद्र्य, कुष्ठरोगी, मजूर आणि पीडितांच्या आरोग्य चांगले राहण्यामध्ये काही अंशी आरोग्य विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका दिसून आली.
३) देशभरात एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची व्याप्ती व कार्य विस्तारात वाढ होणे काळाची गरज बनली आहे.
४) संबंध राज्य व देशातील आरोग्य व इतर क्षेत्रात विविध योजना व अभियानाच्या यशस्वितेत लोकप्रशासनाची मोलाची भूमिका पहायला मिळते.
५) आरोग्याशी निगडित योजना व उपक्रमाविषयी व्यापक प्रसार व प्रचार झाला पाहिजे.

**संदर्भ सूची**

१) सामाजिक कल्याण प्रशासन - प्रा.लक्ष्मण कोत्तापल्ले, विद्या प्रकाशन, औरंगाबाद
२) विकास प्रकाशन - प्रीता जोशी, आरे.बी.एम.ए. पब्लिकेशन
३) उच्चस्तर लोक प्रशासन - डॉ.बी.एल. फाडिया, आग्रा प्रकाशन
४) समग्र लोकप्रशासन - प्रा.व्ही.बी. पाटील, के.सागर प्रकाशन, पुणे
५) योजना मासिक
६) लोकराज्य २०१६-१७
७) आरोग्य विद्या
८) विकीपिडिया
९) योजना व कुरूक्षेत्र मासिक

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# ग्रामीण विकासात RKVY योजनेची भूमिका

**प्रा. एस. सय्यद**
अर्थशास्त्र विभाग,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

**प्रस्तावना:**

१९७९ मध्ये थिओडोर शुल्झ यास विकासात्मक अर्थशास्त्रासाठी नोबेल पारितोषिक मिळाले. विकासाचा महत्त्वाचा पाया म्हणून सर्वप्रथम त्याने कृषी क्षेत्राच्या महत्त्वाची जाणीव करुन दिली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या Food and Agricultural Organization च्या अहवालानुसार फळे, दूध, चहा, मसाले, ज्युट, ताजे मांस उत्पादन करणारा भारत अव्वल देश आहे. गहू आणि तांदूळ उत्पादनात भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास केल्यास कृषी क्षेत्र हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र ठरलेले आहे. भारताच्या जीडीपी मध्ये कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा २०१६-१७ मध्ये १५.२ टक्के होता. तसेच रोजगार निर्मितीचा विचार केल्यास कृषी व संलग्न क्षेत्र ४८.९ टक्के कार्यकारी लोकसंख्येला रोजगार पुरविते. ही लोकसंख्या सर्वाधिक ग्रामीण भागातील आहे.

**उद्दिष्टये :**

- RKVY या योजनेची ग्रामीण भागातील भूमिका अभ्यासणे.
- RKVY या योजनेचा आढावा घेणे.

**तथ्य संकलन :** प्रस्तुत प्रबंध द्वितीयक माहितीवर आधारित आहे. त्यामध्ये मासिक, वार्षिक व वर्तमानपत्रे तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील कृषी उत्पादन वाढ करण्यासाठी सध्या कार्यरत असलेल्या काही प्रमुख योजनांचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**अ) राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY- Rashtrya Krishi Vikas Yojana):**

११ व्या पंचवार्षिक योजनेतील ४ टक्के कृषी वृध्दीधर प्राप्त करण्यासाठी कृषी व संलग्न क्षेत्रातील उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने २००७ पासून १०० टक्के केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजना सुरु करण्यात आली आहे.

**उद्देश :**

कृषी क्षेत्रासाठी सधन नियोजन आखणे, कृषी आणि पर्यावरण, नैसर्गिक स्त्रोतांचे प्रश्न, तंत्रज्ञान इत्यादी विचारात घेऊन कृषी क्षेत्रासाठी सधन नियोजन आखणे व पशुधन, कुक्कूटपालन आणि मासेमारीचा त्यात समावेश करणे या उद्देशाने ही योजना सुरु झाली.

राज्यांनी स्वत:चे राज्य कृषी आराखडे व जिल्ह्यांसाठी जिल्हा कृषी आराखडे तयार करुन या निधीचा वापर करुन विकेंद्रीत नियोजनाचा आराखडा राबविणे अपेक्षित आहे. इतर कृषी योजनांसाठी अपुरी पडणारी आर्थिक मदत देखील या योजनेअतर्गत केली जाते.

**योजनेवरील खर्च :**

केंद्र राज्यांना देत असलेली १०० टक्के मदत ही उत्पादन वाढीसाठी ३५ टक्के, पायाभूत संरचनेसाठी ३५ टक्के, विशेष क्षेत्रीय योजनांसाठी २० टकके आणि लवचिकता निधी म्हणून १० टक्के अशी विभागून दिली जाते.

११ व्या योजना काळात RKVY साठी २५,००० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले. राज्य कृषी आराखडयानुरुप २२,४०८ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आणि त्यातील २२,३२५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. १२ व्या योजना काळात ३१,५४७ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले. त्यापैकी २७,०२६ कोटी रुपयांचा वापर झालेला होता.

**RKVY योजनेंतर्गत पुढील उपयोजना राबविल्या जात आहेत:**

I. पूर्व भारतात हरितक्रांती <BGREI इ Bringing Green Revolituon to Eastern India> - आसाम, पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार, झारखंड, उत्तरप्रदेशाचा पूर्व भाग आणि छत्तीसगड मधील तांदूळ आधारित पीक यंत्रणेत सुधारणा करण्याचे लक्ष्य यात ठेवले आहे.

II. कडधान्ये उत्पादन करणाऱ्या ६०,००० खेडयांचा एकात्मिक विकास- पर्जन्यश्रयी प्रदेशातील ६०,००० खेडयांमधील शेतकऱ्यांना प्रोत्साहित करुन कडधान्यांच्या उत्पादनाला चालना देण्याचे या उपयोजनेचे लक्ष्य आहे.

III. पामतेल उत्पादन क्षेत्र विकास कार्यक्रम.

IV. शहरी भागांसाठी भाजीपाला उत्पादन क्षेत्रे,
V. बाजरी / भरड उत्पादन व पोषण,
VI. प्रथित पोषणाचा राष्ट्रीय कार्यक्रम,
VII. वर्धित पशुखाद्य विकास कार्यक्रम,
VIII. पर्जन्याश्रयी क्षेत्र विकास कार्यक्रम,
IX. विदर्भ प्रबलित सिंचन विकास कार्यक्रम,
X. केशर अभियान,
XI. पीक विविधीकरण योजना,
XII. खूर आणि मुखरोग नियंत्रण कार्यक्रम.

**समारोप :**

वरील योजनांमुळे ग्रामीण विकासाला अंशीक स्वरुपात हातभार लागला आहे. यामुळे ग्रामीण विकासात सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. किरण देसले, अर्थशास्त्र, दीपस्तंभ स्पर्धा परिक्षा
२. रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था.
३. डॉ. वसुधा पुरोहित, कृषी अर्थशास्त्र.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# महिला शेतमजूर- सामाजिक समस्या एक दृष्टीक्षेप

**प्रा. मोहंमद हनिफ इस्माईलसाब शेख**
सहयोगी प्राध्यापक लोकप्रशासन विभाग,
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि. लातूर

**प्रस्तावना:**

भारतात ग्रामीण भागातील महिलांना विशेषतः मोठया प्रमाणावर काम करावे लागते. शेवटच्या दोन दशकात कामगारांचे प्रमाण वाढत गेले आहे. महिला ह्या प्रासंगिक कामगार सुध्दा आहेत. सध्या महिला व पुरुष कामगार वर्ग हे खेडयात काम करतात.

महिला शेतमजूर ह्या असंघटीत असल्या तरी महिलांचे अर्थव्यवस्थेतील योगदान हे मौल्यवान ठरते. भारतीय राज्यघटनेतील कलम ३९ (ड) नमुद करते की, समान कामाबद्दल, समान वेतन महिला व पुरुषांना दिले जावे. एकूणच महिलांची देशातील संख्या ही अंदाजे ४.९५.७४ मिलीयन इतकी २००१ च्या शिरगणतीप्रमाणे आहे आणि देशाच्या लोकसंख्येच्या ४८.३७ टक्के आहे.

भारतामध्ये महिला शेतमजुरांची शक्ती ही काम करण्यायोग्य वयातील लोकसंख्येचा एक भाग आहे. ज्यांची खुले आम पिळवणूक करता येते. महिला शेतमजुरांपैकी बहुसंख्य महिला शेतमजुर या असंघटीत क्षेत्रात कमी वेतनावर काम करीत असतात आणि त्यांच्या कौशल्याची पातळी देखील कमी असते. महिला शेतमजुराच्या वाढीचा वार्षिक दर हा थोडासा कमी झाला असला तरी रोजगार करणाऱ्या सुशिक्षित महिलांची वार्षिक दरवाढ अधिक आहे. शेती क्षेत्रात काम करण्याचा एक स्वतंत्र कक्ष १९७५ साली स्थापन केला गेला. आजही मंत्रालयामध्ये महिला शेतमजुरांच्या प्रश्नाकडे लक्ष ठेवण्याकरिता कार्य करते.

आपल्या वार्षिक अहवालामध्ये जागतिक बँकेने १९८९ मध्ये सर्वेक्षण केले की, दारिद्रय रेषेखालील ३५ टक्के कुटुंबाची धुरा मलि संभाळतात. बऱ्याच बाबतीत महिला उत्पादनावर अवलंबून राहतात. गरीब कुटुंब हे महिलांच्या आर्थिक उत्पन्नावर आधारित आहे. म्हणून महिलांच्या बिकट परिस्थिती सुधारणा करण्यावर भर दिला पाहिजे.

**संशोधनाची उद्दिष्टये:**

१. भारतीय महिला शेतमजूरांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेणे.
२. भारतीय महिला शेतमजूरांचे स्वरुप अभ्यासणे.
३. भारतीय महिला शेतमजूरांचे विकासातील योगदान तपासणे.
४. भारतीय महिला शेतमजूरांच्या सामाजिक समस्यांचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. भारतीय महिला शेतमजूरांचे शेती क्षेत्रात अद्वातीय असे योगदान आहे.
२. भारतीय महिला शेतमजूरांचे स्वरुप असंघटीत आहे.
३. भारतीय महिला शेतमजूरांच्या अनेक सामाजिक समस्या दिसून येत आहेत.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत लघुशोध निंबधासाठी वर्णानात्मक व विवरणात्मक सामाजिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्राथमिक व द्वितीय तथ्यांच्या आधारे संशोधन करण्यात आले आहे.

**महिला शेतमजुरांची स्थिती :**

गेल्या काही दशकात महिलांचे योगदान बऱ्याच देशात वाढलेले आहे. जागतिक स्तरावर रोज बदल होत आहे. त्यामुळे कालचे प्रश्न सोबत घेवून वाटचाल करावी लागत आहे. त्यात महिलांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला ह्या आघाडीवर आहेत.

कमी साक्षरतेच्या महिला शेतमजूरांची परिस्थिती वाईट झालेली आहे. महिला शेतमजुरांच्या निरक्षरतेचे प्रमाण १९७.३ अब्ज आहे तर पुरुषांमध्ये हे प्रमाण १२६.७ अब्ज आहे. लिंगप्रमाणामध्ये ही फरक आहे तो म्हणजे ४२ हजार पुरुषांमध्ये ९२२ स्त्रिया तर १९८१ ते १९९१ या कालावधीत पुरुष व स्त्री लोकसंख्या मधील फरक ९ लाखापासून ३१ लाखापर्यंत वाढलेला आहे.

महिला मजुरांच्या सहभागामधील समस्येशी म्हणजे शेतीतील आधुनिक पध्दतीतील शोध ज्याचा परिणाम महिला शेतमजूरांचे प्रमाण आणि त्यांना मिळणाऱ्या कामावर झाला आहे. याचबरोबर नवीन शेती तंत्रज्ञानामुळे कामाची प्रांसगिकता वाढलेली नाही. महिलांना उत्पादन क्षम काम मिळणे हा असंघटीत महिला शेतमजूरांचा प्रश्न आहे. त्यांना सामुदायिक स्वरुपाच्या कामात चांगली संधी मिळू शकते.

**महिला शेतमजुरांची वैशिष्टये :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेत काम करणारी महिला शेतमजुर ही दुर्बल व निम्न स्तरावरील घटक आहे. ही महिला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी, दारिद्य व असाह्ययतेमुळे ती शेती व्यवसायात काम करते. महिला शेतमजुरांची परिस्थिती उंचावण्यासाठी कोणते वास्तविक धोरणे राबविली जावे ही जाणून घेणे महत्त्वाचे आहे. महिला शेतमजुरांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे -

१. ग्रामीण महिला शेतमजुर ह्या अकुशल व शहरापासून दूर आहेत.
२. महिला शेतमजुरांची संख्या वाढत असली तरी त्यांच्याकडे कुशलता व कौशल्य नाही.
३. महिला शेतमजुरांच्या मागणी नुसार पुरवठा कमी आहे. शेतमजुरांना फक्त पेरणी व मळणीच्या काळात मोठया प्रमाणात काम मिळते. परंतु त्यानंतरच्या काळात ते श्रमहिन असतात.
४. भारतातील काही भागात महिला शेतमजुर हे स्थलांरीत स्वरुपात दिसून येतात. त्या रोजगाराच्या शोधात विशेषत: पेरणी व मळणीच्या काळात स्थलांतर करतात.
५. महिला शेतमजुर ह्या विखुरलेल्या स्वरुपात आहेत. यामुळे संघटनेचा अभाव आहे. शेती व्यवसायातील अत्याधुनिक माहितीच्या बाबतीत त्या अज्ञानी आहेत.
६. शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला शेतमजूरांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे. शेती व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत त्या अज्ञानी आहेत.
७. इतर सर्व व्यवसायापेक्षा शेती व्यवसायात काम करणाऱ्या एकूण मजुरांत महिला शेतमजुरांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.
८. शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला व पुरुषांच्या वेतनात भिन्नता आहे. समान काम करूनही महिलांना कमी वेतन दिले जाते.

**महिला शेतमजूरांच्या सामाजिक समस्या :** भारतातील महिला शेतमजुरांच्या सामाजिक समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) आर्थिक हालाखीची स्थिती-**

महिला शेतमजूरांना मिळणारा रोजगार अनियमित व अपूर्ण आहे. यामुळे त्यांचे उत्पन्न कमी आहे. दैनंदिन उपभोग खर्च पूर्ण करण्यासाठी सावकार वर्गाकडून कर्ज घ्यावे लागते. दारिद्र्य आणि कर्जाच्या दुष्टचक्रात हा वर्ग अडकून बसलेला आहे. परिणामी त्यांच्याकडून विघातक कृत्याचा अवलंब केला जातो. दुसऱ्या नियोजन मंडळाच्या मते, या वर्गाचा प्रश्न हा भारताच्या शेती अर्थव्यवस्थेतील चिघळलेली जखम आहे. दारिद्र्यात अडकलेली ही कुटुंबे अत्यंत असहाय्य जीवन जगतात.

**२) जीवनामध्ये अनिश्चितता-**

महिला शेतमजूरांचे जीवन अनिश्चित आहे कारण कुटुंबात असलेली व्सनाधिनता यामुळे संपूर्ण कुटुंबाचा भार महिलांनाच उचलावा लागतो. त्यातही त्यांना अपूर्ण रोजगारामूळे मर्यादित उत्पन्न मिळते. तिला गरजा पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे तिला जगणे कठीण झाले आहे.

**३) आर्थिक शोषण-**

महिला शेतमजूर ही रुढी, पंरपरा व चालीरिती यामध्ये गुर फटलेली आहे. ग्रामीण समाजव्यवस्था व कुटुंब यामध्ये त्यांना देण्यात येणारे स्थान दुय्यम आहे. अर्थार्जनातही तिची भूमिका दुय्यम स्वरुपाची आहे. कुटुंब आणि शेती अशी दुहेरी भूमिका पार पाडताना तिला १० ते १२ तास काम करावे लागते. याचा विपरित परिणाम तिच्या आरोग्यावर झ ाला आहे. काम करण्याच्या ठिकाणी कामाचे तास व वेतनाबाबतीत तिची पिळवणूक होत आहे. कमी वेतन कुटुबातील जबाबदाऱ्या, आरोग्यावरील विघातक परिणाम यामुळे स्त्रीचे आर्थिक शोषण होत आहे.

**४) राहणीमानाचा निकृष्ट दर्जा-**

महिला शेतमजूरांना मिळणाऱ्या अल्प उत्पन्नात त्यांच्या जीवनाश्यक गरजा पूर्ण होत नाही. त्यामुळे त्यांचा आहार निकृष्ट दिसून येतो. महिला शेतमजूरांच्या घरामध्ये अत्याधुनिक सोयी-सुविधांचा अभाव असलेला दिसून येतो. त्यांचे राहणीमान अत्यंत साधे असून मुलांच्या शैक्षणिक गरजांकडे दुर्लक्ष केले जाते.

**५) महिला शेतमजूरांच्या संघटनेचा अभाव-**

महिला शेतमजूरांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांच्यात असंघटीतपणा दिसून येतो. संघटीत क्षेत्रातील श्रमिक संघटीत एकत्र येऊन आपले हक्क आणि अधिकारासाठी मागणी करतात परंतु असंघटीत क्षेत्रातील महिला शेतमजूरांच्या संघटना निर्माण करताना अनेक अडचणी येतात.

**६) निरक्षरता-**

महिला शेतमजूरांमध्ये निरक्षरता सर्वाधिक आहे त्यामुळे त्यांच्यात कौशल्याचा अभाव दिसून येतो. शेतीमध्ये अत्याधुनिक तंत्राचा त्यांना वापर करता येत नाही. थोडक्यात निरक्षरता आणि अज्ञान यामुळे ती परावलंबी जीवन जगताना दिसून येते.

**७) समाजातील दुय्यम वागणूक-**

अनेक वर्षापासून महिला शेतमजूरांना हीन वागणूक देण्यात येते. त्यातही अनुसचित जाती-जमातीच्या स्त्रियांचे प्रमाण जास्त असते अशा महिलांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने त्यांना दारिद्र्य रेषेखाली जीवन जगावे लागते.

**८) सामाजिक चालीरिती-**

ग्रामीण भागातील महिला शेतमजूर ह्या रुढी परंपरा चालीरिती यात गुंतलेल्या दिसून येतात. धार्मिक विधी चालीरिती, अंधश्रध्दाळूपणा याचा पगडा त्यांच्यावर असलेला दिसून येतो.

**निष्कर्ष / सारांश:**

सारांश रुपामध्ये भारतीय महिला शेतमजूरांना आपल्या सामाजिक, आर्थिक समस्या दूर करण्यासाठी काही उपाय योजना कराव्या लागतील यामध्ये ग्रामीण भागातील महिला शेतमजूरांच्या कुटुंबांमये व्यसनाचे प्रमाण अधिक असल्यामूळे कुटुंबातील अशा सदस्यांचे समुपदेशन करून शेवटी अटोक्यात येत नसतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. महिला शेतमजूरांच्या हलाखीचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे व त्यांच्या मुलांचे अल्प शिक्षणाचे प्रमाण त्यामुळे त्यांच्या शिक्षणासाठी वेगळी विशेष सुविधा करण्यात यावी ज्यामुळे त्यांना शिक्षण घेणे आवडेल. महिला शेतमजूरांमध्ये मुलींची संख्या अधिक असल्यामुळे ग्रामीण भागातील मुलींना व त्यांच्या कुटुंबाना त्यांच्या शिक्षणासाठी प्रेरणा द्यावी, त्यांचे मार्गदर्शन करून त्यांच्या सोयीसाठी काही सरकारी योजना निर्माण करावी. ग्रामीण भागात महिला शेतमजूरांना मागणी मोठया प्रमाणात असते परंतु ती मागणी काही काळात किंवा विशिष्ट हंगामातच असते त्यामुळे महिला शेतमजूरांचा पुरवठा अपुरा पडतो त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक पध्दतीमध्ये व पीकांच्या लागवडीमध्ये अंतर ठेवावे. महिला शेतमजूर या शहरातील महिला मजूरांप्रमाणे संघटीत नाहीत त्यामुळे ग्रामीण भागातील महिला शेतमजूरांनी एकत्रित येऊन किमान तालुकाक्षेत्रापुरते तरी संघटना निर्माण करावी ज्यामुळे निश्चित मजूरी प्राप्त होण्यास मदत होईल. ग्रामीण भागातील महिला शेतमजूर या अनेकदा कामा निमित्त स्थलांतरीत होताना दिसतात त्यांमुळे शासनाने व मोठया शेतकऱ्यांनी हे स्थलांतर होणार नाही या साठी रोजगाराची संधी गावातच निर्माण करावी. ग्रामीण भागात महिला शेतमजुरांना मिळणाऱ्या मजूरी दरामध्ये विभिन्नता आहे. त्यामुळे ही विभिन्नता दूर करून सर्वत्र एक सारखा मजुरी दर निश्चित करावा ज्यामुळे त्यांचा व शेतकऱ्यांचा फायदा होईल. ग्रामीण भागात महिला व पुरुष यांच्यात शासनाचा सामन मजुरी दर असतानाही महिला समान कामासाठी मात्र मजूरी सरासपणे कमी देण्यात येते. यासाठी यासाठी ही असमानता कमी करावी याबाबत योग्य तो कठोर कायदा करावा.

**संदर्भ ग्रंथसूची:**


१. साथम कौर आणि एस.के.गोयल, 'स्त्री शेती कामगार भारतीय शेती अर्थव्यवस्था मासिक' खंड XVI (१६) क्र.३ जुलै - सप्टेंबर १९४७

२. सत्यसुंदरम (१९९६) "त्रिपाठीमधील असंघटित स्त्री कामगारांची भरभराट (प्रकाशित) भारतातील असंघटित स्त्रियांचे काम " नवी दिल्ली डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस

३. गियान कौर (१९९४) "ग्रामीण पंजाबमधील स्त्री शेती कामगारांचा स्वयंरोजगार आणि पगार" भारतीय शेती अर्थशास्त्राचे मासिक खंड XVI - १६

४. सविता एस.जोशी (१९९५) "मुलभूत पातळीवरील स्त्री कामगार - एक सामाजिक अभ्यास" नवी दिल्ली आशिष पब्लिशिंग हाऊस

५. सत्यसुंदरम (१९९६) "त्रिपाठीमधील असंघटित स्त्री कामगारांची भरभराट (प्रकाशित) भारतातील असंघटित स्त्रियांचे काम " नवी दिल्ली डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस

६. त्रिपाठी एस.एम.आणि पटनाईक पी.के. (१९९६) "भारतातील असंघटित कृष्णसाद गटातील स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक विकास" नवी दिल्ली डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस

# ग्रामीण विकासातील महिला नेतृत्व - एक अभ्यास

**अलका विठ्ठल शिंदे**
संशोधन विद्यार्थिनी (लोकप्रशासन)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्राचीन काळापासून ते आजपर्यंतचा जर विचार केला तर सर्व सजीव सृष्टीमध्ये मानव हा सर्वाधिक बुध्दिमान प्राणी म्हणून ओळखला जातो. आणि याच बुध्दिमत्तेच्या आधारे मानवाने स्वतःची व समाजाची वेगाने प्रगती घडवून आणली आहे. या मानवजातीमध्ये दोन महत्त्वाचे घटक आपल्याला सांगता येतात एक म्हणजे पुरूष आणि दुसरा म्हणजे स्त्री म्हणूनच ज्याप्रमाणे समाजाच्या या विकासात जेवढे श्रेय हे पुरूषाचे आहे तेवढेच श्रेय हे स्त्रीचे सुध्दा आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्र आपल्या देशातील स्त्री-पुरूषाच्या विकासातूनच देशाचा सर्वांगीण विकास करू शकते. म्हणून राष्ट्राच्या विकासामध्ये महिलांच्याही विकासाचे स्थान विचारात घ्यावे लागते. अलिकडे महिलांचा दर्जा, सुधारण्याच्या उद्देशाने केंद्रस्तरापासून ते ग्रामीण स्तरापर्यंत महिला विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. आज राजकीय क्षेत्रात महिला खासदार, आमदार, महापौर, सचिव, सरपंच, सभापती इ. अनेक पदे भूषवित असल्या तरी त्यांच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी सक्षम अशा महिला नेतृत्वाची गरज आहे. तसेच सद्यस्थितीत महिला नेतृत्व प्रशासनातही मोठ्या प्रमाणात स्थान मिळवत आहे उदा. जिल्हाधिकारी, तहसिलदार, तलाठी, गटविकास अधिकारी इ. अशाप्रकारे कार्यरत महिला नेतृत्वाचे वर्चस्व दिसते.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर स्थापन झालेल्या पहिल्या लोकसभेतील महिला प्रतिनिधित्वाचे प्रमाण ४.४ टक्के होते. मात्र १९७० च्या दशकात लोकसभेत महिला प्रतिनिधित्व घटले. परंतु पुढे अनेक महिला आघाड्याचा उदय झाला. ऑल इंडिया डेमॉक्रेटिक विमेन्स असोसिएशन, शेतकरी संघटनेतील महिला आघाडी, कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडिया आघाडी इत्यादीचा उदय झाला आणि त्यामुळे १९८० नंतर लोकसभा सदस्यांमध्ये महिलांचे प्रमाण वाढण्यास मदत झाली.

भारतात १९९३ साली ७३ वी व ७४ वी घटना दुरूस्तीमुळे स्थानिक स्वाराज्य संस्थांनामध्ये स्त्रियांना प्रतिनिधित्वाचा अधिकार उपलब्ध झाला. यामुळे महिला नेतृत्वाचा राजकीय विकास झाल्याचा दिसून येतो. ग्रामीण भागातील महिलांची स्थिती पहिली तर असे लक्षात येते की, पूर्वी या महिलांना उंबरठ्याच्या बाहेर पडण्यास परवानगी नव्हती पण आता याच महिला सरपंच, सभापती अशा भूमिका पार पाडण्यास सक्षम झाल्या आहेत. हे सर्व महिला नेतृत्वाच्या विकासामुळे शक्य झालेले दिसून येते.

**महिला नेतृत्व विकासाचे उद्देश :-**

- ग्रामीण भागातील महिलांचा दर्जा सुधारणे
- ग्रामीण भागातील स्त्री-पुरूष असमानता नष्ट करून स्त्री-पुरूष समानता निर्माण करणे.
- ग्रामीण भागातील महिलांना ग्रामीण विकासाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- ग्रामीण भागातील महिलांमध्ये राजकीय, सामाजिक व आर्थिक सबलीकरणाची जाणीव निर्माण करणे.

**ग्रामीण विकासात महिला नेतृत्वाची गरज :-**

महिला नेतृत्वाची संकल्पना व्यापक असल्यामुळे तिचा अर्थ सांगणे कठिण आहे. तरी असे म्हणता येईल की, "महिलेला सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून निर्णय प्रक्रियेत सामील करून घेणे म्हणजे महिला नेतृत्व होय."

स्त्री ही कुटुंब विकासाचा महत्वाचा पाया असते. कारण कुटुंबाची प्रगती ही पुरूषापेक्षा स्त्रीवर अधिक प्रमाणात अवलंबून असते. म्हणूनच कुटुंबाच्या विकासातून समाजाचा विकास व समाजाच्या विकासातून गावचा विकास अशी संकल्पना तयार होते. यामुळे ग्रामीण समस्या काय असतात व त्या कशा सोडविल्या पाहिजेत याचे सुक्ष्म निरीक्षण पुरूषापेक्षा स्त्री चांगल्या प्रकारे करू शकते. म्हणून ग्रामीण विकासात महिलांना नेतृत्वाची संधी देणे ही काळाची गरज आहे. यातून ग्रामीण महिलांचेही सबलीकरन होईल व गावाचाही विकास साध्य होईल.

**ग्रामीण विकासात महिला नेतृत्व निर्मितीतील अडथळा :-**

- ग्रामीण महिलांमध्ये शिक्षणाचा अभाव असतो. त्यामुळे राजकीय, प्रशासकीय नेतृत्व या संकल्पनेपासून ती अलिप्त असते.
- महिलांविषयी समाजाचा संकुचित दृष्टिकोन, पुरूष प्रधान संस्कृती
- स्त्री स्वातंत्र्याचा अभाव, अज्ञान, दारिद्र्य, गलिच्छ जात-पातीचे राजकारण
- ग्रामीण महिलांना आर्थिक सहकार्यात मर्यादा असणे.
- ग्रामीण विकास योजना, कार्यक्रमाबाबत जागरूकता नसणे.

**संशोधनाची उद्दिष्ट्चे :-**

- ग्रामीण विकासात महिलांना लाभलेले नेतृत्व यांचा अभ्यास करणे.
- ग्रामीण विकासात महिला नेतृत्वाचे महत्त्व जाणून घेणे.
- ग्रामीण विकासात महिला नेतृत्वाच्या मार्गात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

- शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील महिलांच्या नेतृत्वाच्या विकासाची गती मंद आहे.
- ग्रामीण विकासात महिलांना अपेक्षेप्रमाणे नेतृत्वाची संधी मिळत नाही.

**शिफारशी :-**

- ग्रामीण भागाचा परिपूर्ण विकास व ग्रामीण महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात महिला नेतृत्वास संधी देण्यासाठी प्रयत्न करणे.
- ग्रामीण समाज व समाजातील महिला यांना राजकीय व प्रशासकीय नेतृत्वासंबंधी शिक्षण देणे

**सारांश :-**

राज्याची कल्याणकारी संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी, देशाचा सर्वांगीण विकास साधने गरजेचे आहे. आणि यासाठी प्रथमतः ग्रामीण भाग व महिला या दोन घटकांचा विकास करणे आवश्यक आहे. म्हणूनच ग्रामीण विकास साधण्यासाठी, ग्रामीण विकासाच्या नेतृत्वाची दोरी महिलांच्या हाती देणेच योग्य राहिल. त्यातून ग्रामीण विकासालाही योग्य दिशा मिळेल व महिलांचाही दर्जा सुधारण्यास, महिलांना सक्षम बनवण्यास मदत मिळेल. महिला नेतृत्वामुळे शासकीय धेय्यधोरणात महिलांचा सहभाग वाढून ग्रामीण भागाचा विकास साध्य होईल. आणि यामुळे शासनाच्या धोरणांना यश प्राप्त होईल.

**संदर्भ साहित्य :-**

१. प्रा. व्ही. बी. पाटील - महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था.
२. डॉ. व्ही.एल. जरादे, डॉ. विद्या राऊत - भारतीय राजकारण व शासन
३. सुवर्णा दामले - लोकसत्ता चतुरंग, महिला आरक्षण सत्तेच्या सोंगट्या (६ जाने. २०१८)
४. डॉ. संजय तिवारी, डॉ. शैलप्रभा कोष्टा - ग्रामीण विकास

# देशाच्या सर्वांगिण विकासात ग्रामीण विकासाचे महत्त्व

**प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे**
संशोधन मार्गदर्शक,सहयोगी
प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी (४३१ ५१६)

**प्रस्तावना (Introduction) :-**

भारतीय खेड्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे ही महात्मा गांधीजीची संकल्पना होती. गांधीजीचे जीवन खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासासाठी होते. खरा भारत खेड्यात राहतो आणि जोपर्यंत खेडे विकसीत होणार नाहीत तो पर्यंत देशाच्या सर्व समावेशक विकास होणार नाही. खेड्यातील लोकांच्या एकंदरीत जीवनपद्धतीचा विचार करुन जुलै १९३६ मध्ये 'हरिजन' या वृत्तात महात्मा गांधीने 'खेड्याचा नाश तर भारताचा नाश आहे' असे लिहिले होते. महात्मा गांधीच्या ग्राम विकासाच्या व्यूहरचनेत आदर्श ग्रामची कल्पना होती. सद्यस्थितीत 'ग्रामीण विकास' हा अत्याधिक चर्चेचा विषय आहे आणि सामाजिक उन्नतीच्या वाटचालीत येणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण घटकांशी संबंधीत आहे.

आजही भारतात ६५ % लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. शहरी भागात जसा मोठ्या प्रमाणात विकास झाला त्या पद्धतीने ग्रामीण भागाचा झालेला नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला हा दिलेला संदेश विसरुन शहराकडे चला हा मंत्र सर्वत्र दिसत आहे. शिक्षणासाठी खेड्यातून शहराकडे आलेली पिढी उच्च शिक्षण घेतल्यानंतर खेड्याकडे पाठ फिरवताना दिसते. याचा परिणाम ग्रामीण विकासावर झाल्याचे दिसून येतो.

ग्रामीण विकासाची दिशा ठरवितांना गावामध्ये रोजगार निर्मिती झाली पाहिजे. खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. राष्ट्रबांधणी व राष्ट्रविकास हा ग्रामीण विकासावरच अवलंबून आहे. तरीही शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही. केंद्र व राज्य शासनामार्फत ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध मार्गाने प्रयत्न होत आहेत. जगातील बहुतेक सर्वच विकसीत देशांनी आपल्या देशातील ग्रामीण भागाच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. भारत हा विकसनशील देश असल्यामुळे विकसीत होण्यासाठी ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय पर्याय नाही. ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावेले, त्यांना उत्तम दर्जा प्राप्त करुन देणे, पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे असते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सुरुवात झाली. प्राथमिक शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण विकास, पर्यावरण विकास व पोषण, प्रौढ शिक्षण, ग्रामीण ऊर्जा, ग्रामीण स्वच्छता इत्यादी घटकांचा विकास करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. फार प्राचीन काळापासून भारतीय जीवनाचे खेडे हे प्रमुख केंद्र आहे. यामुळे ग्रामीण भागाच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले जाते.

**संशोधनाचे उद्देश :-** संशोधनाचे उद्देश खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

१. ग्रामीण विकासाची संकल्पना स्पष्ट करणे.
२. ग्रामीण विकासाचे महत्त्व स्पष्ट करणे.
३. ग्रामीण भागातील समस्यांचा अभ्यास करणे.
४. त्यावर उपाय सूचविणे.
५. निष्कर्ष काढणे.

**संशोधनाची गृहितके :-** सदर संशोधनाची गृहितके खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

१. आजही ६५ % जनता ग्रामीण भागात राहते.
२. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.
३. शहरी भागाकडे लोंढा दिवसेंदिवस वाढत आहे.
४. खेडी ओस पडत आहे.
५. खेड्यांचा विकास म्हणावा तेवढा झालेला नाही.

**अभ्यास पद्धती :-**

सदर शोध निबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख, मासिके, इंटरनेट इ. चा वापर करुन निश्चित उद्देशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**ग्रामीण विकास ( Rural Development) :-**

औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिक समाजाची निर्मिती झाली आणि त्याचा परिणाम औद्योगिक क्षेत्रातील लोकवसाहतीला शहरीकरणाचे स्वरुप प्राप्त झाले. त्यातून शहरी व ग्रामीण समाज असे विभाजन झाले. विकासाच्या संकल्पनेत देशाची किंवा समाजाची सर्वांगिण प्रगती करण्यासाठी ग्रामीण विकास केंद्र बिंदू मानणे अभिप्रेत असते. मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य इ. बाबींचा विकास अपेक्षित आहे.

**ग्रामीण विकासाची व्याख्या :-**

"ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण क्षेत्रात कृषी, मत्स्यपालन, ग्रामीण उद्योग किंवा हस्त कौशल्य तसेच सामाजिक व आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी उपलब्ध भौतिक व मानवीय साधनांचा पूर्णपणे उपयोग करुन ग्रामीण जनतेचा जीवनस्तर उंचावण्यासाठी स्विकारली गेलेली व्यूहरचना, धोरणे यांचा समन्वय होय."

- अंकर डेस्मंड

"ग्रामीण विकास एक पद्धत आहे. ज्या अंतर्गत सामुहिक प्रयत्नांचे शहराच्या बाहेर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणात तसेच आत्मज्ञानामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केला जातो."

ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी कृषी, ग्रामीण उद्योग, शिक्षण, सेवा या प्रमुख घटकांचा समावेश होतो.

**ग्रामीण विकासाचे प्रमुख घटक**




**ग्रामीण विकासाचे उद्देश :-** ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्देश खालील प्रमाणे आहेत.

- ग्रामीण भागाला आत्मनिर्भर बनविणे.
- ग्रामीण भागात कृषी व उद्योग या दोन्हीच्या उत्पादकतेबरोबर एकूण उत्पादनात वाढ करणे.
- ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे. उदा. मनरेगा
- नि:स्वार्थी प्रवृत्तीत वाढ करणे.
- ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न वाढविणे.
- पाणी, माती, हवा, जंगल इत्यादी नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करणे.
- ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविणे.
- ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध प्रकारच्या सेवा सुविधा पुरविणे.

**ग्रामीण विकासाचे महत्त्व (Significance of Rural Development) :-**

भारत हा खेड्याचा देश असून येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या जास्त असल्यामुळे ग्रामीण भागात दारिद्र्य, बेकारी, राहणीमानाचा खालावलेला दर्जा, गरीबी इत्यादी समस्या दिसून येतात. ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास झाला तरच देशाचा सर्वांगिण विकास होईल म्हणून देशाच्या आर्थिक विकासात ग्रामीण विकासाचे महत्त्व अधिक असल्याचे दिसून येते.

**१. पायाभूत सोयी -सूविधा :-**

देशात शेती व उद्योग या क्षेत्रांच्या विकासासाठी पायाभूत सुविधांची गरज असते. ग्रामीण भागात समाजाची आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी पायाभूत सोयी - सुविधेला ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागात पायाभूत सोयी - सुविधा मोठ्या, प्रमाणात उपलब्ध करुन दिल्यास ग्रामीण भागाचा सामाजिक, आर्थिक विकास घडून येण्यासाठी मदत होते. पायाभूत सुविधेत शिक्षण, पाणी, आरोग्य, रस्ते, वाहतूक व दळनवळण, बाजारपेठ, बँक, दूरसंचार, इंटरनेट, मोबाईल, फ्रीज, इत्यादी सुविधांचा समावेश होतो. खेड्यांना मुख्यरस्त्याशी जोडणारे रस्तेनाहीत. वीज नाही, पाणी नाही.

**२. ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन :-**

ग्रामीण विकासाची फलनिष्पती ग्रामीण क्षेत्रात विकासासंबंधी गती वाढविण्यासाठी लागली आहे. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्यातील लोकांना उत्पादन कार्यात सहभागी करुन घेण्यात येत आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांना विविध सुविधा पुरविण्याचे

काम मोठ्या प्रमाणात केले जात आहे. रोजगारांच्या सधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. त्याचा परिणाम ग्रामीण दारिद्र्याच्या प्रमाणात घट होत आहे.

**३. कृषी विकास :-**

शेती हा ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. ही शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कधी कमी पावसाने तर कधी जास्त पावसाने कोणत्यांना कोणत्या भागात दुष्काळ पडलेला पाहावयास मिळतो. ग्रामीण भागात रोजगाराच्या पुरेशा संधी नाहीत त्यामुळे लोकसंख्येचा शेतीवरील ताण वाढत आहे. शेती ही उद्योगधंद्यासाठी कच्चा माल उपलब्ध करुन देते. शेती उत्पादन वाढल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. कापूस, ऊस, तेलबिया इत्यादी कृषीक्षेत्रातील उत्पादनामुळे अनेक मोठे उद्योग सुरु आहेत. हातमाग, तेल, तांदूळ पॉलिश करण्याचा उद्योग हे शेतीवरच अवलंबून आहेत. शेती उत्पादन वाढल्यास शेतकऱ्यांची खरेदी शक्ती वाढते. उद्योगांचा विकास होतो.

**४. राष्ट्रीय एकात्मतेत सहभाग :-**

ग्रामीण भागात विविध जाती - धर्माचे लोक एकत्रितपणे एकमेकांत मिसळून राहतात. ग्रामीण भागातील युवक, युवती, प्रौढ व महिला यांची देखील देशाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे देशाची एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचे योगदान मोठे आहे.

**५. बेरोजगारी निर्मूलन :-**

भारतात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी दिसून येते. ग्रामीण भागात आवश्यकतेपेक्षा जास्त लोक कृषीक्षेत्रावर अवलंबून आहेत. त्यामुळे कृषी क्षेत्रात छुपी, अर्धबेकारी दिसून येते. शासनामार्फत ग्रामीण कार्यक्रम चालविले जातात. उदा. मनरेगा, जवाहर रोजगार योजना इत्यादी.

**६. शिक्षण व व्यावसायिक शिक्षण :-**

ग्रामीण भागात शिक्षण व व्यावसायीक शिक्षण विस्तार होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील युवक, तरुणी यांचा व्यावसायिक शिक्षणाकडे कल पाहवयास मिळतो. इ. सन २०१५ पासून मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र इत्यादीमुळे व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**७. आर्थिक विषमता :-**

देशात आर्थिक विषमतेची खूप मोठी दरी आहे. ग्रामीण भागात जमीन असणाऱ्यांकडे खूप आहे आणि कांहीजणाकडे इंचभर देखील जमीन नाही. गरीबी आणि श्रीमंती खूप अंतर आहे. विषमता कमी करण्यासाठी शासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जातात.

**७. राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण :-**

सद्यस्थितीत देशातील २/३ लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांचे उपजिविकेचे साधन कृषी हेच आहे. परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता दिसून येते. त्यामुळे बेरोजगारीत वाढ झाली. यावर मात करण्यासाठी ग्रामीण भागात शेतकरी, बेरोजगार तरुणांना शेळीपालन, कुक्कूटपालन, वराहपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी अनेक व्यवसायांची निवड केलेली आहे. शेतीवरील ताण कमी झाल्यामुळे अनेक शेतकरी, बेरोजगार तरुणांना उत्पन्नाचे साधन मिळालेले आहे. या व्यवसायामुळे राष्ट्रीय उत्पन्नास मोठा हातभार लागत आहे.

**८. औद्योगिक विकासास मदत :-**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. कृषी उत्पादनामुळेच अन्नधान्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणात केला जातो. तसेच उद्योगांना लागणारा कच्चा मालही मोठ्या प्रमाणात पुरविला जातो. कापूस, ऊस, तेलबिया, दाळ इत्यादीवर मोठ्या प्रमाणात उद्योग सुरु असतात. उद्योगांच्या विकासात कृषी क्षेत्राचा फार मोठा वाटा आहे.

**९. परकीय चलनाची प्राप्ती :-**

देशाला आवश्यक असणारे तंत्रज्ञान, वस्तू व सेवा परकीय देशांकडून प्राप्त करुन घेण्यासाठी देशाची निर्यात वाढविणे आवश्यक असते. निर्यातीमुळे आपल्याला बहुमोल परकिय चलनाची प्राप्ती होते. साखर, अन्नधान्य, तंबाखू, तेलबिया, मसाल्याचे पदार्थ इत्यादीच्या निर्यातीद्वारे आपल्याला बहुमोल परकिय चलन प्राप्त होते.

**निष्कर्ष :-**

ग्रामीण विकास चांगल्याप्रकारे घडवून आणण्यासाठी खेड्यातील उद्योग धंद्यात वाढ, मूलभूत व प्रौढ शिक्षण, मागासवर्गाचा विकास, राष्ट्रीय भाषांचा विस्तार, मुलामुलींना शिक्षण, गावाची स्वच्छता इत्यादी गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. खेडे आदर्श बनविण्यासाठी खेड्यात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण इत्यादींच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागात लघु व कुटीरउद्योग सुरु केले पाहिजेत. ग्रामीण भागाच्या विकासाच्या हेतूने अनेक प्रकारच्या योजना व कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. प्रा. नानासाहेब पटनुरे व इतर : ग्रामीण अर्थशास्त्र, अरुणा प्रकाशन, लातूर.
२. गंगाधर कराळे : ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

# भारतीय ग्रामीण विकास व स्वरुप : एक अभ्यास

**प्रा.डॉ. उन्मेष मारोती शेकडे**
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद
ता.अहमदपूर जि. लातूर

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आज सत्तर वर्षापर्यंत भारतीय विवकासासाठी भारत सरकार प्रयत्न करीत आहे. यापूर्वी आपल्या देशात जवळपास एकशे पन्नास वर्षे इंग्रजांचे सरकार होते. त्यांनी देशात भौतिक विकासाच्या बाबतीत प्रयत्न केलेले आढळता. शिक्षण, रेल्वे व भौतिक जीवन हे कसे सुधारावे याबाबतीत निश्चितच त्यांनी प्रयत्न करण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्य संस्कृतीशी भारतीयांचा संबंध निश्चितपणाने या काळात आलेला दिसून येतो.

**उद्देश :**

१) भारतीय ग्रामविकासाचे स्वरुप लक्षात घेणे.
२) भारतीय ग्राम अर्थव्यवस्थेची नाडी लक्षात घेणे.
३) भारतीय ग्रामविकासाचे प्रयत्न लक्षात घेणे.

जगातील विविध देशाचे वर्गीकरण हे विकसित व अविकसित देशामध्ये केले जाते. अविकसित देशामध्ये सर्वसाधारणपणे अमेरिका व पश्चिम यूरोप या देशामधील असणारे दरडोई वार्षिक उत्पादन हे विचारात घेतले जाते. या देशाच्या साधारणपणे दरडोई वार्षिक उत्पादनाच्या १/४ पेक्षा कमी उत्पन्न असणारे देश प्रामुख्याने अविकसित देश मानले जातात. या देशाना गरीब देश या नावाने संबोधले जाते. आज जगातील सर्वसाधारणपणे एकूण लोकसंख्येपैकी ६०% ते ७०% लोक हे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. भारतातील सुद्धा ७०% ते ८०% लोक हे शेती व्यवसायावर अवलंबून असून ते शेती व्यवसायासी निगडीत आहेत.

भारतातील आर्थिक व्यवस्थेपुढील सर्वात मोठी समस्या ही दारिद्र्याच्या दुष्ट चक्राशी संबंधित आहे. सातत्याने भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी वर्गांना कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ याच्याशी सामना करावा लागतो. भारतीय अर्थव्यवस्था या आपल्या ग्रंथात प्रा. (डॉ.) स. श्री.मु. देसाई व सौ. (डॉ.) निर्मला भालेराव यांनी मांडलेला विचार यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

‘‘बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य ही भारताच्या अर्थव्यवस्थेपुढील प्रमुख समस्या आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताची आर्थिक प्रगती खुंटण्याचे प्रमुख कारण म्हणजे ब्रिटिश सरकारची भारतातील राजवट ही होय. भारतातील शेती व्यवसायातील सरंजामशाहीसदृश संबंधाची वाढ, अवजड व मुलभूत उद्योगांचा जवळजवळ संपूर्ण अभाव, भारतात तयार होणाऱ्या मालाला ब्रिटिश मालाशी यशस्वी स्पर्धा करण्यात आलेले अपयश, भारतातील आर्थिक धोरणे आखताना व ती कार्यवाहीत आणताना ब्रिटनच्या हिताची केलेली जपणूक इत्यादी कारणांमुळे भारतातील शेती व्यवसायाला निर्वाह शेतीचे स्वरुप प्राप्त झाले व औद्योगिकदृष्ट्या भारत अप्रगत राहिला. औद्योगिक विकास न झाल्याने वाढत्या लोकसंख्येमुळे शेती क्षेत्रावर वाढता ताण पडत गेला.

भारतातील सुमारे ७०% लोक अद्याप उदरनिर्वाहासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरितीने शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. म्हणून भारतीय लोकामधील विस्तृत दारिद्र्याची प्रमुख कारणे शेती व्यवसाय अविकसित राहण्यामध्ये आहे. अविकसित शेती व्यवसायात भारतातील बहुसंख्येच्या दीर्घ काळ टिकून राहिलेल्या व अद्याप आढळणाऱ्या दारिद्र्याची कारणे शोधली पाहिजेत.’’[१]

आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रात भारताला येणारी तूट ही प्रामुख्याने प्रगतीतील मोठी समस्या जाणवते. सातत्याने येणारी तूट ही कमी करण्याचे मुख्य आव्हान आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय संख्या ज्या आहेत त्या संख्यावर अमेरिकेचा असलेला प्रभाव त्यानुसार राबवली जाणारी धोरणे ही या त्रूटीस कारणीभूत ठरताना आढळतात. ‘भारतीय अर्थव्यवस्था’ : प्रा.(डॉ.) स. श्री. पु. देसाई, सौ. (डॉ.) निर्मला भालेराव या ग्रंथात आलेला विचार लक्षात घ्यावा लागतो तो असा-

‘‘सन १९८० नंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतोलात व व्यवहारतोलात सातत्याने अधिकाधिक तूट येत आहे. ह्या कारणामुळे भारताला जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्जासाठी धाव घ्यावी लागत आहे. वरील दोन्ही जागतिक विकास संस्थावर अमेरिकेचा मोठा प्रभाव आहे. त्या कारणाने त्या वित्तीय संस्थांची धोरणे अमेरिकेच्या आर्थिक हिताची जपवणूक करण्याच्या दृष्टीने आखली जात आहेत व त्या वित्तीय संस्थाकडून कर्ज मागणाऱ्या देशांवर ती

धोरणे लादली जात आहेत.''२ भारतात १९५१ पासून भारताच्या ग्रामीण व सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. या योजनामार्फत भारतातील लाखो खेड्या-पाड्यातील व लहान शहरातील अल्प उत्पन्न गटांतील लोकांसाठी सातत्याने उन्नतीसाठी प्रयत्न करण्यात आले. भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी जे प्रयत्न केले आहेत ते अतिशय महत्वाचे आहेत. तरी परंतु त्याला पूर्णपणे यश हे आलेले आहे असे मात्र म्हणता येणार नाही. गावच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न करण्यात आले. त्यातून प्रगती करण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु योजनेतील पूर्ण निधी हा त्या खेड्यापाड्यातील विकास कामावर प्रत्यक्ष खर्च होताना आढळत नाही. 'भारत मे ग्रामीण विकास' या आपल्या ग्रंथात रामजी यादव यांनी मांडलेला विचार लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''भारतीय जनता को आत्मनिर्भर बनाने तथा देश की आर्थिक समृद्धि के लिए सरकार द्वारा रात-दिन प्रयास किया जा रहा है। लेकिन स्वतंत्रता प्राप्ती से पचास वर्षो के बाद भी वह सफलता प्राप्त नही हो सकी जो होनी चाहिए थी। इसका अर्थ यही निकलता है कि, या तो योजनाओं में कहीं न कहीं कोई कमी है या फिर लोग रुचि नही लेते। इसका कारण भी है कि, जब सरकार द्वारा कोई धनराशि गाँवों के उत्थान के लिए भेजी जाती है तो सिर्फ उसका १५ प्रतिशत भाग ही गावों तक पहुंच पाता है।''३

विश्वात असणाऱ्या सर्व देशात त्यांच्या त्यांच्या साधनावर व उत्पादनावर आधारित व्यापार चालू असतो. व्यापारातील निर्यात क्षमताही ज्यावेळी जास्त असेल त्यावेळी इतर देशाकडून मिळणारे चलन हे जास्त असते. यामुळे निर्यातीतून मिळणाऱ्या एकूण चलनामुळे त्या देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. जागतिक स्तरावर व्यापार नितीतून आपले दरडोई उत्पादन वाढविणे व त्यातून राष्ट्रविकास साधणे हे महत्वाचे असते. 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' या आपल्या ग्रंथात डॉ.जयप्रकाश यांनी मांडलेला विचार या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

' 'विश्व में जितने भी देश है, वहाँ अपने विशिष्ट प्राकृतिक संसाधन, विशेष ज्ञान का स्तर, पुँजि एवं मानवीय साधन पाए जाते है। उनकी अपनी सामाजिक तथा आर्थिक संस्थाएँ होती है। एवं उनकी अपनी कुछ स्वतंत्र आर्थिक नितीया भी होती है। आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्री वस्तुओं एवं सेवाओं की आंतरराष्ट्रीय गतीशिलता की व्याख्या करने का प्रयास करता है। उसका मुख्य केंद्र उन नीतियों पर होता है जो विदेश व्यापार एवं भुगतान को प्रभावित करती है, जैसे विदेशी विनीमय दर, तटकर नीति, आदि। विभिन्न देशों के बीच होनेवाले विनिमय मे प्रयुक्त होनेवाली अन्य नीतियों, विशेष तौर से व्ययनीति, मौद्रिक नीति, करनीति आदि का भी ध्यान रखा जाना आवश्यक होता है।''४

भारतीय ग्रामीण विकास अथवा एकूण आर्थिक संपन्नतेचा विकास लक्षात घेतला तर जागतिक पातळीवर हा आर्थिक विकास भारत करत असतानाच त्या बरोबरच तुलनात्मकदृष्ट्या चीन या देशाचा झालेला व होणारा एकूणच ग्रामीण अथवा देशाचा आर्थिक विकास लक्षात घ्यावा लागतो. कारण यावरुन आर्थिक विकासाची गती लक्षात येते. चीन या देशाने सन १९४० च्या दशकात भारताच्या आसपासच आपल्या विकास प्रक्रियेस प्रारंभ करुन सुद्धा आज चीन आणि भारत यांच्या आर्थिक विकासाबाबत तफावत आढळते. 'भारतीय राज्यों का विकास' या आपल्या ग्रंथात संपादक अमर्त्येसेन व ज्यां द्रीज यांनी मांडलेला विचार लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''केवल आकार के कारण ही इन तुलनाओं में सार्थकता नही आ जाएगी-वस्तुत: चीनने भी अपनी विकास यात्रा भारत की भाँती ही १९४० के दशक में ्अंत में प्रारंभ की थी- उस समय वह भी भारत की भाँति अतिनिर्धनता एवं आभाओं से ग्रस्थ था। चीन की सभ्यता भी भारती तरह ही वाणिज्य एवं व्यापार की समृद्ध परंपरा से संपन्न रही है, यहाँ भी गैर-बाझार और सामाजिक परंपराएं उतनीही सशक्त रही है। यही नहीं, दोनों देशों के मुल नागरिकों के विशाल समुह विश्व के कोने कोने मे फैले हुए है, उनके माध्यम से भी ये दोनो ही विश्व वाणिज्य एवं व्यापार के साथ बहुत सहज भाव से जुड पाने में समर्थ है। अत: चीन से तुलनाएँ कर ये आकलन कर पाना बहुत आसान हो सकता है कि आज भारत किस मुकाम पर है, ये क्या कुछ कर सकता है और इसे क्या करना चाहिए।''५

भारत के ग्रामीण विकास या संकल्पनेत शेती उद्योग, सेवा क्षेत्र, शिक्षण यांचा समावेश होताना आढळतो. आर्थिक क्षेत्रातील संधी ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील एक महत्वाची प्रक्रिया असते. दैनंदिन उदरनिर्वाह चालविण्यासाठी जे चलन लागते : त्या प्रक्रियेच्या संबंधितच विकास प्रक्रिया गतीशिल होताना आढळते. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत तेथील लोकांचे जीवनमान अधिक चांगले होणे कसे गरजेचे आहे याचा विचार असतो. एकूणच व्यवस्थेचा विचार करत असताना त्याना जीवनात संपन्नता येण्यासाठी स्वास्थ्य, शिक्षण व पोषक आहार या बाबींचे महत्व पटवून सांगावे लागते तसेच त्यांना पटावे लागते. यामुळेच जीवनामध्ये संपन्नता येवून त्यांच्या आर्थिक विकासाल गती मिळू

शकते. ग्रामीण भागातील व्यक्तींचा हा विकास म्हणजेच भारताचा आर्थिक विकास होय. आजही भारतातील सर्वाधिक लोक खेड्यापाड्यात राहतात. त्यांचा विकास करणे म्हणजेच ग्रामीण विकासाची प्रक्रिया आहे हे उदात्त हेतून लक्षात घेतले पाहिजे. संपन्नता आणि समृद्धतेच्या पातळीवरुन ज्यावेळी ग्रामीण विकास घडून येईल त्यावेळी देशाचाही विकास गतीशिलतेने होताना दिसून येईल. ग्रामीण भागातील सामाजिक विकास ही प्रक्रियाच भारतीय विकासाच्या दृष्टीने महत्वाची अशी आहे. त्यासाठी प्रामुख्याने या विकास प्रक्रियेत स्वास्थ, शिक्षा, पेयजल, ऊर्जा, स्वच्छता इत्यादी बाबीवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करावे लागते. 'ग्रामीण विकास' या आपल्या ग्रंथात विनायक चतुर्वेदी यांनी मांडलेला विचार या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''गावों के विकास का अर्थ उन्नत खाद्य आपूर्ति तथा पोषण और उसके साथ ही शिक्षा और स्वास्थ्य जैसी आधारभूत सेवाएँ न केवल गरीब व्यक्ति के भौतिक कल्याण तथा जीवन की गुणवत्ता में प्रत्यक्ष रुप से सुधार लाए जाते है, बल्कि अप्रत्यक्ष रुप सेभी उनकी उत्पादकता तथा राष्ट्रीय आई में उनके योगदान करने की क्षमता मे भी वृद्धि करते है। ये ग्रामीण अर्थव्यवस्था के आधुनिकिकरण एवं मौद्रिकरण से संबंधित है। तथ साथ ही इसको परंपरागत अलगाव से हटाकर राष्ट्रीय अर्थव्यवस्था से एकिकृत करने की संक्रमन क्रिया सेभी। इस अर्थ मे ग्रामीण विकास भी उग्र एवं पश्च संयोजनों को स्थापित करते हुए भीन्न कार्यक्रमों को कार्यात्मक तथा उद्‌ग्र एकिकरण दिखायी देता है।''[६]

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण विकास प्रक्रियेस चालना मिळालेली दिसून येते. सामाजिक पातळीवर चांगले जीवन जगण्याची पद्धती विकसित करण्याची प्रक्रिया विकास प्रक्रियेमध्ये साध्य झाली तर ग्रामीण विकास वेगाने होताना दिसून येईल. आर्थिक विषमतेचीवाढत जाणारी दरी कमी करणे हे सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. लोकानी निवडून दिलेल्या सरकारचे हेच कर्तव्य असते की, समाजातील लोकांना अनेक योजना त्यांच्या भल्यासाठी पुरविणे, त्यांचा आर्थिक विकास घडवून आणणे, त्यांना चांगले जीवनमान जगण्याची संधी प्राप्त करुन देणे यामुळे खालच्या सामाजिक स्तरावरील जे घटक आहेत त्याना विकास प्रकियेमध्ये संधी मिळाल्यामुळे त्यांच्या विकासास गती मिळेल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याच्या या सत्तर सालामध्ये त्या त्या कालखंडातील भारत सरकारने जो गरीबी कमी करण्याचा प्रयत्न केला तो खरोखरच अतिशय महत्वपूर्ण असाच आहे. असे गौरवाने म्हणावे लागते. कारण विकासाची प्रक्रिया ही काय रातोरात विकसित करण्याची प्रक्रिया नाही. त्यासाठी बराच काळ द्यावा लागतो. विचार विनिमयातून नवे नवे विकासाचे दृष्टिकोण पुढे येतात व त्यातून एकूणच विकास प्रक्रियेला गती मिळते. आर्थिक विकासापासून दूर असलेल्या समाजातील सर्व घटकांना आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याची प्रक्रिया हीच भारतीय ग्रामीण विकासाची प्रक्रिया आहे. 'आर्थिक नीति एवं प्रशासन' या आपल्या ग्रंथात डॉ. सुरेंद्र कठारिया यांनी मांडलेला विचार या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''सामाजिक स्तर पर समानता, न्याय तथा सौहार्द की स्थापना किए बिना आर्थिक विकास की कल्पना करना बेमानी है। विकासशिल देशों में जहाँ, निरक्षरता, गरिबी, भुकमरी, बेरोजगारी, रुढीवादिता, महिला-अत्याचार, अपराध, नशाखोरी, सामाजिक कुरितीयों तथा भाग्यवादीता का प्रसार अधिक है, वहाँ सरकार की भूमिका तुलनात्मक रुप से ज्यादा महत्वपूर्ण हो जाती है। वास्तव में आर्थिक विकास को सामाजिक संरचना, संस्थाएँ तथा व्यवस्थाएँ व्यापक रुप से प्रभावित करती है। अत: यह आवश्यक हो जाता है कि, सरकार समाज के कल्याण,विकास तथा परिवर्तन में वाहक की भुमिका निर्वाहित करे।''[७]

भारताच्या ग्रामीण भागात विकासाचा टप्पा गाठण्यासाठी कल्याणकारी योजना बरोबरच उद्योग व्यवसायाला चालना देणे हे ही अतिशय महत्वाचे असेच आहे. छोटे-छोटे उद्योग जर सुव्यवस्थितपणे ग्रामीण भागात चालविले तर निश्चितपणाने कांही अंशी का होईना त्या त्या ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था संपन्न होण्यासाठी मदत होईल. खाजगी औद्योगिक क्षेत्रातील धोरणातून एकुण भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होताना दिसून येते. 'भारतीय अर्थव्यवस्था' या आपल्या ग्रंथात कै. प्रा.(डॉ.) स.श्री. मु. देसाई व सौ. (डॉ.) निर्मल भालेराव यांनी मांडलेला विचार या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''सन १९४८ आणि सन १९५६ च्या औद्योगिक धोरणाविषयक ठरावाने भारताने 'मिश्र अर्थव्यवस्था' स्थापन करण्याचे उद्दिष्ट स्वीकारले. सार्वजनिक औद्योगिक क्षेत्राबरोबरच खाजगी औद्योगिक क्षेत्रासही अर्थव्यवस्थेत निश्चित स्थान देण्याचे मान्य करण्यात आले. याचे कारण म्हणजे खासगी औद्योगिक क्षेत्रात असेली प्रेरणा, धडाडी, शोधक बुद्धी व वृत्ती, लवचिकता आणि कार्यक्षमता या गुणांचा उद्योगाच्या विकासासाठी जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे हे होय. खासगी

नफ्याची प्रेरणा ही खासगी क्षेत्रातील उद्योगांना कार्यक्षम बनवित असल्याने त्यास योग्य तो वाव देणे देशहिताचे ठरते हे मान्य करण्यात आले.''[८]

भारतातील ग्रामीण विकासामध्ये शेतीचा विकास महत्वाचा मानला जातो. जगातील अनेक राष्ट्रात शेती व्यवसाय भारताप्रमाणेच महत्वाचा आहे. भारत देशात तर लोकांना अन्न पुरवि्याचे कार्य शेती व्यवसायातून होते. यामुळे या कृषि व्यवसायाकडे अधिक लक्ष देणे ग्रामीण विकासाठी आवश्यक आहे. भारतीय कृषि क्षेत्राकडे लक्ष देत असताना विकासाच्या माध्यमातून आर्थिक नियोजन ढासाळणार नाही; याकडे लक्ष देणे जरुरी आहे. याचाच अर्थ असा की, नियोजनबद्ध कृषि विकास हाच ग्रामीण अर्थव्यवस्थेला सबळ बनविण्यासाठी उपयुक्त आहे हे निश्चितपणाने लक्षात घ्यावे लागते. 'कृषि अर्थशास्त्र' या आपल्या ग्रंथात डॉ. बी. एल. माथुर यानी मांडलेला विचार या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''भारत प्राचीन काल से ही एक कृषिप्रधान देश रहा है। देश के अधिकांश निवासी आज भी कृषि द्वारा अपनी जीविका अर्जित करते है। भारत में ही नही, विश्व के अनेक अन्य देशों मे भी कृषि एक महत्वपूर्ण व्यवसाय रहा है; क्योंकि ये मनुष्य की मुलभुत आवश्यकताओं की पूर्ति का एक महत्वपूर्ण साधन है। किसी भी देशों में उद्योगों के विकास से पहले कृषि का विकास किया जाना अत्यंत आवश्यक है। भारत जैसे देश के लिए जहाँ जनसंख्या के एक बडे भाग को भोजन कृषि से प्राप्त होता है, इसका विकास प्रथम आवश्यकता है।''[९]

भारतीय अर्थव्यवस्था आज विकसित करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होताना आढळत आहेत. कारण एकूण राष्ट्रीय सकल उत्पादनात कृषी उत्पादनाचे महत्वपूर्ण योगदान लक्षात येताना दिसून येते. एकूण राष्ट्रीय उत्पादनात कृषिचे उत्पादन गृहित न धरल्यास राष्ट्रीय सकल उत्पादनाचा विचार परिपूर्ण होवू शकत नाही. ग्रामीण विकासाची प्रक्रिया ही जशी कृषीशी निगडित आहे, तशीच राष्ट्रीय उत्पादनाशी संबंधित आहे. राष्ट्रीय सकल उत्पादनाची क्षमता कृषी उत्पादनाच्या क्षमतेवर निश्चितच आधारलेली दिसून येते. 'शेतीचे अर्थशास्त्र: सिद्धांत आणि धोरण' या आपल्या ग्रंथात डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील यांनी मांडलेलाविचार या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

''भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर नियोजनाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासास प्रारंभ झाला. १९५१ पासून सुरु झालेल्या पंचवार्षिक योजनेत शेतीक्षेत्राला प्रत्येक वेळा (एक दोन पंचवार्षिक योजना सोडल्यास) प्रत्येक वेळा प्राधान्यक्रम देण्यात आला. आज भारतातील जवळपास ६८% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि राष्ट्रीय उत्पादनात शेतीचे योगदान ४३% असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका आणि महत्व अभ्यासणे आवश्यक ठरते.''[१०]

भारतीय अर्थव्यवस्था समृद्ध होण्यासाठी जशी शहराची अर्थव्यवस्था चांगल्या स्थितीत असते; तशी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था संपन्न होणे आवश्यक आहे. विकासास कायमस्वरुपी चालना देणारी व कायम अर्थार्जन उपलब्ध करुन देणारे विकास प्रकल्प ग्रामीण भागात राबविणे आवश्यक आहे. एकूण विकास प्रक्रियेत ग्रामीण भाग हा महत्वाचा मानून विकास करणे त्यासाठीच गरजेचे आहे. भारतीय ग्रामीण विकास हा जसा ग्रामीण जीवनमान उंचावण्यासाठी उपयुक्त आहे तसा ग्रामीण भागातील माणूस कृषी जीवनासह तेथील ग्रामीण वास्तवासह साहित्य निर्मितीत येण्यासाठीही उपयुक्त आहे हे ही लक्षात घ्यावे लागते. एकूणच भारताच्या विकासाची प्रक्रिया ही ग्रामीण विकास प्रक्रियेशी निगडित आहे हे निश्चितपणानेच लक्षात घ्यावे लागते.

### भारतीय विकास प्रक्रियेतील महत्वाची मुद्दे :

माझ्या आकलनानुसार भारताच्या विकास प्रक्रियेत आवश्यक असलेली पुढील काही मुद्दे विचारार्थ लक्षात घेण्यासाठी मांडत आहे. त्यामुळे एकूणच भारतीय विकास प्रक्रियेस गती मिळण्यास त्यांचा उपयोग होईल. परंतु हेच मुद्दे भारतीय विकास प्रक्रियेत अंतिम असतील असा दावा कदापी करता येणार नाही. या मुद्याच्या आधारे भारताच्या विकास प्रक्रियेतील सुक्ष्मत्व कोणत्या विकास प्रक्रियेवर अवलंबून आहे हे लक्षात येण्यास मदत होईल.

१) जीवन जगण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस अथवा मनुष्यास चलनव्यवस्था अर्थविनिमयाचे साधन म्हणून स्वीकारली असल्यामुळे पैशाची आवश्यकता उधरनिर्वाहसाठी आहे.

२) ज्या व्यक्तीस अथवा मनुष्यास जीवन जगण्याचे परंपरेने साधन उपलब्ध झाले आहे त्यांच्या पेक्षा ज्या व्यक्तींना असे साधन परंपरेने उपलब्ध झालेले नाही त्यांच्या उदरनिर्वाहासाठी लागणाऱ्या पैशाचा विचार करणे आवश्यक आहे.

३) भारतातील ज्या व्यक्तीस दैनंदिन जीवन जगताना दोन वेळेसचे जेवण मिळत नसेल: त्यांना किमान जेवण व्यवस्था होणे हे नित्तांत जरुरीचे आहे. भारत व विश्वातील २४ तासात झोपेपूर्वी एकही व्यक्ती उपासोपोटी झोपू नये? एवढी

अर्थार्जनाची क्षमता त्याच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यादृष्टीने सरकारची स्वस्त धान्य दुकानावरुन कमी किंमतीत धान्य देण्याची सुरु केलेली योजना भारतातील व विश्वातील एक महत्वाची योजना आहे.

४) भारतातील लोककल्याणाच्या योजनावरील खर्च योग्य असाच व्हावा: त्यातील पैसा व्यर्थ वा भ्रष्टाचारात लुप्त होवू नये? याची काळजी प्रत्येकाने घेणे जरुरीचे आहे.

५) भारतातील कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी सुरु असलेल्या देशातील अनेक राज्यातील अनेक योजना बंद करुन त्यांच्या कल्याणासाठी सर्वसमावेशक अशी एकच भारत सरकारकडून सर्व अनुमताने योजना राबविण्यात यावी. या योजनेत देशातील बेकार, शेतकरी, जेष्ठ नागरीक व कोणतेही उत्पन्न नसलेले व्यक्ती यांच सहभाग होईल असे धोरण ठरवून ठराविक वयोमानानुसार त्यांना जीवन जगण्यासाठी निश्चित स्वरुपाचे मानधन देण्याची कायम योजना तयार करावी.

६) या योजनेमुळे अनेक राज्याच्या अनेक गरीबी कल्याणाच्या योजना राबविण्याचा वेळ बचत होईल आणि केंद्रिय पातळीवरुन देशातील सर्वच वरील घटकांसाठी योजना राबविल्यामुळे सर्व लोकांना त्याचा निश्चितच लाभ होईल.

**निष्कर्ष :**

१) भारतीय ग्रामीण विकासाचे स्वरुप लक्षात येते.
२) भारतीय खेड्यातील जीवनमान लक्षात येते.
३) भारतीय ग्रामीण विकासातील शेती व्यवसायाचे महत्व कळते.

**संदर्भ :**

१) 'भारतीय अर्थव्यवस्था': कै.प्रा. (डॉ.)स.श्री. मु. देसाई, सौ. (डॉ.) निर्मल भालेराव, प्रकाशन, निराली प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ०५.
२) तत्रैव, पृ. क्र. ३०४.
३) भारत में ग्रामीण विकास': रामजी यादव, पब्लिकेशन, अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, प्रथम संस्करण २००५, पृ. क्र. ०४.
४) 'आंतरराष्ट्री अर्थशास्त्र': डॉ. जयप्रकाश, पब्लिकेशन, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण १९९५, पृ. क्र. ०१.
५) 'भारतीय राज्यों का विकास -कुछ प्रादेशिक अध्ययन' : संपादक अमर्त्ये सेन, ज्यॉ द्रिज, प्रकाशन, राजपाल एन्ड सन्ज, दिल्ली, पृ. क्र. २२.
६) 'गामीण विकास': विनायक चतुर्वेदी, प्रकाशन, प्रिज्म बुक्स (इंडिया) जयपूर, प्रथम संस्करण - २०११, पृ. क्र. १, २
७) 'आर्थिक नीति एवं प्रशासन': डॉ. सुरेंद्र कठारिया, प्रकाशक-प्रकाशन, मलिक एन्ड कंपनी, जयपूर, प्रथम संस्करण-२००२, पृ. क्र. २७.
८) 'भारतीय अर्थव्यवस्था': प्रा. (डॉ.)स.श्री.मु.देसाई, सौ. (डॉ.) निर्मल भालेराव, प्रकासन, निराली प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ३१७.
९) 'कृषि अर्थशास्त्र': डॉ. बी. एल. माथूर, अर्जून पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली, प्रथम संस्करण - २०११, पृ. क्र. १.
१०) 'शेतीचे अर्थशास्त्र: सिद्धांत आणि धोरण': डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील, प्रकाशन, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, आवृत्ती चतुर्थ-२००७, पृ. क्र. २१.

# ग्रामीण विकासात मनरेगाची भूमिका

**प्रा. डी.डी. गायकवाड**
समाजशास्त्र, विभाग प्रमुख
वसंतराव काळे महाविद्यालय,
ढोकी, ता. जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

भारत खेड्याचा देश आहे. खेड्यात बेरोजगारी आणि गरीबी ह्या गंभीर समस्या आहेत. जोपर्यंत या समस्यांचे निराकरण होत नाही. तोपर्यंत खेडी स्वयंपूर्ण होणार नाही. स्वयंपूर्ण खेडी बनवणे ही एक प्रक्रिया असून तिच्यासाठी कालावधी लागणे स्वाभाविक आहे. ग्रामीण भागातील पारंपारिक व्यवसायात यश मिळत नसल्यामुळे रोजगाराच्या शोधात शहराकडे लोकांचा ओढा वाढला आहे. परंतु शहरातही अशांना राहण्यास जागा व सन्मान मिळालेला नाही. गाव सोडून येणारे लोक नाली, गटार, सडक, रेल्वे पटरीच्या कडेला, झोपडी मारून नरकीय जीवन जगताहेत. या प्रक्रियेमुळे शहरही अव्यवस्थित झालेले आहे.

७ सप्टेंबर २००५ च्या अधिसूचित राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारण्टी अधिनियमाचे औपचारिक उद्घाटन प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील बन्दलापल्लीत केले. महात्मा गांधीच्या ग्रामीण विकास प्रती विशेष बापूच्या १४० व्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर २००९ पासून नरेगाचे नाव परिवर्तीत करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारण्टी अधिनियम (मनरेगा) केला गेला.

**मनरेगाची पार्श्वभूमि :**

१५ ऑगष्ट १९८३ ला ग्रामीण भूमिहीन रोजगार गारण्टी कार्यक्रम (RLEGP) पूर्ववर्ती राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारण्टी कार्यक्रम (NREP) ला संशोधित करून पुन्हा २८ एप्रिल १९८९ ला जवाहर रोजगार योजना बनविण्यात आली. २ ऑक्टोंबर १९९३ ला रोजगार आश्वासन योजना (EAS) तसेच ०१ एप्रिल १९९९ पासून ग्राम समृध्दी योजना (JGSK) चालवण्यात आली. या दोन्हीवर संशोधन करून २५ डिसेंबर २००१ मध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना चालविण्यात आली. परंतु यापेक्षा वेगळी १४ नोव्हेंबर २००४ ला कामाच्या बदल्यात अन्नाचा राष्ट्रीय कार्यक्रम (NFFWP) अकुशल शारिरिक कष्टकऱ्यांसाठी चालवण्यात आली. २००५ मध्ये पूर्ववर्ती 'कामाच्या बदल्यात अन्न' असा राष्ट्रीय कार्यक्रम व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ला संशोधित करून राष्ट्रीय पातळीवर पहिल्यांदा "रोजगाराचा अधिकार" असे कायदयाचे रूप देवून मनरेगाची सुरूवात झाली.

परंतु वर्तमान मनरेगाच्या पूर्वी १९७२ -७३ मध्ये महाराष्ट्रात रोजगार गारण्टी कार्यक्रम सुरू केला. ज्यामध्ये संविधानात दिलेल्या 'कामाचा अधिकार' ला कायद्याचे रूप प्रदान केले गेले. ज्याच्या अंतर्गत एखाद्या व्यक्तिने कामाची मागणी केल्यास शासनाने रोजगार उपलब्ध करून देण्याचे दायित्व होते.

**मनरेगाचा उद्देश :**

१) ग्रामीण भागातील कुटूंबाला अर्थसहाय्य म्हणून एका वर्षात १०० दिवस रोजगार मिळवून देणे आहे. त्यासाठी कुटूंबातील सदस्य शारिरिक श्रम करण्यास सक्षम असावेत.
२) उत्पादक संपदा तयार करणे.
३) पर्यावरणाचे रक्षण करणे.
४) ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण करणे.
५) ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतर थांबवते.
६) सामाजिक-आर्थिक असमानतेची दरी कमी करणे.

**मनरेगा कार्यक्रम :** मनरेगा कार्यक्रमाला संपूर्ण देशातील स्थरात लागू केले आहे.

१) ०२ फेब्रुवारी २००६ ला प्रथम वेळी २०० जिल्ह्यात लागू केले. उत्तर प्रदेशातील २२ जिल्हे - आजमगड, बांदा, बाराबंकी, बन्दौली, चित्रकुट, फत्तेपुर, गोरखपूर, हमीदपुर, हरदोई, जालौन, जौनफर, कौशम्बी, कुशीनगर, लखीमपुर, महोबा, मिर्जापूर, प्रतापगढ, रायबरेली, सीतापूर, सोनभद्र तसे उन्नाव समाविष्ट होते.
२) ०१ एप्रिल २००७ ला देशातील १३० अतिरिक्त जिल्ह्यात लागू केले. ज्यामध्ये उत्तर प्रदेशाचे १७ जिल्हे - झांसी, कानपूर, मऊ, सुल्लानपूर, अंबेडकर नगर, बस्ती, संत कबीर नगर, महाराजगंज, सिध्दार्थनगर, बहराइच, बलरामपूर, श्रावस्ती, गोण्डा, बलिया, बदायूँ, एटा व फरूखाबाद याचा समावेश होता.
३) मनरेगाच्या कार्य सफलतेने प्रेरित होऊन ०१ एप्रिल २००८ पासून देशातील सर्वच ६१४ जिल्ह्यात ही योजना लागू करण्यात आली.

**ग्रामीण विकासासाठी नरेगाच्या योजना :**

१) पाणी बचाव, संरक्षण आणि संयम व दुष्काळापासून वाचविणे.
२) वृक्षारोपन व वृक्षांचे संवर्धन
३) सिंचनासाठी लघू सिंचन योजना व तलाव तयार करणे.
४) अनुसुचित जाती/जमाती तसेच इंदिरा आवास योजनाच्या लाभार्थींच्या जमिनीत सुधारणा करणे व सिंचन सुविधा पुरविणे.
५) परंपरागत जलस्त्रोताचे पुनर्नवीकरण करणे, गाळ काढणे, पुर नियंत्रण तसेच सुरक्षा योजना.
६) गावा गावात दळणवळणाची सोय करणे इत्यादी कामाचा समावेश मनरेगामध्ये केला जातो.

**मनरेगा योजनेत बेरोजगारी भत्ता :**

मनरेगाच्या अंतर्गत ज्या कुटूंबातील सदस्य शारीरिक श्रम करण्यास सक्षम आहे. अशांना वर्षातील ३६५ दिवसापैकी १०० दिवस रोजगाराची हमी देवून त्यांच्या उपजिवीकेबाबत सुरक्षा प्रदान केली जाते. एखादा जॉब कार्डधाकाने कामाची मागणी केली असेल. तर त्यास १५ दिवसाच्या आत रोजगार दिला नसले तर संबंधित जॉब कार्डधारकाला राज्य सरकारकडून बेरोजगारी भत्याचा उपभोक्ता म्हणून अधिकार असेल.

मनरेगानुसार २०११-१२ न्युनतम मजूरी ४७ रूपयावरून ७२ रूपये

| | | | |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४७ | - | ७२ |
| उत्तर प्रदेश | ५८ | - | १०० |
| बिहार | ६८ | - | ८१ |
| प. बंगाल | ६४ | - | ७५ |
| मध्य प्रदेश | ५८ | - | ८५ |
| जम्मू काश्मीर | ४५ | - | ७० |
| छत्तीसगड | ५८ | - | ७२ |

०१ एप्रिल २०१८ ला केंद्र सरकारने देशाच्या ३० राज्यात व केंद्रशासित प्रदेशात मनरेगाने मजदुरी वाढवली आहे.

या संदर्भात ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारने २८ मार्च २०१८ ची अधिसुचना जारी केली आहे. ०१ एप्रिल पासून पूर्ण देशात लागू केली आहे.

वित्तीय २०१८-१९ मध्ये मनरेगा मजुरांना वाढीव असलेली मजुरी देणार आहे.

| राज्य | मजूरी संख्या | राज्य | मजुरी संख्या |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश - | २०५ | मध्यप्रदेश - | १७४ |
| अरूणाचल प्रदेश - | १७७ | महाराष्ट्र - | २०३ |
| आसाम - | १८९ | मणिपूर - | २०९ |
| बिहार - | १६८ | मेघालय - | १८१ |
| छत्तीसगड - | १७४ | मिजोराम - | १९४ |
| गोवा - | २५४ | नागालँड - | १७७ |
| गुजरात - | १९४ | ओडिसा - | १८२ |
| हरियाणा - | २८१ | पंजाब - | २४० |
| हिमाचल प्रदेश - | १८४ (गैर अनुसुचित) | राजस्थान - | १९२ |
| हिमाचल प्रदेश - | २३० (अनुसुचित) | सिक्कीम - | १७७ |
| जम्मू/काश्मीर - | १८६ | तमिळनाडू - | २२४ |
| झारखंड - | १६८ | तेलंगाना - | २०५ |
| कर्नाटक - | २४९ | त्रिपूरा - | १७७ |
| केरल - | २७१ | तामिळनाडू - | २२४ |
| तेलंगना - | २०५ | त्रिपुरा - | १७७ |
| उत्तर प्रदेश - | १७५ | उत्तराखंड - | १७५ |
| प. बंगाल - | १९१ | अंदमान - | २५० |
| निकोबार - | २६४ | चंदीगड - | २७३ |
| दादर-हवेली - | २२० | दमन/दीप - | १९७ |
| लक्षद्विप - | २४८ | पांडेचरी - | २२४ |

मनरेगाने विविध राज्यात काम करणाऱ्या मजुरास मजुरी एकसारखी न देता विविध राज्यात तफावत असणारी दिसत आहे.

Active Workers २०१८-१९

| अ.क्र. | | Active Worker | Total Worker | Percentage |
|---|---|---|---|---|
| १ | अंदमान निकोबार | २०,२९८ | ५२,६४० | ३८.५६ |
| २ | अंध्र प्रदेश | ८६१६८५५ | १७६७१२३८ | ४८.७६ |
| ३ | अरूणाचल प्रदेश | २४०५७६ | ४५६१५९ | ५२.७४ |
| ४ | आसाम | ३९४२५१८ | ७७७२३५० | ५०.७२ |
| ५ | बिहार | ५१६६१०६ | २३३४९६०३ | २२.१३ |
| ६ | छत्तीसगड | ६०८९४२८ | ८६३०८८७ | ७०.५५ |
| ७ | दादर नगर हवेली | ० | २५९२७ | ०.०० |
| ८ | गोवा | १०००१ | ४७६४४ | २०.९९ |
| ९ | गुजरात | २३८२२०६ | ८५०४७१३ | २८.०१ |
| १० | हरियाणा | ६६२७५० | १६५९१०० | ३९.९५ |
| ११ | हिमाचल प्रदेश | १०७२३९० | १३११५१३ | ४६.३९ |
| १२ | जम्मू/काश्मिर | १५२९१६० | २६६२९३९ | ७०.७० |
| १३ | झारखंड | २९९७८७० | ८०९८८८९ | ३७.०२ |
| १४ | कर्नाटक | ६४२५१९७ | १३८६५४५६ | ४६.३४ |
| १५ | केरळ | २३३८४४० | ५३९१८८४ | ४३.३७ |
| १६ | लक्षद्विप | ४२५ | १६०११ | २.६५ |
| १७ | मध्य प्रदेश | ९३४८६७६ | १६०६६९४५ | ५८.१९ |
| १८ | महाराष्ट्र | ५४६२२४२ | २१४७६९१० | २५.४३ |
| १९ | मणिपूर | ६१२८७३ | १०२२८५४ | ५९.९२ |
| २० | मेघालय | ७५३३७८ | १११७२६२ | ६७.४३ |
| २१ | मिझोराम | २१०५०३ | २४७८२२ | ८४.९४ |
| २२ | नागालँड | ५७६१०३ | ७१९१५४ | ८०.११ |
| २३ | ओडीसा | ५७८३८९२ | १६२९२४२१ | ३५.५० |
| २४ | पांडेचरी | ५५३६१ | १४२६२२ | ३८.८२ |
| २५ | पंजाब | ११९८३६२ | २५३५९०२ | ४७.२६ |
| २६ | राजस्थान | ९८७५०५९ | २३१३२०९६ | ४२.६९ |
| २७ | सिक्कीम | ९७१५६ | १३३३४९ | ७२.७५ |
| २८ | तामिळनाडू | ८७२७३५२ | ११८९८४३८ | ७३.३५ |
| २९ | तेलंगना | ५८९३७७५ | ११६४०३९७ | ५०.६३ |
| ३० | त्रिपूरा | ९५८५८८ | १०५०७०२ | ९१.२३ |
| ३१ | उत्तर प्रदेश | १०४७८३१० | २३३५१२६४ | ७४.८७ |
| ३२ | पश्चिम बंगाल | १३९८९०७८ | १७२८९५९ | ५८.१२ |
| ३३ | उत्तराखंड | १००४८०७ | २७०८२७८५ | ५१.६५ |
| | **एकुण** | **११,६५,१७,७३५** | **२५,९६,५७,१३५** | |

**सारांश :**

ग्रामीण भागातील विकासात मनरेगाने खुप मोठे कृतिशिल पाऊल उचललेले दिसून येते. श्रम करण्याची कुवत आहे. पण हाताला काम नाही. अशांना ३६५ दिवसापैकी १०० दिवस रोजगार देण्याची हमी देवून उदरनिर्वाह भागविण्यास हातभार लावला आहे.

२०१८-१९ मध्ये मनरेगाच्या प्रयत्नाने Active Workers म्हणून ११,६५,१९७३५ मजूर काम करित आहेत. तर मनरेगाअंतर्गत आज देशात एकुण Worker म्हणून २५९६५७१३५ इतके आहेत. यावून ग्रामीण भागातील चित्र पाहता २५ कोटी लोकांना काम म्हणजे २५ कोटी कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविण्यास मदतच झाली आहे. म्हणून ग्रामीण विकासात मनरेगाची खूप महत्वाची भूमिका आहे.

**संदर्भ :**

१) ग्रामीण विकास एवं मनरेगा - डॉ. धर्मेंद्र प्रताप शाही
२) ग्रामीण समाजशास्त्र - डॉ. सरल दूबे
३) ग्रामीण समाजशास्त्र - डॉ. दा. धो. काचोळे
४) विकासका समाजशास्त्र एवं नियोजन - डॉ. गणेश पाण्डेय
५) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र - प्रा. अशोक गोरे
६) Narega Net

# महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण समाजाचा विकास

**प्रा. पी. के. गायकवाड**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय
लोहारा ता. लोहारा जि. उस्मानाबाद

१.१ **गोषवारा (Abstract) :-**

*महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण समाजाचा विकास या दोन प्रक्रियांचा परस्परसंबंध असून महिला सक्षमीकरणाशिवाय ग्रामीण विकासाची प्रक्रिया शक्य नाही. कारण ग्रामीण समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकिय क्षेत्रात महिलांचा वाटा दिवसेदिवस वाढत असल्याचे दिसते. परंतू भारतीय समाज अजुनही पुरुषप्रधान असल्याकारणाने आजही विविध क्षेत्रातील महिलांचे प्रमाण वाढत असले तरी पुरुषांच्या तुलनेत त्यांना मान व सन्मान अजूनही मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यातही ग्रामीण समाजात महिलांना नेहमी दुय्यम वागणूक मिळत असल्याची दिसते. जोपर्यंत ग्रामीण भागातील महिलांचे संपुर्ण सक्षमीकरण होत नाही तोपर्यंत ग्रामीण समाजाचा प्रभावीपणे विकास होऊ शकत नाही, हे वास्तव आहे.*

१.१ **महत्वाचे शब्द :-** महिला सक्षमीकरण, सामाजिक, आर्थिक, राजकीय, विकास, पुरुषप्रधान, मान व सन्मान, ग्रामीण समाज, वास्तव, इ.

## २.० प्रस्तावना ( Introduction) :-

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांमध्ये समानसंधी व स्थान उपलब्ध करुन देणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना त्यासाठी पात्र व सक्षम बनविणे. त्यासाठी समाजात असणारी पुरुषप्रधान संस्कृतीला हद्दपार करुन स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणे हे अत्यंत आवश्यक असल्याचे दिसून येते. पुरुषांबरोबरीने स्त्रियांना प्रत्येक क्षेत्रामध्ये समान हक्क मिळवून देणे आवश्यक असून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात महिलांना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे. त्यासाठी आवश्यक असल्याचे दिसते. अशाप्रकारे महिला सक्षमीकरणाविषयी ची संकल्पना असून त्याआधारे शासनाने व समाजाने पुढाकार घेऊन महिला सक्षमीकरणाची व्यापक चळवळ हाती घेणे अत्यंत आवश्यक आहे.

फार पुर्वीपासून महिलांचे कार्यक्षेत्र 'चुल आणि मूल' यापुरतेच मर्यादित असल्याचे दिसते. भारतातील समाज जीवनाचा विचार केल्यास कुटुंबातील निर्णय घेण्याचे पुर्ण स्वातंत्र्य हे पुरुषांनाच असून स्त्रियांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाकारलेले असल्याचे दिसून येते. यात पुरुषसत्ताक संस्कृतीची बीजे जोपासलेली दिसून येतात. वैदिक काळामध्ये पाहिल्यास स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व स्थान प्राप्त होते. स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने समाज जीवनातील प्रत्येक क्षेत्रात वैदिक काळात सहभाग घेत होत्या. त्यांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार प्राप्त झाले असल्याकारणामुळे वैदिक काळात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता अस्तित्वात होती. मात्र उत्तर वैदिक काळात पुजा , कर्मकांड, अंधश्रद्धा, यांचे स्त्रोत माजले त्यातुन समाजाचा दृष्टीकोन संकुचित झाला. उत्तर वैदिककाळातील लोकांनी स्त्री पुरुष समानता नाकारली. त्यामुळे पुरुष प्रधान संस्कृतीची निर्मिती झाली व स्त्रियांना दुय्यम दर्जा मिळाला यातुन स्त्रियांना सन्मानाची प्रतिष्ठेची वागणूक न मिळता स्त्रियांना समाजात दुय्यम स्वरुपाची वागणूक मिळू लागली व त्यांचे कार्यक्षेत्र हे मर्यादीत बनले. तेव्हापासुन आजपर्यंत महिलांची स्थिती फारशी सुधारलेली दिसत नाही. असे असले तरी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकरणाच्या काळात स्त्री व पुरुष सबंधात मोठ्या प्रमाणावर लवचिकता असल्याची दिसून येते. आज पूर्वीपेक्षा स्त्रियांचा वाटा प्रत्येक क्षेत्रात वाढला असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी अनेक क्षेत्रामध्ये सशक्त नेतृत्व दिले असल्याचे दिसते.

ग्रामीण भागातही स्त्रिया या पुरुषांपेक्षा मागे नसल्याचे दिसते. ग्रामीण विकासात महिलोच योगदान हे महत्वपुर्ण असुन ग्रामीण भागाला एक वेगळे रुप मिळवून देण्यात स्त्रियांनी महत्वाची भुमिका बजावली आहे. ग्रामीण भागात घरकाम करुन स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारची कामे करत असल्याची दिसतात. ग्रामीण भागातील महिला या पुरुषांपेक्षा जास्त कष्ट करतात. याचे कारण महिला या पुरुषापेक्षा अधिक समाजिकदृष्या संयमी असतात. संकटाच्य काळात त्या कधीही हिमंत हारत नाही. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात पुरुषापेक्षा स्त्रिया अधिक कार्यक्षम असल्याने महिलांचे सबलीकरण घडवून आणल्यास ग्रामीण भागाचा कायापालट होऊन ग्रामीण भाग हा मोठ्या प्रमाणावर विकसित होईल यात शंका नाही.

२.१ **ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणातील अडथळे :-**

१. **साक्षरतेचे कमी प्रमाण :-** आजही ग्रामीण भागातील बहुसंख्य महिला निरक्षर असून त्यांच्यात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने त्यांना मिळणारी दुय्यम वागणूक त्या सहन करत असल्याने त्यांचे सबलीकरण झालेले नाही.

२. **सामाजिक रुढी, परंपरांचा प्रभाव** :- ग्रामीण भागात आजही सामाजिक रुढी, परंपरा यांचा प्रभाव अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे स्त्रिया पुरुषांना सन्मानाचे स्थान देत असल्याने पुरुषांनी स्त्रियावर कितीही अन्याय केला तरी त्या पुरुषांविरुध्द बंड करण्यात तयार नाही.

३. **भारतीय संस्कृतीचा प्रभाव :-** ग्रामीण भारतातील स्त्रियांवर भारतीय संस्कृतीचा जबरदस्त प्रभाव असल्यने संस्कृतीला त्या विरोध करत नाही. भारतीय संस्कृती ही प्ररुषप्रधान संस्कृती असल्याचे दिसून येते.

४. **सामाजिक शिक्षणाचा अभाव** :- ग्रामीण भागातील महिला सामाजिक शिक्षणापासून दुर असल्याने त्याचे सबलीकरण झालेले दिसून येत नाही.

५. **जनजागृतीचा अभाव** :- ग्रामीण भागातील महिलामध्ये स्वत:चे हक्क व अधिकार याविषयी जाणीव नसल्याने व त्यांच्यामध्ये त्याविषयी जनजागृती झाली नसल्याकारणाने ग्रामीण भारतात महिला सक्षमीकरणात अडथळे येत आहे.

२.२ **महिला सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी ग्रामीण भागासाठी शासनाने राबविलेल्या उपाययोजना :-** ग्रामीण भागात महिलाचे सक्षमीकराण घडवून आणण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना राबविलेल्या दिसतात.

१. **७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती :-**ग्रामीण भागात महिलांना राजकीय क्षेत्रात नेतृत्व विकसित करण्याची संधी देण्यासाठी शासनाने ७३ वी घटनादुरुस्तीद्वारे पंचायत राज व्यवस्थेत ३३ % टक्के आरक्षण दिले त्यानुसार महिलांना नेतृत्वविकासाची ग्रामीण भागात संधी मिळून ग्रामीण भागातील समाज जीवनात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले.

२. **संजय गांधी निराधार योजना :-** ग्रामीण भागातील महिलांनासबल व सक्षम करण्यासाठी शासनाने संजय गांधी निराधार योजना विधवा महिलांसाठी सुरु केली. त्याद्वारे महिलांना सक्षम करण्यात येते.

३. **महिला उद्योजकांना प्राधान्य :-**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योजकांसाठी प्रोत्साहनपर योजना सुरु केल्या आहेत. त्यामध्ये महिला उद्योजकांना प्राधान्य देऊन त्यांना सक्षम केले जात आहे.

४. **बचत गटाची स्थापना :-**शासनाने महिला बचत गटांची स्थापना करण्यासाठी प्राधान्य दिले असून त्यासाठी शासन ग्रामीण भागातील महिलांना अनुदान देते. महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी उद्योग स्थापन केले असून आज त्या ग्रामीण भागाच्या विकासात महत्वाचा वाटा उचलत आहेत.

**२.३. महिला सबलीकरणाचे ग्रामीण विकासातील योगदान :-**आज ग्रामीण भागातील महिलांचे संपुर्ण सक्षमीकरण झालेले नसले तरी पुर्वीपेक्षा त्या अधिक सक्षम असल्याचे दिसून येतात. आज ग्रामीण भागातील महिला ग्रामीण विकासात महत्वाचे योगदान देत असल्याचे दिसते. खालीलप्रकारे महिलांनी ग्रामीण भागास सशक्त बनविले आहे.

१. महिला बचत गटाद्वारे महिलांनी उद्योगांची स्थापना करुन ग्रामीण भागातील महिला उद्योजक बनल्या आहे. अनेक हातांना रोजगार देण्याचे काम त्यांनी केले आहे.

२. ग्रामीण भागातील महिला शेती व्यवसायाबरोबर अनेक प्रकारचे जोडधंदे करत असल्याचे दिसतात. त्यातून त्यांनी ग्रामीण भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर केलेला दिसून येतो.

३. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबे आहेत. पुरुष पतीच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीनी कुटुंबाला आधार देण्याचे कार्य ग्रामीण भागात केल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे वरील निष्कर्षावरुन महिलांना सक्षम बनविल्यास ग्रामीण भागाचा कायापालट होऊन ग्रामीण भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून येईल.

- **संशोधनाचे महत्व (Singificance of Research) :-** प्रस्तुत संशोधनात महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण समाजाचा विकास यामधील असणारा परस्परसंबंध त्याचप्रमाणे महिला सक्षमीकरणाचे ग्रामीण समाजाच्या विकासावर होणारे परिणाम यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे ( Objective of Research ) :-**

१. महिलासक्षमीकरण व ग्रामीण विकास यांच्यातील असणारा परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणापुढे असणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण भागातील महिलांची स्थिती याचा सुक्ष्मपणे अभ्यास करणे.
४. ग्रामीण विकासात असणारे महिलांचे योगदान तपासणे.
५. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता महिला सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना सुचविणे.

- **संशोधनाची गृहितके** (Hypothesis of Research ):-

१. महिला सक्षमीकरण व ग्रामीण विकास या दोन प्रक्रियांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असल्याचे दिसून येते.
२. ग्रामीण भागाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासात महिलांचे प्रमाण वाढत असले तरी त्यांचे या क्षेत्रात असणारे प्रत्यक्ष वर्चस्व मात्र कमी असल्याचे दिसते.
३. ग्रामीण समाजात आजही महिलांना पुरुषांच्या तुलनेत दुय्यम वागणुक मिळत असल्याने त्यांचे आजही सक्षमीकरण घडून आलेले नाही.
४. ग्रामीण भागाचा सर्वागीण विकास करायचा असल्यास शासनाने महिला सक्षमीकरण प्रभावीपुणे घडुन आण्ण्यासाठी आवश्यकती उपाययोजना करणे आवश्यक आहे.

- **संशोधन पद्धती** (Research Methodology ) :- प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या व्दितीय माहितीच्या साधनांचा वापर करण्यात आला असून संशोधनाच्या विश्लेषणात्मक व वर्णनात्मक या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

- **निष्कर्ष** (Conclusion) :-

१. ग्रामीण विकास व महिला सक्षमीकरण यांचा परस्परांशी जवळचा संबंध असल्याने महिला सक्षमीकरणाशिवाय सर्वांगीण ग्रामीण विकास अशक्य असल्याचे दिसते.
२. ग्रामीण समाजात महिलांना पुर्वीपेक्षा अधिक स्वातंत्र्य मिळाल्याने त्यांचे प्रमाण पुर्वीपेक्षा प्रत्येक क्षेत्रात वाढत असले तरी त्यांचे स्थान आजही ग्रामीण समाजात दुय्यम असल्याचे दिसते.
३. आजही ग्रामीण समाजात महिलांचे सक्षमीकरण पुर्णपणे होऊन शकल्याने ग्रामीण समाजाचा विकास होऊ शकलेला नाही.
४. ग्रामीण समाजात महिलांना पुर्णपणे सक्षम करण्यात शासनाने राबविलेल्या उपाययोजना व कार्यकम अपयशी ठरल्याचे दिसून येते.

- **शिफारशी** (Recomendation):-

१. ग्रामीण भागातील सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी तसेच महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सामाजिक सुधारण कार्यक्रम सामाजिक संस्थांनी हाती घेणे आवश्यक आहे.
२. ग्रामीण समाजात महिलांना मानाचे स्थान प्राप्त करुन देण्यासाठी शासनाने कडक नियम व संतुलित उपाययोजना यांची निर्मिती करणे आवश्यक आहे.
३. महिलांचा ग्रामीण समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा क्षेत्रात प्रवेश झालेला असून या क्षेत्रात महिलांना संरक्षण व स्वायत्तता मिळवुन देण्याचे काम शासकीय व सामाजिक पातळीवर होणे आवश्यक आहे.

- **संदर्भ (References):-**

१. 'लोकराज्य' मासिक, महाराष्ट्र शासन, २०१८
२. The Indian, Express, News paper
३. दै. 'लोकमत, ' वर्तमानपत्र
४. मिल जॉन स्टुअर्ट, 'सबजेक्शन ऑफ वूमेन'
५. मेरी वूलस्टोनक्राफ्ट, 'The Vindication Right at Women'
६. 'दै महाराष्ट्र टाईम्स, ' वर्तमानपत्र
७. 'The Hindu, ' News paper, २०१८

# ग्रामीण विकासाच्या योजना व ग्रामीण विकासाची दिशा

**प्रा.डॉ.कल्पना हनुमंतराव घारगे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, गेवराई
लोकप्रशासन अभ्यास मंडळ, सदस्य
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा,विद्यापीठ औरंगाबाद.

कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील ग्रामीण भागाच्या विकासावर अवलंबून असतो.भारत हा एक कृषिप्रधान देश असून त्याचा विकास हा पूर्णपणे देशातील ग्रामीण भागावर अवलंबून आहे. जर एखादा देश विकसित करायचा असेल तर त्या देशातील‘खेडे’सुधारायला हवेत. म्हणजे काय तर खेडयांचा विकास करायला पाहिजे आणि हे सर्व काही तेव्हाच होऊ शकते, जेव्हा शासनाच्या कार्यक्रमात जनतेचा मोठया प्रमाणात सहभाग असेल.

आपल्या भारत देशात आजही 65% लोकसंख्या ग्रामीण भागात आहे.मात्र शहरी भागात जसा मोठया प्रमाणात विकास झाला तसा वेग मात्र ग्रामीण भागाच्या विकासासंदर्भात असल्याचे दिसून येत नाही.राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खेडयाकडे चला हा दिलेलासंदेश विसरुन शहराकडे चला हा मंत्र सर्वत्र दिसत आहे.शिक्षणासाठी शहराकडे आलेली पिढी उच्च शिक्षण घेतल्यानंतर खेडयाकडे पाठ फिरवताना दिसते.या परिस्थितीचा खेडयांच्या विकासावर प्रतिकुल परिणामहोताना दिसून येत आहे.

ग्रामीण विकासात समाजातील मातृशक्ती, संतशक्ती, संघशक्ती आणि युवाशक्ती यांच्या माध्यमातून जलसंपदा, जंगल-वनसंपदा, जमीन भूसंपदा, जनावर, जैवविविधता संपदा, उर्जा संपदा आणि जनसंपदाचासमाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग, विचार घेऊन करण्याची पर्यावरणपूरक शाश्वत विकास प्रक्रिय आहे. तसेच ग्रामीण भागात सुविधा राबवून ग्रामीण भागाचा मोठया प्रमाणात विकास केला गेला पाहिजे.ग्रामीण विकास करायचा असेल तर ग्रामीण लोकांची मानसिकता बदलली पाहिजे.

## ग्रामीण विकासाच्या योजना

### 1. समुदाय विकास योजना (Community Development Porgramme)

2 ऑक्टोबर 1952 रोजी ग्रामीण भारताच्या सर्वांगिन विकासासाठी भारत सरकारने राष्ट्रीय पातळीवर सुरु केलेली पहिलीच महत्त्वाची योजना म्हणूनसमुदाय विकास कार्यक्रम या योजनेला ओळखले जाते. या योजनेचे उदिष्टहेहोते की, ग्रामीण भागातील नेतृत्वाचा विकास करुन त्याद्वारे ग्रामीण भागाचा विकास घडवून आणणे या योजनेला पुरकठरेल आणि सर्व समुदायाचा ग्रामीण विकासाच्या कामात सहभाग वाढविण्याच्या दृष्टिने 1993 मध्ये करण्यात आलेली 73 वी घटनादुरुस्ती अतिशय महत्वाची ठरते. यानुसार ग्रामीण भागातील सर्व जातीघटकातीलसमुदायाला अरक्षण मिळाल्यामुळे नेतृत्व मिळण्यास मदत झाली.त्यात अनुसूचित जाती जमातीबरोबरच स्त्रीयांनाही आरक्षण मिळाले.आज ग्रामीण भागात कितीतरीस्त्रीयासक्षमपणे गावचा कार्यभार संभाळताना दिसून येतात.

### 2. एकात्मिक ग्रामीण विकास (Integrated Rural Development Progarmme)

ही योजना 1978-79 पासून प्रायोगिक स्वरुपात सुरु करण्यात आली.2 ऑक्टोबर 1980 पासूनहा कार्यक्रम व्यापक स्वरुपात राबविण्यात आला.या योजनेच्या खर्चाचे प्रमाण 50.50% या प्रमाणात केंद्र आणि राज्य सरकार करत असे.या योजनेचे उदिष्ट ग्रामीण भागातील दारिद्र दूर करणेहेहोते.या योजनेत ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 20 हजार रुपयापेक्षा कमी अशा कुटुंबाला दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी आर्थिकसहाय्य दिले जाते.

### 3. ग्रामीण युवा स्वंयरोजगार प्रशिक्षण योजना : (Training for Rural Youth for Self Employment)

या योजनेची सुरुवात 15 ऑगस्ट 1979 सालीझाली. या योजनेचेउदिष्टे : ग्रामीण भागातील सुशिक्षीत युवकांना स्वयंरोजगारातून रोजगार निर्मिती करणेहेहोते.

**4. सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार :**ही योजना 1 एप्रिल 1999 ला सुरु झाली.

**5. रोजगारहमी योजना -** 1965 सांगली - तासगाव येथे प्रायोगिक तत्वावर सुरु केली आणि 1972 च्या दुष्काळात व्यापक स्वरुपात संपूर्ण राज्यात सुरु करण्या आली.26 जानेवारी 1978 ला महाराष्ट्रसरकारने कायदा करुन तो लागू करुन भारतात प्रथमच कामाचाहक्कहे तत्व स्वीकारले.

**6. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार योजना :**

2 फेब्रुवारी 2006 रोजी 200 जिल्हयांमध्येही योजना सुरु करण्यात आली.2008 पासूनसंपूर्ण देशभरात लागू करण्यात आली.2 ऑक्टोबर 2009 पासून या योजनेस महात्मा गांधीचे नाव देण्यात आले.या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास प्रत्येक आर्थिक वर्षात किमान 100 दिवसाचा रोजगार मिळवून देण्याचीहमी देण्यात आली.काम करण्यास इच्छुक परिवारास ग्राम पंचायतीमध्ये नोंदणी केल्यानंतर जॉब कार्ड जारी करण्यात येते.अर्जदाराने अर्ज केल्यापासून 15 दिवसाच्या आत त्याच्या घरापासून 5 किलोमिटर अंतराच्या परिसरात त्याला रोजगार पुरविला जातो.तसे न झाल्यास अर्जदारास प्रतिदिन बेरोजगांरी भत्ता दिला जातो.मनरेगांतर्गत महिलांसाठी 33% आरक्षणाचीतरतुद करण्यात आली आहे.

या व अशा स्वरुपाच्या ग्रामीण विकासाच्या अनेक योजना भारत व महाराष्ट्र शासन ग्रामीण विकासासाठी राबवित असल्याचे आपणास दिसून येते.

ग्रामीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे सर्वासाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र 2019 अंतर्गत 'जलयुक्त शिवार' ही योजना काही प्रमाणात जीवनदायी ठरली आहे. 2014-15 मध्ये भूजल पातळीत 2 मिटर पेक्षा जास्त घट झालेल्या 188 तालुक्यातील 2 हजार 234 गावे तसेच शासनाने टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या 22 जिल्हयातील 19 हजार 59 गावामध्येहे अभियान प्राधान्याने राबविण्यात येत आहे. भविष्यात राज्याच्या उर्वरित भागात पाणी टंचाई निर्माण होऊ नये.यासाठीही उपाय योजना करण्यावर भर दिला जाते आहे.

अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणामहोत आहे.या बाबी ग्रामीण विकासासमोर एक आव्हान ठरत आहेत.गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धी अभावी कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठया प्रमाणात चढ-उतार दिसून येतो. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारीही परिस्थिती बदलण्यासाठीहे अभियान राबविल्यास पिण्याचे पाणी व पिकाससंरक्षित सिंचन देण्याची व्यवस्था निश्चितपणे निर्माण होईल. या योजनेचा प्रमुख उद्देश म्हणजे पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे, भूगर्भातील पाणी पातळीत वाढ करणे. जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून पाणीसाठा वाढविणे, पाण्याच्या वापराबाबत प्रभावीपणे जनजागृती व वृक्षलागवडीस प्राधान्य देणेहा आहे.

जलयुक्त शिवाय योजनेमध्ये लोकसहभागातून झालेली कामे अवाक करायला लावणारी आहेत.आपल्याकडे पूर्वापार चालत आलेली म्हण आहे, 'गाव करीतो राव न करी' या म्हणीची सत्यताच कळते.स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये सर्वांत मोठा लोकसभाग असलेले जलयुक्त शिवार अभियान विकेंद्रित व शाश्वत जळसाठे निर्माण करणारी परिवर्तनाची लोकचळवळ ठरली आहे.

याच बरोबर सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नाम फाऊंडेशन व पाणी फाऊंडेशन यांनीखुप मोठया प्रमाणावर लोकसहभागातून चळवळ उभारली आहे.कारण ग्रामीण विकासासाठी दिशा ठरविताना संचनाला अनन्यसाधारण महत्व आहे.याबाबत अलीकडे झालेल्या संशोधनावरुन असेस्पष्ट दिसून येते की, ग्रामीण भागात ज्या गावामध्ये सिंचन सुविधा उपलब्ध आहेत.त्या गावाचा सर्वांगिण विकास हा सिंचन सुविधा उपलब्ध नसलेल्या गावापेक्षा 3 ते 6 पटीने अधिक आहे.म्हणून ग्रामीण विकास करण्यासाठी जास्तीत जास्त सिंचनावर भर देणे गरजेचे आहे.

ग्रामीण विकासाचा विचार करताना आपणास ग्रामीण भागांत शिक्षणाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध कराव्या लागतील. प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ग्रामीण भागातील युवकांना बाहेर पडावे लागते. अशावेळी त्यांच्यासमोर अनेक समस्या मुख्यत्वे आर्थिक समस्या असते.परिणामी शिक्षण पूर्णत्वास नेता येत नाही.याही कारणामुळे पाहिजे त्या प्रमाणात ग्रामीण विकास साध्य करता येत नाही.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी दळणवळणाच्या सुविधा वाढविण्यावर भर दिला गेला पाहिजे. आज माहिती तंत्रज्ञानामुळे जग हे एक वैश्विक खेडे बनत चालले आहे. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासासाठी दळणवळणाच्या सुविधा वाढविणे गरजेचे आहे.याच बरोबर ग्रामीण आरोग्यायावरही भर दिला जात आहे. आज ग्रामीण भागात डॉक्टरथांबण्यास तयार नाही. शासनाचा पगार घेऊन खाजगी प्रॅक्टीस करणारे डॉक्टर आपणास पहावयास मिळतात.त्यामुळे ग्रामीण विकासात आरोग्य विषयक सुविधांचा अभाव हा देखील एक अडसर बनत चालला आहे.

गांधीजींच्या स्वप्नातील भारत खऱ्या अर्थाने खेडयामध्येहोता.ग्रामीण भागातील ग्रामोदयोग व कुटीरोदयोग यांचा अस्त झाला.त्यामुळे लोकांच्या उदर निर्वाहाची समस्या निर्माण होऊन त्याचा लोकांच्या आर्थिक जीवनावर परिणाम झाला.शासनाने बंद पडलेल्या व अर्धवट अशा ग्रामोद्योगांना चालना देण्यासाठीहे व्यवसाय करणाऱ्यांना भांडवल पुरवठा

करुन ग्रामविकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय असणाऱ्या 'शेती' त आधुनिक तंत्रज्ञानामुळे बराच विकास होत आहे. आज माती परिक्षणापासूनते पिक येईपर्यंतच्या कामामध्ये शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेत आहे.

ग्रामीण भागात आजकाल पांरपारिक उर्जेचा वापर बराच वाढला आहे.ग्रामीण भागात जागोजागीसौर दिवे लावले गेले आहेत.त्यामुळे विजेची बचत तर होतच आहे.सोबत फुकट मिळणाऱ्या सौरऊर्जेचा वापरही करुन घेताना दिसून येतो.सौरऊर्जेचा वापर करुन सौर दिव्यासोबत सौरबंब, सौरचुली आणि सौरकुकरही ग्रामीण भागात हल्ली मोठया प्रमाणात वापरले जात आहेत.

सर्वांत महत्त्वाची व आवश्यक बाब म्हणजे शासनाच्या ग्रामीण विकासाच्या योजनांची माहिती ग्रामीण भागातील लोकांपर्यंत नेऊन पोहचविणे शासनाच्या योजनेत जनतेचा सहभाग जास्तीत जास्त प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे.
ग्रामीण भागाचा विकास साध्य करण्यासाठी प्रामुख्याने

1. दारिद्रय निर्मुलन
2. भूक निर्मुलन
3. चांगले आरोग्य
4. दर्जेदार शिक्षण
5. लैंगिक समानता
6. शुध्दपाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता
7. नुतनीकरण करण्याजागी व स्वस्त उर्जा
8. नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा
9. असमानता कमी करणे.

यासाठी सर्व स्तरातून काम करण्याची गरज आहे. वरील बाबींचा विकास घडून आला तर महात्मा गांधी यांचा दृष्टिकोन सत्यात उतरेल. प्रत्येक खेडेहे आपल्या गावाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्वंयपूर्ण असेल. या करीतासामुदायिक तत्वाचा गावात विकास झाला अशी अग्रही भूमिका ग्रामीण भागाचा विकास करताना ठेवणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

1. भारतातील स्थानिक शासन, डॉ.शांताराम भोगले.
2. महाराष्ट्र शासन आणि राजकारण, प्रा.भिवसनकर
3. पंचायत राज आणि नागरी प्रशासन, डॉ.अर्जुनराव दर्शनकार
4. ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, डॉ.दा.धो.काचोळे.
5. यशाची परिक्रमा- ऑक्टोबर 2014.
6. लोकराज्य- ऑगस्ट 2015.
7. http//: www.un.org/sustainabledevelopment15untainable-development.gools.

# ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान

**डॉ.संजय गायकवाड (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)**
श्री योगानंद स्वामी कला महाविदयालय,
वसमतनगर जि.हिंगोली

**प्रा.जिजाभाऊ घुले (राज्यशास्त्र विभाग)**
श्री ढोकेश्वर महाविद्यालय टाकळी ढोकेश्वर
ता.पारनेर जि.अहमदनगर

**प्रस्तावना**

लोकशाहीत विकेंद्रीत नियोजन व्यवस्था निर्माण व्हावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आली. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेस 'पंचायतराज' या नावाने ओळखले जाते. पंचायतीच्या रुपाने अस्तित्वात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राचीन व गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे संघटन व कार्यपध्दतीचे स्वरुप मुख्यत: ब्रिटिश शासन पध्दती प्रमाणे होते. पुढे ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे खऱ्या अर्थाने या संस्थांच्या एकुण कार्यप्रमाणालीमध्ये आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांना घटना दुरुस्ती केल्या नंतर अनेक महत्त्वाचे अधिकार प्राप्त झाले. स्थानिक स्वराज्य संस्था या ग्रामीण विकासाचा पाया असून आजच्या आधुनिक काळात या संस्था ग्रामीण विकासामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. प्रदेशपरत्वे त्यांच्या नावांत, अधिकारांत व कर्तव्यात फरक आढळतो आणि देशपरत्वे यांची नावेही निरनिराळी आढळतात असे असले तरी ग्रामीण भागातील खेडी आत्मनिर्भर व समृध्द बनविण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. पायाभूत सुविधांच्या विकासापासून लोककल्याणकारी कार्य पार पाडून लोकशीच्या संवर्धनाची महत्त्वाची कामगिरी त्या यशस्वीरित्या त्या बजावत आहेत.

**स्थानिक स्वराज्य संस्था :-**

"महात्मा गांधीजींनी खरा भारत हा खेडयात आहे. खरा भारत हा शहरांत नसून तो सात लाख खेडयांमध्ये आहे म्हणून ग्रामीण भागाच्या विकासांकडे मुख्यत्वाने लक्ष केंद्रीत केले पाहिजे असा संदेश दिला." [१] भारताचा सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्विकार केला. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेचा पुरस्कार करुन गाव तिथे ग्रामपंचायत या तत्वाचा स्विकार करण्यात आला. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर ग्रामीण विकास साधण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था भारतभर कार्य करताना दिसून येतात. स्थानिक स्वशासन संस्था लोकशाहीचा मुलाधार आहेत त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवरील दैनंदिन व विकासात्मक गरजा पुर्ण करणारी एक यंत्रणा आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था : संकल्पना व अर्थ :**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अनेक व्याख्या विविध अभ्यासकांनी आपणांस केल्याचे दिसून येते. त्या खालील प्रमाणे सांगता येतील.

१) **गोल्डींग :-** "स्थानिक लोकांनी स्वत: त्यांच्या प्रश्नांची व्यवस्था करणे म्हणजे स्थानिक शासन होय."

२) **जी.डी.एच. कोल :-** "स्थानिक शासनाचे कार्यक्षेत्र लहान असते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना सोपविलेले कार्य ते करतात. ते सार्वभौम नसतात ते कायदे करीत नसतात. वरिष्ठ संस्थांनी तयार केलेल्या कायद्यांची ते अंमलबजावणी करतात.

३) **डब्ल्यु इ. जॅक्सन :-** "स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे विशिष्ट भागातील लोकांनी लोकशाही पध्दतीने निवडून दिलेल्या परिषदेकडून स्थानिक कारभारांचे व सेवांचे व्यवस्थापन व प्रशासन करणे होय.[२]"

४) **एनसायक्लोपिडीया ब्रिटीनिका ज्ञानकोश :-** "स्थानिक शासन म्हणजे राज्यापेक्षा मर्यादित असलेल्या प्रदेशातंर्गत निर्णय घेण्याचा व तो आंमलात आणण्याचा अधिकाय होय. निर्णय व अंमलबजावणी स्वतंत्र्यावर भर असणे हे स्थानिक शासन संस्थांचे महत्त्वाचे लक्षण होय."

थोडक्यात वरील विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या पाहिल्यानंतर आपणांस असे म्हणता येईल की, एकाच देशातील गांव, तालुका किंवा तत्सम विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित असलेले शासन म्हणजे स्थानिक शासन होय. राष्ट्रीय किंवा घटक राज्याच्या शासनाद्वारे कायदा करुन स्थानिक शासन निर्माण केले जाते. अशा प्रकारे स्थानिक स्वराज्य संस्था

ही स्थानिक अशा - अपेक्षांनुरुप चालणारी, स्थानिक समस्यांची सोडवणूक करणारी, दैनंदिन कार्याच्या स्वरुपात स्वायत्त असणारी, परंतु केंद्र किंवा राज्यांच्या अधिन राहून कार्य करणारी स्थानिक प्रतिनिधीत्वाची सुसूत्र व्यवस्था होय.

ना. र. इनामदार यांच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थांचे सैध्दांतिक अस्तित्व खालील तीन घटकांवर अवलंबून असते. यामध्ये १, अधिकारांचे विकेंद्रीकरण, २ सत्तेचे विकेंद्रीकरण ३. निर्णय **प्रक्रियेतील स्थानिक जनतेचे सहभागीत्व.**

थोडक्यात एक आदर्श स्थानिक स्वराज्य संस्था तेव्हांच निर्माण होऊ शकते जेव्हा प्रशासकीय व राजकीय दृष्टीकोनातून अधिकार विकेंद्रीत असतील. अशा सत्तेत निर्णय घेण्याचे व धोरण आखण्याचे अधिकार स्थानिक जनतेला आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून प्राप्त झालेले असतील.

**ग्रामीण विकास : संकल्पना व अर्थ**

केवळ उत्पादन वाढ म्हणजे विकास नव्हे किंवा भौतिक वस्तुंचे उत्पादन व वाढ म्हणजे विकास नाही तर उपभोगासाठी निर्माण केली जाणारी उत्पादान साधने व उत्पादनाचा सर्व मानवी समाजाला उपयोग व्हावा या दृष्टीकोनातून विकास संकल्पनेकडे पाहिले जाते. "ऐका व्यक्तीकडून समुहाचा विकास होत असतो. त्याच समुहाचा झालेला विकास म्हणजे ग्रामीण विकास असे म्हणता येईल.[३]"

विविध अभ्यासकांनी ग्रामीण विकासाच्या व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. **डॉ.व्ही.के.आर.व्ही.राव :-** "ग्रामीण क्षेत्रातील जीवनमानात सुधारणा करण्यासाठी तेथील नैसर्गिक व मानवी संसाधनांचा पर्याप्त वापर करणे म्हणजे ग्रामीण विकास होय."
२. **जागतिक बँक अहवाल :-** ग्रामीण गरीबांच्या विशिष्ट गटाच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानात सुधारणा करण्यासाठी तयार केलेली व्यवहार रचना म्हणजे ग्रामीण विकास होय."
३. **भारतीय नियोजन आयोग :-**"ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा घडवून आणली जाते तिला ग्रामीण विकास म्हणता येईल.[४]"
४. **पार्थ सारथी :-** "ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील निर्धनांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी करण्यात आलेला प्रयत्न होय."

थोडक्यात ग्रामीण विकास म्हणजे, लोकसहभागातून ग्रामीण क्षेत्रातील नैसर्गिक व मानवी संसाधनांचे संवर्धन, विकास व कार्यक्रमाचा वापर करुन तेथील जनतेच्या जीवनमानात आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक बदल घडवून आणणे होय. "दररोजच्या जीवनामध्ये ग्रामीण लोकांनी त्यांच्या कामकाजाच्या व जीवन जगण्याच्या सवयींत चांगला बदल घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय."[५]

**ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थेचे योगदान :**

ग्रामीण भागाच्या विकासाची महत्त्वाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातुन पार पाडली जाते. केंद्र व राज्य शासन ग्रामीण विकासासाठी जी काही धोरणे, योजना, कार्यक्रम ठरवते. त्या सर्वांच्या अंमलबजावणीचे कार्य स्थानिक स्वराज्य संस्थेस पार पाडावे लागते. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण विकासाच्या योजना आणि कार्यक्रम किती कार्यक्षमपणे आणि पारदर्शकपणे राबविते व त्याची अंमलबजावणी करते यावरच ग्रामीण विकास अवलंबून आहे. "ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत ७३ वी घटना दुरुस्ती करुन ११ वे परिशिष्ट संविधानामध्ये समाविष्ट करण्यात आले व या परिशिष्टामध्ये २९ विषयांची यादी देण्यात आलेली आहे. परिशिष्टातील समाविष्ट विषयांतील कामे करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना अनिवार्य आहे."[६] या कामांतूनच ग्रामीण विकासातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान स्पष्ट होते. स्थानिक स्वराज्य संस्था पार पाडत असलेल्या कामांचा आपणांस पुढीलप्रमाणे थोडक्यात आढावा घेता येईल.

१. **कृषी विषयक कार्य :** ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे पंचायतराज मार्फत कृषी विकासाच्या विविध योजना व उपक्रम राबविले जातात. उदा. शेतकऱ्यांना शेती साहित्यांचे वाटप, खते व बी बियाणे, औषधे वाटप, शेततळे, फळबाग लागवड, कृषी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन इत्यादी योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्वतंत्र कृषी विभाग कार्यरत आहे. थोडक्यात कृषी विषयक कामांच्या माध्यमातून ग्रामीण भागांचा विकास करण्याचा सतत प्रयत्न केला जातो.

२. **पशुसंवर्धन व दुग्धविकास विषयक कार्य :** ग्रामीण भागात शेती व्यवसायाला पुरक असा पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय केला जातो. यासाठी शेतकरी गाय, बैल, म्हैस, शेळया, मेंढया इत्यादी जनावरे आणि कुकूटपालन व्यवसायही

केला जातो. यांचे संवर्धन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत अनेक योजना व उपक्रम राबविले जातात. यामध्ये प्रमुख्याने गांवामध्ये जनावरांचे दवाखाने चालविणे, मोफत औषधोपचार करणे, सुधारित पैदाशिच्या जनावरांचे वितरण करणे, मोफत लसीकरण करणे, जनावरांचे प्रदर्शन व मेळावे भरविणे, गुरांना चाऱ्याची व्यवस्था करणे. मुरघास पैदशीबाबत प्रशिक्षण देणे. दुग्धविकासाला चालना देणे इत्यादी कामे केली जातात. थोडक्यात स्थानिक संस्थाद्वारे पशुसंवर्धन व दुग्ध विकासात महत्वाचे योगदान देऊन ग्रामीण विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

**३. वनसंवर्धन (जंगल व गायरान जमीन) विषयक कार्य :** गावाच्या क्षेत्रात असलेली गायरान जमीन व जंगल यांचे संवंधन होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत विशेष प्रयत्न केले जातात. गायरान जमीनीवर जनावरांना चारण्यासाठी अटकन केली जाते. जंगले व पडीक जमीन पाणलोट क्षेत्राचा विकास करुन पाणी आडवले जाते. जमिनीची धुप होऊ नये म्हणून वृक्षारोपण केले जाते. तसेच वनसंवर्धनाचे महत्व पटवून देण्यासाठी जनजागृती करुन जास्तीत जास्त लोकांचा सहभाग मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यातून स्थानिक स्वराज्य संस्थांची वनविषयक व पर्यावरण संवर्धन विषयक भूमिका स्पष्ट होते.

**४. शिक्षण विषयक कार्य :** ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार व्हावा व तळागाळातील प्रत्येक व्यक्तीला मोफत शिक्षण मिळावे यासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत केली जाते. ग्रामीण भागातील प्रत्येक भागात जिल्हा परिषदेच्या शाळा स्थापन केल्या केल्या आहेत. या शाळेचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण, नियंत्रण, शैक्षणिक साहित्याचा पुरवठा आणि शिक्षकांच्या निवडी, मोफत पुस्तके व गणवेश वितरण व्यवस्थापनाचे सर्व कार्य स्थानिक स्वराज्य संस्था करते.

**५. आरोग्य व ग्रामस्वच्छता विषयक कार्य :** गावाच्या स्वच्छतेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, निर्मल ग्रामस्वच्छता अभियान हगणदारीमुक्त अभियान, शौचालय बांधण्यासाठी आनुदान देणे, बंधिस्त गटार व्यवस्था इत्यादी अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण स्वच्छते विषयचे कार्य केले जाते.ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही महत्वाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेला पार पाडावी लागते. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करुन याद्वारे विविध आरोग्य विषयक सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. आरोग्य केंद्रामार्फत लसीकरण, साथीच्या आजाराविषयी जनजागृती, आरोग्य शिबीरे, मोफत आरोग्य तपासणी, महिला प्रसुती गृहांची व्यवस्था, पोषक आहाराबाबत जनजागृती इत्यादी कार्य पार पाडले जाते.

**६. राजकीय कार्य :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमाततून ग्रामीण भागात नेतृत्व उदयास येत आहे. समाजातल्या सर्व स्तरांना आरक्षणाच्या माध्यमातून सहभागी करुन घेतले जाते. त्यामुळे या संस्थाच्या माध्यमातून सामान्य जनतेला सहभागी करुन घेतले जाते. त्यामुळे या संस्थांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात राजकीय जागृती होऊन नवीन नेतृत्व निर्माण होण्यास मदत झाली आहे महिलाना ५०% आरक्षण देऊन त्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास घडून आणण्याचे महत्वाचे कार्य या संस्थामार्फत केले जाते. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमधून पुढे आलेले ग्रामीण नेतृत्व राज्य व केंद्रात महत्वाच्या पदावर कार्य करत आहे. हे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेमुळेच शक्य झाले आहे.

**७. सार्वजानिक रस्ते व दिवाबत्ती स्वच्छ पाणी पुरवठा विषयक कार्य :** ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते व दिवाबत्तीची व्यवस्था करण्याचे कार्य स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे केले जाते. करांच्या माध्यमातून जी रक्कम जमा होते ती रक्कम रस्ते व दिवाबत्तीसाठी काही प्रमाणात खर्च केली जाते. तसेच राज्य शासन व वित्त आयोगाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जातो. ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची महत्वाची जबाबदारी ही संस्था करते. नळ योजना, विहिर, हातपंप याद्वारे पाणीपुरवठा केला जातो. तसेच पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो.

**८. समाज कल्याण विषयक कार्य :** स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत अनेक समाज कल्याण योजना राबविल्या जातात. उदा. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वस्तीगृहे, गरीबांना लघुउद्योगासाठी वित्त साहाय्य, अस्पृश्यता निवारण कार्यक्रम, प्रशिक्षण, मोफत घरकुल योजना, दलित वस्ती सुधार कार्यक्रम इत्यादी माध्यमातून सामाजिक कल्याणाची कार्य पार पाडली जातात.

**९. महिला प्रशिक्षण विषयक कार्य :** आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अधिक कार्यक्षमपणे काम करत आहेत. अनेक संस्था महिला मार्फत चालवल्या जात आहेत. ग्रामीण भागाचा कायापालट करण्यामध्ये या संस्थांची भूमिका महत्वाची आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे महत्वाचे कार्य स्थानिक स्वराज्य

संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले. महिलांचे स्वप्न साकार करण्यामध्ये व त्यास मुर्तरुप देण्यामध्ये या संस्थांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**सारांश :**

आपणास असे म्हणता येईल की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून कृषी, आरोग्य, ग्राम स्वच्छता, महिला सशक्तीकरण, शिक्षण, पाणीपुरवठा, सामाजिक कल्याण, अस्पृशता निवारण, वनसंरक्षण व वनसंवर्धन, अंधश्रध्दा निर्मुलन इत्यादी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था या ग्रामीण विकासाचा पाया आहे. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्ती करुन या संस्थांना अधिक अधिकार प्रदान करुन संपूर्ण ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे कार्य आज केले जात आहे. म्हणूनच आपणास असे म्हणता येईल की, ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे.

**संदर्भ सूची :-**

१) भिसे आर.एम., २०१२, वर्तमान परिस्थितीत महात्मा गांधीच्या विचारांची आवश्यकता, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव, पृ.क्र.३६८.
२) बंग आर.के., २००५, भारतातील स्थानिक स्वशासन, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर पृ.क्र.२-३.
३) आघाव दत्तात्रय, ग्रामीण विकास आणि योजना चिन्मय प्रकाशन, पृ.क्र. - १२.
४) उपरोक्त पृ.क्रं.२०.
५) करे बिभिषण, लोकसहभाग आणि ग्रामीण विकास, डायमंड पब्लीकेशन पृ.क्र. ३१.
६) बिराजदार, घोडके, १९९९, भारतातील स्थानिक स्वशासन संस्था, अंशुल पब्लीकेशन, पृष्ठ क्र. १०३-१०५.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# भारतीय संविधानातील महत्त्वपुर्ण क्रांती - ७३ वीं घटनादुरुस्ती

**प्रा. गिता गिरवलकर**
लोकप्रशासन विभाग,
महात्मा बसेवश्वर महाविद्यालय, लातूर

---

**प्रस्तावना :**

भारत हा देश प्रामुख्याने खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत अधिकांश जनता छोट्या-छोट्या गावात वास्तव्य करत होती. परंतु जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, निर्गंतुकीकरण इत्यादी संकल्पनामुळे नागररीकरणात सुरुवात झाली. तरी ही आज १२५ कोटी लोकसंख्येपैकी ६० टक्के जनता ही छोट्या गावांमध्ये राहते, त्यामूळे स्थानिक शासनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे, त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरणावर अधिक भर दिला जातो.

केंद्र शासन
↓
राज्य शासन
↓
स्थानिक शासन

सत्तेच्या व अधिकारांच्या विकेंद्रीकरणामुळे शासन व जनता ह्या दोहोंमध्ये आपुलकीचे, विश्वासाचे नाते निर्माण होते. स्थानिक स्वशासन व्यवस्थेला लोकशाही व्यवस्थेचा मूलाधार मानले जाते. स्थानिक स्वशासन शासकीय यंत्रणेतील निम्न स्तरावर कार्य करणारी यंत्रणा असून समाजाला जनतेच्या दैनंदिन जीवनाशी तिचा संबंध येत असतो. केंद्रशासन व राज्यशासनाच्या तुलनेत स्थानिक स्वशासन जनतेच्या अधिक जवळच असते. म्हणूनच स्थानिक स्वशासनास शासनाची पहिली कडी म्हटले जाते.

**साहित्याचा आढावा :**

१९१९ च्या भारतीय कायद्यातील तत्त्वानुसार विविध प्रांतात ग्रामपंचायत स्थापन झाल्या. १९३५ साली भारतसरकार कायदा संमत केला गेला. त्यामध्येही ग्रामीण शासनाला महत्त्व दिले गेले. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अंमलात आली. राज्यघटनेतील कलम ४० अंतर्गत राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ग्रामस्तरावर ग्रामपंचायत स्थापन करण्यासंबंधी तरतूद आहे. २ ऑक्टोबर १९५२ रोजी भारतात ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या उद्देशाने सामुदायिक विकास कार्यक्रम सुरु करण्यात आले. ३ ऑक्टोबर १९५३ रोजी या कार्यक्रमाचे विस्तारीत रुप राष्ट्रीय विस्तार सेवा योजना सुरु करण्यात आली. या दोन्ही कार्यक्रमाचे मुल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषदेने १९५७ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने सामुदायिक विकास कार्यक्रमाच्या विकेंद्रीकरणाची शिफारस केली. केंद्रीय सरकारने या शिफारशींचा स्वीकार करुन लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालूका स्तरावर पंचायत समिती आणि ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी घटकराज्यांना स्वतंत्र कायदे करुन या संस्था स्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले.

**उद्दिष्टे :**

- ग्रामीण सामुदायिक विकास कार्यक्रमाची यशस्वीता अभ्यासणे.
- ७३ वी घटनादुरुस्तीचे ग्रामीण विकासातील योगदान अभ्यासणे.
- ग्रामीण विकासातील अडथळे व मर्यादा अभ्यासणे.

**गृहितके-**

- ७३ वी घटनादुरुस्ती राज्यघटनेतील महत्त्वाचे क्रांती होय.
- या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला.

**संशोधन पध्दती :** हा संशोधन लेख लिहिण्यासाठी विविध मासिके, वर्तमानपत्रे व संदर्भग्रंथांचा अभ्यास केला. तसेच इंटरनेट याचा वापर करण्यात आला.

स्थानिक स्वशासन व्यवस्था स्थानिक पातळीवरील दैनंदिन व विकासात्मक गरजा पुर्ण करणारी प्रभावशाली यंत्रणा आहे. कल्याणकारी राज्यनिर्मितीसाठी स्थानिक पातळीवर सत्ता रुजविण्याची व शासनाच्या कार्यात जनसहभाग वाढविण्याची ती एक प्रक्रिया आहे. राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी करणारी एक प्रभावी यंत्रणा म्हणजे स्थानिक शासन होय. त्यामुळे जगातील बहुमांशी राष्ट्रांनी राज्यकारभाराच्या सुविधेसाठी व स्थानिक जनतेच्या कल्याणासाठी स्थानिक स्वशासनाचा स्वीकार केलेला आहे.

**ब्रिटानिका शब्दकोश :**

स्थानिक स्वशासन म्हणजे एकूण राज्यऐवजी अंर्तगतदृष्टया लहान भूभागात व्यवस्थापन करुन, निर्णय घेऊन त्याची कार्यवाही करणारी सत्ता होय.

**सर आयव्हर जेनिंग :**

स्थानिक स्वशासन म्हणजे केवळ स्थानिक शासन व्यवस्था नसून, अशी व्यवस्था आहे जी आपल्यापेक्षा वरिष्ठ शासनास जबाबदार असते.

भारताचे संविधान (७ व्या अनुसूचीतील, राज्यसूची ५ वी तरतूद)

स्थानिक शासन म्हणजे महानगरपालिका, सुधारणा विश्वस्त मंडळे, जिल्हा मंडळे, स्थानिक स्वयंशासन किंवा ग्रामप्रशासन यांच्या प्रयोजनार्थ असलेली अन्य स्थानिक प्राधिकरणे यांची घटना व त्यांचे अधिकार.

पंचायतराज व लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण पर्वास प्रारंभ करणारी घटना म्हणजे भारतीय राज्यघटनेतील ७३ वीं घटनादुरुस्ती विधेयक होय. ग्रामीण भागात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी आणि पंचायत राजव्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यासाठी तत्त्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव सरकारने २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभसेत पंचायतराज विधेयक मांडले. लोकसभेने या विधेयकास संमती दिल्यानंतर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने या विधेयकास मान्यता दिली. २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतीच्या संमतीनंतर प्रथमच पंचायतराज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा मिळाला. संविधानातील कलम २४३ मध्ये पंचायतराज व्यवस्थेविषयी तरतूद करण्यात आली. तसेच संविधानात ११ वे परिषिष्ट समाविष्ट करुन पंचायती संस्थांच्या कामकाजाचे विषय निश्चित करण्यात आले. दि. २४ एप्रिल १९९३ पासून ७३ वे घटनादुरुस्ती अधिनियम-१९९२ ची अमंलबजावणी सुरु झाली. स्थानिक स्वशासन हा राज्यसुचीतील विषय असल्याने दि. २४ एप्रिल १९९४ पर्यंत म्हणजेच एका वर्षाची मुदत सर्व घटक राज्यांना अंमलबजावणी करण्यासाठी देण्यात आली होती.

७३ वी घटनादुरुस्ती संविधानातील अतिशय महत्त्वाची घटनादुरुस्ती होय. या कलमामुळे पंचायतराज संस्थांना स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले. परिणामी ग्रामीण विकासाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. ग्रामीण विकास खऱ्या अर्थाने सुरु झाला. या घटनादुरुस्तीची मुख्य उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

१. पंचायतराज संस्थांना घटनात्मक वैधानिक आधार प्राप्त करुन देणे.
२. अनुसूचित जाती-जमाती, महिला व इतर मागासवर्गीयांना पंचायत संस्थांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व मिळवून देणे.
३. देशातील पंचायतराज संस्थांमधील विविधता काही प्रमाणात करुन त्यांच्यात एकसुत्रता निर्माण करणे.
४. लोकशाही नियोजनाचा लाभ सर्वसामान्य ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवणे.
५. विकास योजनांचा निधी मुळ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवणे.
६. निवडणुकांचे नियमन करणे.
७. अनुसूचित जाती, जमाती व महिलांना आरक्षण देऊन घटनात्मक संरक्षण देणे.
८. पंचायतराज संस्थांचे आर्थिक स्वावलंबित्व वाढविणे.
९. पंचायतराज संस्थांचे राजकीय प्रमुख, प्रशासकीय आधिकारी यांच्यात सामंजस्य व सहकार्याचा दृष्टीकोण निर्माण करणे.

**७३ व्या घटनादुरूस्तीची वैशिष्टये :-**

७३ व्या घटनादुरूस्ती मुळे पंचायत राज व्यवस्थेत राज्यघटनेच्या कलम (२४३) मध्ये नवीन उपकलमे समाविष्ट करण्यात आली. या कलमानुसार ग्रामीण प्रशासनात काही मूलीूत घटक समाविष्ट करण्यात आले. त्यांचा विचार करता ग्रामीण प्रशासनाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. घटनात्मक दर्जा :-**

७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामीण प्रशासनाच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तिन्ही स्तरांना विशिष्ट असा घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला आहे.

**२. कार्याची निश्चितता :-**

११ वे परिशिष्ट जोडण्यात येऊन त्यात २९ कार्याची यादी जोडण्यात आलेली आहे.

**३. त्रिस्तरीय व्यवस्था :-**

७३ व्या घटनादुरूस्तीचे जिल्हा परिषद, पंचायत ामिती व ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय व्यवस्था निर्माण केलेली आहे.

**४. पंचायत राजव्यवस्थेची पुनर्रचना :-**

पंचायत राजची त्रिस्तरीय संरचना ठेवण्यात आली त्यापैकी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या अधिकार व कार्यांना घटनात्मक स्थान प्राप्त झाले आणि जिल्हा परिषदेच्या अतिरीक्त अधिकार देण्यात आले.

**५. ग्रामसभेचे सबलीकरण :-**

७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामसभा प्रभावी केल्या, ग्रामसभेचे अधिकार व कार्य स्पष्ट केले आणि गावातील प्रत्येक प्रौढ नागरीकांच्या ग्रामसभेमध्ये समावेश करण्यात आला.

**६. आरक्षण व्यवस्था :-**

ग्राम प्रशासनात राजकीयआरक्षणाची तरतुद करण्यात आली. आरक्षण व्यवस्था अनुसूचित जाती-जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात मागासवर्गीयांसाठी २७ % आरक्षण दिले जाते तर महिलांसाठी ३३ % आरक्षण दिले जाते.

**७. पंचायत राजचा कार्यकाल :-**

कलम २४३ (ई) नुसार पंचायत राजचा कार्यकाल ५ वर्षाचा करण्यात आलेला आहे. दर ५ वर्षांनी निवडणूका करणे आवश्यक आहे.

**८. राज्य निवडणूक आयोग :-**

स्थानिक निवडणूकांचे सत्र अधिकार २४३ (के) कलमानुसार राज्य नियोजन आयोगाकडे
स्फूर्त करण्यात आले आहेत. स्थानिक शासनाच्या निवडणूका जाहीर करण्यापासून ते निवडपत्र देण्यापर्यंत सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगाला देण्यात आले आहेत.

**९. वित्त आयोग :-**

कलम २४३ (आय) नुसार स्थानिक वित्तीय कारभार राज्य वित्त आयोगाकडे देण्यात आला. राज्य व स्थानिक स्तर यांच्यातील कराचा वाटा वित्तीय स्थिती व कर आकारणी या संदर्भातील सर्व अधिकार स्थानिक शासनाकडे स्फूर्त करण्यात आले. त्याचबरोबर राज्य वितत आयोगाचे दर ५ वर्षांनी गठन केले जावे हे बंधनकारक रण्यात आले.

**१०. स्थानिक वित्त व लेखांकन :-**

कलम २४३ (जे) नुसार प्रत्येक ग्रामीण स्थानिक प्रशासनाला दरवर्षी वित्त व लेखांकन करण्याचे बंधन घालण्यात आले. स्थानिक वित्त व लेखांकन अधिकाऱ्यांकडे ती जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

**११. केंद्रशासीत प्रदेशासाठी तरतुदी :-**

कलम २४३ (एल) नुसार ७३ व्या घटनादुरूस्तीतील सर्व तरतुदी केंद्रशासीत प्रदेशांनाही लागू केलेल्या आहेत. ज्या ज्या केंद्रशासीत प्रदेशामध्ये विधीमंडळ अस्तित्वात आहे त्या त्या ठिकाणी या संदर्भातील कायदा विधीमंडळ अस्तित्वात पारित करेल आणि ज्या ठिकाणी विधीमंडळ अस्तित्वात नाही त्या ठिकाणी राष्ट्रपतींच्या आदेशानुसार घटनादुरूस्तीची अंमलबजावणी केली जाईल.

७३ वी घटनादुरूस्ती संपूर्ण भारतासाठी लागू करताना त्यातून जम्मू-काश्मीर , मेघालय, नागालॅन्ड, मिझेराम ही घटकराज्ये आणि पश्चिम बंगाल मधील काही भाग यातून बगळण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक घटकराज्याला या तरतुदीच्या आधारे स्वतंत्र कायदे करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

**७३ व्या घटनादुरूस्तीची विषय सूची :-**

२० एप्रिल १९९३ च्या ७३ व्या घटनादुरूस्तीने भारतीय राज्यघटनेत ११ वी अनुसूची अनुसूची समाविष्ट करण्यात आली असून त्यात पंचायतीकडे सोपविलेल्या २९ विषयांची यादी दिलेली आहे. ती विषयाची यादी खलीलप्रमाणे -

१) कृषी, २) भूविकास, जमिन सुधारण्याची अंमलबजावणी, जमिनीचे एकत्रीकरण, मृदासंधारण, ३) पाण्याचे व्यवस्थापन, छोटे पाटबंधारे आणि पानलोट विकास, ४) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन, ५) मच्छीमार, ६) सामाजिक वनीकरण, शेती वनीकरण, ७) किरकोळ जंगल उत्पन्न, ८) अन्नावरील प्रक्रियांचे उद्योगासह लघु उद्योग, ९) खादी उद्योग, ग्रामोद्योग आणि कुटीर उद्योग, १०) पिण्याचे पाणी, ११) ग्रामीण घरबांधणी, १२) इंधन व चारा, १३) रस्ते नाली, पूल तळी, जलमार्ग आणि दळणवळण, अन्य साधने, १४) ग्रामीण विद्युतीकरण, विजेचे वाटप, १५) अपारंपारिक ऊर्जा साधने, १६) दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम, १७) प्राथमिक व दुय्यम शाळांसह शिक्षण, १८) तांत्रिक प्रशिक्षण आणि व्यवसायिक शिक्षण, १९) प्रौढ आणि अनौपचारिक शिक्षण, २०) ग्रंथालये, २१) सांस्कृतिक कार्यक्रम, २२) बाजार व जत्रा, २३) रुग्णालये, २४) कुटूंबकल्याण, २५)

स्त्रिया व बालविकास, २६) अपंग आणि मतिमंद यांच्या कल्याणासह समाजकल्याण, २७) दुर्बल घटकांचे आणि विशेषतः वर्गीकृत जाती आणि जमातींचे कल्याण, २८) सार्वजनिक वितरण व्यवस्था, २९) समाजाच्या मूल्यवान ठेव्यांचा सांभाळ इ.

**पंचायतराज व्यवस्थेत सुधार घडवून आणण्यासाठीचे उपाय :**

१. नवीन नेतृत्वाचा आधिक वाव द्यावा जेणे करुन व्यवस्थेमध्ये नवीन कल्पना मांडल्या जाऊ शकतील.
२. ग्रामीण भागात सहकारी चळवळीला उत्तेजन द्यावे सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा चांगला विकास होऊ शकतो.
३. योजनांची अंमलबजावणी योग्य पध्दतीले होत आहे की नाही हे पाहण्यासाठी योजनांचे वारंवार मूल्यमापन करण्यात यावे.
४. प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम असावी भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर ताबडतोब कार्यवाही करावी यामूळे भ्रष्टाचारास अकुंश बसेल.
५. निवडणुकांमध्ये जात, धर्म यांचा वापर केला जाणार नाही याची काळजी घ्यावी.

**समारोप :**

देशाच्या विकासात ग्रामविकास अतिशय महत्त्वाचा असतो. देशाचा ग्रामीण भाग सुजलाम सुफलाम असेल तरच संपुर्ण देश ही समृध्दी, संपन्नता व विपुलतेने भरून येतो. हे जाणूनच ७३ वी घटना दुरुस्ती विधेयक अमंलात आणले गेले व ग्रामीण विकास खऱ्या अर्थाने सुरु झाला. त्याबरोबरच ७४ वी घटना दुरुस्ती जी शहरीकरण व नागरी स्थानिक संस्थांशी निगडीत आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे स्वतंत्र राज्य निवडणूक आयोग अस्तित्वात आले. जेणेकरुन पंचायतराज संस्थांचा कार्यकाल निश्चित झाला व निवडणूका वेळेवर व नि:पक्षपातीपणे होऊ लागल्या या घटनादुरुस्तीमुळे स्वतंत्र राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. जेणे करुन राज्य व स्थानिक संस्थांचा महसूल वाटा निश्चित झाला. स्थानिक संस्थांचे आर्थिक परावलंबत्व कमी झाले.

**संदर्भ ग्रंथ :**

१. भारतीय ग्रामीण समुदाय विकास, डॉ. नंदा पांगुळ-बारहाते.
२. महाराष्ट्रातील ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वशासन, प्रा. अशोक सोनकांबळे, प्रा. सी.एम. कहाळेकर.
३. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, प्रा. शाम शिरसाठ, प्रा. भगवानसिंग बैनाडे.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरण

**प्रा. डॉ. पल्लवी बी. इरलापल्ले**
लोक प्रशासन विभाग प्रमुख,
वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा जि. बीड.

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपुर्व काळात भारतीय समाजाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने झालेले प्रयत्न मर्यादीत स्वरूपाचे होते. स्वातंत्र्यानंतर मात्र ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे जाणिवपुर्वक प्रयत्न केले गेले. ग्रामीण विकासाचा उदय महात्मा गांधी यांच्या विचारातून झाला आहे. खेड्याकडे चला अशी साथ देत ग्रामीण भाग हा भारताचा आत्मा आहे आणि याचा विकास झाल्या शिवाय देशाचा विकास होणार नाही अशी साथ महात्मा गांधीनी जनतेला दिली आणि यातूनच सामुहिक विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी भारत सरकारकडून केली गेली.

एखादया विशिष्ट समुहाला (ग्रामीण भागामधील) संघटीत करून त्या समुहाची प्रगती घडवून आणणे, त्यांच्या आवश्यक गरजा पूर्ण करणे या माध्यमातून ग्रामीण विकास घडवून आणण्यावर भर देण्यात आला. यामध्ये ग्रामीण भागातून क्रियाशिल नेतृत्व निर्माण करणे, ग्रामीण महिला आणि कुटुंब याचा विकास करणे, ग्रामीण शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करणे इ. कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सामाजिक व आर्थीक विकास घडवून आणण्यावर भर दिला गेला. ही उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कुटीर उदयोगांना प्रोत्साहन, दळणवळण साधनांचा विकास, शिक्षणाची सुविधा, आरोग्याची व्यवस्था, रोजगाराची उपलब्धता आणि त्यांचे प्रशिक्षण इ. कार्याचा समावेश करण्यात आला.

ग्रामीण विकास ही एक अशी रचना आहे जिच्याद्वारे ग्रामीण लोकांच्या जीवनस्तरामध्ये सुधारणा आणि त्यांची उत्पन्नाची साधने यात वाढ करण्याचे कार्य केले जाते. याबाबत भारतीय नियोजन आयोग असे म्हणते की, "ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा घडवून आणली जाते तिला ग्रामीण विकास म्हणता येईल."(१) थोडक्यात ग्रामीण भागातील निर्धनांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न म्हणजे ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण विकासात पंचायत राजचे महत्त्व :-**

प्राचीन काळी पंचायतीस सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग मानले जात होते. गावचा सर्व कारभार पार पाडण्यासाठी व गावातील लोकांच्या न्यायासाठी नियुक्त केलेले मंडळ म्हणजे पंचायत असे वर्णन केले जात होते. आता मात्र केंद्र आणि राज्य शासन ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोणातून ज्या काही वेगवेगळ्या योजना, कार्यक्रम, धोरण ठरवितात त्या सगळ्यांची अंमलबजावणी पंचायत राजच्या माध्यमातूनच होत असते. त्यामुळे ग्रामीण विकासात पंचायतराजची भुमिका अत्यंत महत्वाची मानली जाते.

पंचायत राजच्या बाबतीत महात्मा गांधी असे म्हणाले होते की, "स्वातंत्र्याला तळागळातील लोकांपासून सुरूवात झाली पाहिजे तरच प्रत्येक गाव किंवा पंचायत अधिकार संपन्न होईल. प्रत्येक गाव स्वावलंबी व्हायला हवे. म्हणूनच पंचायत या शब्दाला वेगळेच महत्त्व आहे. या शब्दाचे पावित्र्य जपणे पंचायतीचेच कर्तव्य ठरते. पंचायतींनी प्रमाणिकपणे काम करित असताना गावातील लोकांना वाद - विवाद यापासून दूर राहण्याचे शिकवावे. पंचायतींनी हे धोरण राबविले तर समाजातील प्रत्येक घटकाचा विशेषतः महिलांना स्वातंत्र्य मिळेल."(२) महात्मा गांधी यांच्या पंचायतराजच्या संकल्पनेत महिलांच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिले हेते.

**पंचायत राज आणि महिला सक्षमीकरण :-**

पंचायतराज विना लोकशाही म्हणजे महात्मागांधी यांच्या तत्वांना झिडकारल्या सारखे होईल आणि पंचायतराज विना विकास म्हणजे पंडीत नेहरूंच्या कल्पनेलाच शह दिल्यासारखे होईल. पंचायतराजच्या माध्यमातून महिला विकास याबाबत स्व. राजीव गांधी असे म्हणतात, "पंचायत राजमध्ये महिलांना प्रतिनिधित्व मिळण् आवश्यक तर आहेच शिवाय महिलांच्या सहभागामुळे पंचायती अधिक सक्षम, प्रमाणिक आणि चोख बनतील."(३) महिला विकासासाठी सर्व बाजूंनी प्रयत्न केले गेले.

भारतातील लोकशाहीचा आधार असलेल्या पंचायतराजमध्ये महिला आरक्षण देण्याचा उद्देश म्हणजे भारतीय समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे होय. वर्षानुवर्ष सत्तेपासून, समृद्धीपासून आणि प्रतिष्ठे पासून वंचित असलेल्या

समाजातील एका गटाला म्हणजे महिलांना आरक्षण देणे आवश्यक असल्यामुळे पंचायत राजमध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला.

एकूण लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या महिलांची असलेल्या देशात महिलांनाच सत्तेपासून दूर ठेऊन सामाजिक न्याय प्रस्थापित करणे उचित होणार नाही. महिलांना अरक्षणाशिवाय संधी मिळणार नाही. '२००५ मध्ये झालेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीत अध्यक्षपद हे महिलांसाठी राखीव असल्यामुळे २९ जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदांपैकी १० जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी महिलांची निवड झाली. तर उपाध्यक्ष पदाला आरक्षण नसल्यामुळे एकही महिला सदस्य उपाध्यक्ष होऊ शकली नाही."(६)

थोडक्यात ७३ व्या घटना दुरूस्तीने समाजाला सर्व स्तरातून दिलेल्या आरक्षणामुळे शेतमजुरी करणाऱ्या महिला देखील गावच्या सरपंच झाल्याचे दिसून येत आहेत.

महिला व बालकल्याणासाठी पंचायत राजच्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक योजना, व कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाते. यामध्ये बचतगटाला प्रोत्साहन देणे, त्यांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेणे, गृहउदयोगांची निर्मिती, आर्थिक अनुदान, गरोदर महिलांसाठी सकस आहाराची योजना, लसीकरण मोहिम इ. कार्यक्रम हाती घेण्यात येतात.

थोडक्यात एकात्मीक ग्रामीण विकास, ग्रामीण भागातील महिला व मुलांचा विकास, गंगा कल्याण योजना, राष्ट्रीय वृद्धकाळ पेन्शन योजना, अन्नपूर्णा योजना, रोजगार हमी योजना अशा विविध योजनांच्या माध्यमतून ग्रामीण भागातील महिला आणि पुरूषांचा विकास करण्यावर शासन भर देत आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून पंचायतराज व्यवस्थेचे सक्षमीकरण करून पारदर्शक व कार्यक्षम व्यवहार केल्यास पंचायतराज अधिक सक्षम होतील व ग्रामीण भागांचा विकास देखील तेवढ्याच तत्परतेने होईल.

**संदर्भ सुची:-**

१) श्याम सिरसाठ आणि भगवानसिंग बैनाडे, २०१४, पंचायतीराज आणि नागरी प्रशासन, विदया बुक पब्लिशर्स, औरंगाबाद पृ.क्र. १५९.
२) पोले कांतराव, २००९, महाराष्ट्रातील पंचायतीराज आणि महिला आरक्षण, अरूणा प्रकाशन, पृ.क्र. ३०.
३) ग्रामीण विकास न्युजलेटर,१९९४, पं. नेहरू और पंचायतीराज, हैद्राबाद, पृ.क्र. १८.
४) इंगोले प्रतिभा, २००२, स्त्रिचे भावविश्व आणि आधुनिकता, सोनल प्रकाशन, अमरावती, पृ.क्र. ४९.

# ग्रामीण विकासातील लघु उद्योगाचे महत्व

**प्रा. डॉ. अशोक काकासाहेब जाधव**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी

आधुनिक औद्योगिक क्रांतीपुर्व भारतीय अर्थव्यवस्थेत लघु उद्योगाचा इतिहास गौरवपूर्ण होता. भारत आपल्या कारागीरांच्या कलेमुळे प्रसिद्ध होता. विणकाम करून वस्त्र निर्मिती करण्याचा जगात नावलौकीक होता. राजेरजवाड्यांच्या दरबारातील चिनीमातीच्या नक्षीदार वस्तू आजही त्याचे प्रमाण आहे. ब्रिटिश शासनकर्ते भारतीय शिल्पकार व कारागीरांच्या वस्तूंना मोठ्या प्रमाणात पसंत करित होते. परंतू ब्रिटिशांनी येथील कारागीरांना नष्ट करण्याचे काम केले. तरीही भारतातील कुटीर व लघु उद्योग पुर्णत: नष्ट करू शकले नाहीत. कारण त्याचा संबंध उदरनिर्वाह हा नसून येथील सभ्यता, संस्कृती आणि परंपरांशी राहिलेला आहे. आजही काश्मिर शाल, बनारसी, कांजीवरम व सिल्क साड्या तसेच संगानेरी नक्षी, जयपुरची रजई, आसाम व आंध्र प्रदेशातील सुती साड्या जग प्रसिद्ध आहेत. स्वातंत्र्योत्तर काळापासून केंद्र शासन ग्राम व लघु उद्योगाच्या विकासासाठी प्रयत्नशिल आहे. परंतू पारंपारिक लघु उद्योग शासनाला टिकवता आले नाहीत. त्या उद्योगांना शासनाने आर्थिक सहाय्य करणे आवश्यक आहे. जे नवीन उद्योग निर्माण केले गेले त्यातील कारागीरांना आवश्यक प्रशिक्षण मिळाले नसल्यामुळे व लोकांच्या अकार्यक्षमतेमुळे बहुतांश उद्योग नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे भारतीय ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासात अडथळे निर्माण झाल्याचे दिसून येते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४३ नुसार राज्य नितिच्या मार्गदर्शक तत्वामध्ये असे म्हटले आहे की, शासन ग्रामीण क्षेत्रात कुटीर उद्योगांना वैयक्तिक किंवा सहकारी तत्वावर विकसित करण्याचा प्रयत्न करिल. परंतू अलिकडील जागतिकीकरणाच्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतातील लघु उद्योगांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. लघु उद्योगास बळकटी देणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील रोजगार, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास इ. समस्यांवर मात करता येईल.

**उद्देश -** प्रस्तुत शोध निबंध खालील उद्देशाला अनुसरून लिहिण्यात आला आहे.

(१) लघु उद्योगाचा अर्थ स्पष्ट करणे.
(२) लघु उद्योगाचा आढावा घेणे.
(३) लघु उद्योगाचे ग्रामीण विकासातील महत्व जानून घेणे.

**अभ्यास पद्धती -** प्रस्तुत शोध निबंध लिहीण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा अवलंब करण्यात आला आहे. यात विविध ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, दै. वर्तमान पत्रे व संकेत स्थळे इ. चा समावेश आहे.

**अर्थ व व्याख्या -**

भारत हा कृषी प्रधान देश असून भारतातील ७०% जनता शेती व्यावसायावर अवलंबून आहे. भारतातील आजची स्थिती कृषी आधारीत उद्योगासाठी अनुकूल आहे. युरोपीय देशात एकच पीक घेतले जाते. परंतू भारतात राज्यनिहाय पीक विविधता आहे. भारतात कृषी आधारित प्रक्रिया उद्योगासाठी मालाची उपलब्धता सहज व तात्काळ होवू शकते. लघु उद्योगात खादी, रेशीम, हातमाग, चादरी, सुती साड्या, खेळन्या, बिडी, सिगारेट इ. चा समावेश होतो. तसेच शेती मालावर आधारित प्रक्रिया उद्योगाचा समावेश होतो. जसे, दाळ मिल, तेल उद्योग इ.

**व्याख्या -**

(१) फिस्कल कमिशन (१९४९-५०) - च्या मते, १० ते ५० पगारी कामगारांच्या मदतीने चालविला जाणारा व्यवसाय म्हणजे लघु उद्योग होय.
(२) ज्या उद्योगात मोठ्या प्रमाणात श्रम प्रधान तंत्राचा वापर केला जातो त्या उद्योगास लघु उद्योग म्हटले जाते.
(३) ज्या उद्योगात १ कोटी रूपयापर्यंत भांडवल गुंतविले जाते त्या उद्योगाला लघु उद्योग असे म्हटले जाते.

**महत्व -**

(१) **रोजगारात वाढ -** लघु उद्योग श्रम आधारित असतात. ग्रामीण भागात श्रमिक वर्गाची कमतरता नाही. त्यामुळे लघु उद्योगाची निर्मिती, त्याचे पुनरूज्जीवन व त्यात वाढ केल्यास ग्रामीण रोजगारात आपोआप वाढ होईल. त्यातून ग्रामीण बेकारी दुर होईल.

(२) **ग्रामीण समस्या दुर करणे -** आज भारतात मोठ्या प्रमाणात बेरोजगार तरूण वर्ग आहे. सर्वांनाच शासकीय नोकरी मिळेल याची शाश्वती नाही. ग्रामीण क्षेत्रात लघु उद्योगाची निर्मिती केल्यामुळे तेथील गरिबी, दारिद्र्य, बेकारी, शेतकरी आत्महत्या, आर्थिक टंचाई, गुन्हेगारी इ. समस्या कमी होण्यास मदत होईल. उद्योगाचे शहरातील केंद्रीकरण थांबवून त्याचे ग्रामीण भागात विकेंद्रीकरण केल्याशिवाय ग्रामीण समस्यांचा तोडगा सुटणार नाही.

(३) **आर्थिक दरी कमी करणे -** ग्रामीण भागातील गरिब-श्रीमंत ही दरी लघु उद्योगामुळे कमी केली जावू शकते. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यामध्ये लघु उद्योग महत्वाची भुमिका बजावू शकते. शेतीमध्ये व शेती आधारित व्यवसायात बारमाही रोजगार मिळत नाही. लघु उद्योगाला चालना दिल्यामुळे ग्रामीण आर्थिक विषमतेचा प्रश्न सुटण्यास मदत होते. संपत्तीचे समान प्रमाणात वाटप होण्यास मदत होईल. अनुसूचित जाती-जमाती व महिलांना रोजगार उपलब्ध होवून त्यांची आर्थिक स्थिती सुधारू शकते.

(४) **प्रादेशिक असमतोल कमी -** उद्योगाचे मध्यम व मोठ्या शहराच्या ठिकाणी केंद्रीकरण झालेले आहे. ग्रामीण भागात फारसे उद्योग नाहित. त्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होत आहे. शहरी व ग्रामीण असा वाद होतो. तो टाळण्यासाठी लघु उद्योगाचे ग्रामीण क्षेत्रात विकेंद्रीकरण करणे आवश्यक ठरते. विशेषतः मराठवाड्यासारख्या मागास भागात लघु उद्योग निर्माण केल्यामुळे मराठवाड्याचा आर्थिक विकास झपाट्याने होवू शकतो.

(५) **मालक - कामगार संबंध दृढ -** मोठ्या उद्योगामुळे मालक-कामगार यांच्यात सतत वाद व संघर्ष निर्माण होतो. मालक कामगारांची पिळवणूक करतात. त्यातून कामगार आंदोलने, मोर्चे करून उत्पादनात खंड पाडतात. उद्योगात अशांतता पसरते. परंतू लघु उद्योगातील कामगार संख्या कमी असते. त्यांचे व्यवस्थापन करणे मालक वर्गाला सोयीचे वाटते. मालक कामगारासोबत काम करित असतो. यामुळे मालक-कामगार संबंध मैत्रीपूर्ण, सलोख्याचे व सहकार्याचे असतात. दिर्घ काळ उद्योगात शांतता टिकून रहाते. त्यामुळे मालक-कामगार गटाचे नुकसान होत नाही.

(६) **शेतीवरिल अवलंबित्व कमी -** आज जवळपास ७०% ग्रामीण लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार शेतीवर पडत आहे. सततची नापिकी, दुष्काळ, अशास्त्रीय व हंगामी शेती यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. सर्वांना शेती व्यवसायात रोजगार मिळणे कठिण आहे. याला पर्याय म्हणून ग्रामीण भागात लघु उद्योगाचा विस्तार केल्यास ग्रामीण लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व ग्रामीण आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल.

(७) **विदेशी चलन -** भारतातील लघु उद्योग विविध वस्तूंची निर्मिती करून विदेशी चलन प्राप्त करून देतात. हस्तकलेच्या वस्तू, बुट, चप्पल, रेशीम, कलाकुसरीतून निर्माण केलेल्या वस्तू इ. ची निर्यात केली जाते. १९७३-७४ मध्ये लघु उद्योगातून ३९३ कोटी रू. च्या वस्तू निर्यात केल्या तर १९९९-२००० पर्यंत निर्यात मुल्य ५३९७५ कोटी एवढे झाले होते.

(८) **आर्थिक विकास व स्थैर्य -** अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या तेजी-मंदीचा रोजगार, उत्पादन, उत्पन्न व लोकांच्या जीवनमान-राहणीमानावर परिणाम होतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. लघु उद्योगवर व्यापारचक्राचा फारसा परिणाम होत नाही. आर्थिक स्थैर्य टिकून राहण्यास मदत होते. यातून लघु उद्योग व मालक-कामगार यांच्या आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम होतो.

(९) **ग्रामीण स्थलांतरास आळा -** अनेक कारणाने ग्रामीण लोक शहरात स्थलांतर करतात. याचे प्रमुख कारण म्हणजे रोजगार हे आहे. शेती हंगामी असल्यामुळे लोकांना रोजगार मिळणे कठिण असते. त्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर खालावलेला असतो. रोजगाराच्या शोधात लोक शहरात येवून स्थायिक होतात. स्थलांतरामुळे लोकांसमोर अनेक कौटुंबिक समस्या निर्माण होतात. त्यावर उपाय म्हणून लघु उद्योग ग्रामीण भागात निर्माण केल्यास स्थलांतर करण्याची लोकांना गरज भासणार नाही.

(१०) **प्रदुषणास आळा -** ग्रामीण लोकांचे शहरात स्थलांतर होत असल्यामुळे शहरात झोपडपट्टीची झपाट्याने वाढ होत आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात प्रदुषण निर्माण होते. तसेच लघु उद्योग प्रदुषणकारी नसतात. मोठ्या उद्योगात विविध कच्चा माल व रसायने वापरली जातात. त्यातून प्रदुषण वाढत आहे. जसे, जलप्रदुषण व वायूप्रदुषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. लघु उद्योग ठिकठिकाणी निर्माण केल्यामुळे राहत्या जागेची टंचाई, झोपडपट्ट्या, सांडपाणी समस्या, जल व वायू प्रदुषण इ. समस्या निर्माण होत नाहीत.

**सारांश**

लघु उद्योग ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासास पोषक ठरणारी आहेत. केंद्र-राज्य शासनाने लघु उद्योगास आर्थिक मदत करून प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. भारतातील लोकसंख्येचा आलेख चढता

आहे. याचा विचार करता ग्रामीण लोकांना रोजगाराची अत्यंत आवश्यकता आहे. ग्रामीण दारिद्र्य, बेकारी, बेरोजगारी या समस्या लघु उद्योगामुळे मोठ्या प्रमाणात कमी करता येतील. ग्रामीण भागात १० ते ५० कामगारांच्या मदतीने चालणारे लघु उद्योग क्वचितच दिसून येतात. कारण ग्रामीण भागातील व्यक्तिकडे श्रम करण्याची ताकद आहे परंतू अमाप भांडवल गुंतवणूक करण्याची ऐपत नाही. यासाठी शासनाने लघु उद्योग व उद्योजकास मदत करणे आवश्यक ठरते. शेतकरी, बेरोजगार तरूण व महिला यांना शासनाने कमी व्याज दराने अर्थ सहाय्य दिले पाहिजे, प्रशिक्षण देवून उद्योजक बनण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

(१) डॉ. मनोज कुमार - आर्थिक विचार विकास (Development of Economic Thought) अर्जुन पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली.
(२) डॉ, खटाळ बी. जी. - भारतातील आर्थिक विकास आणि नियोजन (Economic Eevelopment and Planning in India) श्रद्धा पब्लिकेशन, सोलापुर
(३) डॉ. सिंह सुदामा - भारतीय अर्थ व्यवस्था (Indian Economy) राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
(४) प्रा. रायखेलकर ए. आर. डॉ. दामजी बी. एच.- औद्योगिक अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
(५) प्रा. बिवलकर रा. म. - भारतीय अर्थव्यवस्था, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ
(६) डॉ. झामरे जी. एन. - भारतीय अर्थव्यवस्था- विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र
(७) डॉ. कदम विकास, डॉ. गावडे गणेश- भारतीय अर्थव्यवस्था, कैलाश पब्लिकेशन, औरंगागाद

# कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने आणि ग्रामीण विकास

**प्रा.बी.एस.जोगदंड**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आर.बी.अट्टल महाविद्यालय,गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :**

भारतासारख्या विकसनशील देशात होणाऱ्या आर्थिक विकासाचे लाभ देशातील ग्रामिण भागापर्यंत पोहचणे महत्वाचे असते.भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास 65%लोक संख्या आजही ग्रामिण भागामध्ये वास्तव करत आहे. ह्या सर्व लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधण कृषीव संबधीत कार्य हेच असलेले दिसते.त्यामूळे आजही मोठ्या प्रमाणावर मागासलेपण ग्रामीण भागात दिसून येते. हे मागासलेपण कमी करण्यासाठी भागाचा विकास साध्य करणे आवश्यक आहे. ग्रामिण विकासाचा अर्थ म्हणजे ग्रामिण भागाचा सर्वांगीण विकास की, ज्याविकासामूळे ग्रामिण जनतेच्या शारीरीक व मानसिक विकासामध्ये वाढ होईल.

ग्रामीण विकासासंबंधी काही विचारवंतांनी मांडलेली मते सांगता येतील-
रॉबर्ट चेम्बर्स यांच्या मते "ग्रामीण विकास ही एक पध्दत आहे ज्याद्वारे ग्रामीण भागातील निर्धन आणि गरिब जनतेची मदत केली जाते.ज्यामूळे अधिक लाभांचा पूरवठा आणि नियंत्रणाद्वारे ग्रामिण विकास होऊ शकेल. यामध्ये लहान शेतकरी, सिमांत शेतकरी, भूमीहीन, मजूर, कामगार यांना यामध्ये समाविष्ट केले जाते"

या सोबतच रॉजर्स या विचारवंताच्या मते,"ग्रामिण विकास हे एक प्रकारचे सामाजिक परिवर्तन आहे.ज्यामध्ये ग्रामीण सामाजिक प्रणालीमध्ये नविन विचार प्रस्थापित करणे, आधूनिक उत्पादन पध्दती आणि प्रगत सामाजिक संगठण, प्रति व्यक्ती उच्च उत्पन्न, आणि उच्च जीवन स्तर यांची उपलब्धता असेल."

वरील मतांचा विचार केला असता हे प्रकर्षाने जाणवते की, ग्रामीण विकास साध्य करायचा असेल तर सर्व प्रथम ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या जीवनाचा प्रमुख आधार असणाऱ्या कृषीच्या विकासावर लक्ष द्यायलाच हवे. कृषीचा विकास टाळून ग्रामीण विकास साध्य करणे कदापिही शक्य होणार नाही. कृषी क्षेत्राचा विकास करताना कृषी संमोरील ज्या विविध समस्या आहेत किंवा कृषी क्षेत्रासमोरील जी आव्हाने आहेत, त्याचा विचार करावा लागेल. आजच्या वर्तमान स्थितीमध्ये कृषीसमोर ज्या नैसर्गीक समस्या, आर्थिक समस्या, मानवनिर्मित समस्या आहेत. त्या खालील प्रमाणे सांगता येतील :

**1.धारण क्षेत्राचा आकार:-** भारतातील कृषी गणना अहवाल 2015-16नूसार कृषीच्या एकूण 85% जमीनीचे धारणक्षेत्रापैकी 1.15 हेक्टर हे सिमांत धारण क्षेत्र आहे. तर लहान व सीमांत धारणा क्षेत्र मिळून एकूण 86.2% एवढी कृषी क्षेत्र आहे.

वरील आकडेवारी लक्षात घेता हे स्पष्ट होते की भारतातील कृषीचे धारणक्षेत्र हे 2 हेक्टर पेक्षा कमी आहे.म्हणजेच भारतामध्ये अल्पभूधारकांची संख्या अधिक आहे.धारण क्षेत्राचा आकार लहान असल्या कारनाने शेतीमध्ये संस्थात्मक सूधारणा करणे, यांत्रिकीकरण करणे या सारख्या गोष्टींवर मर्यादा येतात.
कृषीचे धारण क्षेत्र कमी होत जाण्याची जी कारणे आहेत, त्यापैकी महत्वाचे म्हणजे वाढती लोकसंख्या. वाढत्या लोकसंख्येमूळे जमीनीचे तूकडीकरण मोठया प्रमाणावर होत आहे. त्या सोबतच शेती योग्य जमीनीचा वापर वाढत्या लोकवस्तीसाठी, इतर व्यवसायांसाठी, विविध प्रकल्पामध्ये शेत जमीन जाणे, मोठ-मोठया औद्योगीक प्रकल्पामध्ये जमीनीचे हस्तांतरण होणे, ही काही कारणे सांगता येतील.

2) **कृषी बाजारपेठा:-** भारतामध्ये कृषी उत्पादनांची विक्री ही विविध प्रकारे करण्यात येते उदा.गावात विक्री करणे, स्थानिक बाजारपेठांमध्ये, मंडीमध्ये, सहकारी संस्थांना विक्री, अशा पध्दतीने कृषी मालाची विक्री करण्यात येते. कृषी उत्पादनांना एक निश्चित बाजारपेठ उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक शोषण केले जाते. व्यापाऱ्यांमार्फत आर्थिक शोषण केले जाते. व्यापाऱ्यांनी ठरवलेल्या किंमतीलाच शेतकऱ्यांना आपला माल विकावा लागतो.

भारतातील कृषी बाजारपेठांमध्ये काही समस्याही आढळतात जसे की कृषी माल साठवणूकीसाठी व्यवस्था उपलब्ध नसणे, बराचसा कृषी माल शिघ्रनाशी असल्याने जी किंमत मिळणे अपेक्षित असते ती न मिळाली तरी मिळेल त्या किंमतीला विकावा लागतो, वाहतूक सूविधांचा अभाव, अनियमित बाजार,संगठण क्षमतेचा अभाव अशा अनेक कारणाने कृषी बाजारपेठा ह्या मागास असलेल्या दिसतात.

**3)पीक पध्दती** :- भारतातील शेतीची सार्वत्रीक समस्या म्हणजे पिक पध्दतीची समस्या होय. बहूतांश शेतकरी हे पिक पध्दतीत कोणताच बदल करत नसलेले दिसतात. एकाच पिकाचे उत्पादन वर्षानूवर्ष घेत असतात.ज्या शेतकऱ्याकडे पाण्याची उपलब्धता अधिक आहे, ते ऊस पिक मोठ्या प्रमाणावर घेतात. तर काही शेतकरी कापूस,गहु अशा पिकांची लागवड वारंवार करत असतात. वारंवार एकच पिक घेतल्याने जमीनीचा पोत बिघडतो. उत्पादनात घट होते. त्यामूळे पिक पध्दतीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

**4)मान्सूनवर आधारित शेती :-** भारतातील शेती ही प्रमूख्याने मान्सूनवर आधारित आहे. त्यामूळे कृषी विकासात मान्सूनचा महत्वाचा वाटा असतो. ज्या वर्षी मान्सूनचा पाऊस सरासरी पडतो त्यावर्षी शेती मधील दोन्ही हंगामामध्ये पिक घेता येतात. जर पाऊस चांगला पडला नाही तर खरीप पिकांच्याही उत्पादनात घसरण होणे आणि रब्बी पिकांचे उत्पादन घेणे शक्य होत नाही. बऱ्याच वेळेस पावसाचे सातत्य नसल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावते. या संकटामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीच्या खर्चाचा अधिकचा आर्थिक भार पडतो. अशा वेळेस खर्चाएवढेही उत्पन्न मिळण्याची शाश्वती राहत नाही. त्यामुळे भारतातील कृषीचे मान्सूनवरचे अवलंबीत्व ही एक समस्या बनत चालली आहे.

**5)निम्न कृषी विकास दर :-**

| Year | Agriculture Growth rate (%) | | Year | Agriculture Growth rate (%) |
|---|---|---|---|---|
| 1975 | 12.89 | | 2005 | 5.1 |
| 1977 | 10.0 | | 2011 | 5.0 |
| 1980 | 12.9 | | 2012 | 1.5 |
| 1982 | -0.3 | | 2013 | 5.6 |
| 1983 | 10.1 | | 2014 | -0.2 |
| 1987 | -1.6 | | 2015 | 0.7 |
| 1988 | 15.6 | | 2016 | 4.9 |
| 2001 | 6.0 | | 2017 | 2.1 |
| Source- NSSO | | | | |

भारतातील कृषी क्षेत्रांमध्ये एकूण लोकसंख्येच्या जवळपास 65% लोकसंख्या कार्यरत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठे क्षेत्र असूनही आणि अर्थव्यवस्थेचा कणा ज्या क्षेत्रास मानतो त्या क्षेत्राचा वृध्दी दर इतर क्षेत्रांच्या तूलनेत कमीच आहे. हे मान्य करावेच लागते.

आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की काही वर्ष कृषीचा वृध्दीदर चांगला राहिला आहे. परंतू तो वृध्दी दर टिकवता आलेला नाही. त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेतच. परंतू कृषीच्या आधारभूत संरचनाचा विकासही आपण करु शकलो नाही त्यामूळे ही वृध्दी कमी राहिली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**6) वातावरणातील बदल:-** 21 व्या शतकातील सर्वात मोठी समस्या म्हटले जाते ते म्हणजे वातावरणातील बदल होय. वातावरणातील होणारे बदल हे सर्वच घटकांना प्रभावित करत आहे. त्यापासून कृषी क्षेत्र ही वाचलेले नाही. वातावरणातील बदलांना वाढते औद्योगीकरण, प्रदूषण, जंगलतोड अशी अनेक कारणे जबाबदार आहेत. या बदलांचा परिणाम म्हणजे मानन्सूची अनियमितता, पर्जन्याचे कमी प्रमाण, पीकांवरील विविध रोगांचे प्रादुर्भाव असे सांगता येतील.

**7) कृषी प्रक्रीय उद्योगाचा आभाव :-** भारतामध्ये कृषी प्रक्रिया उद्योगांचा ज्या गतिने विकास होणे आवश्यक आहे तो विकास होताना दिसत नाही. कृषी प्रक्रिया उद्योगांच्या कमतरतेमुळे कृषी मालाचा बऱ्याच वेळेस अपव्ययही होतो. तसेच कृषी उत्पादनातील मूल्यवृध्दी ही होत नाही.कृषी प्रक्रिया उद्योगामार्फत रोजगाराच्या संधीही ग्रामिण भागात उपलब्ध होतील. त्यामूळे कृषी वरील अतिरिक्त भार कमी करण्यास मदतच होईल.

**सारांश :-**

कृषी क्षेत्रासमोरील आव्हानांना एक संधी समजून कृषीच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. इज्राईल सारखा देश, ज्या देशात पाण्याचा तूटवडा आहे त्या देशाने कृषीमधील प्रगतीच्या माध्यमातून जगाला अचंबीत केले आहे. आपल्याकडे मूबलक साधने असतांनाही त्यांचा पर्याप्त वापर करण्यात आपण कमी पडत आहोत. सर्व साधनांचा पर्याप्त वापर केल्यास सिंचनाची समस्या, विद्यूत पूरवठा, वाहतूक व्यवस्थेत सूधारणा, वित्तपूरवठयात नियमितता, प्रक्रिया उद्योगांचा विकास व विस्तार या सर्वांच्या माध्यमातून आपणास ग्रामिण विकासाचे ध्येय गाठणे सहज शक्य होईल.

**संदर्भ सुची :**

1) Chambers Robert (1983) Rural Development Putting the last first Essex, England, Longman Scientific and Technical Publishers : New York – John Willy
2) Rogers E.M (1960) Social Change in Rural Society : A Text Book in rural Sociology : New York.
3) Agricultural Census – 2015-16
4) NSSO
5) Directorate of Agriculture and co- operation (Agricultural census – 2010-11 Phase – I)
6) कृषी अर्थशास्त्र- डॉ. नाना वाणी प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
7) विकासाचे अर्थशास्त्र व पर्यावरण : डॉ.विश्वास कदम, नक्षत्र प्रकाशन, औरंगाबाद
8) Rural Development– Sundaram I.S. Himalaya Publishing House Mumbai.
9) Agricultural Problems in India-Sadhu A.N.& Singh Himalaya Publication House Mumbai.

# ग्रामीण समुदाय विकास आणि आरोग्य सेवा/सुवीधा

**प्रा.डॉ. नागेंद्र किशन कांबळे**
लोकप्रशासन विभाग
एस.एस.पी. सिनिअर कॉलेज नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना:**

भारत जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे.भारताला स्वतंत्र प्राप्त होवून आज ७१ वर्ष पूर्ण झाले आहेत. या कालावधीमध्ये भारतीय ग्रामीण समुदाय आणि समाजामध्ये फार मोठयाप्रमाणात बदल झालेला आहे. यामागील महत्वाचे कारण भारतामध्ये दिली जाणारी आरोग्य सेवा अथवा सुविधा होय. आरोग्य सेवा मानवासाठी एक आवश्यक घटक असून तिच्या वाचून मानवाची प्रगती होणे अशक्य आहे. मानवाच्या कौशल्य विकासात आरोग्य सेवांना फार मोलाचे स्थान आहे. चांगल्या आरोग्यावाचून मानव आपली भूमीका व्यवस्थितपणे पार पाडू शकत नाही आपण चांगल्या आरोग्यावाचून एक सभ्य आणि अनुशासित समाजाची कल्पना करु शकत नाही ग्रामीण आणि शहरी या दोन्ही भागामध्ये आरोग्याचे महत्व समान स्वरुपाचे आहे. इ.स. २०११ च्या जनगननेनुसार भारतातील एकूण लोकसंख्या १२१.०२ करोड आहे. त्यातील ८३.३१ करोड लोकसंख्या ग्रामीण भागातून आपले जीवन व्यथित करीत आहे[१] यामध्ये बदल होत असून ग्रामीण भागातील जनता शहराकडे आपले पाऊल टाकीत आहे. याचे मुख्य कारण शहरामध्ये ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा पेक्षा चांगली सुविधा शहरामध्ये मिळतात उदा: आरोग्य, शिक्षण, रोजगार, वाहतूक इत्यादी.

ग्रामीण विकासात आरोग्य सुविधांची गरज अधीक महत्वपूर्ण होत आहे.शहरामध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत अधीक प्रमाणात आरोग्य सेवा उपलब्ध असतात त्यामूळे शहरामध्ये ग्रामीण आरोग्य सेवा पेक्षा परिस्थिती अधीक चांगली असल्याचे दिसून येते परंतू आधुनिक काळामध्ये ग्रामीण विकास ही संकल्पना उदयास आल्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अथवा सुविधामध्ये हळु-हळू वाढ होत आहे. चांगले आरोग्य हे कोणत्याही देशाच्या कौशल्य विकासाला प्रभावीत करित असते. ज्यामुळे देशाच्या आर्थीक विकास दरामध्ये वाढ होवून एक चांगला समुदाय निर्माण होण्यास मदत होते.

**उददेश:**

१. ग्रामीण समुदाय विकासात आरोग्य सुविधांची भूमिका अभ्यासने
२. आरोग्य सुविधा आणि ग्रामीण समुदाय विकासातील योजनांचा अभ्यास करणे

**माहिती संकलनाची पध्दत:**

प्रस्तूत शोध निबंधासाठी माहिती संकलनातील दोन्ही पध्दतीचा वापर करण्यात आला आहे प्राथमीक माहिती संकनल पध्दतीनुसार निरीक्षण, प्रश्नावली,मुलाखत आणि अनुसूची इत्यादी साधनाचा उपयोग करुनमाहिती संकलीत केली आहे. तर दुय्यम साधनाचा उपयोग करुन व्यक्तीगत प्रलेख, सार्वजनिक प्रलेख, प्रकाशीत विविध अहवाल, गॅजेटिस, पुस्तके, मासिके वर्तमानपत्रे आणि इतर लेख इत्यादी साधनाचा उपयोग करुन माहिती संकलीत करण्यात आली आहे.[२]

**ग्रामीण समुदाय विकासाचा अर्थ:**

ग्रामीण विकासाचा संबंध गावाच्या संपूर्ण विकासाशी आहे तेंव्हा ग्रामीण समुदाय विकासाचा अर्थ समजून घेण्यासाठी गाव आणि विकास म्हणजे काय माहित असने आवश्यक आहे. साधारणत: एक सामुदायीक,जिथे एक निश्चित संख्यामध्ये लोक जीवन जगतात त्याला गाव असे म्हटले जाते. इ.स. १९८१ च्य जनगननेनुसार गावाची व्याख्या अशा प्रकारे केली आहे. I) जास्तीत जास्त ५००० लोकसंख्या,II) कमीत कमी ७५% लोकसंख्या गैर-कृषी कार्यावर आपले जीवन अवलंबून आहे, III) कमीम कमी ४०० लोक प्रति वर्गकि.मी.लोकसंख्या घनत्व.

विकास एक सतत चालणारी प्रक्रिया असून मानवाच्या सर्व पैलूला उदा: आर्थीक, सामाजीक, राजकीय, सांस्कृतीक आणि पर्यावरण इत्यादी गती मिळत असते थोडक्यात विकासाचा संबंध मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासाशी आहे.[३]

**ग्रामीण समुदाय विकासाची आवश्यकता:** आज ग्रामीण भारत आणि शहरी भारत यामध्ये अंतर असल्याचे दिसून येते भारतातील ७२% लोकसंख्या आजही ग्रामीण तथा गावात सुविधांच्या अभावी आपले जीवन जगत आहे तर दुसरीकडे शहरी भारतातील लोकसंख्या जवळ अत्याधुनिक साधनसामग्री व सुख सुविधाची काही कमी नाहीहे सत्य नाकारता येत नाही. गाव भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार आहे. देशातील ७२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात जीवन जगते. त्यातील ६२ टक्के लोकसंख्या कृषिवर आपले जीवन अवलंबून आहे तेंव्हा भारतातील कृषी आणि ग्रामीण भाग उदासिनता आहे. पर्यायाने भारत ही उदासिनता आहे. देशाचा संपूर्ण विकास करुन आर्थीक सुख सुविधा आनण्यासाठी सामाजिक, राजकीय, उदासिनता दुर करून ग्रामीण भारत आणि शहरी भारत यातील अंतर समाप्त करण्यासाठी ग्रामीण समुदाय विकासाची आवश्यकता आहे.[४]

**ग्रामीण समुदाय विकास योजना :** भारतात ग्रामीण समुदाय विकासामध्ये एकामागून एक येणाऱ्या पंचवार्षीक योजनांमध्ये महत्वपूर्ण योजना लागू करण्यात आले त्यातील काही योजना पुढील प्रमाणे आहेत

कृषी जिल्हा कार्यक्रम १९६१, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम २ ऑक्टोबर १९८०, ग्रामीण युवकांना स्वंरोजगारासाठी प्रशिक्षण योजना १७ आगष्ट १९७८,जनजातीय क्षेत्र विकास कार्यक्रम १९६२, ग्रामीण रोजगार योजना १९९६, जवाहर रोजगार योजना १९८०, जीवनधारा योजना, ग्रामीण कार्य योजना १९७०, विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम १९७५-७६, पढीत भूमी विकास योजना १९९७, कामाच्या बदल्यात अन्न योजना १९७७, गांधी ब्लॉक योजना १९९५-९६, गंगा कल्याण योजना ग्रामीण भागातील महीला आणि बाल विकास योजना, बायोगॅस कार्यक्रम, ग्रामीण महिला बचत कार्यक्रम १९९३, आपले गाव आपले काम योजना १९९१, सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना, इत्यादी विविध कार्यक्रम आणि योजना मार्फत ग्रामीण समुदाय विकास कार्यक्रम हाती घेण्यात आले[५]

**ग्रामीण समुदाय विकासाचे प्रमुख लक्ष** ग्रामीण समुदाय विकासात प्रमुख खालीलमुदयावर लक्ष्य केंद्रीत करण्यात आले आहे. कृषी विकास, औद्योगिक विकास, परिवहन साधनाचा विकास, व्यापार विकास, निर्यात प्रक्रियामध्ये वाढ, रोजगार निर्मीत वाढ, प्रति व्यक्तीच्या उत्पन्न दरात वाढ, जीवनस्तरामध्ये वाढ, आर्थीक शोषण संपुष्टात आनने, आर्थीक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, सामाजीक सुविधांची पुर्ती करणे, घराची समस्या दुर करणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे, आरोग्य सुविधामध्ये वाढ करणे, जाती व्यवस्थेची प्रथा नष्ट करणे, सामाजीक मुल्यांची स्थापना करणे, लोकसंख्या नियंत्रण, इत्यादी गुणात्मक कार्यक्रम लक्ष्य केंद्रीत करण्यात आले.

**आरोग्य सुविधा :** भारतातील ग्रामीण भागामध्ये ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्याकरीता विविध आरोग्य सुविधा आरोग्य प्रशासनाकडून पुरविली जात आहेत त्यातील काही सुविधा पुढील प्रमाणे आहेत

माता-बालसंगोपण कार्यक्रम, अंधत्व निवारण कार्यक्रम, दमा व क्षय निवारण कार्यक्रम, दंतविकार व उपचार कार्यक्रम, लसिकरण कार्यक्रम, सर्वरोग निदान कार्यक्रम, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, रुग्णवाहीका सेवा, प्राथमीक उपचार सेवा, इत्यादी कार्यक्रम अथवा सुविधा आज ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य प्रशासनाकडून पूरविण्यात येत आहेत[६]

**ग्रामीण सुमदाय विकासात आरोग्य सुविधांचे महत्व :** आज २१ व्या शतकातभारतातील ग्रामीण समुदाय फार मोठयाप्रमाणात विकसित होताना दिसून येत आहे. त्यामध्ये आरोग्य सुविधांची भूमिका फार महत्वाची आहे आज आरोग्य प्रशासनाकडून फार मोठया प्रमाणात ग्रामीण भागात सेवा पुरविल्या जात आहेत. त्यामध्ये माता- बालसंगोपन कार्यक्रमाअंतर्गत बाळ जन्माला येण्या आगोदर पासून ते बाळ जन्माला येऊन ५ ते ६ वर्षाचे होईपर्यंत आरोग्य प्रशासनाकडून विविध सेवेच्या माध्यमातून बाळाची व मातेची काळजी घेतली जाते याचा परिणाम बाळ सुदृढ जन्मास आला असून त्याचा फायदा येणाऱ्या काळात ग्रामीण समुदाय विकासासाठी होत असताना दिसून येत आहे[७]

**निष्कर्ष:**

१. ग्रामीण भागातील स्तर उंचावत असताना दिसून येत आहे परंतू शहरी भागाच्या तुलनेत कमीच आहे
२. आरोग्य सुविधांचा विचार केला असता ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये मोठया प्रमाणात सुविधा पुरविल्या जात आहेत.
३. ग्रामीण समुदाय विकासातील महत्वाचा घटक शेती अथवा कृषी असून यामध्ये तंत्रज्ञानाचा मनावा तेवढा उपयोग आजही होत असताना दिसून येत नाही.
४. ग्रामीण भागामध्ये आरोग्य सुविधा पुरविल्या जात आहेत परंतू त्या सुविधा पुरेशा प्रमाणातनाहीत.
५. आज भारतात ७२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातून आपले जीवन जगत आहे तेंव्हा या तुलनेत आरोग्य प्रशासनाकडून पुरविण्यात येणारी सेवा कमी प्रमाणात आहे
६. ग्रामीण विकासासाठी भारत सरकारकडून ज्या योजना पुरविण्यात येतात त्याचा लाभ त्या त्या व्यक्तीला अथवा समुदायाला मिळत नाही. परिणामी आजही ग्रामीण भागामध्ये उदासिनता असल्याचे दिसून येते.

**सारांश:**

आज पुर्वी सारखी परिस्थिती ग्रामीण भागातील लोकांची राहिलेली नाही थोडया फार प्रमाणात विकास कार्यातील चुका सोडल्यास ग्रामीण भागातील विकास मोठया गतीने होत असताना दिसून येत आहे. आरोग्य प्रशासन सुविधा पुरवीण्यात थोडयाफार प्रमाणात कमी पडत आहे म्हणून त्याचे महत्व नाकारता येत नाही आज मोठया प्रमाणात आरोग्य प्रशासन ग्रामीण समुदाय विकासात आपली भूमिका पार पाडत असताना दिसून येत आहे

**संदर्भ ग्रंथ:**

१. https://WWW.census of india 2011.
२. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे डॉ. प्रदिप आगलावे, विदया प्रकाशन नागपूर, १ जानेवारी २००० पृष्ठ क्र. १०.
३. लोकप्रशासन, कटारिया सुरेन्द्र, नॅशनल प्रकाशन जयपूर, पृष्ठ क्र. ६६४
४. कित्ता पृष्ट क्र. ६६९.
५. कित्ता पृष्ट क्र. ६७२.
६. लातूर आरोग्य विश्व, विशेषांक, डिसेंबर २०१२,हिंदुस्थान प्रकाशन प्रभादेवी मुंबई४०० ०२५ पृष्ट क्र. १५
७. वृत्तमानपत्रे, विविध मासिके, इतर लेख.

# स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण सामुदायिक विकास

**डॉ.जे.बी. कांगणे**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
वैद्यनाथ कॉलेज, परळी-वै. जि.बीड

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात एकवटलेली होती. यामुळे भारतातील ग्रामीण विकास होणे महत्त्वाचे होते. याच कारणामुळे महात्मा गांधीजींनी म्हटले होते. खेड्यांचा विकास झाला, तरच देशाचा विकास होईल. खरा भारत हा खेड्यात आहे. हा संदेश दिला. इंग्रज कालीन राजवटीत भारतातील ग्रामीण भागातील पारंपारिक उद्योगधंदे बुडाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण विकासाचे काही प्रयत्न झाले, परंतु त्यातही इंग्रजांचा स्वार्थ दडलेला होता. स्वातंत्र्यानंतरच खऱ्या अर्थाने भारतात सामूहिक विकासाची संकल्पना पुढे आली. त्यातूनच महात्मा गांधीजींच्या जन्मदिनाचे औचित्य साधून २ ऑक्टोबर १९५२ रोजी भारतात सामूहिक विकास कार्यक्रमाची घोषणा झाली.

ग्रामीण भागातील विकासाच्या बाबतीत 'शासकीय पातळीवरील पहिला प्रयत्न म्हणजे १८८२ चा लॉर्ड रिपव यांचा स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव होय. यानंतर अधुनमधून असे प्रयत्न होत गेले. परंतु त्यामागे जनहित हा मूळ हेतू नव्हता. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात वैयक्तिक पातळीवर राबविले गेलेले काही कार्यक्रम, योजनाच्या भावी काळातील सामुदायिक विकास कार्यक्रमाचा पाया मानला जातो. त्याचा उल्लेख सोबतच्या तक्त्यात केला आहे. हे प्रयत्न वैयक्तिक किंवा स्थानिक असल्यामुळे यांचे प्रभाव क्षेत्र सीमित होते. पुढे २ ऑक्टोबर १९५२च्या सामुदायिक विकास कार्यक्रमाने ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला.

**सामुहिक विकास म्हणजे काय ?**
**१९४८ ची केंब्रिज परिषदेची व्याख्या -**

"स्थानिक समुहांच्या सक्रिय सहभागाने व शक्य झाले तर समाजाच्या पुढाकाराने संपूर्ण समाजाचे जीवनमान सुधारावे म्हणून सुरु झालेली चळवळ म्हणजे सामुदायिक विकासाची चळवळ होय. परंतु जर हा स्थानिक समाज उत्स्फुर्तपणे पुढाकार घेत नसेल, तर या चळवळीच्या माध्यमातून ही चळवळ काही तंत्रे वापरून त्या समूहांची सक्रिय व उत्साही प्रतिसाद मिळवून निर्मित व प्रोत्साहित केली जाते.''

**डेव्हिड पॉटर -**

"सामुहिक विकास योजना म्हणजे ग्रामीण समुदायाने स्वयंस्फूर्तीने स्वत:ला मदत करणे होय."

ग्रामीण समुदायाच्या सर्वांगिण विकासासाठी सामुदायिक विकास कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती. पारंपारिक भारतीय समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल झाला होता. सामाजिक दृष्टिकोनातून निरक्षरता, लोकसंख्या वाढ, अंधश्रध्दा, रुढी-परंपरा-प्रथा जाती व्यवस्थेचे प्राबल्य अशा अनेक समस्यांनी भारतीय समाज पूर्णत: पोखरला गेला होता. या समाजाचा राष्ट्रीय राजकारणात कोणताही सहभाग नव्हता. या पार्श्वभूमीवर संपूर्ण ग्रामीण समुदायात जागृती घडवून आणणे सरकारचे आद्यकर्तव्य होते. म्हणूनच सामुदायिक विकास कार्यक्रम हा व्यापक व मोठी वित्तीय तरतूद असलेला कार्यक्रम भारतात सुरु करण्यात आला.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये -**

१. सामुदायिक विकास कार्यक्रमाचे महत्त्व अभ्यासणे.
२. सामुदायिक विकास कार्यक्रमाच्या उद्दिष्टांचा अभ्यास करणे.
३. सामुदायिक विकास कार्यक्रमातील घटकांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितकृत्ये -**

१. सामुदायिक विकास कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील लोकांचा विकास झाला आहे.
२. सामुदायिक विकास कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील जनतेला रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत.
३. सामुदायिक विकास कार्यक्रमामुळे.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके यांचा आधार घेऊन शोधनिबंध लिहिण्यात आला आहे.

**सामुदायिक विकास कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये -**

१. स्थानिक ग्रामीण जनतेत सामुहिक विचार करण्याची वृत्ती निर्माण करणे.
२. वैयक्तिक अशक्य गोल्ट सामुहिकरित्या साध्य करून घेणे.
३. शासकीय प्रयत्नांना जनतेच्या प्रयत्नांची साथ देणे.
४. जनतेस राष्ट्रीय विकासात्मक योजनामध्ये सहभागी होण्याची जाणीव निर्माण करणे.
५. भारतीय शेती व शेतकरी यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे.
६. ग्रामीण जनतेला अधिकाधिक रोजगाराची संधी प्राप्त करून देणे.
७. ग्रामीण जनतेला आत्मनिर्भरता व नेतृत्त्वाची संधी प्राप्त करून देणे.
८. राष्ट्रातील उपलब्ध साधनसामुग्रीचा व संपत्तीचा महत्त्वम उपयोग करणे.
९. गावाच्या सर्वांगिण विकासासाठी आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि नैतिक विकास साधण्याचा प्रयत्न करणे.
१०. राष्ट्रातील उपलब्ध साधनसामग्रीचा व संपत्तीचा महत्तम उपयोग करणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारने राष्ट्रीय पातळीपासून ग्राम पातळीपर्यंत सुव्यवस्थीत संघटन निर्माण केले होते.

**सामुदायिक विकास कार्यक्रमाचे संघटन**

सामुदायिक विकास कार्यक्रमांचे संघटन साधरणतः पाच स्तरावर आले होते.

**१. केंद्रीय स्तर -**

सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्रीय समिती होती.या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान, तर सदस्यांमध्ये नियोजन मंत्री, नियोजन मंडळाचे सभासद, अन्न व कृषीमंत्री यांचा समावेश असे. ही समिती धोरणांची आखणी व कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असे.

**२. राज्य स्तर -**

राज्याचे मुख्यमंत्री राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष असत. विकास खात्याचे मंत्री सदस्य, तर विकास आयुक्त हे सचिव म्हणून कार्यभाग सांभाळत असे. ही समिती विकास कार्यक्रमाची प्रगती व जनतेच्या गरजेनुसार आवश्यक बदल केंद्रीय समितीला सुचवित असे.

**३. जिल्हा स्तर -**

जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा उपायुक्त हे जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष असत. या समितीत जिल्हा पातळीवरील सर्व प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश होता. जिल्हा विकास अधिकारी हा जिल्ह्यातील सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्यासाठी जबाबदार असे.

**४. गट स्तर -**

या स्तरावर सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी गटविकास अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली होती. त्याच्या मदतीसाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ असत. या समितीवर ग्रामीण प्रतिनिधी नियुक्त केले जात असे.

**५. ग्राम स्तर -**

सामुदायिक विकास कार्यक्रमातील ग्रामस्तर हा शेवटचा स्तर होता. या स्तरावर कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी ग्रामसेवकावर असे. त्याने गटविकास अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली कार्य करावे, असे अपेक्षित होते.

**सामुदायिक विकास कार्यक्रमातील घटक**

सामुदायिक विकास कार्यक्रमासाठी उत्कृष्ट संघटन निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. त्याचबरोबर त्या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील विकासाच्या आधारे सामुदायिक विकासाचे मूल्यमापन होणारे होते. या कार्यक्रमात खालील घटक अभिप्रेत होते.

१) कृषी व भूमी विकास २) वाहतूक व दळणवळण, ३) शिक्षण प्रसार, ४)आरोग्य व स्वच्छता, ५) स्वयंरोजगार प्रशिक्षण, ६) रोजगार सुविधा, ७) निवासस्थान व राहण्याची व्यवस्था, ८) कुटीरोद्योग व ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन, ९) समाजकल्याण, १०) संघटनात्मक विकास.

वरील संघटकांच्या विकासाच्या क्षेत्रामध्ये सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्यात आला. परंतु त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून या कार्यक्रमाला सहाय्यभूत राष्ट्रीय विस्तार सेवा या समांतर कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

**निष्कर्ष -**

सामुदायिक विकास कार्यक्रमात जनतेचे प्रभुत्व असावे असे अभिप्रेत होते व शासकीय अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करावे, ही अपेक्षा होती. परंतु शासकीय अधिकाऱ्यांनी हा कार्यक्रम पूर्णत: आपल्याच वर्चस्वाखाली ठेवला. अधिकाऱ्याच्या वर्चस्वामुळे स्थानिक जनता या कार्यक्रमापासून दूर गेली. स्थानिक जनतेच्या सहभागासाठी ग्रामीण पातळीवर कोणतीही प्रतिनिधीक संस्था नव्हती. त्यामुळे ग्रामीण जनता सहभागापासून वंचित राहिली. ग्रामपातळीवर हा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी ग्रामसेवकावर होती. मात्र ज्ञान, कुवत व योग्य प्रशिक्षणाच्या अभावामुळे त्यांच्या कार्यावर मर्यादा पडली होती. हा कार्यक्रम समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी राबविण्याऐवजी कल्याणकारी स्वरूपाची कार्ये करण्यावरच अधिक भर दिला होता. त्यामुळे विकासाचा केंद्रबिंदु समजला जाणारा आर्थिक विकास दुर्लक्षित राहिला. साहजिकच भारताच्या सामुदायिक विकासाच्या दृष्टिने सामुदायिक विकास कार्यक्रम अपयशी ठरला. तरी या कार्यक्रमामुळे ग्रामीण विकासाचा शासकीय पातळीवरून श्रीगणेशा झाला, हे मान्य करावे लागते. म्हणूनच भारतीय ग्रामीण विकासाच्या दृष्टीने 'सामुदायिक विकास कार्यक्रम' एक महत्त्वपूर्ण अनुभव ठरतो.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. डॉ.शाम सिरसाट, प्रा.भगवानसिंग बैनाडे, पंचायतीराज आणि नागरी प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, ऑगस्ट २०१४.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.
३. मनोज आवाळे : पंचायतराज कार्य - कायदा योजना अनुबध्द प्रकाशन, पुणे, आवृत्ती ७ ऑक्टोबर २०००.
४. डॉ.आर.पी.जोशी, भारत में स्थानीय प्रशासन.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# भारतीय अर्थव्यवस्थेत लघु आणि कुटीर उद्योगाची भुमीका

**प्रा.डॉ.बी.आर शिंदे**
(वाणिज्य विभाग )
कै रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी

भारत हा प्राचिन काळापासून कृषी प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाला पुरक असणाऱ्या लघु आणि कुठीर उद्योगांना महत्वाचे स्थान आहे. महात्मा गांधी यांनी सांगितल्या नुसार भारताचा विकास करण्यासाठी ग्रामीण भागातील लघु आणि कुटीर उद्योगाची भुमीका लक्षात घेता भारत सरकारणे सुध्दा लघु आणि कुटीर उद्योगाच्या विकासासाठी विशेरूा लक्ष घालून वेळोवेळी मोठ्या प्रमाणात तरतुद निमा्रण करून दिल्या. जो व्यवसाय स्वतःच्या घरी स्व श्रमातुन केले जातात अशा व्यवसायांना कुटीर उद्योग म्हणतात. या व्यवसायात ग्रामीण भागातील जनतेच्या जिवन आवश्यक वस्तु तयार केल्या जातात या व्यवसायात एकाच कुटुंबातील १० व्यक्ती काम करत असून या व्यवसायासाठी अतिशय कमी भांडवल लागते. हा व्यवसाय वंशपरंपरेने चालविले जातात. असे व्यवसाय जाती व्यवस्थेवर चालविले जातात.

इ.स.१९४९ च्या वित आयोगानुसार जया व्यवसायात २० ते २५ मजुर काम करतात ज्या उद्योगात ५ लाख रूपयापर्यंत गुंतवणुक केलेलेसर्व उद्योग लघु उद्योगात येतात. परंतु १९४९ च्या वि धोरनात बदल करून १९९० च्या औद्योगिक धोरनानुसार लघु उद्योगात प्लॅट आणि यंत्रांमध्ये ६० लाख रूपयांपर्यंत आणि सहाय्यक उद्योगांमध्ये ७५ लाख रूपयांपर्यंत गुतवणूक केलेल्या उद्योगाचा समावेश लघु उद्योगात होतो. लघु आणि कुटीर उद्योग ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्वाची भुमीका पार पाडतात. ती भुमीका खालील प्रमाणे आहेत.

लघु आणि कुटीर उद्योगाची भारतीय अर्थव्यवस्थेत भुमीका खालील प्रमाणे अभ्यासता येतील.

**०१ - रोजगार निर्मिती**

लघु आणि कुटीर उद्योगात भारतात मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. कारण भारत हा कृषी प्रधान देश असुन भारतातील त्या काळी ७०% लोकांची उपजीविका शेती व्यवसायावर होती आणि लघु आणि कुटीर उद्योग शेती मालावर प्रक्रीय उद्येग आहेत या उद्योगात भारतीय लोकांना जवळपास २ कोटी पेक्षा जास्त रोजगार मिळतो. या रोजगारापैकी ५० लाख रोजगार हातमागाच्या उद्योगापासून मिहत होता. म्हणून भारताच्या अर्थव्यवस्थ्ेत लघु आणि कुटीर उद्योगाची भुमिका महत्वाची असलेली दिसून येते.

**०२ - आर्थिक विषमता कमी करण्यास मदत**

लघु आणि कुटीर उद्योगामुळे देशातील लोकांच्या हाताला रोजगार मिळतो. या उद्योगामुळे रोजगारांचे विकेंद्रीकरण होवून देशातील सर्वच व्यक्तींना योग्य प्रमाणात पैसा प्राप्त होता. त्यामुळे देशात आर्थिक विषमता वाढत नाही. आर्थिक समता निर्माण होते.

**०३ - भांडवल गुंतवणुकीचे कमी प्रमाण**

लघु आणि कुटीर उद्योगांना अत्यंत कमी प्रमाणात भांडवल गुंतवणूक करावी लागते. ह्या व्यवसायात पैसा पेक्षा श्रमाला प्राधानय जास्त दिले जाते. त्यामुळे भारतात या उद्योगाचा विकास करून देशाच्या आणि जनतेचया आर्थिक विकासात भर टाकली जाते.

**०४ - साधन सामग्रीचा विकासात योग्य वापर**

भारतात लघु आणि कुटीर उद्योगामुळे साधन सामग्रीचा योग्य उपयोग होऊ शकतो. भारतासारख्या श्रम प्रधान देशात भा्ंडवलाचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्यामुळे या उद्योगाचा विकास व विस्तार महत्त्वाचा आहे.

**०५ - लघु आणि कुटीर उद्योग शेती व्यवसायाला पुरक**

भारत हा कृषी प्रधान देश असून हा व्यवसाय शेतीवर उत्पादित मालावर आधारीत आहे. भारताची ७०% लोक ग्रामीन भागात राहतात. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. लघु आणि कुटीर उद्योग शेती व्यवसायाला पुरक आहे त्यामुळे ग्रामीन भागातील लोकांना या व्यवसायातून पुर्ण वेळ रोजगार मिळतो. त्यामुळे हा उद्योग ग्रामीण लोकांच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

**०६ -** लघु आणि कुटीर उद्योगामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे शेतकरी या पैशांची गुंतवणुक शेतीत करतात म्हणून त्यांन शेतीची उत्पादकता वाढवीता येते व पर्यायाने ग्रामीण भागात या उदृयोगाची भुतीका महत्वाची आहे.

**०७ - भांडवल निर्मितीच्या दरात वाढ**

लघु आणि कुटीर उद्योगामुळे ग्रामीण भागातील व्यक्तींना त्यांच्या स्वतःच्या गावात किंवा खेड्यात रोजगार निर्माण होतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या शहरी भागाकडे येण्याच्या कल कमी होतो. त्याचे स्थांनांतरण होत

नाही. त्यामुळे पुर्वीच्याच पध्दतीने ते आपले जिवन जगतात. त्यांना या व्यवसाया पासुन अतिरीक्त उत्पन्न मिळते परंतु त्यांचा खर्च आवश्यक वस्तुवरच होतो. म्हणून त्यांचा उपयोग खर्च कमी असतो. त्यामुळे बचतीचा दर वाढतो त्याचा परिणाम भांडवल निर्मितीच्या दरात होतो.

**०८ - प्रादेशिक असमतोल कमी**

लघु आणि कुटीर उद्योगामुळे प्रादेशिक असमतोल कमी होता कारण मोठ्या उद्योगासारखे हे उद्योग केंद्रीत होणार नाहीत. तर हे उद्योग संपुर्ण ग्रामीन भागात पसरतील त्याचा परिणाम प्रादेशिक असमतोल कमी होण्यावर होईल. त्यांमुळे मोठ्या उद्योगापेक्षा लघु आणि कुटीर उद्योगाची भुमीका महत्त्वाची असलेली दिसते.

**०९ - भारतीय ग्रामीण लोकांच्या कलागुणांना वाव**

लघु आणि कुटीर उद्योग हे लोकांच्या कौशल्यावर व श्रमावर आधारीत असल्यामुळे देशातील ग्रामीण भागातील जनतेच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो.कुअीर उद्योगातील सर्व श्रमीक आपले कौशल्य पणाला लावून अत्यंत कलात्मक, सुदर व आकर्षक वस्तु तयार करतात. अशा वस्तुला विदेशात सुध्दा मागणी असते. उदा. काश्मीरी गालीचे, मुरादाबादी भांडी, पैठणची पैठणी इ. वस्तुंना विदेशात सुध्दा मागणी असते. त्यामुळे या उद्यागाला ग्रामीण भागात महत्तवाची भुमीका असलेली दिसते.

**१०- आर्थिक स्थिरता**

लघु आणि कुटीर उद्योगामुळे ग्रामीण भागात आर्थिक सुलभता होण्यास मदत होते कारण भारतीय ग्रामीण लोमांचा मुख्य व्यवसासय शेती हा व्यवसाय नैसर्गिक वातावरणावर अवलंबुन आहे. त्यांमुळे या व्यवसायाला नैसर्गिक आपत्तीने नेहमी ग्रासलेले आहे अशा वेळी शेतीला पुरक असणाऱ्या लघु आणि कुटीर उद्योगामुळे त्यांना पुर्ण वेळ रोजगार मिळतो त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थिरतेवर होतो म्हणून ग्रामीन भागात या उद्योगाची त्या काळी महत्त्वाची भुमीका दिसुन आली.

**११ - युध्दजन्य परिस्थितीत सुरक्षित**

लघु आणि कुटीर उद्योग त्या श्रमिकांच्या स्वत:च्या घरी चालविल्या मुळे ते देशातील सर्व भागात पसरलेले असतात म्हणजे केंद्रीत नसतात ते विखुरलेले असताता त्यामुळे उद्योग सुरक्षित राहतात अशा उद्योगामुळे देशाची आर्थिक हानी होत नाही.

**१२ - औद्योगिक शांतता**

लघु आणि कुटीर उद्योगात काम करणाऱ्या श्रमीकांची संक्ष्या कमी असते. मालक आणि श्रमीक बरोबर काम करत असतात त्यामुळे उद्योगात मालक आणि श्रमीक यांचे संबंध चांगले निर्माण होतात. त्यामुळे उद्योगात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होते.

**१३ - सामाजिक आणि आर्थिक शोषण होत नाही**

लघु आणि कुटीर उद्योगात त्या उद्योगातील श्रमीक आणि मालक यांचे संबंध सलोख्याचे असल्यामुळे त्यांचे सामाजिक आर्थिक शोषण होत नाही. कधी कधी या व्यवसायात व्यवसायाचा मालक हा श्रमीकांची असतो.

**१४ - पारंपारीक यंत्र सामग्री**

लघु आणि कुटीर उद्योगात पारंपारीक यंत्र सामग्री वापरासत असल्यामुळे ते स्थानिक बाजार पेठेत उपलब्ध असतात त्यांची विदेशातून मागणी करण्याची गरज नसते त्यामुळे विदेशी चलनात बचत होते.

वरील सर्व मुद्दे अभ्यासता भारतीय अर्थव्यवस्थेत लघु आणि कुटीर उद्योगाचे महत्त्वअभ्यासता या उद्योगाची भुमीका महत्तवाची दिसते.

**संदर्भ :**

०१ - डॉ. मेधा कानेटकर, भारतीय अर्थशास्त्र
०२ - प्रा.जगताप / वाणि /जंगले /पाटील, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप
०३ - प्रा.डॉ.दत्तात्रय भुतेकर, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

# सामूहिक ग्रामीण विकास व जलव्यवस्थापन

**प्रा. डॉ. मुक्ता सोमवंशी( गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ

भारत हा खेड्यांचा देश म्हणून जगात ओळखला जातो आजही भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ६५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. अर्थातच निम्म्यापेक्षा जास्त लोक ग्रामीण भागात वास्तव्यास असल्यामुळे ग्रामीण क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष देणे क्रमप्राप्त आहे. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीपासूनच ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले परंतु अपेक्षित यश मिळत नसल्यामुळे ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने सतत विचारमंथन होत राहिलेग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था राज्याचा विषय असूनही केंद्र सरकारने याबाबतीत पुढाकार घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी विविध समित्यांच्या माध्यमातून अभ्यास करून विकास साधण्याचा प्रयत्न केला १९४८ सली सर्व राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मंत्र्यांच्या बैठकीत तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी असे म्हले की," स्थानिक स्वराज्य संस्था या खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्थेचा आधार आहेत आणि असावयासच पाहिजेत आम्हास अशी सवय झाली आहे की, आम्ही लोकशाहीचा उच्च स्तरावर विचार करीत असतो ,खालच्या स्तरावर नाही; परंतु जोपर्यंत खालचा आधार मजबूत होत नाही तोपर्यंत वरच्या स्तरावरील लोकशाही सफल होत नाही"१ पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मतानुसार भारतात स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक होते. त्यांनी त्या काळात यासाठी अनेक प्रयत्न केले त्यातील एक महत्त्वाचा प्रयोग म्हणून सामूहिक विकास या योजनेचा उल्लेख करावा लागतो.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंध लिहीण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिक, दैनिक वर्तमानपत्र व इंटरनेट यांचा समावेश आहे

**शोधनिबंधाचे उद्देश:**

१. सामूहिक ग्रामीण विकासाचा अर्थ स्पष्ट करणे.
२. जलव्यवस्थापनाचा अर्थ स्पष्ट करणे.
३. सामूहिक ग्रामीण विकास व जल व्यवस्थापन यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे
४. जल व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करणे.

**गृहीतकृत्यः**

पाण्याच्या योग्य नियोजनाअभावी ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे सामूहिक विकास योजनेच्या माध्यमातून १९५२ मध्ये भारताच्या ग्रामीण भागातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.२ ऑक्टोबर १९५२ पासून प्रायोगिक स्तरावर ५५ सामाजिक विकास प्रकल्प हाती घेण्यात. आले ही योजना देशातील लोकांचा दृष्टिकोन बदलून जबाबदार आणि क्रियाशील नेतृत्व निर्माण करणे व प्रगतीशील बनविणे, ग्रामीण महिलांचा विकास करणे, ग्रामीण शिक्षणाचा स्तर उंचावणे, ग्रामीण जनतेचे आरोग्य सुधारणे तसेच ग्रामीण क्षेत्रातील मागास जातीचे कल्याण करण्याच्या उद्देशाने सामूहिक विकास योजन राबविण्यात आली.

**सामूहिक ग्रामीण विकासाचा अर्थ व व्याख्याः**

**संयुक्त राष्ट्र संघः**" स्थानिक समाजाची, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थिती सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय प्रगतीला त्यांनी पूर्णतः हातभार लावावा म्हणून या प्रक्रियेद्वारे जनतेच्याच प्रयत्नांची शासकीय प्राधिकरणाच्या प्रयत्नांशी यांची सांगड घाली जाते त्यास सामुदायिक विकास असे म्हणतात"२

**डेविड पॉटरः**" सामूहिक विकास योजना म्हणजे, ग्रामीण समुदायाने स्वयंस्फूर्तीने स्वतःला मदत करणे होय"३

सामूहिक अथवा सामुदायिक विकास या शब्दातील सामुदायिक या शब्दाचा अर्थ भारतात ग्रामीण विकासाची निगडित आहे मात्र अमेरिकान संकल्पनेनुसार स्थानिक पातळीवरील विकास अर्थ घेतला जातो तर भारतीय संकल्पनेनुसार ग्रामीण स्थानिक पातळीवरील विकास असा समजला जातो.

उपरोक्त व्याख्यांचा विचार करता सामुदायिक विकास म्हणजे स्थानिक जनतेला स्वतःच्या प्रगतीसाठी प्रोत्साहित करून त्यांचा राष्ट्र विकासातील सहभाग वाढविण्याचा प्रयत्न आहे. तसेच स्थानिक समस्या सोडविण्यासाठी स्थानिक लोकांचा सहभाग घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या मदतीने केला जातो.

**जलव्यवस्थापन**

जल अथवा पाणी ही मानवाला निसर्गाने दिलेली फार मोठी देणगी आहे. पाणी हेच जीवन आहे किंवा पाणी व जीवसृष्टी यांचा अतिशय जवळचा संबंध आहेपाण्यातूनच जीवसृष्टीचा उदय झाला आहे पाणी ही नैसर्गिक साधनसंपत्ती असून जीवसृष्टीसाठी अत्यावश्यक आहे. पृथ्वीचा ७१% भाग पाण्याने व्यापला आहे, त्यापैकी०.९% पाणी वापरण्यायोग्य आहे. त्यामुळे पाण्याचे व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे. आज महाराष्ट्राचा बहुतांशी भाग दुष्काळग्रस्त आहे जल संकट दिवसेंदिवस वाढतच आहे. यावर उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी सर्वत्र जल व्यवस्थापन ही संकल्पना रूढ झाली आहे. पाणी ही नैसर्गिक बाब असून ती अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे पाण्याचे व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे.

जल व्यवस्थापन म्हणजे उपलब्ध पाण्याचा योग्य पद्धतीने वापर करणे किंवा पाणी वापराचे नियोजन करणे होय.

"सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोतांचे समाजातील सर्व घटकांना योग्य असे वितरण करणे याला पाणी व्यवस्थापन असे म्हणतात."

**सामूहिक विकास व जल व्यवस्थापन**

सामूहिक विकास व जल व्यवस्थापन यांचा परस्पर घनिष्ठ संबंध आहेग्रामीण विकास हा कृषीवर आधारित आहे, तर कृषी क्षेत्र पाण्यावर आधारित आहे, त्यामुळे ग्रामीण विकासासाठी जलव्यवस्थापन करणे अत्यावश्यक ठरते. जलव्यवस्थापन शासकीय पातळीवरून केले जाते. परंतु त्याचे म्हणावे तसे परिणाम दिसून येत नाहीत. कारण जल व्यवस्थापन करणे हे एक संस्था व केवळ शासनाच्या आवाक्यातील काम नाही. तर देशातील प्रत्येक नागरिकांचा त्यामध्ये सहभाग असणे गरजेचे आहे तो सहभाग सामूहिक विकास योजनेच्या माध्यमातून मिळविणे शक्य आहे यासाठी महाराष्ट्रात जलसाठ्यामध्ये वाढ करण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यात आले. यशवंत ग्रामसमृद्धी योजना, आदर्श ग्राम योजना, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, निर्मल ग्राम योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून लोकसहभाग मिळवून ग्रामीण क्षेत्राचा विकास साधण्याचा प्रयत्न केला.

**जलस्वराज्य-**

"२००२ साली केंद्र शासनाने राष्ट्रीय जलनीती चा दुसरा दस्ताऐवज जारी केला यामध्ये नदी खोरे व उपखोरे हे नियोजनाचे एकक मानण्याची आवश्यकता, मानवी आणि पर्यावरणीय संदर्भांना नियोजनामध्ये स्थान, आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून नियोजन या तत्वावर भर देतानाच संसाधनाच्या नियोजनावर आणि नियमनावर विशेष भर देण्यात आला. तसेच पाणीपुरवठा सेवेचा विस्तार पृष्ठजल आणि भूजल यांच्या दर्जाची तपासणी आणि भूजलाच्या वापराचे नियमन या बाबींवर विशेष भर देण्यात आला. त्यानंतर त्यांची धोरणे बदलण्यास सुरुवात केली यामध्ये आंध्र सरकारने १९९७ साली संमत केलेला' जलस्त्रोत विकास महामंडळ कायदा' किंवा महाराष्ट्र शासनाचा बहुचर्चित 'सिंचन कायदा' हे काही महत्त्वाचे बदल आज महाराष्ट्र, आंध्र, प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, कर्नाटक अशी अनेक राज्य आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थान बरोबरपाणी क्षेत्रातील विविध प्रकल्पाबाबत महत्त्वाचे करार करीत आहेत"४

जागतिक बँकेद्वारे भारत सरकारच्या पेयजल पुरवठा आणि स्वच्छतेच्या क्षेत्रातील आजवरच्या कामगिरीचे सखोल विश्लेषण केले गेले. जागतिक बँकेने यापूर्वी पेयजल स्थिती सुधारणांसाठी केंद्र व राज्य शासनांनादिलेल्या प्रकल्पांचे मूल्यांकन

हे या विश्लेषणाचे निमित्त होते. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या मूल्यांकनामधून योजनेचे अपेक्षित परिणाम साध्य करण्यामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासन कमी पडल्याचा निष्कर्ष मूल्यांकनातून पुढे आल्याने शासनाच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याच्या सूचनानां भक्कम आधार मिळाला या विश्लेषणातून मांडण्यात आलेली अपयशाची कारणे-

१. गेल्या पन्नास वर्षांमध्ये पेयजल यंत्रणेवर प्रचंड गुंतवणूक झालेली असूनही अनेक ग्रामीण भागांमध्ये पेयजलाची स्थिती अतिशय बिकट आहे.
२. पेयजल यंत्रणेमध्ये बिघाड होणे, नादुरुस्त होणे याचे प्रमाण अधिक असून एवढी मोठी गुंतवणूक करून उभ्या करण्यात आलेल्या यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती पुरेशा प्रमाणात झालेली नाही यामुळे उभारलेल्या यंत्रणा निकामी होत गेल्या
३. या प्रकल्पांची अंमलबजावणी प्रभावी नसल्याने एवढी मोठी यंत्रणा असूनही देशातील गावे, वस्त्या, स्वच्छ आणि शुद्ध पेयजलाच्या सुविधेपासून वंचित आहेत
४. सिंचन आणि औद्योगिक कारणांसाठी भूजलाचा बेसुमार उपसा झाल्याने भूजलाची पातळी खालावली आहे तसेच जलसाठ्यातील पाण्याचा दर्जा अतिशय खालावला असून त्याचे आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत

सर्वप्रथम उत्तर प्रदेश शासनाने १९९६ साली व 'स्वजल' या पाणीपुरवठा योजनेचा प्रकल्प उभारला आखणी व अंमलबजावणी मधील लोकसहभाग निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण, विकेंद्रीकरणासाठी नव्याने निर्माण करण्यात आलेली संस्थात्मक रचना आणि खाजगी व अशासकीय संस्थांचा सहभाग या वैशिष्ट्यांसह हा प्रकल्प राबविण्यात आला

त्यानंतर केंद्र शासनाने जागतिक बँकेच्या वित्तीय साह्याने 'क्षेत्र सुधारणा' या नावाचा एक प्रकल्प, या प्रकल्पाच्या धर्तीवर १९९९ मध्ये देशातील २६ राज्यांमधील ६८ जिल्ह्यामध्ये राबवण्यात आला. याचा कालावधी दोन वर्षांचा होता.

क्षेत्र सुधारणा या केंद्र शासनाच्या पथदर्शी प्रकल्पा नंतर अनेक आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था पेयजल योजनांच्या प्रकल्पासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यास उत्सुक होत्या. या संधीचा महाराष्ट्र सरकारने फायदा घेत क्षेत्र सुधारणा हा प्रकल्प रायगड, धुळे, नांदेड व अमरावती या चार जिल्ह्यांमध्ये राबवला २००२ मध्ये जागतिक बँकेने जलस्वराज्य प्रकल्पासाठी मंजुरी दिली आणि २००३ पासून जागतिक बँकेकडून सुमारे १३०० कोटी कर्ज घेऊन सुरू करण्यात आला.

या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या कर्मचाऱ्यांनी पाणीपुरवठा योजना उभारण्यापासून ते ग्रामसभा घेण्यास प्रोत्साहन देणे, गावात जाऊन जनजागृती, पथनाट्य, पोस्टर्स, प्रशिक्षण, फिल्मशो याद्वारे जनजागृती केली. त्यामुळे राज्यातील सुमारे २६ जिल्ह्यातील ३००० गावांमध्ये पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. या प्रकल्पाच्या यशस्वीतेमुळे जागतिक स्तरावरचा अमेरिकेतील पीपल्स फर्स्ट अवार्ड २००९ हा पुरस्कार मिळाला. मात्र अद्याप पर्यंत पाणीटंचाईवर आपण मात करू शकलो नाही. तेव्हा महाराष्ट्र शासनाने 'जलयुक्त शिवार' ही योजना राबविण्यास सुरुवात केली.

**जलयुक्त शिवार**

महाराष्ट्र शासनाने २०१४ मध्ये दुष्काळाचा सामना करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान सुरू केले २०१९ पर्यंत या योजनेची व्याप्ती १८००० गावांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. यासाठी लोकसहभाग महत्वाचा मानून लोकांच्या सहभागातून जलसाठ्यांमधील गाळ काढून जलस्त्रोतांचा पाणी साठा वाढविणे, वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन 'एकच लक्ष १३ कोटी वृक्ष' अशा नाऱ्यांमधून लोकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात आहे.पाण्याचा वापर नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी जनतेत जागृती घडवून आणणे, पाणी अडविणे व जिरविण्याच्या बाबत लोकांना प्रोत्साहित करणे. या उद्देशाने ही जलयुक्त शिवार योजना कार्यान्वित करण्यात आली आहे

जलयुक्त शिवार अभियानामध्ये कृषी, वन, सामाजिक वनीकरण, लघुसिंचन, जलसंपदा, जिल्हा परिषदेकडील कृषी व लघु सिंचन पाणीपुरवठा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, स्वच्छता जिल्हास्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय राखून हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणेबरोबर अशासकीय संस्था आणि लोकसहभाग महत्त्वाचा

मानला आहे. यासाठी सकाळ माध्यमाने आपले योगदान दिले आहे. सिने अभिनेता आमिर खान यांनी ‘पाणी फाउंडेशन’ च्या माध्यमातून लोकांमध्ये प्रेरणा निर्माण करून पाणी चळवळ सुरू केली आहे महाराष्ट्राच्या दुष्काळग्रस्त भागात जाऊन लोकांमध्ये ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ हा नारा देऊन नदी-नाले, शेततळे या माध्यमातून पाणी साठविण्यासाठी तसेच शेतातील पाणी शेतातच आडवण्याचा सल्ला लोकांना दिला. एवढेच नव्हे तर स्वतः श्रमदानामध्ये भाग घेऊन लोकांमध्ये उत्साह निर्माण करून जागृती घडवून आणली आहे त्यामुळे गावातील लहान, मोठे, वृद्ध लोक श्रमदानासाठी पुढे आले व त्यातून नाले नद्यांचे रुंदीकरण व खोलीकरण झाले आहे.

जलस्वराज्य व जलयुक्त शिवार या योजनांच्या सहाय्याने महाराष्ट्रात शाश्वत जलस्रोत निर्माण करण्याचा मानस ठेवला. मात्र अद्यापपर्यंत शाश्वत जलस्रोत निर्माण झाले आहेत असे दिसून येत नाही. आजही महाराष्ट्रात बहुसंख्य गावांमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. यातून गावे ओस पडत आहेत .गुरांसाठी पाणी व चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे आज शासनाला चारा डेपो निर्माण करणे अगत्याचे झाले आहे.

२०१४ ते २०१७ या कालखंडात ७२११ कोटी रुपये खर्च करून १६ हजार ४६१ गावांमध्ये राबवण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या कामामुळे सुमारे२२ लाख हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता असणारे पाणीसाठे निर्माण झाले आहेत मात्र महाराष्ट्राच्या विविध भागात पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे अनेक ठिकाणची नदी-नाले, शेततळे कोरडेच राहिले आहेत. तेव्हा केवळ ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ या घोषणेतून पाणी प्रश्न सुटणे अशक्य आहे. तर पर्यावरणावर लक्ष केंद्रित करून वृक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षमित्र निर्माण करण्यासाठी चळवळ उभी करणे आवश्यक आहे. वृक्षतोडीवर नियंत्रण तर दुसऱ्याबाजूस वनांचे पुनर्निर्माण करणे अत्यावश्यक झाले आहे आमच्या शासनाकडून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम दरवर्षी राबविला जातो, परंतु त्यातील किती रोपांचे वृक्षांमध्ये रूपांतर झाले आहे याची शहानिशा केली जात नाही. वृक्षलागवड करणे सोपे आहे परंतु त्याचे जतन करणे कठीण आहे तेव्हा केवळ घोषणा आणि आदेश काढून उपयोग होणार नाही, तर ते वास्तवात येणे गरजेचे आहे. जेव्हा आपण या सर्व बाबींचा सखोल विचार करून आखलेली योजना केवळ कार्यान्वित न करता ती तडीस नेण्यात यावी तेव्हाच सामूहिक ग्रामीण विकासातून शाश्वत विकास साधता येईल

**निष्कर्ष व उपाययोजना**

१५ एप्रिल २०१५ मध्ये लातूर शहराला रेल्वेद्वारे पाणीपुरवठा करावा लागला. अशा प्रकारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आपल्यावर येत असेल, तर आपण आपल्या विकासाच्या दृष्टीने काय करीत आहोत? असा प्रश्न निर्माण होतो. पाण्यासाठी राज्याराज्यांमध्ये वाद आहेत, सध्या एकाच राज्यात दोन जिल्ह्यात वाद निर्माण होत आहेत. वरील धरणातील पाणी खालच्या पात्रात सोडण्यासाठी वाद होत आहेत. यावरून पाणीप्रश्नाची गंभीरता लक्षात येते. हा प्रश्न केवळ सामुदायिक विकासाच्या माध्यमातूनच सोडविला जाऊ शकतो. प्रत्येकाने पाण्याचा जपून वापर करणे ,पाण्याचा पुनर्वापर करणे , खड्ड्यामधून पाणी मुरविणे, मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे अशा उपाययोजनांच्या माध्यमातून पाणी प्रश्नावर मात करता येईल तसेच भविष्यात मोठ्या प्रमाणात जलसाठ्यांची निर्मिती होईल एकंदरीत देशातील प्रत्येक नागरिकाने या समस्येचा विचार करून पाण्याचा योग्य वापर करून ते जतन करण्याचा प्रयत्न केला, तरच शाश्वत जलस्रोत निर्माण होऊ शकतात.

१. प्रा. गोविंद यमलवाड- स्थानिक स्वराज्य संस्था ,कल्पना प्रकाशन, नांदेड ,२००१.
२. प्रा. श्याम शिरसाठ व इतर- भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था- विद्या बुकस पब्लिशर्स,औरंगाबाद , जून २००६
३. जलस्वराज्य-: वस्तुस्थिती आणि आव्हाने- प्रकल्पातील 'क्षमता बांधणी' आणि 'माहिती - शिक्षण- संवाद' या घटकाच्या मूल्यमापनाचा अहवाल प्रयास -संसाधने व उपजीविका गट, पुणे.
४. डॉ. उर्मिला रेड्डी लोकप्रशासनातील कौशल्य विकास कार्यक्रम अरुणा प्रकाशन लातूर ऑगस्ट २०१८.

# शेती मागास व प्रगत

**प्रा.डॉ. एस.व्ही. सोनवणे**
भूगोल विभाग
शंकरराव जावळे-पाटील महाविद्यालय लोहारा

**गोषवारा :- (Abstract)**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आपण स्थानिक समस्येचा अभ्यास करणार आहोत. आपण आतापर्यंत ज्या स्थानिक समस्या बघितल्या त्यापेक्षा शेतीसंबंधी समस्या ह्या जास्त महत्वाच्या आहेत. विशेषत: शेतीचे प्रकार , हरीतक्रांती आणि शेती अशा दृष्टिकोनातून आपण शेती ह्या क्षेत्रातील अभ्यास करणार आहोत.

**प्रास्ताविक :-**

अगदी सुरुवातीला स्थलांतरीत पध्दतीची शेती होती नंतर नद्याच्या काठावर शेती प्रगत झाली. पाण्याच्या बाजूला शेंती असे दृष्य होते आता जमीनीकडे पाणी असे दृष्य दिसते. जमीनीची मशागत करुन पीक काढणे म्हणजे शेती असा मर्यादित अर्थ होतो नंतर मात्र पशुंपालन , कुकुटपालन, दुग्धव्यवसाय आणि वनशेतीचा समावेश झाल्याने कृषी क्षेत्राची व्यापकता वाढली त्यानंतर शेतीचे वर्गीकरण झाले मागास शेती प्रगत शेती असे प्रकार पडले हवामान जमीन प्रकार उपलब्ध क्षेत्रफळ , पाण्याची उपलब्धता मनुष्यबळ , वापरलेले तंत्र, अवजारे येणारे उत्पादन व त्याचा दर्जा हेतू यावर मागासलेपणा वा प्रगती अवलंबून असते.

**उदिष्ट्ये :-**

१) शेती म्हणजे काय तसेच त्याचे मागास व प्रगत ह्या प्रकारचे स्पष्टीकरण करता येईल
२) हरीत क्रांतीचे ऋण व परिणाम सांगता येतील
३) पडीक जमीनीच्या समस्या ओळखता येतील
४) पडिक जमीनीवरच्या समस्यावरील उपाय सांगता येतील.

**शेती व्यवसाय :-**

माणसाच्या मुलभूत व्यवसायापैकी शेती हा एक व्यवसाय समजला जातो. मानसाच्या भटक्या जीवनाला शेतीमुळे स्थिरता लाभली हा कायम चालणारा व्यवसाय आहे. संपूर्ण राष्ट्राची अर्थव्यवस्था या उद्योगावर अवलंबून आहे. ज्या राष्ट्राकडे सुपिक जमीन मुबलक पाणी पूरवठा ती राष्ट्रे कृषिप्रधान बनतात भारत देश त्यापैकी एक आहे. प्रतिकुल परिस्थितीतही तंत्रज्ञान, सहकार्य व जिद्द यांच्याद्वारे हा उद्योग प्रगतीकडे नेता येतो. हे इस्त्राइल सारख्या छोट्या राष्ट्राने दाखवून दिले आहे.

**मागास शेती :-**

मागास शेतीत जमीन एकदा वापर ल्यावर बदलली जाते मागास शेतीमध्ये काठी , कोयता अशा अवजारांचा वापर केला जातो शेंतजमीन लहान असते पाणी पूरवठा मर्यादीत असतो, बारमाही पाऊस नसतो पेरणी हाताने केली जाते केवळ कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो हा हेतू असतो यामध्ये आसाम, मध्यप्रदेश, विशुवृत्तीय प्रदेश आफ्रिकेमध्ये अशी शेती आढळते.

**प्रगत शेती :-** प्रगत शेतीत उदरनिर्वाह व व्यापार असे दोन्ही हेतू असतात विविध हंगामात पिके घेतली जातात अत्याधुनिक अवजारे तंत्र संशोधंन कृत्रिम खते पाणीपूरवठा यांचा वापर होतो ज्या ठिकाणी दाट लोकसंख्या आहे अशा ठिकाणी जास्तीत जास्त पिक घेतले जाते तर कमी लोकसंख्या व विस्तीर्ण प्रदेश असल्यास सलग मोठ्या जमीनीवर विस्तीर्ण शेती होते.

**शेती**

| **मागास** | **प्रगत** |
|---|---|
| १) केवळ उदरनिर्वाहा (स्थिर) | १) जिरायत (नैसर्गिक पावसावर) |
| २) भटकी (स्थलांतरीत) | २) बागायत (कृत्रिम पाण्यावर) |
| | १) कोरडवाहू |
| | २) पाटाची |
| | ३) सधन/श्रमआधारीत |
| | ४) विस्तीर्ण यांत्रीक |
| | ५) मळ्याची |
| | ६) दुग्धशेती |
| | ७) मिश्र शेती |

या खेरीज पीक घेण्याच्या पध्दती एकपिक पध्दत, द्विपीक पध्दत , बहुपीक पध्दत , आंतरपीक पध्दत , धान्यपीकाची , गळीत धान्याची , फळांची , फुलांची, वनशेती, वनऔषधी शेती, जंगली झाडे इत्यादीचा समावेश होतो.

लोकसंख्या वाढीचा वेग हा शेती उत्पादनापेक्षा जास्त असल्याने अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होतो. जमीनीचे क्षेत्र वाढवणे अशक्य असल्याने त्याचा योग्य वापर करावा लागतो त्यामुध्ये दर हेक्टरी जास्तीत जास्त उत्पादन वाढवावे लागते. कमी क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त नैसर्गिक खत , बियाने, यांचा वापर करुन नविन तंत्रज्ञानाचा व ठिबक सिंचन , तूषार सिंचन याच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात शेती उत्पादन मिळते तसेच योग्य त्या वेळेमध्ये शेती मशागत करावी.

**निष्कर्ष :-**

१) जमीन ही मर्यादीत आहे यामुळे त्याचा योग्य वापर व्हावा
२) पडीक क्षेत्रामध्ये नविन जमिनी तयार करुन उत्पादन वाढवावे
३) मागास शेतीच्या मागे न लागता प्रगत शेतीच करावी.
४) नविन तंत्रज्ञान व जिद्द शेती उद्योग प्रगतीकडे नेता येतो.
५) नैसर्गिक खत , बि.बियाने यांचा वापर करुन योग्य उत्पादन काढता येते.
६) प्रगत शेतीमुळे अन्नधांन्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.
७) हरीत क्रांतीमुळे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळालेले आहे.
८) मागास शेतीपेक्षा कधीही प्रगत शेती अधिक फायद्याचीच आहे.
९) मागास शेती फक्त उदरनिर्वाहासाठीच आहे यापासून उत्पादन पैसा मिळत नाही.

**संदर्भ**

१) डॉ. मालशे प्र.त्री. भारताचा आर्थिक व वाणिज्य भूगोल पूणे सिटि बुक स्टॉल १९७०
२) डॉ. आहिरराव द.या. भारताचा प्राकृतिक व महाराष्ट्राचा भूगोल , नाशिक वारदा प्रकाशन १९९९
३) देशमुख प्रभाकर , भारताची अर्थव्यवस्था , नागपूर पिंपळापूरे कंपनी १९९०.
४) देसाई स.मु. व भालेराव निर्मल भारताची अर्थव्यवस्था

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे ग्रामीण विकासातील योगदान एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.डॉ. दत्ता माधवराव तंगलवाड**
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी,
ता.गेवराई, जि.बीड.

**प्रस्तावना :-**

भारत हा खेडयांचा देश असून देशाच्या एकुण लोकसंख्येपैकी ७६.७% लोक ग्रामीण भागात वास्तव्यास आहेत. २०११च्या जनगणना अहवालाप्रमाणे भारतात ५९७४६४ खेडीअसुन, खेडेहे भारतीय समाजाचा आत्मा आहे; म्हणुन खेडयाचा विकास होणे काळाची गरज आहे. हे जाणुन महात्मा गांधींनी'खेडयाकडे चला' असा कानमंत्र दिलाहोता कारण खेडयाचा विकास म्हणजे देशाचा विकास होय. पण देशाला स्वातंत्र्य मिळुन ७१ वर्षे संपलीतरी खेडयाचा विकास झाला नाही. तर शहरी भागात वाढते औद्योगिकरण व नागरीकरणाच्या विविध शासकीय योजनांमुळे शहरी भागाची संख्यात्मक व दर्जाच्या दृष्टीने प्रगतीझाली आणि ग्रामीण व नागरी जीवनपद्धतीमध्ये प्रचंड तफावत वाढत गेली असुन; भारता हा खेडयात पहावयास भेटतो तर इंडीया शहरी भागात पहावयास भेटतो. ग्रामीणसमुदायात दारिद्रये, उपासमारी, बेकारी, पाणी समस्या, आरोग्याची समस्या आजही गंभीर स्वरुपात असलेल्या दिसुन येतात. म्हणुन ग्रामीण लोकांचा लोंढा शहरी भागाकडे वाहत असुन दिवसेंदिवस खेडीही बकाल होत आहेत. तर शहरी भागात गलिच्छ वस्त्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. म्हणुन ग्रामीण भागात पायाभतू सुविधा निर्माण करुन ग्रामीण स्वरचनेचे स्वरुप बदलण्यासाठी शासनाने अनेक योजना व धोरणे आखुन ग्रामीण भागात परिवर्तन घडुन आणण्याचा प्रयत्न केला, त्यापैकी एक म्हणुन संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाकडे पाहिले जाते. या अभियानामुळे ग्रामीण जीवनात काय बदल घडुन आलेहे प्रस्तुत लघुशोध निबंधात जाणुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन विधान :-** "संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे ग्रामीण विकासातील योगदान- एक समाजशास्त्रीय अभ्यास".

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. ग्रामीण भागातील लोकांना स्वच्छतेच्या व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यातील अभियानाचे योगदान अभ्यासणे.
२. या अभियानातून बांधलेल्या शौचालयाच्या वापराबाबतची अभिवृत्ती अभ्यासणे.
३. लोकसहभागा बरोबरच शासनाने केलेल्या आर्थिकतरतुदी व त्याचा ग्रामीण समाजाला झालेला फायदा याचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. या अभियानामुळे ग्रामीण भागात आरोग्याविषयक सोयी बरोबरच जाणिवजागृती करण्या आली.
२. या अभियानात लोकसहभागातून निर्माण झालेल्या स्वच्छतागृहाच्या वापरामुळे आरोग्याच्या समस्येत घट झाली.
३. वैयक्तिक स्वच्छतेतून ग्रामस्वच्छता व हगणीदारीमुक्त गाव याची जननी म्हणुन या अभियानाकडे पाहिले जाते.

**नमुना निवड :-**

शासनाच्या विविध योजना व अभियानापैकी केवळ संत गाडगेबाबात ग्रामस्वच्छता अभियानाचा ग्रामीण जीवनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी केवळ शेळगाव गौरी, ता. नायगाव, जि. नांदेड या गावाला प्रतिनिधीत्व देण्यात आले.

**तथ्यंसकलनाचेसाधने :-**

प्रस्तुतसंशोधनात माहितीसंकलनासाठी मुलाखत अनुसूचीचा अवलंब करण्यात आला. तसेच संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील बातम्या याचा आढावा घेण्यात आला.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुतसंशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. १०० उत्तर दात्यांकडुन माहितीसंकलीत करण्यात आली.

**माहितीचे विश्लेषण :-**

अनेक आजारांचे उगमस्थान म्हणुन अस्वच्छतेकडे पाहिले जाते. ग्रामीण भागात आजही वैयक्तिक व सामुहिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात नाही म्हणुन ग्रामीण माणसाला अनेक आजारांना बळी पडावे लागते. कारण ग्रामीण माणुस स्वच्छतेबद्दल अज्ञान व उदासीन असलेला दिसुन येतो. त्यामुळे अनेकसाथीचे रोग ग्रामीण भागात पसरलेले दिसुन येतात. यातील बहुतांशी आजारहे अशुद्ध पाणी व अस्वच्छ परिसर यामुळेहोतात. देशात दरवर्षी लाखो लोकांनासाथीच्या रोगाची बाधा होते. डायरिया व जलशुष्कतेमुळे अनेक लहान बालकांचा दरवर्षी मृत्युहोतोहे लक्षात आल्यावर महाराष्ट्र शासनाने २ ऑक्टोबर २००० पासुन संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबवायला सुरुवात केली.

लोकसहभागातून ग्रामीण भागात आरोग्य व स्वच्छतेचा कार्यक्रम शासनानेहाती घेतला कारण ग्रामीण भागातील माणुस आजही उदासीन आहे. नकारात्मकता व उदासीनतेलासकारात्मकतेत बदलण्यासाठी उचललेलेहे एक मोठे पाऊल आहे.

स्वातंत्र्याच्या ७१ वर्षानंतरही अजुनही स्वच्छ पाणी, वीज, रस्ते या मुलभूत सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध माहित या जाणिवेतुन या योजनेचा उदय झाला. यासाठी १९८६ मध्ये केंद्रसरकारने ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची सुरुवात केली व त्यात सुधारणा करुन १९९९ मध्येसंपुर्णस्वच्छता अभियान सुरु केले. त्या धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही योजना सुरु केली. घरोघरी स्वच्छतागृहे बांधणे, पाण्याची पातळी उंचावणे यासाठी लोकसहभाग वाढविण्यासाठी ग्रामसेवकाद्वारे माहितीचे प्रसारण व जनजागृती करण्यात आली. यासाठी अनेक सेवाभावी स्वयंसेवी संस्थांची (NGO) मदत घेण्यात आली. यातून अहमदनगर जिल्हयातील हिवरेबाजारचे पोपटराव पवार आणि नांदेड जिल्हयातील नायगाव तालुक्यातील शेळगाव गौरी या गावाला अनेकवेळा आदर्श ग्राम म्हणुन राज्य व राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळाले आहेत यामध्येतालुक्यातील नेतृत्व मा. माधवराव शेळके पाटील शेळगावकर यांचे मोठे योगदान आहे. या अभियानाचे योगदान अभ्यासण्यासाठी प्रस्तुत लघुशोध निबंधात अभ्यास करण्यात आला आहे.

**अभियानाची वैशिष्टये :-**

**१)स्वच्छतेतुन श्रमदान :-** या अभियानातून ही योजना सर्वांची आहेही भावना निर्माण झाल्यामुळे सर्व लोक अत्यंत उत्साहाने या योजनेत सहभागी झाले. ग्रामीण भागातील युवक, स्त्री, प्रौढ, सर्व गटातील लोकांनी उत्स्फुर्तपणे ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेतला. गावाच्या स्वच्छतेसाठी सर्वांनी श्रमदान केले.

**२)वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच ग्रामस्वच्छता :-** या अभियानातून आरोग्याचा निगा राखणे, वैयक्तिक स्वच्छता या बाबीवर लोकजागृती घडवुन आणली. त्यामुळे ग्रामस्थाची शारीरिक व आर्थिकहानीहोण्याचे टळले. यामुळे ग्रामस्थांना हे अभियान आमचे अभियान आहे असे वाटले. परिणामी वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच परिसर स्वच्छतेतुन व ग्रामस्वच्छतेची सर्व ग्रामस्थांनी काळजी घेली. त्यामुळे या अभियानाला चालना मिळाली व गावाचा चेहरा मोहरा बदलला.

**३)हगणदारी मुक्त गावाचा प्रयत्न :-** आपण गावाच्या जवळ आलो आहोतहे आपणास तेथील दुर्गंधीवरुन लक्षात येते. हजारो वर्षापासुन खेडयाची असलेलीहीओळख नष्ट करण्यात या अभियानाचे मोलाचे योगदान आहे. कारण या अभियानात उघडल्यावर शौचास बसल्यास होणाऱ्या परिणामाची चर्चा ग्रामीण भागातील लोकांशी उघडपणे करण्यात आली. आपल्या घरातील आया-बहिणीला उघडयावर शौचास पाठवणे खुप अनिष्ट आहे. हे ग्रामीण भागातील लोकांच्या मनावर ठसविण्यात आले. परिणामी खेडयातील लोकांनी स्वयंप्रेरणेने स्वच्छतागृह बांधले. यामध्येलोकप्रतिनिधी व प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाची भुमिका बजावली म्हणुन आज या गावात घरोघर स्वच्छतागृहे उभारलेली दिसतात पण त्याचा वापर पाण्याअभावी खुपच कमीलोक करताना दिसतातहेही या गावात तेवढचे सत्य आहे.

**४)सरकारी तिजोरीवर अतिअल्प भार :-** या अभियानात लोकसहभागावर विशेष भर असल्यामुळेनाममात्र स्वरुपात आर्थिक भार सरकारच्या तिजोरीवर पडला. लोकांनी स्वयंप्रेरणेने स्वखर्चातून आपल्या गावाचे व परिसराचेसौंदर्यकरण केले. आमची योजना अशी भावना असल्यामुळे भ्रष्टाचाराचा प्रश्नच नव्हता. कारण जनतेचा पैसा असल्यामुळेही रक्कम जास्तीत जास्त खर्च करण्यावर भर देण्यात आला. महाराष्ट्रातहजारो कोटीचा निधी लोकसहभागातून उभा केला गेला. त्यामुळे शासकीय तिजोरीवर कमी भार पडला. शासनाने वेगवेगळया प्रकारचे पुरस्कार व बक्षिसाचे प्रलोभन दाखवून लोकांना प्रेरीत केले व ग्रामीण भागात स्वच्छता अभियान राबवण्यात आले.त्यामुळे शेळगाव गौरी गावाचा कायापालट झालेला दिसुन येतो.

**५)सामाजिक एकता :-**या अभियानाला संत गाडगेबाबांचे नाव दिलेले असल्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्यांच्या बद्दल असलेल्या आदरभावामुळे व त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेवून स्वयंप्रेरणेने सर्व गावकऱ्यांनीसमूह भावनेने व आपलेपणाच्या भावनेने कामे केल्यामुळे एकमेकांच्या मनातील दुरावा नष्ट होवुन सामाजिक एकता निर्माण होण्यास चालना मिळाली. पुरस्कार आपल्याच गावाला मिळाला पाहिजेही भावना गावकऱ्यांना एकत्र बांधुन ठेवू शकी. गावातील लोकांच्या मनात निर्माण झालेली आम्हीया भावनेतून सामाजिक एकत निर्माण होत असलेली दिसुन येते म्हणुन या गावाला अनेक वेळा पुरस्कार मिळाले.

ग्रामीण भागातील नागरीकांना स्वच्छतेसाठी प्रेरीत करण्यासाठी राज्य शासनाकडून २०१६-१७ मध्ये पुढील प्रमाणे बक्षीसे दिली गेली.

**अ.जिल्हास्तरीय पुरस्कार**

| अ.क्र. | पुरस्काराची रक्कम | क्रमांक | गावाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ५००००० | प्रथम क्रमांक | शेळगाव भोरी, ता. नायगाव, जि.नांदेड |
| २ | ३००००० | द्वितीय क्रमांक | लहान, ता. अर्धापुर, जि. नांदेड |
| ३ | २००००० | तृतीय क्रमांक | कामळज, ता. लोहा, जि. नांदेड |

**ब.विभागीय पुरस्कार वितरण २०१६-१७**

I. धामनगाव, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर.
II. शेळगाव गौरी, ता. नायगाव, जि. नांदेड.
III. पिंपराळा, ता. वसमत, जि. हिंगोली

**क.राज्यस्तरीय पुरस्कर वितरण २०१६-१७**

I. हिवरेबाजार (अहमदनगर) -२५ लक्ष
माण्याची वाडी (सातारा)
II. शेळगाव गौरी, ता. नायगाव, जि. नांदेड. -२० लक्ष
III. घाटाव (रायगड) व राजगड जि. रायगड -१५ लक्ष

अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाने २०१६-१७ मध्ये जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण केले व ग्रामीण भागातील जनतेने या अभियान सहभाग घेवून केलेल्या कार्याचे चिज झाले. या गवाला तिन्ही स्तरावरील बक्षीस मिळाले.

या अभियानात सहभागी गावांचा कायापालटहोण्यास मोलाचे योगदान गावकरी व शासन या दोघांचेही आहे. पण विद्यमान सरकारनेही योजना मोडकळीस आणी असुनती बंद करण्याच्या मार्गावर आहे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

**सारांश :-**

शेळगावातील ग्रामीण समाज जीवनात पायाभूत बदल घडवून आणुन जीवनमानाचा दर्जासुधारण्यामध्येतसेच स्वच्छता व आरोग्याचे प्रश्न समूळ नष्ट करण्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे योगदान मोलाचे आहे. या अभियानामुळे महाराष्ट्रातीलहजारो गावे ही स्वच्छ व हगणदारीमुक्त झाले व ग्रामीण भागातील स्वच्छतेविषयी असलेली उदासीनताहळूहळू कमीहोण्यास चालना मिळाली. स्वच्छ परिसर, शुद्ध पाणी याचासाथीच्या रोगाशी असलेला परस्पर संबंध सर्वसामान्यांचा लक्षात आल्यामुळे अभियानात सहभागी गावांचा चेहरामोहरा बदलला हेस्पष्ट लक्षात येते.

**निष्कर्ष :-** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवल्यामुळे ग्रामीण समाज जीवनात कोणकोणते सामाजिक बदल घडून येण्यास चालना मिळाली व या अभियानाने काय साध्य केलेहे आपणास पुढील प्रमाणेनिष्कर्ष रुपाने सांगता येते.

१) या अभियानामुळे ग्रामीण भागातील लोकांचा आरोग्य व स्वच्छतेविषयी सकारात्मक दृष्टीकोण निर्माण झाला.
२) विविध प्रकारच्या साथीच्या रोगाचे कारणे व परिणामांची माहिती ग्रामीण भागातील लोकांना दिल्यामुळे ग्रामीण माणसात जागरुकता निर्माण झाली. परिणामी डायरिया व जलशुष्कतेमुळेहोणाऱ्या बालमृत्युचे प्रमाण घटण्यास मदत झाली.
३) या अभियानामुळे महाराष्ट्रातील गावागावात व घरा-घरात स्वच्छता घराचे महत्व पटवून सांगण्यात आल्यामुळे ग्रामीण भागात स्वच्छता गृहाचे प्रमाण वाढले, पण कोरडया दुष्काळामुळे त्यांचा वापर करण्याचे प्रमाणे कमी झाले आहे.
४) ही योजना लोकसहभागातून राबवण्यात येत आल्यामुळे शासनानेसहाय्यकाची भूमिका घेतली. जन सहभागामुळे जनतेलाहे अभियान आपलेच आहे अशी भावना निर्माण होण्यास चालना मिळाली व उत्स्फुर्तश्रमदानालाप्रतिसादमिळाला व सामाजिक एकात्मता निर्माण होण्यास चालना मिळाली.

**शिफारशी :-**

१) शासनाने अशा अभियाना बरोबरच ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर विशेष भर द्यावा.
२) शासनानेहे अभियान बंद करण्याचा विचार न करता यामध्ये नाविण्य आणण्याचा प्रयत्न करावा.
३) हे अभियान तळागाळातील लोकांपर्यंत नेण्यासाठी शासनाने विशेष धोरण अखावे.

**संदर्भ :-**

१) डॉ. दिलीप खैरनार (२०१०), भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
२) तुकाराम वाघमारे (२००६), स्वच्छ पाणीसुरक्षीत आरोग्य, ज्ञान संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ, धुप्पा.
३) www.loksatta.com/mumbai
४) https://mr..wikipedia.org

# ग्रामीण सामुदायिक विकास आणि सामाजिक समस्या

**प्रा. बी.जे. कुकडे**
(समाजशास्त्र विभाग)
तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर
जि.उस्मानाबाद

भारतीय समाज हा प्राचीन व अत्यंत संकीर्ण असा आहे. भारतास सुमारे पाच हजार वर्षापेक्षा अधिक काळचा इतिहास आहे. या कालखंडात अनेक वंशाचे, धर्माचे व भाषांचे लोक भारतात आले. व येथील समाज जीवनाशी एकरुप झाले. त्यामुळे भारतीय समाजात सांस्कृतीक विविधता पाहावयास मिळते.

भारतीय समाज हा विविध मानवी समूहांनी ज्यांची वैशिष्ट्ये भिन्न आहे अशा समूहांच्या मिश्रणाने बनलेला आहे. समुहाच्या अधारे भारतीय समाजाचे प्रामुख्याने आदिम, ग्रामीण व शहरी समुदाय असे तीन प्रकार पडतात. डॉ. राधाकमल मुखर्जी म्हणतात. "ग्रामीण समुदाय म्हणजे असा मानवी समूह की ज्यात तुलनात्मक दृष्टीने अनेक सामाजिक व सांस्कृतीक साम्ये आढळतात. या समूहातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती अथवा शेतीशी संबंधीत असणारे व्यवसाय असतो. या समूहात लोकसंख्येची घनता कमी असते. परस्पर सहकार्यावर आधारित परस्पर संबंधामुळे या समूहाचे स्वरुप प्राथमिक गटासारखे समूहासारखे असते." तर सिम्स यांच्या मते "शेतकऱ्यांचे वसतीस्थान म्हणजे खेडेगांव होय."

आजही भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात सहा लाख चाळीस हजार आढशे सदुसष्ट (६४०८६७) खेडी आहेत. तेव्हा एकूण भारतीय लोखंख्येच्या ६८.८४ टक्के लोक खेड्यात राहतात.

इंग्रजांच्या आगमनापूर्वी भारतीय खेडी ही स्वायत्त होती. मार्क्स सारख्या विचारवंताने भारतीय खेड्यांना स्वायत्त गणराज्य असे म्हटले आहे.

इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या कालखंडात खेड्यांची दुरावस्था सुरु झाली. दारिद्रय, उपासमार, अनारोग्य, शेतीचे मागासलेपण, बेरोजगारी, दुष्काळ, अज्ञान, स्त्री दुय्यम स्थान अशा अनेक मानवी व नैसर्गिक समस्यांनी ग्रामीण समाज दुभळा बनला होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण समाजाचा मागासलेपणा दूर करण्यासाठी व विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन विकास कार्यक्रम कार्यान्वीत करुन ग्रामीण परिवर्तनाला चालना देण्यात आली.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. ग्रामीण सामुदायिक विकासाची संकल्पना स्पष्ट करणे
२. ग्रामीण समस्या आणि सामुदायिक कार्यक्रम यांच्या परस्पर संबंधाचा आढावा घेणे
३. सामुदायिक विकास संकल्पनेची प्रासंगिकता तपासणे

**संशोधन पद्धती :-**

१. प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदातील प्रकाशित लेख विविध वर्तमानपत्रातील लेख व संदर्भ ग्रंथाचा अवलंब करण्यात आला आहे.

सर्वसाधारण विकास ही संज्ञा कोणत्याही आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी वापरली जाते. आर्थिक विकासात प्रामुख्याने आर्थिक उत्पादनात झालेली वाढ व समृद्धी यांचा अंतर्भाव होतो. तर सामाजिक विकासात नवीन आणि जटील अशा सामाजिक संरचना व संघटना यांच्या विविध प्रकारांचा समावेश होतो. सामाजिक विकास या संकल्पनेचे स्पष्टीकरण करताना फेअरचाईल्ड म्हणतात "सामाजिक किंवा सामाजिक नसललेल्या संस्था व शक्ती (Forces) यांत झालेले परिवर्तन म्हणजे सामाजिक विकास होय." तेव्हा ग्रामीण सामुदायिक विकासाचा अर्थ पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. ग्रामीण सामुदायिक लोकांची सर्वांगिण सुधारणा घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.
२. ग्रामीण विकास म्हणजे आहे त्या स्थितीत सुधारणा करणे म्हणजे नवीन बाबींचा समावेश करणे.
३. शेतमजूर शेतकरी, लघु उद्योग, जमिन सुधारणा, दळणवळण व संदेशवहणाच्या सोयी, वजीपुरवठा, पाणी पुरवठा, अस्पृष्यता निर्मुलन, दारिद्रय व्यसनाधिनता अशा सामाजिक समस्यांचे उच्चाटन करणे.
४. ग्रामीण समुदयास स्वावलंबी व सामर्थ्यशाली बनविणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

५. ग्रामीण लोकांच्या मानसिक व ध्येयवादी जीवनाची प्रगती म्हणजे ग्रामीण विकास होय.

तेव्हा ग्रामीण समुदायाच्या विकासाला चालना देणाऱ्या सुधारणा म्हणजे

१. १९४८ पासूनचे जमीन सुधारण विषयाचे कायदे.
२. १९५२ ची सामुदायिक विकास योजना - ग्रामीण जनतेने आपल्या स्वत:च्या बळावर आर्थिक व सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयोग म्हणजे सामुदायिक विकास योजना होय.
३. बळवंतराय महेता समितीची पंचायतराज्य योजना
४. १९७५ चा वीस कलमी कार्यक्रम
५. १९७८-१९७९ चा एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
६. १५ ऑगस्ट १९७९ ची ग्रामीण युवकांना स्वयंरोजगार साठी प्रशिक्षण (ट्रायसेम) योजना
७. १९६७ ते १९६९ च्या दरम्यान राष्ट्रीय पातळीवर जे कृषी संदर्भात कार्यक्रम राबविले तेथून देशात शेती क्षेत्रात हरित क्रांतीला सुरुवात झाली. शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा व यंत्राचा वापर करुन शेतीतील धनधान्याचे उत्पादन वाढविण्यास सुरुवात झाली.
८. १ एप्रिल १९८९ मधील जवाहर रोजगार योजना
९. १९९३-९४ ची ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती यातून ग्रामीण नेतृत्वाला नविन संधी मिळण्यास सुरुवात झाली.
१०. १९९१ च्या जागतीकीकरणामुळे भारतातील शेतीमाल जगाच्या कानाकोपऱ्यातील बाजारपेठेत पोहचला. शेतीत व्यापारीकरणाला सुरुवात झाली.

अशा विकास उपक्रमातून ग्रामीण विकासाला चालना देणारे घटक निर्माण झाले ते असे.

१. कृषि विकासात जलसिंचनाच्या सोयी वाढल्या.
२. शिक्षणांच्या सुविधांमध्ये वाढ झाली.
३. स्त्री, बालक, वंचित घटकांच्या कल्याणाला सुरुवात झाली.
४. मनुष्यशक्ती व नैसर्गिक साधनांचा वापर सुरु झाला.
५. क्रियाशिल नेतृत्वाला संधी मिळू लागली.
६. जोडधंदा, बचतगटांची स्थापना, कर्जपुरवठ्यांच्या सुविधांच्यामध्ये वाढ झाली.

अशा विकासाला चालणा देणाऱ्या घटकांच्या निर्मितीची प्रक्रिया सुरु झाली.
परंतु ग्रामीण सामुदायिक विकासाला आव्हान ढरणाऱ्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

१. <u>कर्जबाजारीपणाची समस्या</u> :- "भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो. कर्ज काढून जीवन जगतो. व कर्जातच मरतो. असे म्हटले जाते." स्वातंत्रकाळात भारत सरकारने केलेल्या विविध उपाययोजनामुळे खाजगी सावकारांच्या पाशातून ग्रामीण शेतकऱ्यांची सुटका सुरु झाली आहे. तसेच अलिकाडच्या काळात शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती मेळावे, कर्जमाफीच्या मागण्या व शासनाने केलेल्या घोषणा करुन देखील शेतकरी अद्यापही कर्जाच्या जाळ्यात अडकलेला दिसून येतो. कर्जामुळे तर आत्महत्त्येला जवळ करत असलेली उदाहरणे महाराष्ट्रातील विदर्भ, यवतमाळ, उस्मानाबाद जिल्ह्यात जास्त दिसून येतात.

वेगवेगळी राजकीय पक्ष देखील कर्जामाफीच्या घोषणा करुन निवडणूका लढवत आहेत. तथापी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व शेतीशी संबंधीत समस्या यात इतकी वाढ झाली आहे की भारतीय खेड्यामध्ये आंदोलने, चळवळ अशांतता, यांचे एक नवीन पर्व सुरु झाले आहे. असे म्हणावे लागते.

२. <u>दारिद्र्याची समस्या</u> :- "सामाजिक दृष्टीकोनातून दारिद्र्याची मीमांसा करताना प्रत्येक व्यक्तीस अनुरुप अशा किमान शहरीमानाच्या दर्जापेक्षा निम्न स्थितीत राहणे होय." शेतजमीनीची मालकी असणारा शेतकरी कर्जबाजारीपणामुळे दरिद्री आहे. तर अर्धरोजगारी तुटपुंजे उत्पन्न असणारे, मजूरीचे दर कमी असलयामुळे ग्रामीण क्षेत्रातील शेतमजूरही दारिद्र्यात आहे.

३. <u>ग्रामीण बेरोजगारी</u> :- "एखाद्या व्यक्तीला काम करण्याची इच्छा असताना व आहे त्या मोबदल्यात काम करण्याची इच्छा असताना काम मिळत नाही. तेव्हा त्याला बेराजगारी म्हणतात." भारतीय ग्रामीण बेरोजगारी

लोकसंख्या वाढ, शेतीचे हंगामी स्वरुप, शेतीचे वाढते विभाजन आधुनिकीकरणाचा वापर करण्याचे कौशल्य नसने, ग्रामीण उद्योगांचा अभाव, इ. कारणांमुळे ग्रामीण बेरोजगारीत वाढ होत आहे. याचा परिणाम ग्रामीण समाज जीवनावर होत असून काम करण्याऐवजी फुकट, आळशी बनण्याकडे माणसांचा कल वाढत आहे. मद्यपानाच्या समस्यात वाढ होत आहे.

४. आरोग्याची समस्या, मद्यपान, मानसिक मागासलेपणा इत्यादी

अशा अनेक समस्यातून ग्रामीण विकासाला एक प्रकारचे आव्हान ठरत आहे. तेव्हा ग्रामीण विकासाला प्रोत्साहन देणारा कार्यक्रम निर्माण करणे, ग्रामीण पुर्नरचनेचे कार्यक्रम नव्याने सुरु करणे आवश्यक वाटते.

**सामाजिक पुनर्रचनेबाबतचे रॉसचे विचार :-**

रॉस या अमेरिकन समाजशास्त्रज्ञ यांनी पुनर्रचनेच्या संदर्भात काही मूलभूत आधारभूत सुत्रे आपल्या "Principales of sociology" या ग्रंथात विशद केलेले आहेत.

१. सुधारणा करीत असताना हिंसा होणार नाही अशी दक्षता घेतली पाहिजे. मानवी स्वभाव हिंसामुक्त ठेवणे आवश्यक आहे.
२. सुधारणा वास्तवाशी सुसंगत असावयास पाहिजे. सुधारणेचा प्ररंभ करण्यापूर्वी सर्व परिस्थितीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे कशात बदल करावयाचे आहे हे ठरवून योजना आखता येतात.
३. सुधारणा मोठ्या प्रमाणात आमलात आण्यापूर्वी लहान प्रमाणात कार्यान्वीत करुन परिणाम पहावेत
४. सामाजिक चळवळीतून सुधारणा होणे आवश्यक असते. सामाजिक चळवळ हा समाज सुधारणेचा पाया असला पाहीजे.
५. सनदशीर मार्गाने, संधिानात्मक पद्धतीचा उपयोग करुन सुधारणा झाली पाहिजे. यासाठी सरकारचे नेतृत्व असावे. अशा शायकीय पाठिंब्यामुळे सुधारणा आमलात येऊ शकतात.

**समारोप :-**

भौतिक स्वरुपाची सुधारणा हा समाजाच्या पुनर्रचनेचाच एक आवश्यक भाग आहे. कारण काही विशिष्ट क्षेत्रात भौतिक स्वरुपाची सुधारणा झाल्याशिवाय समाजाची पुनर्रचना होऊ शकत नाही. ग्रामीण समुदाय हा भौतिक दृष्ट्या स्थानिक स्वरुपाचा आहे. तेव्हा ग्रामीण सामुदायिक पुनर्रचनेच्या संदर्भात पुढील दृष्टीकोन सुचवित आहे.

१. लोकशाहीवादी दृष्टीकोन
२. साम्यतावादी दृष्टीकोन
३. गांधीवादी दृष्टीकोन
४. सर्वोदय विचारणसरणी

अशा पुनर्रचना कार्यक्रमातूनच ग्रामीण समस्यांच्या तिव्रता कमी होऊन ग्रामीण विकासाचे क्षेत्र विशाल होईल असे वाटते.

**संदर्भ पुस्तक :-**

१. सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिंद्धांताचा कोश
२. सामाजिक समस्या - रा.ज.लाटे
३. ग्रामीण समस्या आणि नागरी प्रश्न - प्रा.जी.एन.मोरे
४. ग्रामीण समाजशास्त्र-डॉ. नारायण चौधरी
५. जातियव्यवस्था व अर्थव्यवस्था-डॉ.भा.कि.खडसे, डॉ.चौधरी
६. भारतीय समाज - प्रा.चंद्रकांत खंडागळे

# भारतीय समाज आणि ग्रामीण विकास

प्रा. डॉ. सुनीता टेंगसे.
कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ
जि. परभणी,

प्रस्तावना :—

आपल्या भारत देशात 65टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आहे, मात्र शहरी भागाचा ज्या वेगाने विकास झाला तसा ग्रामीण भागाचा झालेला नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खेडयाकडे चला हा दिलेला संदेश विसरून हा शहराकडे चला हाच मंत्र सर्वत्र दिसतो आहे. शिक्षण, व्यवसायासाठी शहराकडे आलेली व्यक्ती शहराची होउन जाते. ती खेडयाकडे पाठ फिरवताना दिसते. या विपरीत सामाजिक परिस्थितीचा ग्रामीण विकासावर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. ग्रामीण विकास ही एक प्रकिया असून ज्याचे उद्दिष्ट ग्रामीण जीवनशैलीच्या गुणवत्तेत सुधारणा करणे. गावाच्या संपूर्ण विकासासाठी शेती आणि त्याच्याशी संबंधीत उपकम, ग्रामीण आणि कुटीर उदयोग, हातमाग सामाजिक आणि आर्थिक पायाभुत रचनात्मक कार्य, सार्वजनिक सेवा अणि सुविधा यांचा विकास आवश्यक आहे. कृषी क्षेत्राचा विकास देखील अशा काही प्रोफेशनलची मागणी करीत आहे. जे विविध सेवामध्ये योगदान देउ शकतील जसे की आयात, निर्यात, ग्रामीन बॅकीग केडीट कृषी प्रक्लपांना अर्थपुरवठा, विमा, मालवाहतुक, संशोधन, आणि वीकास ग्रामीन अर्जासोबतच तांत्रीक माहीती, बाजार, खाध्यान्य आणि कृषी क्षेत्रातील विध्यमान सार्वजनीक आणि खाजगी संस्थांची माहीती देउ शकतीलं

शोधनिबंधाचा उद्देश:—

1. ग्रामीण समाज व्यवस्थेची स्थिती अभ्यासणे.
2. विकास म्हणजे काय हे जाणुण धेणे.
3. ग्रामीण विकासाचे मापदंड अभ्यासणे.
4. ग्रामीण विभागाव्दारे राबवलेले कार्यक्रम जाणुण घेणे.
5. ग्रामीण विकासाच्या योजना व सध्यस्थीती अभ्यासणे

संशोधन पध्दती :—

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ संकलण साधनांचा वापर करून माहीतीचे संकलण व माडणी करण्यात आली आहे.

ग्रहीत कृत्य :—

ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम राबवले जातत. परंतु याचा फायदा म्हणावा त्या प्रमाणात संबंधीतापर्यत पोहचत नाही

''ग्रामीण विकासाचा अर्थ जनतेची आर्थीक स्थिती सुधारणे व सामाजीक बदल घडवुण आणणे हा आहे''. ग्रामीण विकास कार्यकमात जनतेचा वाढता सहभाग, योजनांचे विकेंद्रकरण, भुमी सुधारणेची चांगल्या पध्दतीने अमलबजावणी करणे, कर्ज वाटपाव्दारे ग्रामीण जीवन सुखी व समृध बनवण्याकडे लक्ष देणे, प्रारंभीक विकास प्रक्रीयेवर कृषी , उदयोग, संचार, शिक्षण, आरोग्य व संबंधीत क्षेत्रावर अधीक लक्ष केंद्रीत केले. पुन्हा असे लक्षात आले की शासकीय प्रयत्नां बरोबरच मोठया प्रमाणात स्थानीक लोकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असला पाहीजे.

विकास या शब्दाची पाश्चीमात्य देशातील तज्ञांनी केलेल्या व्याखेनुसार दरडोई किती पेट्रोल वापरले जाते ? दरडोई उत्पन किती आहे हे मोजता येते. दरडोई किती आयकर भरला अशा गोष्टींच्या आधारे विकासाचा वेग अथवा गती मोजली जाते परंतु सत्य बाब ही आहे की केवळ भौतीक बाबींचा विकास म्हणजे ख—या अर्थाने विकास नसुन ग्रामीण भागामध्ये जे मुलभुत प्रश्न आहेत त्याची सोडवणुक झाली आहे का ते पाहणे गरजेचे आहे ग्रामीण भागातील मुलभुत प्रश्न म्हणजे जर अन्न, वस्त्र, निवारा, व पाणी व आरोग्य या गरजा पुर्ण झाल्यावरच मानवी विकासाची नांदी सुरू होते यात प्रामुख्याने सामाजीक आर्थीक विकास कितपत झाला, सामाजीक समस्येचे स्वरूप कसे आहे, सामाजीक मुल्य जोपासताना स्थीती , जनतेचे मनोबल वाढले आहे का सामाजीक, सांस्कृतीक वा आध्यात्मीक स्थीती, लोक सुखी आणि आनंदी आहेत का या बाबीचाही विकास या

संक्लपनेत समावेश असणे गरजेचे आहे असे वाटते, म्हणुणच ग्रामीण विकासाला योग्य ती दिशा असणे आवश्यक आहे. केवळ भौतीक उन्नती म्हणजेच विकास नव्हे तर भौतीक, अभौतीक, सामाजीक व सांस्कृतीक विकास ही महत्वाचा आहे.

ग्रामीण विकासाची दीशा ठरवताना ही मापदंड ठरवणे गरजेचे आहे. ही मापदंड ठरवताना महात्मा गांधी यांचा दृष्टीकोण आजही खुप मोलाचा आहे प्रत्येक खेडे हे गावाच्या गरजा भागवीण्यासाठी स्वयंपुर्ण असले पाहीजे या सामुदायीक असले पहीजे या तत्वावरच गावाचा विकास झाला पाहीजे. यासाठी समन्यायी तत्वचा वापर झाला पाहीजे अशी अग्रही भुमीका ग्रामीण विकासाची दिशा ठरवताना घेतली पाहीजे.

ग्रामीण विकासाचा मापदंड प्राधान्याने हा असावा की गावात स्वयं रोजगार निर्मीती झाली पाहीजे. गावात बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती करणे हाच आहे स्वयं रोजगार निर्मीती मध्ये कृषी उत्पादनावर आधारीत घरगुती तसेच सामुदायीक तत्वावर प्रक्रीया उद्योग सुरू करण्यासाठी मोठया प्रमाणावर चालणा देणे गरजेचे आहे. शेतीतील कच्चा माल बाजारात विकण्या ऐवजी त्यावार प्रक्रीया करून दरजेदार उत्पादनाची निर्मीती करून याची विक्री करणे या प्रक्रीया उदयोगातुन रोजगार निर्मीतीत वाढ होउ शकते अन्नधान्य, पिक उत्पादनाचे ग्रेडींग म्हणजे वर्गवारी करणे, ग्रडींग प्लॅन गाव पातळीवर उभारणे त्यामुळे शेतमालाचा भाव वाढु शकतो, त्यामुळे ग्रह उदयोगास चालना मीळु शकते जसे की पापड, कुरडई, सांडगे, लोणचे, हळद पावडर, मसाले, मीरची पावडर, लसण, अदरक, कांदा याची पेस्ट इ. या सर्व पदार्थाच्या निर्मीतीसाठी जी आदर्श शास्त्रीय पध्दती आहे व टीकावुपण वाढवण्यासाठी ज्या पदार्थांची म्हणजेच प्रीझरव्हेशन चा कीती प्रमाणात वापर करयचा याचे प्रशीक्षण तालुका व जिल्हा पातळीवर उपलब्ध आहेत. ग्रामस्थांनी जर ठरवले तर हे सहज शक्यही आहे. ग्रामस्थांमधील कृषी उदयोजकता जागवणे व तीची योग्य दिशेने वाटचाल करणे हीच ग्रामीण विकासाची योग्य दिशा ठरू शकते आणि याशिवाय इतर कृषी उदयोग म्हणजे शेतीसाठी लागणारी अवजारे यांची देखभाला व दुरूस्ती करणे शक्य असेल तर लहान अवजारांची निर्मीती करणे. अशा प्रकारचा उदयोग जर ग्रामपातळीवर केला तर श्रम, पैसा व वेळ वाचून रोजगार निर्मिती वाढण्यास मदत होईल. यासाठी ग्रामसभेच्या बैठकीत गावाच्या विकासाचे कार्यक्रम मांडून त्यानुसार कार्यवाही केली तर ग्रामीण विकासाची दिशा निश्चीत होईल. याबरोबरच गावातील सिंचनाची सुविधा उपलब्धतेबाबत होत असलेली प्रगती हा एक मापदंड होउ शकतो.

ग्रामीण भागामध्ये ज्या गावामध्ये सिंचन सुविधा उपलब्ध आहे या गावाचा सर्वांगीण विकास हा सिंचन सुविधा उपलब्ध नसलेल्या गावांपेक्षा तीन ते सहा पटींने अधिक झाला आहे. म्हणून ग्रामीण विकासाची दिशा ठरवताना सिंचन सुविधा उपलब्धतेवर अधिक भर देणे महत्त्वाचे आहे. ज्या गावात धरण, कालवा , नाही तेथे ‘गाव तेथे तळे’ ही योजना राबवता येईल. ग्रामीण विकासाची दिशा ठरवताना गाव तेथे तळे ही संकल्पना राबवली पाहिजे. सध्याचे युग माहिती आणि तंत्रज्ञानाच्या सहज उपलब्धतेमुळे ‘वैष्विक खेडे’ ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत आहे. अशा वेळी संगणकाने इंटरनेट च्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेने बाहय जगाशी संपर्क वाढवल्यास, ग्रामीण विकास सुयोग्य दिशेने होण्यास निश्चितच मदत होईल. यात शंका नाही.

ग्रामीण विकास विभागामार्फत राबवले जाणारे कार्यक्रमः–

1. रोजगार देण्यासाठी महात्मा गांधी नॅशनल रूरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी ॲक्ट मनरेगा
2. स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासासाठी नॅशनल रूरल लाइव्ली हूंडस मिशन (एन. आर. एल. एम
3. दारिद्रय रेषेखालील कुटुंबीयांसाठी इंदिरा आवास योजना आय.ए. आई
4. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (पी.एम. जी.एस.वाय.)
5. सामाजीक पेंन्शन साठी नॅशनल सोशल असिस्टंट प्रोग्राम (एम.एस.पी.)
6. आदर्श ग्राम साठी सांसद आदर्श ग्राम योजना (एम.ए.जी.वाय.)
7. ग्रामीण विकास केंद्रासाठी शाम प्रसाद मुखर्जी अर्बल मिशन याशिवाय मंत्रालयाकडे ग्रामीण पदविधरांच्या क्षमतांचा विकास, सुचना, शिक्षण आणि संचार अणि निगराणी व मुल्यमापण या साठीच्या योजना

ग्रामीण विकासाच्या योजना :–

1. सामुदायिक विकास कार्यक्रमः– ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भारत सरकारने राष्ट्रीय पातळीवर सुरू केलेली ही पहिलीच महत्त्वाची योजना होय. या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भाग नेतृत्वाचा विकास करून त्याद्वारे ग्रामीण भागाचा विकास घडवून आणणे.

2. एकात्मिक ग्रामीण विकास योजना (1997–1998):– 2 ऑक्टोंबर 1990 पासून हा कार्यक्रम व्यापक स्वरूपात हाती घेण्यात आला या योजनेच्या खर्चाचे प्रमाण केंद्र व राज्य सरकारचे पन्नास–पन्नास टक्के असते. या योजनेचे उद्यिष्ट गग्रमीण भागातील दारिद्रय दुर करणे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाते. 1999 पासून हा कार्यक्रम सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेत विलीन करण्यात आला.
3. ग्रामीण युवा स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना 1979:– ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देणे. बॅकेमार्फत कर्ज मिळवून देणे. प्रशिक्षण कालावधीत विध्यावेतन देणे.
4. सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार 1999 :– गावात राहणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न वाढविणे केंद्र व राज्य सरकार द्वारे 75:25 प्रमाणात खर्च केला जातो.
5. राष्ट्रीय वृध्दपकाळ पेंन्शन योजना :– ज्यांना स्वतःचे नियमित उत्पन्न नाही किंवा ज्यांना कुटुंबाच्या सदस्यांकडून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने आर्थिक सहाय्य मिळत नाही, आश्रयाशिवाय जीवन जगत आहेत अशा वृध्दांना आर्थिक मदत करणे.
6. राष्ट्रीय परिवार सहाय्य योजना एन.एफ.बी.एस. :– कमवणाऱ्या कर्त्याचा मृत्यु झाल्यास 10000रू सहाय करण्यात येईल. कर्त्याचे वय 18 ते 65 वर्ष असावे.
7. अन्नपूर्णा योजना 2000 :– वृध्द लोकांची गरज पूर्ण करण्यासाठी अन्नाची सूरक्षा देणे अर्जदाराचे वय 65 वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक असावे आश्रयहिन वृध्दपकाळ पेंन्शन घेणारा नसावा.
8. रोजगार हमी योजना 1965 :– ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना काम पुरवणे, ग्रामीण जनतेच उत्पन्न वाढविणे. नवीन उत्पादन संपत्ती निर्माण करणे, 18 वर्षावरील स्त्रीपुरूषांना काम देणे. अपवादात्मक परिस्थीतीत 15 ते 18 वर्षातील
9. रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :– सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी मिळविण्याकरीता उपयोगी होईल असे कौशल्य संपादित करण्यासाठी तसेच कौशल्याचा दर्जा वाढविण्याकरित प्रशिक्षण दिले जाते.
10. सुशिक्षित बेरोजगारांच्या सहायार्थ रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :– सातवी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सुशिक्षित तरुणांना प्रकल्प खर्चासाठी बीजभांडवल उपलब्ध करून देण.

या विविध योजना संबंधीतापर्यंत पोहोचण्यासाठी मोठया प्रमाणात जणजागृतीची गरज आहे.

सरांश :–

सर्व जगभर शहरांचा सतत विकास होत असून सुध्दा जागतीक लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे ऱ्प्रमाण अधिक आहे म्हणूनच आर्थिक नियोजनाद्वारे राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक आहे. तर तो आवश्यक म्हणूनच ग्रामीण समस्यांचे स्वरूप निटपणे समजावून घेवून त्या सोडवण्याचे कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. कुठल्याही राष्ट्रात ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावतो.

अन्नधान्य व इतर कच्चा माल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असते, आणि या बाबतीत शहरांची गरज ही ग्रामीण उत्पादनातूनच भागवली जाते. भारतासारख्या विकसनसिल राष्ट्रांना तर ग्रामीण विकासाची गरज फारच तीव्रतेने भासते. आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या सामाजिक रूढी व चालीरीती यांचे ग्रामीण जीवनातील वर्चस्व कमी व्हावे म्हणून शिक्षणाच्या व दळणवळणाच्या सोयी भरपूर प्रमाणावर पुरवूण ग्रामीण जनतेला विकाससोन्मुख केल्यानंतर ग्रामीण विकासाचे पाउल पुढे पडेल यात शंकाच नाही.

संदर्भ सूची :–

1) http//mr.m. Wikipedia.org
2) http//www.bookganga.com
3) http//secure.mygov.in
4) http//rdd.maharashtra.gov.in.
5) sardha martra, 15 aug 2016
6) India water portal. ग्रामीण विकासाची दिशा, डॉ. बारसवाडकर औरंगाबार, 2/5/18
7) Government of India report of coomitties on community dev.and panchyat raj, new Delhi 1957 Jain sc community dev.panchyatraj in India, Bombay 1967.

# ग्रामीण सामुदायीक विकास आणि जनसहभाग

**प्रा.डॉ. केशव दत्तराव तिडके**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
जनविकास महाविद्यालय,बनसारोळा
ता.केज जि.बीड

---

**प्रस्तावना :**

भारतामध्ये विकासाची प्रक्रिया ही स्वातंत्र्यपूर्व काळापासून राबविण्यात आलेली असली तरी खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ग्रामीण विकासाला चालना मिळाली.ग्रामीण क्षेत्रातील विकासाची जबाबदारी ही स्थानिक स्वशासनाकडे देण्यात आलेली आहे. ग्रामीण क्षेत्रातील जनेला सहभागी करून घेणे त्यांच्या गरजा लक्षात घेऊन स्थानिक उपक्रमांची निर्मीती करणे आणि जनतेच्या सहकार्याने उपक्रमाला कृतीमध्ये आणणे यात स्थानिक संस्था आणि स्वशासनाची भूमीका महत्वाची राहिलेली आहे.ग्रामीण जनसमुदायामध्ये एकता प्रस्तापीत करणे,त्यांना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी सामुदायीक विकास कार्यक्रमाची निर्मीती करणे, यात जनतेला सहभागी करून घेणे याला महत्व आहे. समाजव्यवस्थेतील आणि विकास प्रक्रियेतील मानव हा प्रमुख घटक आहे. कारण मणुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाच्या बाहेर राहू शकत नाही. विकास प्रक्रियेत त्याचे योगदान असले पाहिजे. विकासाची संकल्पना ही अनेक अर्थाने व्यापक आहे. ग्रामीण भागाचा विकास म्हणजे लोकशाही विकेंद्रीकरण, जनसहभाग,महिला, मागासवर्ग, बालके, अपंग यांचे सशक्तीकरण, आरोग्य,गृह, शिक्षण या पायाभूत सामाजिक सेवांचा विकास या बाबी यामध्ये समाविष्ठ होतात.

ग्रामीण सामुदायिक विकासासाठी इ.स. १९५२ मध्ये मोठे पाऊल उचलले गेले ते सामुदायीक विकास कार्यक्रमाच्या अनुषंगाने यातुन सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, संरचनेची पायाभरणी झाली असली तरीही ग्रामीण विकास करण्यात हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला नाही. कारण या कार्यक्रमात जनसहभागाचा अभाव दिसून आला. या कार्यक्रमाच्या अपयशाचे पडसाद बलवंतराय मेहता समितीमध्ये दिसून आले.या समितीने जनसहभाग विकासाच्या केंद्रस्थानी ठेवला पाहिजे अशी शिफारस केलेली आहे.

**शोध निबंधाची उदिष्टये :**

१) ग्रामीण विकास कार्यक्रमातील जनसहभागाचा अभ्यास करणे.
२) ग्रामीण विकास कार्यातील प्रशासकीय यंत्रणेचा आढावा घेणे.
३) ग्रामीण क्षेत्रातील राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा आढावा घेणे.
४) ग्रामीण विकास योजनांचा अभ्यास करणे.
५) पंचायतराज संस्थाच्या भुमीकेचा आढावा घेणे.

**गृहितकृत्ये :**

१) ग्रामीण विकासप्रक्रियेत जनसहभाग वाढत आहे.
२) पंचायतराज संस्था ग्रामीण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना त्यात जनता सहभागी होत आहे.
३) शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात विविध विकास उपक्रम राबविले जात अहेत.
४) ग्रामीण विकास कार्यक्रमात जनसहभाग वाढल्यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे.

**ग्रामीण सामुदायीक विकासातील महत्वाच्या बाबी :**

१) ग्रामीण सामुदायिक विकास ही संकल्पना व्यापक असल्यामुळे संपूर्ण ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास करणे यांच्याशी संबंधित आहे. विशेषत: आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय महत्वपुर्ण असतो.
२) ग्रामीण विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे जनसहभाग हा त्यातील महत्वाचा घटक आहे.त्याचबरोबर शासकीय यंत्रणा विभाग यांच्या सामूहिक प्रयत्नातून ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो.
३) ग्रामीण सामुदायिक विकासाची संकल्पना खऱ्या अर्थाने राबवायची असेल तर त्यामध्ये कृषी विकास श्रमीक मजूर, लहान शेतकरी यांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.
४) सामाजिक, आर्थिक, भौगोलिक विकास करण्यासाठी पंचायतराज संस्था व स्वयंसेवी संस्था यांनी नियोजीत पद्धतीने परिवर्तन घडवून आणणे ही ग्रामीण सामुदायीक विकासाची निती आहे.
५) ग्रामीण जनतेला सहभागी करून घेण्याबरोबरच त्यांना सुरक्षीतता प्राप्त करून देणे आणि निणर्यप्रक्रिया व अंमलबजावणीच्या कार्यात त्यांना सहभागी करून घेणे.
६) ग्रामीण दारिद्रय ही प्रमुख समस्या आजही आहे. जनजागृती करून त्यांना विकासाची कामे उपलब्ध करून देणे.त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे हे ग्रामीण विकासाचे प्रमुख ध्येय्य असले पाहिजे.

**ग्रामीण सामुदायीक विकासाला चालना देणारे प्रकल्प**

| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय सेवा ग्राम | १९४५ |
| २ | फिरका विकास योजना | १९४६ |
| ३ | इटावा पायलर प्रकल्प | १९४८ |
| ४ | निलखोरी प्रकल्प | १९४८ |
| ५ | सर्वोदय योजना | १९४८ |
| ६ | सामुदायीक विकास कार्यक्रम | १९५२ |
| ७ | राष्ट्रीय विस्तार सेवा | १९५३ |
| ८ | व्यापक कृषी जिल्हा कार्यक्रम | १९६० |
| ९ | एकीकृत ग्रामीण विकास कार्यक्रम | १९७८ |
| १० | संपूर्ण गाव विकास कार्यक्रम | १९८० |
| ११ | ग्रामीण महिला व बालविकास योजना | १९८२ |

स्वांतत्र्यपुर्व काळापासूनच विविध संघटना संस्थानी ग्रामीण जीवनमानात सुधारणा करण्यासाठी पुढाकार घेताला होता परंतु त्याला मर्यादा होत्या. भारताला स्वातंत्र्य प्राप्त

झाल्यानंतर इ.स. १९५० मध्ये विकासाकरीता पंचवार्षिक योजना आणि ग्रामीण विकास योजना सुरू करण्याच्या दृष्टिने त्याचे नियोजन करण्यासाठी नियोजन मंडळाची स्थापना केली. महात्मा गांधीजीच्या स्वप्नातील भारत साकारण्यासाठी लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी बलवंतराय मेहता यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासगट स्थापन करून त्रिस्तरीय पंचायतराजची निर्मिती केली. ग्रामीण जनतेला सहभागी करून घेणे आणि त्यांच्या हातामध्ये सत्ता परिवर्तीत करणे अशी शिफारस केली याच आधारावर ग्रामीण विकासाची संकल्पना आज राबविण्यात येत आहे.

ग्रामीण जनतेच्या समस्याचे निराकरण करून त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याचा उद्देश ग्रामीण विकास प्रशासनाचा आहे. ग्रामीण भागातील उपलब्ध भौतिक आणि मानवी साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल या दृष्टीने विचार पंचायतराज संस्थानी केला पाहिजे. ग्रामीण क्षेत्राचा सामुदायीक विकास करण्यासाठी आज विविध विकास योजना राबविल्या जात आहेत. परंतु या योजना अंमलात आणण्यासाठी ग्रामीण जनतेचा त्यात सक्रिय सहभाग असला पाहिजे. ग्रामीण उपक्रम राबवत असताना त्यामध्ये जनसहभागाचा अभाव दिसून आला त्यामुळेच आजपर्यंत राबविण्यात आलेले विकास कार्यक्रम यशस्वी होऊ शकले नाहीत. शासकीय आणि अशासकीय संस्था, संघटना शासनाचे विविध विभाग यांनी याकडे सकारात्मक पाहिले पाहिजे.

**सारांश :**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य व्यक्ती हा विकासाचा केंद्रबिंदू मानून विकास प्रक्रियेत त्याला सहभागी करून घेतले पाहिजे. ग्रामीण जनतेला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, सामाजिक व आर्थिक क्षेत्रामध्ये सुधारणा घडवून आणणे. ग्रामीण विकासात्मक धोरणाची निर्मिती करणे. पंचायतराज संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण सामुदायीक विकासाची संकल्पना यशस्वी होऊ शकेल. ग्रामीण भागाच्या विकासाकरीता बहुमुखी विकासाला चालना दिली पाहिजे. शेतीवर आधारीत जोड उद्योगांचा विकास आवश्यक आहे.ग्रामीण जनतेची विकासाबाबत असणारी उदासीनता,निरक्षरता, दारिद्रय या प्रमुख समस्या आजही आहेत. विकासाकरीता राबविण्यात येणाऱ्या विकास योजना पारदर्शक अंमलात आणण्यासाठी त्यात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेतले पाहिजे.ग्रामीण विकासासाठी केंद्रीय पातळीपासून ते गटस्तरापर्यंत नियोजन तयार केले पाहिजे. ग्रामीण विकासासाकरीता राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत प्रशासकीय यंत्रणा आणि संस्था यांच्यात समन्वय असला पाहिजे. ग्रामीण क्षेत्रातील गरजू व्यक्तीला लाभ मिळावा त्यांचा सर्वांगीण विकास करण्याकरीता त्यांच्यात जागरूकता निर्मान करून त्यांना सहभागी करून घेतले पाहिजे. तरच ग्रामीण सामूदायीक विकासाचे ध्येय साध्य होऊ शकेल.

**संदर्भसुची :**

१) Vasant desai, Rural Development, Himalaya Publishing House Delhi, १९८८, P,२४.
२) प्रा.अनंतकुमार कल्याणी, विकास आणि पंचायतराज यशदा,पुणे २००४ पृ.०७
३) डॉ.सुरेन्द्र कटारिया, भारत मे.ग्रामीण विकास राजनितियॉ एंव चुनौतिया,मलिक एन्ड कम्पनी जयपूर २००८ पृ.१२
४) राम अहुजा, भारतीय समाज, रावत पब्लिकेशन्स जयपूर २०००, पृ.३०८
५) डॉ.ए.पी. अवस्थी, विकास प्रशासन, लक्ष्मीनारायण अग्रवाल, आगरा २००८ पृ.१३१.
६) डॉ.संजय तिवारी, ग्रामीण विकास सरकार की विविध योजनाएँ, ओमेगा पब्लिकेशन्स दिल्ली २०११ पृ.३३.

# ग्रामीण महिला नेतृत्त्व विकासातील ७३ वी घटनादुरुस्तीची भूमिका

**डॉ. प्रा. विठ्ठल सांडूर**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा, लातूर

---

**प्रस्तावना :**

७३ वी घटनादुरुस्ती लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. ७३ वी घटनादुरुस्ती म्हणजे पंचायतराज व सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे प्रारंभ करणारी एक ऐतिहासिक घटना होय. ७३ वी घटनादुरुस्तीमुळे राजकीय सत्तेचा वाटा दुर्बलघटकांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला. दुर्बल, मागास घटकांच्या हाती नेतृत्त्व देत असताना. स्थानिक शासन व्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली तरी केवळ ७३ वी घटनादुरुस्तीमुळे असे म्हणणे अतिशोक्ती ठरणार नाही, ७३ वी घटनादुरुस्तीमुळे स्थानिक पंचायतराज व्यवस्थेजा तर संवैधानिक दर्जा मिळालाच त्याच बरोबर महिलांसाठी आरक्षणाची तरतूद केल्याने महिला नेतृत्त्वाचा विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळू लागली. सध्या पंचायतराज व्यवस्थेत ५० टक्के महिला खंबीरपणे नेतृत्व करत आहेत. ही संधी केवळ २४ एप्रिल १९९३ च्या राज्यघटनादुरुस्तीमुळे झाली आहे. म्हणूनच या घटनादुरुस्तीला ऐतिहासिक मानले जाते.

भारतात मेहता सुमितीच्या शिफारशीनुसार १९५९ ला पंचायतराज व्यवस्थेची स्थापना  झाली. याचाच परिणाम महाराष्ट्रात नाईक समितीच्या शिफारशीनूसार १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेची स्थापना करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेच्या कलम २४३ क नुसार पंचायतराज व्यवस्थेसंबंधी राज्यघटनेत तरतूद करण्यात आली. यामुळे या संस्थेला संवैधानिक दर्जा प्राप्त  झाला. त्याचबरोबर महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली. त्यामुळे स्थानिक व्यवस्थेत महिलांना प्रतिनिधीत्व मिळाले.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

- ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला नेतृत्त्व याचा अभ्यास करणे.
- ७३ वी घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेच्या महत्त्वाचा अभ्यास करणे.
- पंचायतराज व्यवस्थेतील महिला नेतृत्त्वाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

- ७३ वी घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेस बळकटी प्राप्त झाली.
- ७३ वी घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेत महिलांना नेतृत्त्वाची संधी प्राप्त झाली.
- ७३ वी घटनादुरुस्तीने महिलांना वास्तविक सत्ता मिळलेली दिसून येते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुयम्म साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. या शोधनिंबधासाठी संदर्भग्रथ, पुस्तके, मासिके व वर्तमानपत्रांचा आधार घेण्यात आला आहे.

**महिला नेतृत्त्व विकासातील ७३ वी घटनादुरुस्तीची भूमिका :**

७३ वी घटनादुरुस्ती पंचायतराज संस्थामध्ये दिलेल्या आरक्षणामुळे महिलांच्या नेतृत्त्व गुणांना संधी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे महिलांना स्वत:च्या राजकीय हक्काची जाणीव झाल्याने महिलांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास झ ाल्यामुळे महिलांमध्ये नेतृत्त्वगुणांचा विकास झपाटयाने होत आहे. ७३ वी घटनादुरुस्तीने महिलांच्या राजकीय सहभागाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. यामुळे अत्यंत दुर्बल घटकांतील महिलांना सत्तेचा वाटा मिळाला आणि त्यामुळे या महिला केवळ स्थानिक शासनापुरतेच नेतृत्त्व मर्यादित राहीले नसून राज्य, व राष्ट्रीय पातळीवर आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवू लागल्या.

जिल्हापरिषद, पंचायतसमिती व ग्रांमपचयांत या तिन्ही स्तरावर महिलाना ५० टक्के आरक्षण मिळाल्याने पंचायतराज व्यवस्थेत ५० टक्के सत्तेचा वाटा आज महिलांकडे आहे. हे विशेष आहे. यामुळे महिला राजकीय महिलांकडे

आहे. हे विशेष आहे. यामुळे महिला राजकीयदृष्टया सक्षम बनत आहेत. त्यांच्याकडे समाजाचा पहाण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. पंचायतराज व्यवस्थेत ७३ वी घटनादुरुस्तीपूर्वी महिलांचा राजकीय सहभाग दुर्मिळ होता. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना यापासून वंचित रहावे लागले होते. पुरुषप्रधान संस्कृतीने महिलांना अत्यंत दुय्यम स्थान दिले आहे. आजही महिलांना पुरुषप्रधान संस्कृतीला बळी पडावे लागते. महिलांवर मोठयाप्रमाणावर अन्याय, अत्याचार सुरु आहेत. महिलांच्या सबलीकरणासंबंधी केवळ व्यासपीठावर बालले जाते पण कृती मात्र केली जात नाही. यामुळे सद्यस्थितीत ही महिलांना त्यांच्या मर्जीनुसार स्वातंत्र्य दिले जात नाही.

केवळ चुल आणि मुल एवढयाच मर्यादित क्षेत्रात वावरलेल्या महिलांच्यादृष्टीने, समाजकारण, राजकारण, अर्थकारण इत्यादी क्षेत्रापासून त्या वंचित होत्या. त्या अनभिज्ञ होत्या. मात्र ७३ वी घटनादुरुस्तीने महिलांनाआशेचा एक किरण दिला. काहीप्रमाणात स्त्रीयांना मान सन्मान प्रतिष्ठा मिळू लागली. ही भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. लोकशाहीच्या दृष्टीने प्राणतत्त्वे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या तत्त्वाची स्थापना अमलंबजावणी करण्यात व स्त्रीयांच्या राजजकीय सहभागाला त्यांच्या नेतृत्व गुणांना वाव देण्यात ७३ वी घटनादुरुस्तीची प्रमुख भूमिका मानली जाते.

७३ वी घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थेत ग्रामीण भागात रहाणाऱ्या आनुसूचित जाती व जमाती मधील वर्गातील महिलांचे नेतृत्त्व मोठया प्रमाणात निर्माण करण्यासाठी मोठया प्रमाणात प्रतिनिधीत्त्व देण्यात आले आहे. त्यानूसार आज प्रचंड प्रमाणात महिला प्रतिनिधी पंचायतराज संस्थेमध्ये निवडून येत असताना दिसून येतात. यावरुन हे स्पष्ट होते की, ७३ वी घटनादुरुस्ती भारतातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी नवसंजीवणी ठरली. महाराष्ट्रशासनाने ८ मार्च १९११ रोजी महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला यामुळे महिला राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आल्या. आपल्या देशातील जवळपास अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. यादृष्टीने महिला सक्षम होणे, राष्ट्राच्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने येणे गरजेचे आहे.याची सुरुवात ७३ वी घटनादुरुस्तीपासून झाली आहे.

यासर्व घटनांचे विवेचन केल्यानंतर महिलांना संवैधानिक त्यांचे हक्क मिळाले आणि त्यामुळे राजकीय सत्तेच्या प्रवाहात आल्याचे निश्चितच समाधान आहे. मात्र ७३ वी घटनादुरुस्तीने महिलांना विशेष संधी देवून त्यांना प्रतिनिधीत्व बहाल केले. पण वास्तविकपणे सुस्पष्ट पध्दतीने विचार केल्यास महिलांना देण्यात आलेले प्रतिनिधीत्व हे केवळ नाममात्र आहे.अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. महिला प्रतिनिधीत्व करत नसून खरे नेतृत्त्व धोरण निर्धारण प्रक्रिया संबंधी तिला बाजूला ठेवले जाते. असे महिला नेतृत्त्व निर्माण होताना दिसत नाही. यासाठी पुरुषी मानसिकता किंवा समाजाची मानसिकता बदलने आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनातून काही निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

- ७३ वी घटनादुरुस्तीने स्थानिक स्तरावर विशेषत: ग्रामीण भागातील राजकारणात महिला नेतृत्व निर्माण झाले.
- देशातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांनी राजकीय सत्ता प्राप्त केली आहे.
- ७३ वी घटनादुरुस्ती ही एक ऐतिहासिक घटना मानली जाते आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासात अत्यंत प्रभावी घटना म्हणून ओळखली जाते.
- मोठयाप्रमाणात स्थानिक स्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे.
- ७३ व्या घटनादुरुस्तीचा प्रभाव पडून आज महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे.

**संदर्भ ग्रथंसूची :**

१ भारतीय संविधान -सुभाष कश्यप.
२ भारतीय शासन एवं राजनिती - बी.एल. फाडीया
३ आपली संसद - सुभाष कश्यप,
४ भारत मे स्थानीय शासन, अशोक कुमार शर्मा

# ७३ व्या घटनादुरुस्ती व महिला सक्षमीकरण

**डॉ. यशवंत रेसा वळवी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,
लातूर, ता. जि. लातूर

**प्रस्तावना :**

७३ घटना दुरुस्तीने स्त्रियांचा पंचायतराज व्यवस्थेवरील स्त्रियांच्या संख्येत वाढ झाली आहे. परंतु यामुळे परिवर्तन होईल का? असा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाच्या अनुषंगाने अभ्यास केल्यास असे दिसून येते की, भारतीय राजकारणात प्रतिनिधी म्हणून आलेल्या महिला मोठया प्रमाणात स्त्री चळवळीतून आलेल्या नाहीत. त्यामुळे महिला प्रतिनिधी झाल्यामुळे मोठया प्रमणात परीर्वतन होईल ही अपेक्षा ही फोल ठरली आहे. शिक्षणाचा प्रशिक्षणाचा अभाव घरातून होणारा कौटुंबिक सदस्यांचा विरोध, राजकीय जागृतता व आकलनाचे राजकारण कायदेविषयक अज्ञान, विविध शासकीय योजनांबाबत माहितींचा अभाव पतीद्वारा सत्तेचा उपभोग व जनप्रतिनिधीचा रबरी शिक्का म्हणून वापर इ. अनेक समस्या स्थानिक पातळीवर महिला जनप्रतिनिधींसमोर आहेत. यासाठी स्वतः खंबीर, सक्षम व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न महिलांना करावा लागणार आहे. आपल्या सभोवतालचे वातावरण प्रतिकूल असून राजकीय वातावरणात आपल्याला कार्य करावयाचे आहे. याची जाणीव ठेवून आत्मविश्वास वाढविल्यास पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग आणखी यशस्वी व प्रभावी होणार आहे.

**७३ वी घटना दुरुस्ती व महिला सक्षमतीकरण :**

७३ वी घटनादुरुस्तीने महिलांना पंचायतराज व्यवस्थेत १/३ जागांचे आरक्षण मिळाले. त्यानुसार ग्रामीण भागातील महिला राजकीय प्रक्रियेत सामील झाल्या. संपूर्ण भारतात २८ घटकराज्यात एकूण पंचायत समितीमध्ये सहभागी होणारे सदस्य १,२९,८२९ आहेत. त्यात ३८,०१२ महिला आहेत. त्याचे प्रमाण ३१.३७ टक्के आहे. ग्रामपंचायत स्तरावर हे प्रमाण ३१.०४ टक्के आहे तर जिल्हा परिषद स्तरावर हे प्रमाण ३१.०८ टक्के आहे. एकटया महाराष्ट्र राज्यात ग्रामपंचायत स्तरावर व पंचायत समिती स्तरावर ३३ टक्के सहभाग आढळतो. कर्नाटक, तामिळनाडू, ओरीसा व मनिपूर या राज्यात तिन्ही स्तरावर निर्वाचित महिलांचे प्रमाण ३५ ते ४० टक्के आहे. मणीपूरसारख्या छोटाशा घटकराज्यात तिन्हा स्तरावर निर्वाचित महिलांचे प्रमाण ४० टक्केच्या आसपास आहे.

२२ जून १९९४ मध्ये मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी राज्याचे महिलाधोरण जाहीर केले. याला स्त्री हक्काची सनद असेही म्हणतात. महाराष्ट्र राज्याने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण दिले. ६ व्या पंचवार्षिक योजनेत विकास प्रक्रियेला चालना देण्याची क्षमता स्त्रियांमध्ये आहे. या मुद्दयावरुन शासनाने प्रथम मान्यता दिली. त्यांनतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या हाती सत्ता सोपविण्याचा विचार झाला व महाराष्ट्र हे पहिले घटकराज्य बनले की, ज्यात पंचायत राज महिलांसाठी आहे.

२४३ (ब) ४ नुसार ७३ वी घटनादुरुस्ती करुन सर्व स्तरावरील महिलांना ३३ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत २४३ (ब) ४ मध्ये बदल करुन महिलांना यापूढे स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. हिवाळी अधिवेशनात घटनादुरुस्ती करुन हा बदल करण्यात येणार आहे. त्यामुळे भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीमध्ये देशात ३३ लाख सदस्यात ११ लाख महिला सदस्य आहेत. पंचायत राज व्यवस्थेत ७,६८,५८२ विभिन्न स्तरावर आणि ३८,५८२ ग्रामपंचायतीमध्ये ७५,९५० महिला सदस्य आहेत. त्यात ९,२९७ महिला सरपंच आहेत. ३५१ पंचायत समितीमध्ये ९,३०७ महिला सदस्या असून प. समितीच्या १४९ महिला सभापती पदावर विराजमान झाल्या आहेत. ३३ जिल्हा परीषदेवर ६७५ महिला सदस्या असून १६ जिल्हा प. अध्यक्षा पदावर महिला आरुढ झालेल्या आपल्याला दिसत आहेत. हे परिवर्तन लक्षात घेतले तर येणारा कालखंड हा महिलांचा असेल असे मला वाटते.

७३ व्या घटनादुरुस्तीने महिलांचा पंचायतराज व्यवस्थेतील सहभाग वाढून सत्तास्थानावरील स्त्रियांच्या संख्येत वाढ झालेली आहे. अहमदनगर जिल्हयातील आदिवासी सरपंच सौ. सुशिलाबाई मकासुरे ही महिला युनेस्कोचा महाराष्ट्रातील पहिली संगणकीकृत ग्रामपंचयात म्हणून पारितोषिक प्राप्त करुन देते हे या ठिकाणी विशेष वाटते.

गडचिरोली जिल्हयातील सायगारा या गावात सौ. उर्मिला गोमसाळे व सौ. भाग्यश्री पाटील यांनी गावाचा विकास घडवून आणला आणि केवळ सुशिक्षित महिलांच काही करु शकतात हा भ्रमनिराश केला.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात आरक्षणाचा लाभ महिलांना झाला आहे. त्यांनी अनेक विकासाची कामे करुन दाखविली आहेत. या संदर्भातले ज्वलंत उदाहरण म्हणजे आंध्रप्रदेशातील कर्नुल जिल्हयातील कुल्पा गावातील फातीमाबीचे उदाहरण देता येईल. फातीमाबीने कधीही आयुष्यात शाळेचे तोंड पाहिले नव्हते. स्वत:च्या गावाबाहेर पाऊल ठेवले नव्हते. पुरुषांच्या समोर बोलण्याची हिंमत नसलेली फातीमाबी या आरक्षणामुळे ग्रांमपंचायतीच्या निवडणूकीस उभी राहीली. स्वत:च्या अर्जावर सही करण्याएवढीही अक्षर ओळख तिला नव्हती. ती निवडणुकीत निवडून आली व सरपंच झ ाली तिने कसलीही गाजावाजा न करता समर्थपणे व सहजपणे गावाचा घडविलेला कायापालट भक्क करणारा आहे. फातीमाबी यांना दारिद्रय निर्मूलन कार्याबद्दल संयुक्त राष्ट्र संघटनेने गरिबी विरुध्दचा लढा नावाचा पुरस्कार कोफी अन्नान यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. साक्षरता प्रसार, १०० टक्के घरपट्टी वसुली कुऱ्हाडबंदी, पाणीपुरवठा योजना असे विविध कार्यक्रम राबवून आदर्श निर्माण करण्याचे कार्य विटानेर ता. चोपडा, जि. जळगाव येथील सरपंच सौ. इंदिराताई पाटील यांनी केले त्याबद्दल त्यांना पंतप्रधानांच्या हस्ते ज्योतिबा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. पंचायतराज व्यवस्थेने हा एक प्रकारचा आत्मविश्वस व सामाजिक बदल महिलांना दिलेला आहे. प्रबळ इच्छाशक्तीच्या आधारे अक्षरज्ञान नसलेल्या महिलाही गरुडक्षेप घेऊ शकतात हे सिध्द झालेले आहे.

महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षण मिळाल्यामुळे तेथील पुरुषांचे स्पर्धात्मक राजकारण कमी झाले आहे. यातून झालेला फायदा आहे. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकारणात अजूनही सक्षम महिला उमेदवार राजकारणात उतरलेल्या दिसत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेत व सहकारी संस्थेमध्ये ज्या महिला उमेदवार निवडून येत आहेत. त्या महिला उमेदवार प्रस्थापित पुढाऱ्यांची पत्नी, बहीण, किंवा जवळच्या नातेवाईक आहेत. त्यामुळे सर्वसामान्य महिलांचा सहभाग आरक्षणामुळे वाढेल हे निश्चितच आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत ज्या महिला पदावर विराजमान झाल्या आहेत. त्यांचे पतीराज किंवा पुत्रराज यांच्या नावावर सत्ता गाजवत आहेत. शासनातील विविध बैठकांना त्या महिलांनी बैठकीला हजर राहण्याची त्यांचे पती किंवा पुत्र यांची मानसिकता आणखी बदललेली नाही. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग आणखी वाढलेला नाही. ज्या महिला आमदार, खासदार किंवा मंत्री आहेत त्यांच्याबद्दल बहुतांशी असाच अनुभव आहे. निवडून आलेल्या महिला आमदार खासदारांकडे लोक जेव्हा काम घेऊन भेटायला येतात तेव्हा त्यांचे पती किंवा पुत्र काय काम आहे ? आम्हाला सांगा, आम्ही तुमचे काम करतो असे म्हणून त्या लोकांची विल्हेवाट लावतात. अशावेळी लोकांची कामे होत नाहीत त्यांच्या पदरी निराशाच पडते. सक्षम महिला जेव्हा येतील पती व पुत्राचा अडसर पुढे चालून दूर होईल अशी खात्री आहे.

**निष्कर्ष :**

- महिलांच्या सहभागामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली.
- आरक्षण व्यवस्थेमुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.
- स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे महिलांना आपले प्रश्न मांडणे व त्यावर निर्णय घेण्याची संधी मिळाली.
- राजकारण व निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला.
- लिंग, भेद व स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला.
- बहुतांश पदावर निवडून आलेल्या स्त्रिया ह्या राजकीय पार्श्वभूमी असलेल्या राजकारणी कुटुंबातील दिसतात.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) डॉ. शर्मा के. के., भारत में पंचायतराज.
२) शर्मा रविन्द्र, ग्रामीण स्थानीय प्रशासन.
३) यमलवाड गोविंद, स्थानिक स्वराज्य संस्था.
४) योजना-२०१३

# ग्रामीण विकास व खाजगीकरण : गरज नव्या दिशेची

**डॉ. जीवन सुदामराव गंगणे**
सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभाग प्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरुर ताजबंद

**प्रस्तावना व समस्याविधान -**

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून भारतात नियोजित विकासास सुरूवात झाली. रशियाकडून आपण हि संकल्पना स्विकारली तेव्हा भारतात लोकसंख्यावाढ, अधंश्रध्दा, सामाजिक व आर्थिक विषमता, बेरोजगारी, अनारोग्य, भ्रष्टाचार अशा अनेक समस्या होत्या. त्यात दारिद्रय हि सर्वात मुख्य समस्या होती. दारिद्रय हे एक दुष्टचक्र आहे. दारिद्रयामुळे व्यक्तीस व राष्ट्रास अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या दारिद्रयावर कठोर प्रहार करण्यासाठी ग्रामीण विकास अत्यावश्यक आहे. ग्रामीण विकासाचे प्रारंभिक प्रयत्न सामुदायीक विकास कार्यक्रमाद्वारे सुरू झाले मात्र जनसहभागाच्या समस्येमुळे ते परिणामकारक ठरु शकले नाहीत. यानंतर आजतागायत या क्षेत्रात विविध प्रयोग होत आहेत. त्यांना यश प्राप्त होत होते मात्र मध्येच आपण खाजगीकरणाचा स्विकार केल्यामुळे ग्रामीण विकासास खिळ बसली नाही काय ? हा खरा प्रश्न आहे. यामुळे खाजगीकरण ग्रामीण विकासास तारक कि मारक ? हे निश्चित होणे आवश्यक आहे. आपली इच्छा नसताना १९९० मध्ये आपण आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम - नविन आर्थिक धोरण गॅट करारावर स्वाक्षरी करुन स्वीकारले तेव्हाच ग्रामीण विकासाच्या खाजगीकरणास सुरूवात झाली होती.

**उद्देश्य -**

१. ग्रामीण विकास व खाजगीकरण या संकल्पना समजून घेणे.
२. ग्रामीण विकास व खाजगीकरण यातील परस्परसंबंध तपासणे.
३. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण विकासास चालना मिळण्यासाठी शिफारसी करणे.

**गृहितक-**

१. खाजगीकरणामुळे ग्रामीण विकासाची गती मंदावली आहे.
२. खाजगी क्षेत्र ग्रामीण विकासाशी बांधीलकी माणून कार्य करते.
३. खाजगीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या शासनाचेच खाजगीकरण केल्याने ग्रामीण विकासास चालना मिळेल.

**ग्रामीण विकास-** विश्व बैंक के अनुसार, " वह व्यूह रचना जिससे ग्रामीण जनता का सामाजिक एवं आर्थिक विकास हो, ग्रामीण विकास कहलाता है"[1]।

**खाजगीकरणाचा अर्थ-** "खाजकीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची मालकी व नियंत्रण खाजगी व्यक्ती किंवा खाजगी कंपनीला हस्तांतरित करणे होय".

**ग्रामीण विकासाचे महत्व-**

नगर व्यवस्थापनावरील वाढता ताण कमी करण्यासाठी, शाश्वत विकासासाठी, पर्यावरणाच्या रक्षणासाठी, बेकारी, गुन्हेगारी, झोपडपट्टी कमी करण्यासाठी, शहरांकडे येणारे लोंढे थांबविण्यासाठी, देशास विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत बसवण्यासाठी, शहरी व ग्रामीण दरी कमी करण्यासाठी ग्रामीण विकासाचे महत्व वादातित आहे. 'केल्याने होत आहे रे, आधि केलेची पाहिजे' याप्रमाणे ग्रामीण विकासाचा हा जगन्नाथाचा रथ ओढल्याने अनेक प्रश्नांच्या मुळावर घाव बसणार आहे, हे जाणून ग्रामीण विकासाचे प्रयत्न चालू आहेत. राष्ट्राच्या प्रगतीत ग्रामीण विकासाचे महत्व सांगताना डॉ. सुदामा सिंह गांधीजींच्या संदर्भात लिहितात,'महात्मा गांधीजी का मानना था कि भारत कि आत्मा गांवो में रहती हैं,यदि गांव नष्ट होते हैं, तो भारत देश नष्ट हो जायेगा। If Village Perish, India will Perish too. अत: ग्रामीण समुदाय के विकास के अभाव में भारत की समृध्दि, सम्पन्नता एवं आत्मनिर्भरता महत्वहीन है। यदि भारत को जिवित रखना है तो सबसे निचले (ग्रामीण) स्तर से कार्य शुरू करना होगा । यदि इसकी स्थिति खराब होगी तो बाकी के सभी स्तरों पर किया गया कार्य निष्फल होगा।'

स्वातंत्र्यानंतर जे विकासाचे नेहरु प्रतिमान आपण स्वीकारले त्यात सार्वजनिक क्षेत्राच्या वृध्दीतून औद्योगिकरण, सार्वजनिक क्षेत्रात शासनाचा हस्तक्षेप अत्यावश्यक मानला गेला[2]...मात्र खाजगीकरणानंतर शासनाचे हे क्षेत्र दिवसेंदिवस संकुचित होत चालले आहे. स्वच्छता सेवेचे खाजगीकरण, स्वच्छतेसाठी चतुर्थ श्रेणी, पूर्ण वेळ कर्मचारीवर्ग न नेमता

कार्यालय स्वच्छतेचे कंत्राट खाजगी कंपनीस, संस्थेस दिले जात आहे. यातुन चतुर्थ श्रेणी सेवाच कायमस्वरुपी नष्ट केली जात आहे. हळु हळु वरच्या श्रेणीचा क्रमांक येणार नाही याची कोणी खात्री देऊ शकते का? खाजगीकरणात जनकल्याण महत्वाचे नसुन नफेखोरीला महत्व दिले जाते. तोटयात जाणारा सार्वजनिक उपक्रम बंद केला जातो किंवा खाजगी कंपनीस विकून टाकला जातो. या स्थितीत नक्कीच ग्रामीण विकासाकडे डोळेझाक होताना दिसत आहे. जसे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अल्पदरात सर्वसामान्यांना प्रवासाची सुविधा उपलब्ध करते त्याचे जर खाजगीकरण झाले तर सर्वसामान्यांनी महागडी वाहने भाडयाने घेऊन प्रवास करणे शक्य आहे का ? खाजगीकरणामुळे शासन आता आपल्या जनकल्याणाच्या भूमिकेपासून दुर जात आहे. ॲटोमेशनच्या नावाखाली अनेक गोष्टी आपल्या माथी मारल्या जात आहेत. मानवविरहित कार्यालयाच्या दिशेने जणू आपला प्रवास सुरू झाला आहे. हे ग्रामीण विकास व संपूर्ण मानवजातीसाठी नक्कीच घातक ठरणार आहेत.

खाजगीकरणाचे धोरण स्विकारण्यापूर्वी शासन विषमतेवर जाणिवपूर्वक प्रहार करत होते. आता 'बळी तो कान पिळी' प्रमाणे 'जिसकी लाठी उसकी भैंस' नुसार जो श्रीमंत, बलवान तो आणखीनच श्रीमंत होत आहे. यामुळे विषमतेची दरी आणखीनच वाढत आहे. खाजगीकरणामुळे लोक प्रशासनाच्या जनकल्याणाच्या मूळ भूमिकेवर गदा येत आहे.

खाजगीकरणामुळे जी केवळ शासकीय मालकीची क्षेत्र होती ती आता खाजगी व्यवस्थांकडे सोपवली जात आहेत. उदा.रस्ते बांधणी. पूर्वी केवळ आणि केवळ शासन रस्ते बांधत असे. आज शासन खाजगीकरणाच्या माध्यमातून आपल्या या जबाबदारीतून बाहेर पडू पाहत आहे. बांधा, वापरा, हस्तांतरीत करा धोरण. या धोरणामुळे खाजगी गुंतवणूकदारांना अधिकृत टोल वसूल करण्याचा परवाना मिळत आहे. समाजातील श्रीमंत व मध्यम वर्गाला हे परवडणारे आहे मात्र ज्यांची ऐपत नाही त्यांचा विचार या खाजगीकरणात झालेला नाही. अर्थात ज्याचा खिसा भरलेला असेल त्यानेच प्रवास करावा इतरांनी नाही. जणू गरिबांसाठी, खेडूतांसाठी प्रगतीचे मार्ग रोखले जात आहेत.

खाजगीकरणाच्या या युगात एका एका सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण केले जात आहे. सार्वजनिक उपक्रम अगोदर तोटयात दाखवायचे आणि नंतर त्याचे खाजगीकरण करायचे. यास नाव दिले निर्गुंतवणूक. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांनी या धोरणावर तीव्र शब्दात टिका केली आहे,'जगात कुठेही निर्गुंतवणूक विभाग पाहिला नाही मात्र भारतात तो आहे'. शिक्षण सेवा, दूरसंचार, विमाक्षेत्र, रस्ते बांधणी आदीचे खाजगीकरण करुन शासन थांबले नाही तर सरंक्षण साहित्य उत्पादनाचे क्षेत्रसुध्दा खाजगी क्षेत्रासाठी खुले केले आहे. खाजगीकरणामूळे नफेखोरीची प्रवृत्ती वाढत आहे. यातुन मोठमोठे प्रकल्प उभे रहात आहेत. सर्वसामान्यांच्या, ज्याचे पोट केवळ शेतीवरच अवलंबून आहे अशांच्याही जमिनी प्रकल्पात जात आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अधांतरीच आहे. 'दारिद्रय निवारण कार्यक्रमावरील खर्चाची टक्केवारी कमी झाली आहे. अर्थातच दारिद्रय रेषेखालील एकूण कुटूंबात वाढ होत आहे' असे मत खाजगीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणाला वीस वर्षाहून अधिक काळ लोटल्यानंतर टिपरसे अशोक[3] यांनी व्यक्त केले आहे. यास पूरक मत डॉ. जीवन गंगणे मांडतात,'पूर्वी दारिद्रय होते, आज ही आहे. पूर्वीच्या तुलणेत आजचे दारिद्रय कमी भयावह, पिडादायक आहे; मात्र दारिद्रयाची हि पिडा क्षीण होण्यात जागतिकीकरणाचा कसलाच वाटा नाही.उलट जागतिकीकरणामुळे दारिद्रय कमी होण्याची गती मंदावली आहे... दारिद्रय कमी झाले आहे. दारिद्रय आणखीनच जलत गतीने कमी झाले असते मात्र त्याच्या मार्गात जागतिकीकरणाने अडथळे निर्माण केले आहेत'[4].

खाजगीकरणाचे अपत्य म्हणून आपण सार्वजनिक-खाजगी भागीदारी(PPP) कडे पाहतो. रस्ते बांधणी, आरोग्य, कृषी, पर्यटन, वाहतूक, वीज उत्पादन इ.बाबतीत या धोरणाचा स्वीकार करण्यात आला आहे. वास्तवात हे धोरण केवळ 'आहेरे' वर्गाचे महत्व वाढवणारे आहे. याबाबतीत अली मंजूर म्हणतात, 'पी.पी.पी. पर संपूर्ण बहस के बाद यह तय हो पाया है की यह प्रयास कुछ और नहीं बल्कि निजीकरण का ही एक प्रारूप है एवं सामाजिक क्षेत्र में इसका अनावरण हमारे देश की गरीब जनता के लिए नुकसानदेह है। शिक्षा, स्वास्थ, कृषि, पानी इत्यादी जिससे आज भी देश की आधी से जादा आबादी महरुम है उसका सरकार और योजना आयोग व्यावसायीकरण नहीं कर सकती। ऐसा होने से भारत एक बडे संकट की तरफ अग्रसर होगा'[5]।

**शासनाचे खाजगीकरण का करु नये इ**

१९९१ पासून शासन उठ-सूट विविध सेवांचे, उद्योगांचे खाजगीकरण करत सुटले आहे. जणू शासनाचा प्रत्येक सेवेवर,सार्वजनिक उपक्रमावर डोळा आहे. नको त्या गोष्टीचेही जर शासन खाजगीकरण करत असेल तर शासनाचेच खाजगीकरण का नको? शासनाचे खाजगीकरण करून ते प्रत्येकी पाच वर्षासाठी उद्योगपतीस चालवायला का देवू नये?

शासन यंत्रणा यास राजी आहे का ? नसेल तर का नाही ? मग इतरांसाठी खाजगीकरणांचा सपाटा कशासाठी ? खाजगीकरणाशी संबंधीत असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

**गृहितकांची पडताळणी -**

१. खाजगीकरणामुळे ग्रामीण विकासाची गती मंदावली आहे, हे गृहितक सत्य सिध्द झाले आहे.
२. खाजगी क्षेत्र ग्रामीण विकासाशी बांधीलकी माणून कार्य करते, हे गृहितक असत्य सिध्द झाले आहे.
३. खाजगीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या शासनाचेच खाजगीकरण केल्याने ग्रामीण विकासास चालना मिळेल, हे गृहितक असत्य सिध्द झाले आहे. कारण ग्रामीण विकास तसेच सर्वच सार्वजनिक क्षेत्रात शासनाचा हस्तक्षेप, शासनाची सर्वोच्च भूमिका वादातित आहे. शासनाचे खाजगीकरण ही 'विनाशकाले विपरित बुध्दी' ठरेल,हे नक्की.

**शिफारशी -**

१. जीवनावश्यक व पायाभूत सुविधांच्या बाबतीत उदा.शिक्षण, कृषी, रस्ते बांधणी, आरोग्य, पाणी पुरवठा आदी क्षेत्रात झालेले खाजगीकरण रद्द करुन त्यात राज्याची मालकी अबाधीत ठेवावी.
२. पाणी आडवा-पाणी जिरवा, झाडे लावा-झाडे जगवा अशा शाश्वत विकासाच्या उपाययोजना करणे आवश्यक.
३. आदर्श ग्राम चळवळीस प्रोत्साहन देण्यात यावे.
४. लोकसंख्या वाढीचा दर जो २००४ साली १.८ टक्के होता तो अजुनही कमी करणे.
५. दुग्धोत्पादन, रेशीम शेती अशा व्यवसायांना प्रोत्साहन देणे.
६. भारताचे ७० टक्के कृषी क्षेत्र आजही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करून तसेच नविन प्रकल्प उभारुन जलसिंचनाचे प्रमाण वाढवण्यात यावे.
७. समाजातिल सर्व घटकात जलसाक्षरता अभियानाचा रेटा अधिक जोमाने पुढे नेऊन जलसंर्वधनाची सवय लावणे.

**संदर्भ -**

1. www.shodhganga.inflibnet.ac.in>bitstream.
2. www.mapsofindia/personalities/nehru/economicpolicies.html
3. टिपरसे अशोक, जागतिकीकरण व कल्याणकारी राज्य, करन्ट ग्लोबल रिव्हयूअर,ISSN 2319-8648,10 मार्च 2018 पृ. 93.
4. गंगणे डॉ.जीवन,जागतिकीकरण आणि दारिद्रय निर्मूलन (शोध निबंध),ISBN 978-93-83672-75-2, पृ. 362.
5. अली मंजूर, सार्वजनिक-निती भागीदारी या निजीकरण, मुस्लिम टुडे, अप्रैल 2013, पृ. 20.

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com

# ग्रामीण सामुदायिक विकास आणि जनसहभाग

**प्रा.डॉ. वैशाली शेषराव पेरके**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
ए.शि.प्र.म.संचलित कला महाविद्यालय,
बिडकीन, ता.पैठण, जि. औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

अलिकडील काळामध्ये जनसहभागाची मोठ्या प्रमाणात चर्चा होतांना दिसत आहे. किंबहूना विकास प्रशासनामध्ये हा विषय गहन चिंतनाचा बनला आहे. लोकशाहीच्या अस्तित्त्वासाठी जनसहभागाची अत्यंत अवश्यकता आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेचे ते एक प्रमुख साधन आहे. जनसहभागाशिवाय लोकशाही शासन आणि विकासशील समाज निर्माण होत नाही. लोकशाही एक शासन व्यवस्था नसुन ती एक जीवनपद्धती आहे यामध्ये खऱ्या अर्थाने विकास कार्यक्रम सफल होतांना दिसतात ते केवळ जनसहभागामुळेच म्हणूनच लोकशाहीचे जीवनमुल्य समाजात रूजविण्यासाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही विकास कार्यक्रमांची यशस्वीता ही जनसहभागावरच अवलंबून असते. परंतु प्रचलित प्रशासकीय व्यवस्थेत ग्रामीण समुदायाच्या विकासात जनसहभाग हा अपुरा वाटायला लागतो. परिणामी ग्रामीण समुदायाच्या विकासासाठी निर्माण करण्यात येत असलेल्या विविध योजना अंमलबजावणीच्या पातळीवर अयशस्वी ठरतांना दिसतात. म्हणून यावर चिंतन होणे गरजेचे वाटते.

**अध्ययनाचे उद्देश :**

१. जनसहभागाचा अर्थ व उद्देश जाणून घेणे.
२. समुदायिक ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.
३. सामुदायिक ग्रामिण विकास आणि जनसहभाग यातील अडथळे तपासून दिशा-निर्देश करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला असून संशोधन क्षेत्रातील वर्णनात्मक, विश्लेषणात्मक तसेच ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**जनसहभाग : सैद्धांतिक चौकट :**

जनसहभागाची संकल्पना ग्रीक लोकशाहीच्या प्रारंभापासून अस्तित्वात असलेली दिसते. त्यांचे सरकार जनतेच्या सहभागावर अवलंबुन असे ग्रीक मधील महत्त्वचे निर्णय जन समुदायात घेतले जात असत. कोणत्याही देशातील अस्तित्त्वात असलेल्या लोकशाहीचे स्वरूप संकुचित किंवा विशाल ठरविण्यामध्ये जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सामाण्यपणे जनसहभाग म्हणजे जनतेने सार्वजनिक कार्यात रस, रूची घेणे होय.

**i) स्टेसिनच्या मते,** प्रशासकीय कार्यात सर्वसामान्य जनतेचा सक्रिय हस्तक्षेप म्हणजे जनसहभाग होय.

**ii) आर. के. सप्रुच्या मते,** सामान्य हिताच्या समच्या व विविध मुद्यावर नागरिकांना प्रवृत्त करण्याचा जाणून बुजून व व्यवस्थीत केलेला प्रयत्न म्हणजे जनसहभाग होय.

**iii) महमद मुमताजच्या मते,** असे लोककल्याणकारी कार्यक्रम, उपक्रम त्यांच्या मार्फत नागरिक प्रशासकीय कार्यसंचलनात सहभागी होतात. त्यास जनसहभाग असे म्हणतात.

वरील व्याख्यांचा आशय पाहता जनसहभाग म्हणजे ज्याद्वारे लोक उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक कार्यात सहभागी होतात हा सहभाग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष औपचारिक किंवा अनौपचारिक राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक अथवा प्रशासकीय असु शकतो सामान्यपणे जनतेने सार्वजनिक कार्यात घेतलेली रूची म्हणजे जनसहभाग असे सप्रु यांनी प्रतिपादन केले आहे.

**जनसहभागाचे उद्देश :**

१. जनसहभागाद्वारे आरोग्य, व्यसनमुक्ती, वृक्षारोपन, रस्तेदुरूस्ती व विविध विकास प्रकल्प राबविणे.
२. ग्रामीण लोकांच्या वर्तमान आणि भविष्य कालीन प्रगतीसाठी त्यांच्या इच्छा आणि धारणा प्रगल्भ करणे.
३. युवक, महिला व ग्रामस्थांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.
४. समुदायाच्या स्वत:च्या क्रियाशीलतेवरील विश्वास दृढ करणे आणि स्थानिक विकास साधनांचा परिचय करून देणे.

५. प्राथमिक आरोग्य संवर्धनात विविध साधनांचा समन्वय घडवून आणने.
६. साक्षरता कार्यक्रमाचे नियोजन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी नविन तंत्रज्ञानाचा वापर करून घेणे.
७. स्थानिक लोकांना गतीशिल बनवीणे व त्यांच्यात जाणीव जागृती घडवून आणने यासाठी स्थानिक नेतृत्त्वाचा विकास करणे.
८. सामाजिक व आर्थिक विकासात आधुनिकता आणण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करणे.
९. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.
१०. स्थानिक प्रश्न, समस्या व अडचणी सोडविण्याच्या दृष्ट्रिकोणातून स्थानिक पातळीवरील विविध समित्यांची स्थापना करणे.
११. अत्यल्प उत्पन्नात विकासाचे ध्येय साध्य करणे.
१२. समुदायातील तळागळातील कामगारांच्या कलागुणांना उत्तेजन व प्रेरणा देणे.

या व यासारख्या उद्देशाची प्राप्ती जनसहभागातून होत असते.

**ग्रामीण सामुदायिक विकास :**

सामुदायिक विकासाच्या संकल्पनेचा अभ्यास करता असे लक्षात येते की, ही संकल्पनात्मक समस्या गुंतागुंतीची व जटील असुन या संकल्पनेबाबत अभ्यासक, संशोधक व विचारवंतामध्ये एकवाक्यता नसुन त्यांच्यात सामाजिक आकलणातील फरकामुळे मतभिन्नता असल्याचे दिसून येते. ग्रामीण विकासाच्या अध्ययनात रूची घेणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, सामुदायिक विकासाचा अर्थ समजून घेतल्याशिवाय कोणत्याही योजनेचे कार्यक्षेत्र आणि त्या योजनेची फलनिष्पती समजून घेणे अवघड आहे. समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोणातून या संकल्पनेकडे पाहता ते असे मत मांडतात की, सामुदायिक विकास ही एक योजना नसुन ती एक विचारधारा किंवा संरचना आहे. ज्याद्वारे प्रत्येकाला आपल्या उत्तरदायित्त्वाची जाणीव होत असते. दुसऱ्या शब्दात भारतीय संदर्भाने विचार करता असे म्हणता येईल की, ही एक अशी पद्धती आहे ज्याद्वारे ग्रामीण समाजाची संरचना आर्थिक साधने, नेतृत्त्वाचे स्वरूप व जनसहभाग यामध्ये सामंजस्य प्रस्थापित करून ग्रामिण समाजाचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

**केंब्रीज संमेलनाच्या अहवालात** नमुद केल्याप्रमाणे सामुदायिक विकास हे एक असे आंदोलन आहे ज्याचा उद्देश संपूर्ण समुदायासाठी उच्च जीवनस्तराची व्यवस्था करून देऊन त्यासाठी प्रेरणा व शक्ती समुदायाद्वारेच प्राप्त होऊन वेळोवेळी जनसहभाग प्राप्त होणे अपेक्षीत असते.

**योजना आयोगाच्या मते,** सामुदायिक विकास ही एक अशी योजना आहे ज्याद्वारे नविन साधनांचा शोध घेऊन त्याद्वारे ग्रामीण समाज व्यवस्थेत सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये बदल घडवून आणला जाऊ शकतो.

**टी.आर.बॅटन यांच्या मते,** सामुदायिक विकास ही एक प्रक्रिया असून ज्यामध्ये खेड्यातील लोक प्रथम एकत्र येऊन आपल्या आवश्यक गरजांवर किंवा समस्यांवर चर्चा करतात आणि नंतर त्याचे नियोजन करून एकत्रीतपणे ती समस्या सोडविण्याकरीता प्रयत्न करतात.

**ग्रामिण सामुदायिक विकास आणि जनसहभाग :**

विकासातील लोकांचा सहभाग या संकल्पनेचे मुळ श्री. रॉबर्ट चेंबर्स यांच्या 'सहभागी ग्रामीण अध्ययन' (पी.आर.ए.) या पद्धतीमध्ये सापडते. या तंत्राद्वारे लोकांच्या सहभागातून सामाजिक प्रश्न समजावून घेणे व सामुदायिक कृतीतून या समस्यांची एकल करणे या संकल्पनेमुळे प्रचलीत समाजसुधारणेतील अनेक दोष उघड होण्यास मदत झाली आहे. याबाबत आता असा मतप्रवाह रूढ होत चालला आहे की, योजना आखण्यापासून त्याचे विकेंद्रकरण व्हावे, स्थानिक लोकांना निर्णय प्रक्रियेत स्थान असावे. कोणत्याही योजनेमुळे पर्यावरणाची हाणी होऊ नये याची दक्षता घ्यावी यामुळे योजनांचे खर्च कमी व लाभ आधिक असे गुणोत्तर मांडता येईल. हे सर्व साध्य करायचे असले तर ग्रामीण सामुदायिक विकासात जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

आधुनिक काळात राज्याच्या कार्यात वाढ झाल्यामुळे विविध विकास विषयक कार्यक्रमात जनसहभागाचे महत्त्व वाढलेले आहे. जनसहभागामुळे प्रशासकीय अधिकारी जनतेकडे सकारात्मक दृष्टिने सहकार्य वृत्तीने पाहतात. या संदर्भात व्ही. सुब्रम्हण्यम म्हणतात की, विकास कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संबंधित लोकांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणून ऑरीस्टॉटलचे विधान या ठिकाणी संयुक्तीक वाटते ते म्हणतात की, लोकशाहीचे मूल्ये स्वातंत्र्य, समता रूजविण्यासाठी जनसहभाग हा अधिक महत्त्वपूर्ण आहे.

**ग्रामिण सामुदायिक विकासातील जनसहभागाचे स्वरूप :**

कोणत्याही देशातील नागरी समुदाय किंवा नागरीक सामुदायिक विकासात कशाप्रकारे सहभाग नोंदवतात यावर जनसहभागाचे स्वरूप अवलंबून असते.

**i) संस्थात्मक जनसहभाग :**

ग्रामीण सामुदायिक विकासात विविध दबावगट, स्वयंसेवी संस्था, कामगार संघटना, युवक संघटना या कशा पद्धतीने आपला सहभाग नोंदवितात यावर संस्थात्मक जनसहभाग अवलंबून असतो.

**ii) राजकीय जनसहभाग :**

ग्रामीण सामुदायिक विकासात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, विधानसभा, विधान परिषद यांच्या सहभागावर राजकीय जनसहभाग अवलंबून असतो.

**iii) व्यक्तीगत जनसहभाग :**

ग्रामीण सामुदायिक विकासासाठी कार्यरत असणाऱ्या विविध समित्या, विविध आयोग, मंडळ, परीषदा, विविध सभा प्रसारमाध्यमे यांच्या सहभागावर ग्रामीण सामुदायिक विकासातील व्यक्तीगत जनसहभाग अवलंबून असतो.

**iv) प्रशासकीय जनसहभाग :**

ग्रामीण सामुदायिक विकासासाठीचे विविध धोरण निर्मीती, निर्णय प्रक्रिया, कार्यक्रम निर्मीती त्यांची अंमलबजावणी आणि मूल्यांकन या प्रक्रियेतील सहभागावर प्रशासकीय जनसहभाग अवलंबून असतो.

**सारांश :**

वरील स्वरूपावरून ग्रामीण सामुदायिक विकासात जनसहभाग प्राप्त होणे अपक्षीत असते परंतु प्रचलीत व्यवस्थेत पाहिजे तेवढ्या प्रमाणात हा जनसहभाग मिळत नसल्याचे दिसून येते. या कारणांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, प्रामुख्याने ग्रामीण भागातील बहुतांशी व्यक्तींच्या प्राथमिक गरजा अन्न, वस्त्र, निवारा प्राप्त होत नाहीत त्यामुळे बहुतांश समाज शासन व प्रशासनामध्ये सहभाग घेत नाहीत किंबहूना ते निरुत्साही दिसून येतो. म्हणून ग्रामीण भागातील लोकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यावर शासन व प्रशासनाने जोर देणे अपेक्षीत आहे. ग्रामीण सामुदायिक विकास प्रक्रीयेत जनसहभाग प्राप्त न होण्याचे प्रमुख कारण लोकांचे अज्ञान आहे. शिक्षणाच्या अभावामुळे त्यांचा सहभाग हा अपुरा पडतो. म्हणून ग्रामीण भागातील शिक्षण व प्रौढ शिक्षणावर अजून जोर देणे अगत्याचे ठरते. याबरोबरच राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार, अभिजन वर्गाचे प्राबल्य यामुळे सर्व सामान्य जनता सामुदायिक विकासाबाबत उत्साही नसतात. म्हणून ग्रामीण सामुदायिक विकासातील राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार व अभिजन वर्गाचे प्राबल्य कमी करून कठोर नियंत्रणासाठी कडक कायद्याची निर्मीती व अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत ग्रामीण सामुदायिक विकासात धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा, सांप्रदाय, जातीयवाद यामुळे सर्वसामान्य व्यक्ती आणि महिला या अशा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत आपला सक्रीय सहभाग नोंदवत नाहीत म्हणून ग्रामीण भागातून या सगळ्या प्रथा, परंपरा बंद होणे गरजेचे आहे. त्यासाठी याबाबत समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपली मानसिकता बदलने अपेक्षीत आहे व शासकीय कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकता वाढवीणे गरजेचे आहे. ग्रामीण सामुदायिक विकासाची ही प्रक्रिया शाश्वतपणे सुरू राहण्यासाठी जनतेने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवणे महत्त्वपूर्ण आहे तरच ग्रामीण भागाचा सर्वांगीन विकास होऊन सु-शासन व सु-जीवनाच्या संकल्पना साकार होतील असे वाटते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. Goal, S.L. (२००९), Advanced Public Administration, Deep & Deep Publication, New Delhi.
२. Avasthi and maheshwari, (२००९), 'Public Administration, L.N. Agrawal Publication Agra.
३. दुबे, अशोक कुमार (२००८), '२१ वी शताब्दी में लोकप्रशासन', टाटा मॅकग्राहिल पब्लीशिंग कंपणी नवी. दिल्ली.
४. करे बिभिषण, (जुलै, २०१५), 'लोकसहभाग आणि ग्रामीण विकास' डायमंड पब्लिकेशन पूणे.
५. कानेटकर मेधा, (२००७), 'भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे' श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
६. अग्रवाल उमेशचंद्र, (जुन २००३), 'जनसहभागीता आधारीत एक अभिनव कार्यक्रम' कुरूक्षेत्र, अंक-८.
७. पाटील कडु,(ऑक्टो-डिसें.२००६),'सूक्ष्म नियोजन,लोकसहभागासाठी प्रभावी माध्यम,यशदा,यशमंथन वर्ष-७,अंक-३.
८. घाटोळे रा.ना., (१९८५), 'ग्रामीण समाजशास्त्र आणि समुदायिक विकास, मंगेश प्रकाशन नागपूर.

# महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा - २०१५ : एक अभ्यास

**डॉ.रमेश वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
गोदावरी महाविद्यालय, अंबड
ता.अंबड, जि.जालना

**प्रस्तावना :-**

प्रशासनात गतीमानता व पारदर्शकता निर्माण करण्यांसाठी प्रत्येक शासन प्रयत्नरत असते. त्याला महाराष्ट्र शासन देखील अपवाद नाही. कारण प्रत्येक सरकारला आपली प्रशासकीय कारकीर्द ही काही नवनविन योजना, कार्यक्रम निर्माण करून त्यांची अंमलबजावणी करणे व जनतेला दिलेल्या आश्वासनांची परिपूर्तता करणे यासाठीच खर्ची घालत असतात. शिवाय ज्या काही नियम, अधिनियम, कायदे, योजना आणि कार्यक्रम यांनाही काही नविन नावांने वा जुन्याचं काही गोष्टी नविन पध्दतीने करण्यांचा प्रयत्न प्रत्येक सत्तेवर येणारे सरकार करित असते. यालाचं तर सत्ता सरीपाटांचा खेळ म्हणतात, असे मला वाटते.

महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा २०१५ हा केलेला आहे. जो या राज्यातील प्रत्येक जनतेला सेवा ही माफक, घरबसल्या आणि हक्काने मिळविता आली पाहिजे. आणि ती शासनांने देण्याची हमी देखील दिलेली आहे. हे या कायद्याच्या अनूषंगानेच या कायद्याची उपयोगीता खरेचं फार मोठी आहे. कारण राज्यातील जनतेला त्यांच्या दारापर्यंत एक खिडकी पध्दतीव्दारे, पारदर्शकरित्या, जलदगतीने सेवा उपलब्ध करून देण्यांसाठी हा कायदा, म्हणजेचं सरकार कटीबध्द आहे. वास्तविक स्थितीमध्ये या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करित असतांना प्रत्यक्षात जनतेला याची किती प्रमाणात आणि कशा पध्दतीने सेवा उपलब्ध होतात ? आणि खरेचं सेवेची हमी सरकारव्दारे पूर्ण होते का ? या प्रश्नांची उत्तरे या काळात मिळालेली आहेत. प्रस्तुत शोध निबंधामध्ये या कायद्याची प्रासंगीकता आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील तफावत शोधण्यांचा अल्पशा प्रयत्न केलेला आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम २०१५ :**

महाराष्ट्र शासनाने २८ एप्रिल २०१५ रोजी राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतिकारी कायदा निर्माण केला. या कायद्यान्वये राज्यांतील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द सेवा मिळविण्यांचा अधिकार प्राप्त झाला आहे. या सेवा हमी अधिनियमांतर्गत आजपर्यंत ३९ विभागाच्या ४६२ सेवा अंतर्भूत करण्यांत आलेल्या आहेत. यामध्ये जलद सेवा, सेवा आपल्या दारात, सहज पोहोज, सोपी शुल्क भरणा, वापरण्यांस सोपे, वेळेची बचत, या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी सेवा हमी या कायद्यान्वये देण्यांत येणार आहे. यासाठी सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार, महा ऑनलाईन, मोबाईल ॲप इ. सुविधा व्दारे सरकार वरिल वैशिष्ट्यांनी परिपूर्ण सेवा हमी नागरिकांना देत आहेत.

विहित सेवा ऑनलाईन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. ही निश्चितपणे अभिमानांचीच बाब आहे. या पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांना इच्छीत सेवा पाहिजे असल्यास, शुल्क भरणा, अर्जाचा मागोवा घेणे अदि बाबी ह्या घर बसल्या करता येणार आहेत. यामूळे निश्चितपणे नागरिकांना विशेष करून महशूल विभाग, ग्रामविकास व पंचायत राज्य विभाग, जलसंपदा विभाग, कामगार विभाग, वन विभाग आणि नोंदणी व मुद्रांक विभाग इ. विभागाच्या सेवा मिळविण्यांस मदतच होणार आहे आणि ती शासन देण्यासाठी तत्पर आहे.

**लोकसेवा हमी अधिनियमांची अंमलबजावणी :**

महाराष्ट्र सरकारने या कायद्याची आखणी करित असतांना प्रामुख्याने या राज्यातील ग्रामीण नागरिकांना नजरेसमोर ठेऊनचं केलेली आहे. कारण यांचा उद्देश मूळात सेवेची हमी देण्यांचा आहे. प्रामुख्याने केंद्र सरकार आणि राज्य सरकार या दोन्ही पातळीवर ऑनलाईन आणि पारदर्शक प्रशासन व्यवस्थेचा स्विकार केलेला असल्याकारणामुळे हा अधिनियम सुध्दा निश्चितपणे स्वागतहार्यचं आहे. परंतू या कायद्यापूर्वी ज्या शासन व्यवस्थेनी सुशासन इ.-गव्हर्नस, गतिमान आणि पारदर्शक शासन, स्मार्ट शासन, ह्या पध्दती अवलंबीलेल्या आहेत, त्याव्दारेचं प्रशासनांला गतीमानाताही मिळालेली आहे, प्रशासकीय कार्यक्षमता वाढलेली आहे. मग यामूळे नागरिकांना सेवा मिळालेली नाही का ? किंवा सेवेची हमी देण्यांचे कोणते निकष किंवा पध्दती या शासनांचे संशोधीत केलेली आहेत का ? वरील सर्व पध्दती अपयशी ठरल्याकारणाने शासन व्यवस्था कोसळली का ? या प्रश्नांची उतरे शासन देऊ शकणार नाही. कारण कोणतीही शासन कारभाराची पध्दती ही परीपूर्ण ठरत नाही. त्यासाठी धोरण निर्माण करणारी व्यवस्था निस्वार्थी असली पाहिजे. शासन आणि राजकारण विभक्त करणारी असली पाहिजे तरचं कोणतेही धोरण, अधिनियम निश्चितपणे यशस्वी होऊ शकतील.

कोणतेही सरकार कोणत्याही पक्षाचे असे ते सत्तारूढ झाल्यानंतर जनतेची सेवा करणे हे त्यांचे कर्तव्य असते. तसेच त्यांना सेवेची हमी देण्यांची काहीही आवश्यकता नाही कारण तुम्ही पाच वर्षात काय केले. याचे उत्तर जनता-निवडणूकीच्या माध्यमातून देत असते. त्यामूळे सेवेची हमी, वचननामा न देता दिलेल्या आश्वासनांची पूर्ती केल्यास निश्चितपणे जनतेची आणि पर्यायाने राज्यांचा विकास होईल.

या अधिनियमांची खरचं या राज्यात पर्यायाने या शासन व्यवस्थेला आवश्यकता होती का हा खरा प्रश्न आहे. आपल्या देशात आणि राज्यांत ई-सेवा, ई-सेतू ही राष्ट्रीय, ई-शासन योजना अंतर्गत सर्व सरकारी सेवा सामान्य नागरिकांना घरपोच मिळविण्यांच्या दृष्टीने विविध योजनांची अंमलबजावणी करण्यांत येत आहे. तसेच डिजीटल इंडीया, यामध्ये ई-गव्हर्नसला प्रोत्साहन देऊन संपूर्ण देशाला इंटरनेटने कनेक्ट करण्यांचा मानस आहे, ऑनलाईन नागरी सेवा, आय-सरिता महाराष्ट्रामध्ये ई-शासन धोरण राबविले जातचं आहे. या सर्व बाबी या अधिनियमापूर्वीच असूनही आणि अंमलबजावणीतही आहेत, तरीही या लोकसेवा हक्काची / अधिनियमांची निर्मिती म्हणजे शासन आणि राजकारणांचा जावई-शोध होय असे म्हटल्यास चूकीचे ठरणार नाही. कारण कूठल्याही योजनेची / धोरणांची अंमलबजावणी ही जनतेला मिळणाऱ्या समाधानांवर आणि त्यांच्या होणाऱ्या हितावर अवलंबून असते.

आपले सरकार या पोर्टलवर किंवा महा-ऑनलाईन या साईटवर पाहील्यास याबाबत बोलक्या प्रतिक्रिया स्पष्टपणे दिसून येतात. यामध्ये नागरीकांना सुविधा, सेवा तर मिळत नाहीत. परंतू शासनांच्या यंत्रणेकडून होणाऱ्या अकार्यक्षमता, इंटरनेट कनेक्टीविटीची समस्या, त्यावरील तांत्रिक अडचणी, ग्रामिण भागातील विजेची समस्या, अपलोड व डाऊन लोडची समस्या, महशुल विभागामार्फत मिळणाऱ्या प्रमाणपत्रांच्या संदर्भातील अनेक समस्या या सेवा हक्काचे उल्लघन करणाऱ्याचं आहेत. त्यामूळे शासनाने लोकसेवेची हमी देत असतांना नागरिकांची सनद ही प्रत्येक कार्यालयात अनिवार्य करावी, जेणेकरून त्यानुसार कोणती कार्य किती दिवसात आणि किती मुदतीत पूर्ण होणार यांची हमी देता येऊ शकेल.

**सारांश :**

आजही देशांतील अनेक राज्यामध्ये ई-गव्हर्नस, सु-शासन याव्दारेचं ऑनलाईन व्यवहार मोठ्या प्रमाणांवर होत आहेत. जनता यांचा मोठ्या प्रमाणावर स्विकार ही करते आहे. परिस्थितीनुरूप बदल स्विकारला देखील पाहीजे यात मूळीचं शंका नाही. परंतू आजही राज्यातील अनेक गावांमध्ये मुलभूत सुविधा पोहचलेल्या नाहीत. जसे - रस्ते, विज, पाणी, शिक्षण, दळणवळण परंतु तेथे मोबाईल पोहचलेले आहेत. मोबाईलसाठी शिक्षण, विज महत्वाची आहे. त्यामूळे शिक्षण, आरोग्य, या मुलभूत सेवेची हमी शासनाने प्रथमता घेतली तर निश्चितपणे पुढील बाबी प्रकर्षाने स्विकारण्यांस जनता तयार होईल.

अजूनही ग्रामीण भागामध्येच नाही तर शहरी भागामधील जनतेमध्ये संगणकीय जागरूकता म्हणावी तेवढ्या प्रमाणांत नाही आहे. त्यामूळे या गोष्टीकडेही प्रामुख्याने शासनाने लक्ष दिल्यास या ऑनलाईन / ई-व्यवहाराला गती तर शासनाने जनताभिमूख व समाजाभिमूख राहून ग्रामीण जनतेच्या मूलभूत समस्या कोणत्या आहेत हे जाणून घेणे आणि त्यांची सोडवणूक करणे आवश्यक आहे. मूलभूत आणि पायाभूत सुविधांचा विकासचं खरी लोकसेवा हमी ठरेल.

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

# कृषी क्षेत्रात सेंद्रीय शेतीची भूमिका : काल आणि आज

**प्रा. डॉ.पी.व्ही.माने**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग
शंकरराव जावळे-पाटील महाविद्यालय , लोहारा

**१.१ गोषवारा (Abstract) :-**

*कृषीप्रधान देश म्हणून भारताला सर्व जगात ओळखले जाते. कृषीउत्पादन वाढविण्यासाठी अतिरिक्त प्रमाणात रासायनिक खते व किटकनाशके याचा मोठ्या प्रमाणात वापर होवू लागला. त्याचाच परिणाम जमीनीची सुपिकता नष्ट होवू लागली एक इंच मातीचा थर निर्माण करण्यास निसर्गाला बरीच वर्ष लागतात. केवळ मानवाच्या स्वार्थीपणामुळे व हा थर नाहीसा होण्याची शक्यता आहे म्हणून सेंद्रिय शेतीकडे वळणे अतिशय महत्वाचे झालेले आहे. कारण सेंद्रिय शेती ही एक स्थायी व पर्यावरणास अनुकूल अशी उत्पादन प्रक्रिया आहे तसेच सध्या सेंद्रिय शेती प्रमाणीकरणामध्ये भारताचा जगात दहावा क्रमांक आहे. भारत जवळपास २.२१ दशलक्ष मेट्रीक टन प्रमाणित सेंद्रिय उत्पादने प्रत्येक वर्षी पिकवतो परंतु सेंद्रिय शेतीला ६५०० वर्षापासूनचा इतिहास असला तरी सेंद्रिय शेतीला एवढी घरघर का लागली आहे याची माहिती मिळवणे आवश्यक असल्याने सेंद्रीय शेतीकडे पुन्हा वाटचाल करणे आवश्यक आहे.*

**१.१ महत्वाचे शब्द (Key Words):-** सेंद्रिय शेती, हरितक्रांती, कृषीप्रधान

**२.० प्रस्तावना :- (Introduction)**

सेंद्रिय शेतीस इतिहासाची पार्श्वभूमी आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सुरवातीच्या काळात मानव स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी जी शेती करत होते ती सेंद्रिय पध्दतीची होती. परंतु विज्ञानाने जसजसी प्रगती केली तशी शेती क्षेत्रात देखील हळुहळू प्रगती होवू लागली प्राचीन भारतातील शेतीचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे स्थानिक परिस्थितीशी सुसंगत अशा बियाणांचा वापर, मातीचा पोत टिकवून ठेवणे, शेतीची जैवविविधता जाणून भारतीय शेती ६५०० वर्षे टिकून राहिली. शेतीची शाश्वता टिकून राहण्यासाठी पर्यावरणातील पाणी, माती, जंगल यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे याची गावपातळीवरील लोकांना जाणिव होती. दक्षिण भारतात गावपातळीवर तलाव संख्या भरपूर होती त्याचबरोबर तलावाच्या माध्यमातून पाणीपूरवठ्याची व्यवस्था केली जात होती. शेतीचा हंगाम संपल्या नंतर तलावातील गाळ काढणे , तलावाची डागडुजी करणे अशी काम गावकऱ्याच्या साह्याने केली जात होती. कोरडवाहू शेतीत कोणकोणती पिके घ्यावीत हे शेतकरी अनुभवाने ठरवित असत , दुष्काळ यासारखी आपत्ती आल्यास सामाजिक व्यवस्था केली जात असे. गाव पातळीवर पेवासारखी अडचणीच्या काळात मदतीला येईल अशी धान्य साठवणूकीची व्यवस्था होती. इंग्रजाची राजवट सुरु होण्याआधीच्या जवळपास दोन हजार वर्षाच्या काळात २२ मोठ-मोठे दुष्काळ येऊन गेले.

**हरितक्रांतीच्या काळातील भारतीय शेती :-**

शेतीमध्ये प्रामुख्याने अन्नधान्याच्या पिकाचे उत्पादन घेतले जात होते परंतु नंतरच्या काळात वाढत्या लोकसंख्येचा शेती क्षेत्रावर दबाव पडू लागला, त्यामुळे जास्तीत जास्त शेती उत्पादन वाढवण्यासाठी हरित क्रांतीनंतर सुरुवात झाली. हरितक्रांतीची सुरुवात गहू व त्यानंतर तांदूळ या दोन महत्वाच्या धान्य पिकांपासून सुरुवात झाली या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावरील वापर , रासायनिक खते , पाणीपुरवठा यामुळे शेतीउत्पादनात भरघोस वाढ झाली, १९५० च्या उत्पादन दरम्यान ५.२ कोटी मेट्रीक टनाच्या आसपास होते. परंतु २०१३ मध्ये तेच उत्पादन २६.३ कोटी मेट्रिक टनावर पोहचले २०१३ मध्ये देशातील धान्य गोदामामधील अन्नधान्य, आपत्तीकाळासाठी राखून ठेवलेला अन्नसाठा सहा कोटी मेट्रीक टनावर गेला वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे धान्य आपण आतापर्यंत उत्पादित करु शकलो.

हरितक्रांतीमुळे दुष्काळ व पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीवर देखील देशातील राखीव अन्नसाठ्यामुळे आपण मात करु शकलो. अगोदरच्या काळात आपला देश अन्नधान्य आयात करीत होता परंतु हरित क्रांतीमुळे आपण अन्नधान्य निर्यात करु शकलो त्यामुळे हरितक्रांतीच्या काळातील शेती क्षेत्रात घवघवीत यश मिळाले.

**हरितक्रांतीचे दुष्परिणाम :-**

- नवीन संकरित वाणामध्ये केवळ एकाच पिढीपुरते वाण टिकून राहतात दुसऱ्या हंगामामध्ये नवे संकरीत वाण विकत घ्यावे लागतात.
- अधिक उत्पादन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खताचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शेतीचा दर्जा खालावला.
- भारतातील शेती कारडवाहू असल्याने कायम पाणीपूरवठा नसल्याने मान्सूनच्या लहरीपणाचा तडाखाही या शेतीला बसतो.
- वाढत्या उत्पादनामुळे शेतकरी शेतीतून अन्नधान्य पिकापेक्षा नगदी पिके घेण्याचे प्रमाण वाढले पावसाच्या लहरीपणामुळे एक पिकामध्ये सुरक्षितता नव्हती त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी शेवटी आत्महत्या करायला प्रवृत्त होतात.

उदा. शेवटच्या १८ वर्षाच्या काळात भारतात २ लाख ८४ हजार ६९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे यावरुन असे लक्षांत येते की भारतातील शेतीची दुरावस्था दाखवणारे हे चित्र आहे.

- ❖ पंजाब हा एके काळी हरितक्रांती तंत्रज्ञानाच्या वापरात आघाडीवर असलेला प्रांत आज भारताचा कँन्सर स्त्रोत (cancer state of india ) म्हणून ओळख झाली.
- ❖ शेतीतील रसायनांच्या अतिवापरामुळे पिण्याचे पाणी विषयुक्त झाले त्यामुळे पंजाबमधील गावागावातून कॅन्सरचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. जमीनीतील पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे त्यामुळे जमीनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे.

**सेंद्रिय शेतीपध्दतीकडे पुन्हा वाटचाल :-**

१९९९ मध्ये भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद यांच्या एका संशोधनात असे आढळून आले आहे की मानवी आरोग्य धोक्यात येवू लागले आहे कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. मज्जा संस्थेचे विविध आजार याचे प्रमाण वाढत आहे. यास रासायनिक खते , किटकनाशके कारणीभूत आहेत तात्कालीन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत देशाचा सेंद्रिय शेतीचा राष्ट्रीय कार्यक्रम सुरु केला.

**सेंद्रिय शेती :-**

१९३९ जगात सर्वप्रथम सेंद्रिय शेती हा शब्द लार्ड नॉर्थबौर्न या शास्त्राने वापरला त्यांनी **लुक टु लँड** (१९४०) पुस्तकात माती ही जिवंत असते असे लिहिले होते त्यातूनच **सेंद्रिय शेती** हा शब्द सर्वश्रूत झाला.

**"सेंद्रिय शेती म्हणजे सजीव पर्यावरणीय रचना आणि जीवनचक्रास समजून घेवून व रसायनांचा वापर टाळून केलेली शेती पध्दत होय"**

मार्च २००८ IFOAM च्या जागतिक सदस्य मंडळाने सेंद्रिय शेती म्हणजे अशी पिक पध्दती आहे ज्यामध्ये मातीचे आरोग्य, पर्यावरण आणि मानवाचे आरोग्य संभाळले जाते तसेच पर्यावरणीय प्रक्रिया जैवविविधता व स्थानिक परिस्थितीच्या धर्तीवर अवलंबुन आहे. उदा. सिक्कीम हे भारतातील सेंद्रिय शेती करणारे पहिले राज्य होय. त्या राज्यात ७५ हजार हेक्टर जमीन ही सेंद्रिय शेती खाली आली.

सेंद्रिय शेतीत प्रामुख्याने सेंद्रिय बियाणे , सेंद्रिय खते , जैविक किटकनाशके यांचा वापर केला जातो आणि शेतमालाचे उत्पादन घेतले जाते. सेंद्रिय उत्पादनाचे प्रमाणकरणाची खऱ्या अर्थाने सुरुवात १९४७-४८ साली इंग्लंड देशात झाली जगामध्ये सेंद्रिय शेतीला कायदेशीर चौकट देण्याची सुरुवात आयफॉमने केली.सेंद्रिय शेतीची पंढरी म्हणजे आयफॉम International Federation of Organic Agriculture Movement (IFOAM) होय.

शास्त्रीय दृष्टीकोन समोर ठेवून ही शेती तांत्रिक दृष्ट्या कशी करावी याची मानके बनवणारी पहिली संस्था असा या संस्थेचा लौकिक आहे याचे मुख्यालय जर्मनी देशात आहे.

**उद्देश :-**

जगामध्ये सामाजिक, आर्थिक व पर्यावरणाला सुरक्षित अशी सेंद्रिय शेतीवर आधारित धोरण आत्मसात करणे.

**आयफॉमचा इतिहास :-** सर्वप्रथम फ्रान्स देशात सुरुवात झाली सुरुवातीला पाच संस्थापक होते नव्या संस्थेचा उद्देश आंतरराष्ट्र्य सेंद्रिय शेतीची चळवळ परिषद या संस्थेच्या नावातूनच ठळकपणे स्पष्ट होते. सेंद्रीय शेतीची धोरणे , शेंती पध्दती यांचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे असे संस्थापकास वाटत होते.

**आयफॉमची रचना:-** सर्वसाधारण विधानसभा हा आयफॉमचा पाया आहे.

**सदस्य:-** जागतिक सदस्य मंडळातून दर तीन वर्षानी निवड होते.

**मंडळ:-** हे मंडळ विविध संस्थांच्या स्वइच्छेने काम करणाऱ्या कार्यकारणीमधून घटनेच्या आघाडीवर बनले आहे. हे मंडळ २२ जुन २००८ पासून कार्यरत आहे. सेंद्रिय शेती चळवळ खऱ्या अर्थात जागतिक पातळीत पोहचवण्यात त्याचा महत्वाचा वाटा आहे.

**आंतरराष्ट्रीय स्थायी सदस्यत्व :-** ECOSOC संयुक्त राष्ट्र संघाची सर्वसाधारण विधानसभेचे सभासदस्यत्व. अन्न व कृषी संस्था व संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेचे सभासदस्यत्व.

- ❖ संयुक्त राष्ट्र संस्थेची व्यापार आणि विकास परिषद यांचे सदस्यत्व.
- ❖ संयुक्त राष्ट्रसंघाचे पर्यावरण कार्यक्रम.
- ❖ अर्थिक सहकारी आणि विकास संघटना.
- ❖ International Labors Organization of the United Nation.
- ❖ International Standard of Organization (ISO).

**सेंद्रिय शेतीची प्रमुख तत्वे :-**

**Principle of health :- Healthy soil, Plants Animals, Humans : a Healthy planet.**

निरोगी माती, निरोगी वनस्पती, निरोगी प्राणी, निरोगी प्राणी, निरोगी मानव म्हणजे निरोगी गृह, निरोगी विश्वाची संकल्पना होय.

**Principle of Ecology :- पर्यावरणाचे तत्व**

**Emulating and sustaining Natural Systems**

नैसर्गिक प्रणाली कायमस्वरुपी व वाढती राहने गरजेचे आहे. पर्यावरण चांगले व निरोगी राहण्यासाठी नैसर्गिक प्रणाली समृध्द राहण्यासाठी महत्वाची असल्यामुळे प्रत्येक घटकांचे अस्तित्व व त्याची वाढ होणे आवश्यक आहे.

**नि:पक्षपाती तत्व (Principle of Fairness) :-**

Equity respect and justice for all living things सर्व सजीवांना समान न्याय व आदर मिळावयास हवा.

Principle of care **:- काळजीचे तत्व**

आज आपण चांगल्या वातावरणाचा उपभोग घेत आहोत परंतु पुढील येणाऱ्या पिढीसांठी चांगले वातावरण मिळण्यासाठी प्रदूषणविरहित वातावरण असणे गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्व :-**प्रस्तुत संशोधनात रासायनिक खंताच्या अतिवापरामूळे जमिनीचा कस कमी होवून उत्पादन कमी होऊ लागले. त्यामुळे उत्पादन खर्च वाढू लागले शेतकऱ्यांनी स्वतःच्या तसेच राष्ट्राच्या हिताचा विचार करुन सेंद्रिय शेती पध्दतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये :-**

- रासायनिक खताचा वापर टाळून जमीनीचे आरोग्य सुधारणे.
- सेंद्रिय शेती प्रमाणीकरण किंवा आयसीएस पध्दतीने शेती करणे
- सेंद्रिय शेती पध्दत विकसीत करण्यासाठी सशक्त व्यवस्था विकसित करणे.

**संशोधनाची गृहितके :-** सेंद्रिय शेती ही सभोवतालच्या पर्यावरणावर चांगला परिणाम घडवून आणणारी असावी मृदा व जलस्त्रोत ही शास्वत पध्दतीने हाताळली पाहिजेत.

**संशोधन पध्दती :-** प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या द्वितीय माहिती साधनाचा उपयोग करण्यात आला व संशोधनाच्या वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला.

**निष्कर्ष :-** देशाची लोकसंख्या वाढ ही मोठ्या प्रमाणात असल्याने सेंद्रीय शेती पध्दतीने केलेले उत्पादन अपुरे पडते.

- नैसर्गिक चक्राचा समतोल राखून प्रदुषण कमी होईल.
- शेतमालाचा दर्जा उंचावतो , पोत व चव सुधारेल.

**शिफारसी :-** शाश्वत व चिरंतन शेतीचा विकास करण्यासाठी जमिनीची सुपिकता व पोत वाढविण्यासाठी नैसर्गिक पध्दतीचा वापर करावा.

- जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करावे.
- रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर टाळावा.
- केंद्र व राज्य सरकारने सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक तेवढा निधी वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन जास्तीत जास्त शेतकरी सेंद्रिय योजनेमध्ये सहभागी होतील.
- आरोग्य व निसर्ग यांच्या समतोलासाठी सेंद्रिय शेतीचा कशी महत्वाची आहे याचे शिक्षण शालेय अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

१) नाईकवाडी प्रशांत, तांत्रिक दृष्टीकोनातून सेंद्रिय शेती : सकाळ प्रकाशन प्रा. लि. शिरोली कोल्हापुर
२) मंदार मुंडले, जमिनीची सुपिकता, सकाळ ॲग्रोवन २० जानेवारी २०१९.
३) नाईकवाडी प्रशांत, सेंद्रिय शेती : मानके आणि प्रमाणीकरण, सकाळ प्रकाशन प्रा.लि. शिरोली, कोल्हापुर दि्तीय आवृती फेब्रुवारी २०१७.
४) http;//www.ifoam.bio/en/our-offices/head-office
५) www.euractiv.com/../eu-reforms-organic
६) www.qcin.org/nabcb

# महिला सबलीकरण आणि ग्रामीण विकास

**प्रा. एस. व्ही. काशीद**
शिवाजी महाविद्यालय कन्नड

भारतीय संस्कृती नारीशक्ती ची संकल्पना पुरातन काळापासून अस्तित्वात आहे भारतात अनादी काळापासून देवीच्या विविध रूपांची उपासना करण्याची पद्धत आहे. पूर्व भारतात काली महिषासुरमर्दिनी आणि केरळमध्ये भागवती यासारख्या विविध रूपात देशभरात देवीची उपासना करण्यात येते .शक्तीचे रूप म्हणून देवीची उपासना आणि आराधना करण्यात येते. परंतु ही नाण्याची एक बाजू आहे. याच नान्याला दुसरी बाजू ही आहे जी की अंधकारमय आहे. तसं पाहिलं तर समाज व्यवस्थेच्या दृष्टीने स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत. समाजाला निरंतर प्रगतीच्या दिशेने न्यायचे असेल तर दोघांचाही सारखाच विकास होणे आवश्यक आहे. परंतु भारतासह इतर सर्व देशात अगदी इसवी सन पूर्व काळापासून तर आजपर्यंत समाजव्यवस्थेने स्त्रीला गौण स्थान दिले महिलांमध्ये पुरुषाप्रमाणेच सर्व क्षमता असताना चूल आणि मूल या पलीकडे तिला जाऊ दिले नाही आणि उत्तर वैदिक काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादून सर्व अधिकारापासून वंचित करण्यात आले

बौद्ध काळात महिलांच्या स्थिती व दर्जात वाढ झाली पण बौद्ध काळानंतर स्मृती व पुराणकाळात अनेक बंधने लादून स्त्रियांची स्थिती नको इतकी खालावली व त्यांची तुलना पशु जनावरे यांच्यासोबत होऊ लागली इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने काही सुशिक्षित मंडळी वर समतेच्या विचारांचा प्रभाव पडला आणि महिलांच्या स्थितीत सुधारणा होण्यास सुरुवात झाली .सावित्रीबाई फुले ज्योतिराव फुले यांच्या प्रयत्नाने स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली महिला शिक्षण घेऊ लागल्या तसेच त्यांच्यावर पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव पडला त्यामुळे महिलांचे सक्षमीकरण होण्यास सुरुवात झाली महिला प्रचंड संख्येने स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी झाल्या काही महिलांनी आपल्या कर्तबगारीने आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला आहे .देशाच्या स्वातंत्र्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे संविधानामध्ये अनेक हक्क व अधिकार महिलांना देण्यात आले तसेच महिलांची स्थिती व दर्जात वाढ होऊन सक्षमीकरण करणारे अनेक कायदे अमलात आले स्त्रियांमध्ये जागृती होऊन सुशिक्षित स्त्रियांचा एक वर्ग निर्माण झाला याच सुमारास आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर महिला सुधार चळवळीने वेग घेतला एकंदर भारतीय समाजामध्ये सामाजिक आर्थिक शैक्षणिक स्तरावर महिलांच्या सक्षमीकरणाचे जोर धरला गेल्या काही वर्षांपासून महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे.

आधुनिक महिला आता चार भिंती मध्ये राहत नाहीत महिलांना त्यांचे अस्तित्व गवसले आहे घर असो की ऑफिस महिला स्त्री पुरुष समानता आणि न्यायाची मागणी करत आहेत. स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली आहे तंत्रज्ञान अंतराळ विज्ञान खेळ सैन्य या सर्वच क्षेत्रात महिलांनी भरारी घेतली एवढेच नाही तर ग्रामीण आणि शहरी भागातील प्रत्येक पाच महिलांमध्ये एक महिला उद्योजक आहे .गेल्या काही वर्षापासून महिलांच्या विकासात सरकारी धोरणाचा ही मोलाचा वाटा आहे .महिलांचे यातून सामाजिक आर्थिक शैक्षणिक सक्षमीकरण होण्यास मदत झाली आहे. परंतु बराच कालावधी पर्यंत राजकीय पटलावर स्त्रिया दुर्लक्षित होत्या महिलांचा राजकारणामध्ये सहभाग वाढावा यासाठी शासनाने प्रयत्न केले 24 एप्रिल 1993 ला महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राजमध्ये ते 30 टक्के आरक्षण देण्याकरिता त्र्याहत्तरावी 74 वी घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज व्यवस्थेमध्ये ते 30 टक्के आरक्षण देण्यात आले आरक्षणामुळे अनेक महिला राजकारणात आल्या त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्याचबरोबर पक्षीय राजकारणात देखील महिलांचा सहभाग वाढला पक्षीय पातळीवर महिलांनी छाप पाडली याचाच परिणाम म्हणून हे आरक्षण महाराष्ट्रात 2011 मध्ये 50 टक्के केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे महिला मोठ्या प्रमाणामध्येराजकारणात येत आहेत त्यांचे राजकीय समीकरण होत आहे 14 एप्रिल 1993 पासून 74 व्या घटना दुरुस्ती चा कायदा म्हणजेच पंचायत राज व्यवस्था कायदा संपूर्ण देशभर लागू करण्यात आला. त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्ती पासून खऱ्या अर्थाने पंचायतराज सुरू झाले गावच्या विकासामध्येगावातील सर्व स्तरातील लोकांचा सहभाग अर्थपूर्ण व्हावा यासाठी विशेष तरतूद करून जागा व पदांमध्ये अनुसूचित जाती जमाती व मागासवर्गीय समाज यासाठी आरक्षण ठेवण्यात आले तसेच या जागा व पदांमध्ये महिलांसाठी महिलांसाठी50 टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली या माध्यमातून ग्रामीण स्त्री बचत गटाच्या माध्यमातून आत्मनिर्भर व आत्मविश्वासू बनत आहे.सत्ता संपत्ती अधिकार यामुळे तिचे जीवनमान बदलत आहे.तिच्या कलागुणांना वाव देऊन सिद्ध करण्याची संधी पंचायत राज व्यवस्थे मुळे तिला दिली आहेतर क्रांतीज्योती प्रशिक्षणामुळे आज ग्रामीण स्त्री सक्षम आहे .स्त्री म्हणून नव्हे तर माणूस म्हणून जगण्याची उमेद तिच्यामध्ये जागृत झाली आहे

कुटुंब व्यवस्थेबरोबरच समाज आणि राजकारणामध्ये तिचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे. ती पुन्हा एकदा सबल होताना आपण पाहत आहोत सावित्रीबाई फुलेंचा लढा सफल होत आहे. तिचे कष्ट सत्कारणी लागत आहेत. मागील दोन दशकातील पाहिल्यास खूप बदल घडून येत असल्याचे दिसत आहे महिला आपलेच चूल अंगण ओलांडून निवडणुकाजिंकूनजबाबदारीच्या जागा पटकावून लोक कल्याणासाठी झटत आहेत. आरक्षणाच्या जागा पेक्षा जास्त जागांवर आज महिला निवडून आल्याचे दिसून येत आहे शाळा ,अंगणवाडी ,पाणीप्रश्न, स्वच्छता अभियान ,बालविवाह, बचत गट विविध शासकीय योजना यासंदर्भात ती माहिती घेत आहे .व या संदर्भामध्ये जे काही प्रश्न आहेत त्यांची सोडवणूक करण्यामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढत आहे आपल्या कार्यकर्तृत्वाचच्योरावर सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कृतिक शैक्षणिक स्तरावर आपल्या अस्तित्वाचा ठसा ती उमटवत आहे.

**संदर्भ सुची**

1.योजना:2012

2.लोकराज्य:2006

3 .भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास प्रा: के.आर.बंग

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com